# ॥ मना सज्जना ॥

समर्थ रामदास स्वामींच्या

## 'मनाचे श्लोक'

या काव्यावरील निरूपण



लेखक: मुकुंद कर्णिक

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मना सज्जना

## मुकुंद कर्णिक

# मना सज्जना

लेखक: मुकुंद कर्णिक

मुखपृष्ठ: श्री. अशोक कर्णिक

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून त्यातील कुठल्याही अंशाचे पूर्णत: अथवा अंशत: पुनर्मुद्रण दृक, श्राव्य किंवा भाषांतर स्वरूपात वा इतर कुठल्याही प्रकारात रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

*This declaration is as per the Copyright Act 1957 read with the sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The copyright Act 1957 provides for registration of such works, although an author's copyright in a work is recognized even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and account.*

परवानगीसाठी पुढे दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा.

Mukund Karnik

Post Box 262434

Dubai, United Arab Emirates (UAE)

दूरभाष: +९७१५०५९७३८१०

वि-पत्र: karnik.mukund@gmail.com

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

इलेवन्थ फ़्लोअर, इटर्निटी, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २५ डिसेंबर २०२३

©esahity Pratishthan®2023

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हे सर्व प्रकारच्या विचारांचे मुक्तपीठ आहे. या पुस्तकांतील सर्वच मजकुराशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

## लेखकाचा परिचय



श्री. मुकुंद संतुराम कर्णिक यांचे सध्या वास्तव्य दुबई (संयुक्त अरब अमिराती) मध्ये आहे. जन्माने ते महाराष्ट्रातील कोल्हापूरचे. त्यांच्याविषयी आणखी थोडं सांगायचं तर त्यांचा जन्म सप्टेंबर १९४२ मधला. ते स्थापत्यशास्त्र अभियांत्रिकी पदवीधर असून त्याच क्षेत्रात भारतात तसेच सौदी अरेबियातील रियाध, अल-कसीम, आभा येथे आणि नंतर संयुक्त अरब अमिरातीमधील शारजा, अबु धाबी, दुबई येथे कार्यरत होते. सन २०११ मध्ये त्यांनी सेवानिवृत्ती स्वीकारली आणि दुबईमध्ये स्थायिक झाले. ते आजवर कवि, कथालेखक, लघुकादंबरीकार, अनुवादक, आध्यात्मिक ग्रंथांवरील भाष्यकार अशा विविध भूमिकांमधून साहित्याच्या प्रांगणातही वावरले आहेत. आणि अजूनही लिहीत असतात.

श्री मुकुंद कर्णिक यांच्या साहित्यकृतींची यादी पुढे देत आहोत.

(प्रकाशित):

१. बनुताई आणि बंटीबाबा हा बालकवितासंग्रह (ई-पुस्तक)

२. चार महिन्यांची रात्र - कथासंग्रह (ई-पुस्तक)

३. हाऊ'ज दॅट? - लघुकादंबरी (छापिल पुस्तक रूपात)

४. तुझ्याचसाठी - कवितासंग्रह (छापिल पुस्तक रूपात)

(मैत्री २०१२ या अनुदिनीत / मराठीसृष्टीत क्रमश: प्रकाशित):

१. संस्कृतमधील सुभाषिते मराठीत.

२. अनेक अभिजात इंग्रजी कथांची मराठीत रूपांतरे/अनुवाद


३. ओमर खय्यामच्या रुबाइयात

४. श्रीमद्भगवद्गीतेचे मराठीत श्लोकबध्द रूपांतर

५. मनाचे श्लोक - एक अभ्यास


# श्री. मुकुंद संतुराम कर्णिक यांची ईसाहित्यवरील इतर पुस्तके.

# क्लिक करताच उघडतील.




esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chaar_mahinyanchi_raatr_mukund_karnik.pdf

esahity.com/uploads/5/0/1/2/501218/banutai_aani_bantibaba_mukund_karnik_2.pdf



# अर्पण पत्रिका

आमची पिढी आता अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहे.
पुढे येणाऱ्या पिढ्यांपर्यंत समर्थांच्या मनोबोधाचा ठेवा भावार्थासह
पोचवावा म्हणून निरूपणाचा हा प्रपंच मांडला आहे.
तेव्हा येणाऱ्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून मी हे लेखन
पार्थ (पार्थ सिध्दार्थ कर्णिक) आणि कबीर (कबीर परीक्षित कर्णिक) ह्या
माझ्या नातवांना अर्पण करतो.

# भूमिका

थोर विचारवंत संत श्री रामदास स्वामी समर्थ यांच्या 'मनाचे श्लोक' या अखंड लोकप्रिय मनोबोधातील प्रत्येक श्लोकाचा सरळ अर्थ आणि त्याचे विश्लेषण अशा स्वरूपात हा अभ्यास आहे. तसे हे काव्य अगदी सरळ, सोप्या भाषेत लिहिलेले आहे. मी येथे केवळ मला त्यात काय दिसते ते लिहिले आणि त्याच्या अनुषंगाने थोडेसे विवेचन केले आहे. ही मनाच्या श्लोकांवरची टीकाटिप्पणी नाही. हा केवळ एक अभ्यास आहे इतकेच.

या अभ्यासाची सुरुवात माझे मित्र श्री मंगेश नाबर यांच्याकडून दि. ४ ऑक्टोबर २०१२ या दिवशी आलेल्या एका विपत्रीय विनंतीमुळे झाली. त्यांच्या आप्तांपैकी, आंग्लभाषेतून सर्व शिक्षण झालेल्या, एका महिलेला मराठीत, त्यातही जुन्या काळाच्या मराठीत, असलेले मनाचे श्लोक समजणे कठीण जात होते. परंतु ते समजावेत अशी तळमळ होती. एव्हाना मंगेशराव नाबर हे संपादित करत असलेल्या, निवडक वाचकांमध्येच विनामूल्य प्रसारित होणाऱ्या, 'मैत्री२०१२ अनुदिनी'मध्ये माझी 'श्रीमद्‌भगवद्‌गीता मराठीत श्लोकबध्द' ही मालिका, 'संस्कृत सुभाषितांचे समश्लोकी मराठीकरण' ही मालिका आणि इतरही बरेचसे साहित्य प्रकाशित झालेले होते. त्यामुळे मी मनाच्या श्लोकांचे समजायला सोपे जाईल अशा स्वरूपात विश्लेषण करून मैत्रीमध्ये देऊ शकेन या विश्वासाने मंगेशरावांनी तशी विनंती मला केली होती. त्यांच्या आमच्या कर्णिक परिवारावरील निखळ, निर्व्याज प्रेमामुळे त्यांची विनंती अमान्य करण्याचा प्रमाद करणे मला शक्यच नसते. त्यामुळे मी स्वीकृती कळवली आणि या अभ्यासाला सुरुवात केली. हा माझा अभ्यास मालिका स्वरूपात अनुदिनीमध्ये दि. २४ ऑक्टोबर २०१२ पासून क्रमश: येत होता. एकूण २०५ श्लोक, साधारणपणे प्रत्येक महिन्याला दहा श्लोकांचे एक 'दशक' अशा रीतीने प्रकाशित करून, पूर्ण करायचा मनोदय होता. परंतु अनेक अडचणी – काही अनिवार्य तर काही केवळ माझ्याकडून

अक्षम्य अशी चालढकल होत गेल्यामुळे उद्‌भवलेल्या- येत गेल्या आणि त्यांचे निवारण करता करता  विलंब होत गेला.

आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाला आध्यात्मिक विषयामधील सखोल ज्ञान नसते. त्याच्या अभावी अन्वयार्थ पट्‌कन लागणे कठीण जाते. त्यामुळे समर्थ जे सहजासहजी लिहून जातात त्याच्यामागे त्यांना काय म्हणायचे आहे ते आकलन होण्यासाठी आपल्याला खूप विचार करावा लागतो. मी अनेक वेळा अडखळत होतो. कित्येक वेळा संदर्भग्रंथात दिलेले विवेचनदेखील माझ्या बुद्‌धीला पटत नसायचे. त्यामुळे पुन्हा पुन्हा विचार करून आपल्याला काय पटले त्याचे विवेचन आपल्याकडून योग्य प्रकारे होत आहे का याची खात्री होईपर्यंत मी लेखन थांबवीत असे. लिहिलेले बदलून पुन्हा सुधारून लिहीत असे. मुद्रणदोष शक्य तितके काढून टाकण्यासाठी पुन:पुन: वाचून पहात असे. लेखन   पूर्ण होण्यात लागलेल्या विलंबाला हे एक मोठे कारण होते. हे सबब सांगणे नाही, कबुली देणे आहे.

असे असले तरीही या मालिकेचे लेखन करत असताना मला खूप आनंद मिळाला. दशक पूर्ण झाले की आंतरिक समाधान लाभत असे. कधी कधी एकाद्‌या श्लोकाचा अन्वयार्थ बराच वेळ समाधानकारकपणे, नीट लागत नसताना अचानक लख्कन वीज चमकावी तसे व्हायचे आणि समर्थांना त्यात काय म्हणायचे आहे ते अगदी सुसंगत स्पष्ट मनात यायचे आणि वाटायचे, ‘अरे किती सोपे होते हे. आपल्याला इतका वेळ का सुचत नव्हते?’ आणि मग भराभर लिहून होताच कमालीचा आनंद होत असे. खूप समाधान मिळाले मला ही मालिका लिहून पूर्ण झाल्यावर.  मालिकेची सांगता होत असताना समर्थांना, त्यांनीच प्रसंग, प्रेरणा, संकल्प, अवसर आणि सामर्थ्य या पाच गोष्टी जुळवून आणून माझ्याकडून हे लिहवून घेतले या जाणीवेने, अति आदरे सांष्टांग प्रणिपात करतो.

आज हा माझा अभ्यास ई-साहित्य प्रतिष्ठानच्या सहकार्याने ‘मना सज्जना’ ई-पुस्तक या स्वरूपात तुमच्यापर्यंत पोचत आहे. त्यासाठी ई-साहित्य प्रतिष्ठानचा मी आभारी आहे.

माणसाने आत्मज्ञानप्राप्तीचा मोक्ष मिळवण्यासाठी ईश्वरभक्तीच्या मार्गावर वाटचाल करताना आपले वर्तन कसे ठेवावे आणि कसे ठेवू नये याबद्दल समर्थ रामदासस्वामींनी नि:संदिग्ध, खूप सविस्तर आणि मोलाचे मार्गदर्शन त्यांच्या या काव्यात केले आहे आणि ते करताना अध्यात्माच्या गहन आणि दुस्तर सागरात अवगाहन करवून आणले आहे. त्यांनी या लेखनाला 'मनाचे श्लोक' असे नाव दिले आणि त्यात वारंवार मनाला संबोधित केले आहे खरे, पण इथे मन हे केवळ एक रूपक असून लेखन सर्व मानव जातीला उद्देशून आणि उपदेशात्मक लेखन आहे हे लक्षात घेऊन या बहुमोल उपदेशाकडे पहावे आणि तो आचरणात आणावा हे श्रेयस्कर होईल.

मनोबोधावरील भाष्य असलेले अनेक ग्रंथ आंतरजालातील संकेतस्थळांवर किंवा मुद्रित वा श्राव्य स्वरूपात उपलब्ध आहेत. माझ्या या अभ्यासात मला श्री.अनंत दामोदर आठवले (स्वामी वरदानंद भारती) आणि कै. रा.द. तथा दादासाहेब प्राणी यांची विद्वत्तापूर्ण भाष्ये, तसेच कै. श्रीमती सुषमाताई वाटवे यांची सुश्राव्य प्रवचने यांची बहुमोल मदत झाली आहे. त्यामुळे त्यांचे ऋण आहे माझ्यावर. तुम्हाला माझे भाष्य आवडले तर मी त्यांच्या ऋणातून अल्पांशाने तरी उतराई होऊ शकल्याचे समाधान मला लाभेल.

मुकुंद कर्णिक, दुबई
दूरभाष: +९७१५०५९७३८१०
वि-पत्र: karnik.mukund@gmail.com

# दशक पहिले

**गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा**
**नमू शारदा मूळ चत्वार वाचा**
**गमू पंथ आनंत तो राघवाचा ॥ १ ॥**

सरळ अर्थ:
गणेश, जो सर्व गुणांचा ईश आहे, जो सर्व निर्गुणाचा मूळ आरंभ आहे त्याला आणि चारही वाणींची मूळ आहे तिला नमन करू आणि मग श्रीरामचंद्राचा जो अंत नसलेला मार्ग आहे त्यावर वाटचाल करू.

विश्लेषण:
समर्थ सुरुवात करतात ती मंगलाचरणाने. आपण कुठल्याही नवीन कार्याची सुरुवात करण्यापूर्वी इष्टदेवतांचे स्मरण करून त्यांना वंदन करून मगच शुभारंभ करतो. ही आपली संस्कृती आहे. समर्थ रामदासस्वामीनी देखील पहिल्या श्लोकात प्रथम श्री गणेशाला आणि नंतर वाणीची देवता सरस्वती हिला वंदन केले आहे. पहिल्या ओळीत सगुण गणेशाला त्यांनी सर्व गुणांचा देव असे संबोधले आहे. देव हे त्रिगुणाच्या पलीकडील म्हणजे निर्गुण, निराकार मानले जातात. दुसऱ्या ओळीत ते म्हणतात हा गणेश म्हणजे निर्गुणाचे मूळ, म्हणजेच देवाधिदेव आहे. तेव्हा जो हा गणेश सर्व गुणांचा (सत्व, रज, तम या त्रिगुणांचा) आणि निर्गुणाचा मूळ आहे त्याला आणि चारही वाचांची (परा/घोष, पश्यंती/ध्वनी, मध्यमा/नाद आणि वैखरी/आकार अशा या चार वाणी किंवा वाचा आहेत) जननी असलेल्या सरस्वती देवीला वंदन करुया आणि मग प्रभू रामचंद्राच्या अनंतकाल अबाधित रहाणाऱ्या मार्गाने पुढे वाटचाल करू या.

**मना सज्जना भक्तिपंथेची जावे**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे**
**जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे**
**जनी वंद्य ते सर्व भावें करावे ॥ २ ॥**

सरळ अर्थ:

हे सज्जन मना, नेहमी भक्तिमार्गाने गेले म्हणजे साहजिकच परमेश्वर पावतो. तेव्हा लोकांकडून ज्याची ज्याची निंदा होईल असे सर्व काही सोडून द्यावे आणि लोकाना जे जे वंदनीय आहे ते सर्व भक्तिभावाने करावे.

विश्लेषण:

या मार्गावर जाताना, हे सज्जन मना, तुला कोणती पथ्ये पाळावयाची आहेत ? तर तू नेहमी ईश्वराची भक्ती करायला हवी म्हणजे स्वत: ईश्वर प्रसन्न होईल. इथे समर्थ मनाला सज्जन म्हणून संबोधत आहेत. म्हणजे काय? जर मन मुळातच सज्जन असेल तर त्याला चांगल्या वर्तणुकीचा उपदेश कशासाठी? तर आपण मुळातच कोणाचाही उल्लेख करताना सौजन्यपूर्ण उल्लेख करत असतो, जसे 'सद्गृहस्था, महोदय, शहाण्या माणसा', किंवा इंग्रजीतदेखील 'जंटलमन' असे म्हणतो. तसेच इथे रामदास स्वामी सर्वसामान्य माणसाला उद्देशून सज्जन मना, सज्जन माणसा, असा उल्लेख करीत आहेत. तर हे सज्जन माणसा, तू नेहमी ईश्वराची भक्ति करीत रहा म्हणजे स्वत: श्रीहरी, ईश्वर तुला नक्की प्रसन्न होईल आणि नेहमीच्या आचरणात, वागण्यात तू जी जी वर्तणूक निंदनीय असेल तिचा त्याग करून जी जी चांगली, सर्वांकडून नावाजली जाईल अशी असेल तीच वर्तणूक अगदी प्रामाणिकपणे, मनोभावे ठेव.

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा**
**पुढे वैखरी राम आधी वदावा**
**सदाचार हा थोर सांडू नये तो**
**जनीं तोची तो मानवी धन्य होतो ॥ ३ ॥**

सरळ अर्थ:

पहाट झाल्यावर श्रीरामाचे स्मरण करावे आणि नंतर श्रीरामाचे नाव उच्चारावे. सद्वर्तन थोर असते ते सोडू नये. कारण सदाचारी माणूसच सर्व जनांमध्ये धन्य होतो.

विश्लेषण:

सकाळी उठताक्षणी तू मनामध्ये श्रीरामाचे चिंतन कर आणि नंतर दिवसभरातही तुझ्या बोलण्यामध्ये सर्वप्रथम रामाचा उल्लेख असू दे. हा नित्याचा परिपाठ ठेव. सोडू नकोस. कारण असा परिपाठ ठेवणारा माणूस धन्य होतो, समाधानी होतो. इथे मला एक सांगावेसे वाटते. इस्लामधर्मीय माणूस त्याच्या बोलण्याची सुरुवात नेहमी 'बिस्मिल्ला अर्रहमानोरहीम' अशी करतो. फोड केली तर ते "ब इस्म अल्ला अल रहमान ओ रहीम" असे आहे. त्याचा अर्थ 'जो दयाळू आहे अशा अल्लाचे नाव घेऊन' असा होतो. मग आपल्याला समर्थ वैखरी (वाणीमध्ये) आधी रामाचे नाव घ्यावे असे सांगतात ते वावगे किंवा दुर्लक्षनीय वाटू नये. समर्थ पुढे सांगतात की सद्वर्तन, सत्त्याचे आचरण हे महत्वाचे आहे त्यामुळे त्यापासून आपण कधीही विचलित होऊ नये. अशा सदाचारी असलेला मानवचे जीवन हेच सार्थकी लागलेले धन्य जीवन ठरते.

**मना वासना दुष्ट कामा न ये रे**
**मना सर्वथा पापबुद्धी नको रे**
**मना सर्वथा नीती सोडू नको हो**
**मना अंतरी सार वीचार राहो ॥ ४ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, पापवासना काही कामाची नाही. निव्वळ पापबुद्धी मनात बाळगू नये. आणि नीतिमत्ता सोडू नये. सारासार विचार मनात नेहमी असायला हवा.

विश्लेषण:

हे मानवा, मनामध्ये दुष्ट वासना ठेवून कधी काही भले होत नाही. तेव्हा अशी वासना, दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी पापबुद्धी ठेवणे योग्य नाही. हेवेदावे मनात जोपासणे, दुसऱ्याच्या मालकीची वस्तू आपल्याला मिळावी अशी पापवासना बाळगणे दुष्टपणाचे आहे म्हणून तू तशी ठेवू नये. आपली नीतिमत्ता महत्वाची आहे. ती कधीही सोडू नये आणि सारासार विचार - काय चांगले म्हणून अंगिकारावे, काय वाईट म्हणून सोडून द्यावे याचा विचार - कायम मनात रहायला हवा.

**मना पापसंकल्प सोडूनि द्यावा**
**मना सत्यसंकल्प जीवी धरावा**
**मना कल्पना ते नको विषयांची**
**विकारे घडे हो जनीं सर्व ची ची ॥ ५ ॥**

सरळ अर्थ:

पापकर्म करण्याचे मनात आणू नये. नेहमी सदाचाराचाच संकल्प मनात धरावा. विषयवासना मनात असू नये कारण त्यामुळे लोकांमध्ये छी थूच होते.

विश्लेषण:

मनात पापी विचार येऊ देऊ नये. आलेच तर ते लगोलग सोडून द्यावेत. केवळ सत्याचा ध्यास धरावा आणि सद्विचारानाच मनात थारा द्यावा. संकल्प म्हणजे पुढे काय करायचे आहे त्याचा विचार. अर्थातच, समर्थ सांगताहेत की हे मानवा, तू तुझ्या पुढील क्रियांबद्दल जे ठरवशील ते केवळ शुद्ध, सत्याला अनुसरून आणि चांगलेच असावे, दुष्टबुद्धीने पापाचाराकडे नेणारे असे असू नये याची जाण ठेव. विषयवासना आणि त्यातून उपजणारे पापकर्म यांची समाजात, जनमानसात केव्हाही छी थू च होते. म्हणून तू अशा विषयवासनांची कल्पनाही मनात येऊ देऊ नकोस.

**नको रे मना क्रोध हा खेदकारी**
**नको रे मना काम नाना विकारी**
**नको रे मना सर्वदा अंगिकारू**
**नको रे मना मत्सरू दंभभारू ॥ ६ ॥**

सरळ अर्थ:

मना, क्रोध, जो खेदकारक असतो आणि कामा, वासना, ही नाना प्रकारे विकारी असते त्यांचा अंगीकार करू नकोस आणि मत्सर, भोंदूगिरी यांना देखील जवळ करू नकोस.

विश्लेषण:

समर्थ या श्लोकात सांगताहेत, हे मना, क्रोध हा खेदकारक असतो. अति क्रोध केल्याने माणसाच्या हातून अविचारी, आततायी कृत्ये घडण्याची शक्यता असते आणि अशा अविचारी कृत्यांचा अंतिम परिणाम खेदजनक होतो. तसेच काम, म्हणजे अभिलाषा हीदेखील विकारी म्हणजे मनाची चलबिचल वाढवणारी असते. अर्थात क्रोधापासून किंवा कुठल्याही गोष्टीची इच्छा, अभिलाषा धरण्यापासून मनुष्यप्राण्याला संपूर्णपणे आणि नेहमीच सुटका मिळणे अशक्यप्राय असते.

किंबहुना थोड्या प्रमाणात या भावना स्वाभाविक आहेत. फक्त हे मना, या भावनांचा सदासर्वदा, म्हणजे अगदी पदोपदी अंगिकार करू नये. कारण गीतेत सांगितल्याप्रमाणे :

विचार मनि जो करि विषयाचा, होई आधीन ।
आधिनता मग जने वासना, राग वासनेतून ॥
रागातुन जन्मतो मोह जो करी स्मरणऱ्हास ।
विस्मरणाने बुध्दि फिरे, तदनंतर हो नाश ॥

समर्थ याच्यापुढे सांगतात की, मत्सर, हेवा, दंभ म्हणजे ढोंग हे देखील अंती नुकसानकारक असतात म्हणून ते कधीही मनात जोपासू नये.

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे**
**मना बोलणे नीच सोशीत जावे**
**स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे**
**मना सर्व लोकांसि रे नीववावे ॥ ७ ॥**

सरळ अर्थ:
हे मना, तुझ्याकडे नेहमी धाडस, धैर्य असायला हवे आणि कोणी दूषणे दिली असल्यास ती सोसायची ताकत असायला हवी. आपण नेहमी नम्र भाषेत बोलावे आणि तसे बोलून लोकांचे समाधान करावे.

विश्लेषण:
या श्लोकात समर्थ समजावताहेत की हे मानवा, श्री रामाचा आनंत मार्ग अनुसरायचा असेल तर मनात सर्वप्रथम असीम धैर्य असणे आवश्यक आहे. संसारात वेगवेगळ्या प्रसंगाना धाडसाने तोंड देतो तसेच धाडस, म्हणजेच धैर्य हे परमार्थाच्या मार्गाने जाण्यामध्येदेखील काही अडचणी आल्या तर त्यांना तोंड

देण्यासाठी, त्यांचे निराकरण करण्यासाठी मनामध्ये असले पाहिजे. अन्यथा हा कठीण मार्ग क्रमणे तुला शक्य होणार नाही. या परमार्थसाधनेच्या मार्गात कोणी चेष्टा केली, अयोग्य शब्दांनी तुझा पाणउतारा केला तरी तू ते सहन करून त्याच्याकडे डोळेझाक केली पाहिजे, सोशिकपणा दाखवला पाहिजे आणि स्वत: अतिशय नम्रपणाचे वर्तन ठेवले पाहिजे. धैर्यपूर्ण, सहनशील आणि नम्र वागण्याने तू समस्त लोकांना आपलेसे करून घ्यायला पाहिजे.

**देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी**
**मना सज्जना हेची क्रिया धरावी**
**मना चंदनाचेपरी त्वां झिजावे**
**परी अंतरी सज्जना नीववावे ॥ ८ ॥**

सरळ अर्थ:

मरण पावल्यानंतर आपली सुकीर्ती मागे उरायला हवी असेच वर्तन, हे सज्जन मना, नेहमी ठेवावे. तू चंदनासारखे झिजावेस आणि सज्जन लोकांना समाधान द्यावेस.

विश्लेषण:

जन्माला आला, जगला, मेला. कुणाच्या आठवणीतही राहिला नाही असलं जीवन जगण्यात काय अर्थ? माणसानं असं जगलं पाहिजे की मेल्यानंतरदेखील त्याची सत्कीर्ति दिगंत पसरलेली रहावी. स्मारकातून, पुतळ्यातून नाही तर त्याच्या कर्तृत्वाच्या आठवणीतून तो मागे उरायला हवा. सज्जनहो, हे मनोमन समजून घ्या आणि तसं होण्यासाठीची वर्तणूक ठेवा. चंदन उगाळलं जात असताना घासून घासून झिजतं, पण उगाळणाऱ्या हातालादेखील सुगंधित करून जातं. तसं तुम्ही मनानं असावं. जगात खरोखरीचे सज्जन, गुणीजन असतात त्यांना तुम्ही आपले

आहात असे, प्रेमाचे, आदर करण्यासारखे वाटायला हवे असे वर्तन ठेवा, त्यांना आनंद, समाधान द्या.

**नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे**
**अति स्वार्थ बुद्धी नुरे पाप साचे**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे**
**न होता मनासारिखे दु:ख मोठे ॥ ९ ॥**

सरळ अर्थ:

मना, दुसऱ्याच्या धनाचा हव्यास नको. अति स्वार्थबुद्धी म्हणजे केवळ पापाची धनी असते. आणि ज्या कर्मामुळे पापाचे फळ भोगावे लागेल असे कर्म करणे खोटेपणाचे असते. आणि त्या कर्मातून मनासारखे घडले नाही तर ते खूपच मोठे दु:ख ठरते.

विश्लेषण:

हे मना, समोरच्याच्या द्रव्याची, संपत्तीची इच्छा, अभिलाषा धरू नये. स्वत:च्या कष्टाने आपल्या स्वत:च्या आणि आपल्या कुटुंबियांच्या निर्वाहापुरते आणि थोड्या दानधर्मापुरते द्रव्य मिळवलेले असेल त्यात तृप्ती मानावी. ‘माझे ते माझे आणि तुझे तेही माझे’ अशी स्वार्थबुद्धी ठेऊ नये. अशी स्वार्थ बुद्धी, अशी अयोग्य अभिलाषा पापकारक आहे. आणि ज्याच्यामुळे तुमच्या गाठी पापच साठेल आणि त्याचे दुष्परिणाम या जन्मात किंवा पुढच्या जन्मात केव्हा ना केव्हातरी भोगावे लागतील असे कर्म करूच नये. पुढच्या जन्माचे तर सोडाच, या जन्मातदेखील अशा कर्मातून तुला अपेक्षित प्राप्ती झाली नाही तर त्यामुळे जी हळहळ वाटेल तिचे दु:खही फार मोठे असेल. मग अशा दु:खाला आमंत्रण द्यायचेच कशाला?

**सदा सर्वदा प्रीति रामी धरावी**
**सुखाची स्वयें सांडी जीवी करावी**
**देहेदु:ख ते सुख मानीत जावे**
**विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ॥ १० ॥**

सरळ अर्थ:

नेहमी श्रीरामाबद्दल प्रेम बाळगावे. सुखोपभोग टाळावा. देहाला पडणाऱ्या कष्टात सुख मानीत जावे आणि मनात नेहमी सारासार विवेक भरलेला असावा.

विश्लेषण:

या श्लोकात समर्थ म्हणतात, हे मना, सतत रामाबद्दल प्रेम बाळगून त्याची भक्ति करीत रहा. स्वार्थबुद्धीची हकालपट्टी झाल्यानंतर निर्विकार होशील तर तुझ्या ठायी श्रीराम प्रवेश करतील. तेव्हा तू त्यांना तिथे कायमपणे राहू दे, त्यांचे सतत स्मरण करीत रहा म्हणजे इतर कुठले विकारी विचार तिथे शिरकाव करू शकणार नाहीत. अशा अवस्थेत ऐहिक सुखाचे तुला विस्मरण होऊ लागेल. कदाचित तू विचलित झालास आणि अशा ऐहिक सुखाची आसक्ती निर्माण झालीच तर तू स्वत: निर्धारपूर्वक तिला टाळ. किंबहुना अशा सुखातून विरक्ति, सुटकारा, याला देहदु:ख न समजता तिला सुखाची भावनाच समज आणि अशी विवेकबुद्धी, म्हणजे विरक्तीतून देहाला पडलेले कष्ट सुखमय मानून, देहसुखाचा त्याग करून श्रीरामाच्या प्रेमात रहाणे हेच योग्य आहे, असा विचार तुझ्या अंतरी भरलेला असू दे.

||श्रीराम||

## दशक दुसरे

**जनी सर्व सूखी असा कोण आहे**
**विचारे मना तूचि शोधून पाहे**
**मना त्वाची रे पूर्वसंचीत केले**
**तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ॥ ११ ॥**

सरळ अर्थ:

या जगात सगळ्या माणसांमध्ये पूर्ण सुखी कोण आहे? हे मना तू शोधून पहा. तू जे पाप वा पुण्य गेल्या जन्मात जोडले असेल त्याच्याप्रमाणे तुला या जन्मात भोग प्राप्त होतील.

विश्लेषण:

या जगातल्या सगळ्या माणसांमध्ये खरोखर सुखी अथवा पूर्णपणे सुखी कोणी आहे का याचा नीट विचार करून हे मना, तूच शोध घे. ज्याच्याकडे दात आहेत त्याला चणे नाहीत याबद्दल दु:ख असतं, ज्याच्याकडे चणे आहेत त्याला दात नाहीत याचं दु:ख असतं. धनहीनाला उपाशी पोटी दिवस काढावे लागत असल्याची काळजी आणि म्हणून दु:ख, तर धनवानाला आणखी जास्ती धन कसं मिळेल, किंवा आहे ते कोणी चोरून नेईल का याची चिंता वाटून चैन पडत नाही त्याचं दु:ख असतं. मुलं झाली असतील तर त्यांच्या भरणपोषणाची चिंता, तर मूलबाळ नसेल तर वंशाला दिवा नाही म्हणून चिंता. या नाना प्रकारच्या चिंतांमुळे अस्वस्थता असणं याला सुख तर म्हणता येत नाही ना? आणि धनहीनानं आपल्याकडे धन का नाही किंवा धनवानाने मला झोप का येत नाही? रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार ह्या व्याधी मलाच का? अश्या चिंता करणे व्यर्थ आहे. कारण हे चिंतेचे जीवन अथवा सुखाचे जीवन, दोन्ही सांप्रत आणि गत जन्मातील साचलेल्या पाप वा पुण्यामुळे त्याला मिळालेलं असतं. जीवन कसलं मिळावं

याबाबतीत आपल्याला काहीही ठरवता येत नाही. जशी करणी तशी भरणी हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

**मना मानसी दु:ख आणू नको रे**
**मना सर्वथा शोक चिंता नको रे**
**विवेके देहेबुद्धी सोडूनि द्यावी**
**विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ॥ १२ ॥**

सरळ अर्थ:

मना, तू दु:ख करू नकोस. सदैव शोक किंवा चिंता करू नये. सारासार विचारपूर्वक ऐहिक सुखाची वासना सोडून द्यावी आणि निर्विकार असा होऊन मोकळेपणाचे समाधान मिळवावे.

विश्लेषण:

समर्थ सांगताहेत, हे मना, काय भोगावं लागत आहे त्याचं दु:ख मानू नकोस. आणि ते भोगावं लागत आहे म्हणून सदैव शोक किंवा चिंता करत राहू नकोस. ज्यावर तुझा काहीही अधिकार चालू शकत नाही, जे भोग केवळ पूर्वसंचितामुळेच भोगावे लागत आहेत त्यांचे दु:ख मानून आणि त्याबद्दल शोक किंवा सतत काळजी करून तुला काय साध्य होणार आहे? अधिकाधिक यातनाच होत रहाणार ना? मग अशी चिंता वाहत रहाण्यापेक्षा 'ठेविले अनंते तैसेची रहावे' हेच श्रेयस्कर होईल. समर्थ पुढे सांगताहेत, हे मना, तू सारासार विचार करावास आणि तुला किंवा शरीराला होणाऱ्या यातनांची, दु:खांची चिंता अथवा सुखाची पर्वा करणे सोडून द्यावेस. जणू काही शरीर नाहीच अशी कल्पना करून म्हणजेच विदेहीपणे किंवा देहबुद्धी सोडून 'सुखदु:खे समे कृत्वा' जीवन जगायला लाग. त्यातच तुला सुख आणि दु:खमय ऐहिक जीवनापासून मुक्ति मिळाल्याची अनुभूती होईल.

**मना सांग पां रावणा काय जाले**
**अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले**
**म्हणोनी कुडी वासना सांडी वेगी**
**बळे लागला काळ हा पाठिलागी ॥ १३ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, रावणाचे काय झाले ते सांग बरे. त्याचे राज्य, सर्वस्व अचानक नामशेष झाले. म्हणून तू तातडीने देहविचार, विषयोपभोगाची वासना सोडून दे. कारण काळ तुझा पाठलाग करत कधी तुला गाठेल ते कळणार देखील नाही.

विश्लेषण:

पुढे समर्थ म्हणतात एवढा मोठा रावण जो बलिष्ठ होता, कमालीच्या श्रीमंत अशा लंकाद्वीपाचा राजा होता, विद्वान होता, शंकराचा भक्तही होता त्याचं काय झालं? राज्य बुडालं, भाऊ, बहीण, मुलं सगळे मारले गेले आणि स्वत: तोदेखील मारला गेला. असा सर्वनाश का व्हावा त्याचा? केवळ गर्व, सूडबुद्धी आणि तीतून निर्माण झालेली देहबुद्धी – विषयवासना जोपासल्यामुळंच. शूर्पणखेच्या विद्रूप होण्यामधून सूड म्हणून सीतेला पळवून आणले आणि तिची अभिलाषा धरली, श्रीराम असो वा आणखी कोणी, माझं काहीही वाकडं करू शकणार नाही असा अहंकार बाळगला. त्यामुळं त्याचा सर्वनाश झाला हे सत्य आहे. म्हणून हे मना, तातडीने, वेळ न दवडता विषयवासना सोडून द्यायला हवी कारण ती राहील तर काळाच्या पोटी सर्वनाश दडलेला आहे आणि तो व्हायला वेळ लागत नाही.

**जीवा कर्मयोगे जनी जन्म जाला**
**परी शेवटी काळमूखी निमाला**
**महाथोर ते मृत्युपंथेचि गेले**
**कितीएक ते जन्मले आणि मेले ॥ १४ ॥**

सरळ अर्थ:

कर्मयोग आचरणात आणल्यामुळे प्राण्याला मनुष्यजन्म प्राप्त झाला तरी शेवटी तो काळाचा घास होतोच. किती तरी थोर माणसे मरणाच्या वाटेने गेली. आणि सामान्यजन सुद्‍धा किती जन्मले आणि मेले त्याची गणतीच नाही.

विश्लेषण:

गतजन्मामध्ये जीवप्राण्याने कर्मयोग सांभाळला, म्हणजे सत्कृत्ये करून पुण्यसंचय केला त्याचं फळ म्हणून त्याला पुढला जन्म मनुष्य योनीत मिळालेला असतो. पण तरी शेवटी मनुष्यालाही काळाच्या तोंडाचा घास बनून मरण पत्करावे लागतेच. वाईट असो वा चांगला, दुष्ट असो वा सत्पुरुष, सगळे मृत्यूचे बळी होतातच. जगाच्या सुरुवातीपासून आजतागायत किती माणसं जन्मली आणि मेली असतील त्याची गणतीच होऊ शकत नाही.

**मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी**
**जितां बोलती सर्वही जीव मी मी**
**चिरंजीव हे सर्वही मानिताती**
**अकस्मात सांडूनिया सर्व जाती ॥ १५ ॥**

सरळ अर्थ:

मना, खरं पाहिलं तर ही मृत्युभूमीच आहे. जिवंत असताना सगळेजण मी मी करत जगतात आणि स्वत: अमर आहोत असे मानतात. पण अचानक सगळे नाश पावतात.

विश्लेषण:

हे जग, खरं पाहू गेलं तर, एक मृत्युभूमीच आहे. जो या जगात आला त्याला मरणे हे क्रमप्राप्त आणि निश्चित आहे. इथे येणारा कोणीही अमरपट्टा घेऊन आलेला नाही. तरीही जिवंतपणी माणूस जसे काही तो अमर, चिरंजीवी आहे असे

मानून जगत असतो. जो तो मी, मला, माझे, खरी खोटी सगळी सुखे माझ्यासाठीच आणि मी ती कायमपणे उपभोगीत रहाणार आहे असे मानतो. पण सत्य असे असते की काळ कधी येईल आणि त्याला घेऊन जाईल याची शाश्वती नसते. अचानकपणे एके दिवशी तो मरण पावतो. जगात आलेल्या सगळ्यांनाच असे अकस्मात, सगळे काही मागे ठेवून निघून जायला लागते.

**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे**
**आकस्मात तोही पुढे जात आहे**
**पुरे ना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें**
**म्हणोनी जनीं मागुता जन्म घेते ॥ १६ ॥**

सरळ अर्थ:

कोणी मरण पावला तर दुसरा त्याच्याबद्दल शोक करतो पण पुढे कधीतरी त्या शोक करणाऱ्यालाही मरणे आहेच. म्हणून माणसांची माया लावून घेतलेली नसावी कारण मायेपोटी मनस्ताप होतो आणि पुन्हा जन्म घ्यावा लागतो.

विश्लेषण:

नातेवाईक, जवळचा मित्र, लोकोत्तर पुरुष अशांपैकी कोणी मरण पावले तर आपल्याला दु:ख होते, हळहळ वाटते आणि आपण शोक करतो पण आपण स्वत: तरी कोठे अमर असतो? एक ना एक दिवस आपल्यालाही हे जग सोडून जायचेच असते. अत्यंत जवळचा, मायेचा माणूस गेला तर आपण वर्षानुवर्षे त्याचं स्मरण करत व्याकुळ होतो. पण यातून काय होतं? आपल्याच दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. मन कुठं लागत नाही. कदाचित त्यापायी आपण आपल्या नित्यकर्मात चुकाही करतो. समर्थ पुढे म्हणतात, म्हणून बाबानो, अशी माणसांची माया लावून घेऊ नका, लोभ, ममत्व ठेवू नका आणि ममत्वापोटी सतत शोकही करू नका. कारण या शोकातून मनस्तापाशिवाय काही निष्पन्न होणार नसते.

आणि या लोभापायी, ममत्वापायी मुक्ती न मिळता पुनर्जन्म घ्यायला लागणार असतो.

**मनी मानवा व्यर्थ चिंता वहाते**
**अकस्मात होणार होऊन जाते**
**घडे भोगणे सर्वही कर्मयोगे**
**मतीमंद ते खेद मानी वियोगे ॥ १७ ॥**

सरळ अर्थ:
माणसाच्या मनात भविष्याविषयी चिंता असते पण ती व्यर्थ, अनावश्यक असते. कारण जे व्हायचे असते ते अकस्मात होऊन जाते. जे भोगायला लागते तेही कर्माचे फळ असते त्यामुळे होणाऱ्या वियोगाबद्दल खेद करणे हे मतीमंद किंवा अल्पमती असण्याचे लक्षण आहे.

विश्लेषण:
माणसाच्या मनात, ‘उद्या माझे काय होणार आहे? मी जे कार्य करतो आहे त्यातून मला फल मिळेल की नाही? कार्य पुरे होईल की नाही? माझी मुलेबाळे सुखात रहातील की नाही?’ या, वा अशा प्रकाराच्या असंख्य चिंता मूळ धरून असतात. बहुतेक वेळा त्या चिंतांपायी तो आपले स्वास्थ्यही बिघडवून घेतो. पण अशी चिंता वहाणे अगदी व्यर्थ, निष्कारण, अनावश्यकच असते कारण या गोष्टींवर त्याचे स्वत: चे काही नियंत्रण नसतेच. जे काही व्हायचे असते ते आपोआप होऊन जाते. आणि होऊन जाते तेही कसे? तर त्या माणसाच्या चांगल्या वा वाईट कर्मानुसार फलस्वरूप होऊन. तेव्हा अशा फलिताचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार न करता अपेक्षित फळ नसल्याबद्दल खेद करणे हे बरे नव्हे. हे ज्याला काळात नाही तो सामान्य बुद्धीचा, किंवा दुसऱ्या शब्दात अल्पमती, मतीमंद असतो.

**मना राघवेवीण आशा नको रे**
**मना मानवाची नको कीर्ति तू रे**
**जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणे**
**तया वर्णिता सर्वही श्लाघ्यवाणे ॥ १८ ॥**

सरळ अर्थ:
हे मना, प्रभू रामचंद्राशिवाय इतर कुठे आशा ठेवू नको अथवा इतर कोणा मानवाची कीर्ती गाऊ नको. ज्याचे वर्णन वेद, शास्त्रे, पुराणे करतात त्याचेच तू स्मरण, वर्णन करावे हे केव्हाही योग्य, स्तुत्य असेल.

विश्लेषण:
या जगात मानव आपल्याला यश मिळावं, आयुष्य सुखी व्हावं, इच्चा आकांक्षा पुऱ्या व्हाव्यात म्हणून आशा करत असतो. किंबहुना असं म्हणतात की आशा असते म्हणूनच माणूस जिवंत रहात असतो. ही आशा माणूस कोणापासून ठेवतो? कोणीतरी जो आपलं भलं करू शकेल अशा व्यक्तीपासून. आपलं उच्च शिक्षण पुरं करायला मदत करावी म्हणून वडिलांवर, प्रमोशन मिळावं म्हणून वरिष्ठावर, मनाप्रमाण निवडलेला जोडीदार वडलांकडून अप्रूव्ह करवून घेण्यासाठी आईवर, अगदी निवडणुकीत उमेदवारीचं तिकीट मिळावं म्हणून पक्षप्रमुखावर अशा वेगवेगळ्या व्यक्तींवर तो आशा लावून असतो. परंतु या सर्वांपेक्षा त्या परमेश्वरावर, श्रीरामावर आशा ठेवणेच योग्य आहे. कारण या सगळयांकडून तुमचं काम करवून घेणारा तो श्रीरामच असतो. म्हणून इतर कुणा माणसाची स्तुतीस्तोत्रे गाण्यापेक्षा, हे मना, तू राघवाची स्तुती कर. ज्या राघवाची कीर्ति, महती वेद, शास्त्र, पुराणातही वर्णन केलेली असते त्या राघवाचे स्मरण, काया वाचा मने करणे सर्वथैव योग्य आणि स्तुत्य असते.

**मना सर्वथा सत्य सांडू नको रे**
**मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे**
**मना सत्य ते सत्य वाचे वदावे**
**मना मिथ्य ते मिथ्य सोडून द्यावे ॥ १९ ॥**

सरळ अर्थ:

मना, सत्याची कास सोडू नको आणि खोटेपणाची तरफदारी करू नको. सत्यवचनच बोलावे आणि जे जे खोटेपणाचे असेल ते ते सर्व सोडून द्यावे.

विश्लेषण:

हे मना, सत्याची भूमिका कधी सोडू नको आणि सदैव लबाडीची, खोटेपणाची किंवा निरर्थक असेल आशा गोष्टींची तरफदारी करू नकोस. समर्थ हे सांगतात तेव्हा त्याना 'नरो वा कुंजरो वा' ज्ञात नव्हते किंवा मान्य नव्हते अशातली गोष्ट नाही. किंबहुना ते राजकारणाचे सखोल ज्ञान असलेले संत होते तेव्हा सत्य पक्षाची बाजू घेताना कधीतरी असत्याचा आधार घेणेही आवश्यक आणि म्हणून क्षम्य ठरते हेही त्याना अवगत असलेच पाहिजे. म्हणून तर ते 'सर्वथा' असा शब्दप्रयोग इथे करतात. त्यामुळे सर्वथा, म्हणजे नेहमीच खोटे बोलू नये, किंवा खोटेपणाचा पाठपुरावा करू नये अशी सावधगिरीची भूमिका त्यांनी इथे घेतली आहे. आपल्या प्रामाणिक बुद्धीला सत्य वाटले असेल तर ते सत्यच बोलावे आणि आपल्याला एखादी गोष्ट असत्य असल्याची मनापासून खात्री पटली असेल तर आपल्या बोलण्यातून तिचे पुष्टीकरण करू नये असे ते या श्लोकात सांगताहेत.

**बहु हिंपुटी होईजे मायपोटी**
**नको रे मना यातना तेचि मोठी**
**निरोधे पचे कोंडिले गर्भवासी**
**अधोमुख रे दु:ख त्या बाळकासी ॥ २० ॥**

सरळ अर्थ:
आईच्या पोटात कोंडल्यामुळे गर्भाला यातना असतात. अशा गर्भवासाच्या मोठ्या यातना हे मना, सहन कराव्या लागू नयेत. गर्भाशयात सर्व बाजुंनी दाबाखाली असलेल्या त्या बालकाला डोके खाली ठेवून (अधोमुख) रहाण्याचे दु:ख सहन करावे लागते.

विश्लेषण:
या जगात जन्मल्यानंतरच यातना भोगाव्या लागतात हे खरे नाही. हे मना, आईच्या पोटात असल्यापासूनच यातनांचा भोग सुरु होत असतो. गर्भाशयाच्या अगदी छोट्याश्या जागेत भरलेल्या द्रवात बालकाला वावरावे लागते. त्याला स्वत:च्या हालचालींवर काहीही नियंत्रण ठेवता येत नाही. आकाराने वाढत असताना ती जागा अपुरी पडते तसा चाहु बाजूनी दाब वाढतो. एव्हढंच नाही तर डोकं खाली असलेल्या अवस्थेत त्याला राहावं लागतं. (अशा यातना भोगून जगात आल्यानंतर पुन्हा नाना प्रकारच्या व्याधी, चिंता, दु:खं, ही सहन करावी लागतातच आणि यातून देहपीडा होतेच होते. तर मग अशा या देहाची लालसा, जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून पुन्हा पुन्हा या सगळ्याना तोंड देत जगण्याची लालसा कशासाठी करायची? म्हणून हे मना, या फेऱ्यात पडायला लागू नये म्हणून देहासक्ती सोडून दे आणि श्रीरामाच्या भक्तीचा मार्ग, जो अनंताकडे घेऊन जाणारा आहे, मुक्ती मिळवून देणारा आहे त्याच्यावर तू वाटचाल कर.)
||श्रीराम||

## दशक तिसरे

**मना वासना चूकवी येरझारा**
**मना कामना सांडी रे द्रव्यदारा**
**मना यातना थोर हे गर्भवासी**
**मना सज्जना भेटवी राघवासी ॥ २१ ॥**

सरळ अर्थ:

मना, वासनांमुळे लागणारा जन्ममरणाचा फेरा चुकव. धनाचा लोभ, स्त्रीचा मोह या कामना सोडून दे. गर्भवासातल्या यातना मोठ्या कठीण असतात. हे मना तू जीवाची, म्हणजेच आत्म्याची राघवाशी भेट घालून दे.

विश्लेषण:

तेराव्या आणि विसाव्या श्लोकांमध्ये समर्थांनी जे सांगितले त्याचेच हे पुढे नेणारे विवेचन आहे. इथे पहिल्या तीन चरणांमध्ये ते जन्ममरणाच्या फेऱ्यातून वाचायचे असेल, तर विषयासंबंधीच्या म्हणजे सर्वसाधारणपणे धन दौलत आणि स्त्रीसमागम अशा ऐन्द्रीय वासना, कामना टाळाव्यात असा उपदेश मनाला करताहेत. गर्भवासामध्ये जीवाला किती यातना भोगाव्या लागतात ते विसाव्या श्लोकात सांगितले आहेच मग अशा यातना वारंवार भोगायला लावणाऱ्या पुनर्जन्म, पुनर्मरण या चक्रातून सुटका होणे हवे असेल तर या साऱ्या वासना, कामना, मोह टाळून राघवाला भेटले पाहिजे. हे भेटणे म्हणजे शारीरिक भेट नव्हे तर आत्म्याने श्रीरामाशी एकरूप होऊन जाणे. श्रीराम ज्यांचा अवतार आहे ते भगवान विष्णू, म्हणजेच श्रीकृष्णभगवान भगवद्‌गीतेच्या चौथ्या अध्यायातील ९ आणि १० या श्लोकात म्हणतात “मला जे लोक येऊन मिळतात त्यांना पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. मोह, माया टाळून शुद्‌ध बनलेले असे कित्येक ज्ञानी जीव मला येऊन मिळाले आहेत”.

दिव्य असे मम जन्म, मर्म हे जाणवती ज्याला
पुर्नजन्म ना लागे त्याला, मिळे येउनी मला ९
माया भय अन क्रोध त्यागुनी ठेवुनि विश्र्वास
विशुध्द बनलेले ज्ञानी मज आले मिळण्यास १०

तात्पर्य असे की हे मना, ऐन्द्रीय वासना, कामना, मोह, अभिलाषा टाळलीस तर जन्ममरणाच्या यातनादायक फेऱ्यातून सुटका मिळेल आणि मग तू श्रीरामाला जाऊन मिळशील.

**मना सज्जना हित माझे करावे**
**रघूनायका दृढ चित्ती धरावे**
**महाराज तो स्वामि वायूसुताचा**
**जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥ २२ ॥**

सरळ अर्थ:

हे सज्जन मना, तू माझे हित व्हावे म्हणून रघुनायकाचे अंत:करणात ठामपणे स्मरण कर. तो रामराजा, त्रिलोकाचा नाथ, पवनपुत्र हनुमानाचा स्वामी आहे. सर्व जनांचा उद्धारकर्ता आहे.

विश्लेषण:

समर्थ मनाला उद्देशून सांगतात की हे मना, जीवन सफल होण्यासारखे माझे हित तू करावेस. मी जन्माला आलो, जगलो आणि मेलो यात माझे काहीही हित नाही. किडामुंगीचंही जीवन असं असतं, मग मी मनुष्यजन्माला येऊन उपयोग काय? माझ्यात आणि त्यांच्यात फरक काय राहिला? असेच जन्मामागून जन्म घेत माझ्या आत्म्याला, म्हणजेच मला फिरत रहायला लागेल. तसे होऊ नये यातच माझे हित आहे. ते साधण्यासाठी तू काहीतरी करायला पाहिजे आहे. आणि ते काहीतरी म्हणजे काय? वरच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे माझी राघवाशी भेट

होणे. त्यासाठी माझ्या अंत:करणात त्या राघवाचा, रघुनायकाचा शिरकाव आणि ठामपणे निवास व्हायला हवा. तो तसा होण्यासाठी कामना, वासना, मोह माया इत्यादींचा त्याग तू करावास. तरच तो रघूनायक, जो हनुमन्ताचा स्वामी आहे, जो तीनही लोकांचा अधिपती, महाराज आहे, जो या त्रैलोक्यातील जनांचा उद्धार करू शकतो तो, परमेश्वर, माझ्या अंत:करणात दृढपणे वास्तव्य करेल आणि माझा उद्धार होईल. यात माझं हित आहे.

**न बोले मना राघवेवीण काही**
**जनी वाउगे बोलता सूख नाही**
**घडीने घडी काळ आयुष्य नेतो**
**देहांती तुला कोण सोडू पहातो ॥ २३ ॥**

सरळ अर्थ:

मना, राघवाच्या नावाशिवाय दुसरे काही बोलू नकोस. अधिकउणे, अयोग्य बोलण्यामध्ये काही मजा नसते. काळाच्या ओघात आयुष्य तासातासाला कमी होत जात असते. आणि मग मेल्यानंतर तुला मोक्ष देणारा कोण आहे?

विश्लेषण:

मना, अरे मुखातून निघण्यासाठी रामानामाशिवाय इतर कुठलेही नाम योग्य नाही. श्रीराम जो परमेश्वर आहे त्याच्या नामाचे सतत स्मरण चिंतन करत राहिले म्हणजे आपोआपच वाचेतूनही त्याचाच उच्चार होणार हे ओघाने आलेच. आणि तसे झाले म्हणजे वावगा शब्द बोलला जाणे आपोआपच होणार नाही. कोणाची निंदानालस्ती, क्रोधापोटी अपशब्द, निराशेने हताश उद्गार हे सगळे वावगे, म्हणजेच टाळावे असे उच्चारण असते. आणि अशा वावग्या बोलाने होते काय? बोलणारा स्वत:ची मन:शांती बिघडवून घेतोच, शिवाय ज्याच्याविषयी बोलले आहे त्याच्या अंत:करणात कटुता वाढते. यात कुणाला सुख मिळाले? कुणालाच नाही. मग

मुळातच  असे वावगे बोलून आपली वाचा विटाळून घ्या कशाला? देवाने दिलेले आयुष्य काही कायमचे नाही. एक ना एक दिवस ते संपणार आहेच. तासातासाला, किंबहुना अगदी क्षणाक्षणानी हे आयुष्य कमी कमी होत जात असते आणि मरणाची वेळ जवळ येत असते.  तेव्हा असे हे तोटके आयुष्य वावगे बोलून अर्थहीन का करायचे? मरण कुणालाच चुकत नाही. सगे, सोयरे, आप्त, मित्र कोणीही तुझ्या मरणानंतर तुझ्याबरोबर असणार नसतात. असणार असतो कोण? तर श्रीराम. तोच तुला या नश्वर देहातून निघाल्यानंतर मोक्षापर्यंत नेणार असतो हे समजून घे आणि श्रीरामाचे नामस्मरण करीत रहा.

**रघूनायकावीण वाया शिणावे**
**जनासारिखे व्यर्थ का वोसणावे**
**सदा सर्वदा नाम वाचे वसो दे**
**अहंता मनी पापिणी ते नसो दे      ॥२४॥**

सरळ अर्थ:

रामाला सोडून जगणे म्हणजे केवळ फुकापासरी वाया गेलेले शिणणे! असे हे सामान्य माणसाप्रमाणे निरर्थक, कुचकामाचे जगणे व्यर्थ असते. तेव्हा तुझ्या वाणीमध्ये सदोदित रघुनायकाचे नाव येऊ दे आणि मनामध्ये अहंकार बाळगण्याचे पाप कधी करू नकोस.

विश्लेषण:

समर्थ या श्लोकात सांगताहेत की हे मना, तू जे काही करतो आहेस त्यात श्रीरामाचे स्मरण नसेल तर ते केवळ वाया गेलेले कार्य आहे असे समज. हे जे काम मी करतो आहे ते मी करत नाही तर श्रीरामाच्या कृपेमुळे माझ्या हातून होत आहे अशी भावना ठेऊन तू जे काम करशील ते योग्य असेल. अर्थात ज्यात भगवंताचे, म्हणजेच श्रीरामाचे स्मरण आणि ते त्याच्यामुळेच  होत आहे अशी

भावना असते असे काम दुष्कर्म असूच शकणार नाही. म्हणजे पर्यायाने तू सत्कर्मच करावेस असेच ते इथे सुचवतात. आणि असे सत्कर्मच सतत करणे हे येरागबाळ्याचे काम नोहे. सामान्य माणसे संसारासाठीची, योगक्षेमासाठीची नित्यकर्मे करत असतातच पण त्यात भगवंताचे स्मरण करण्याचे, भगवंतालाच त्या कर्मांचा कर्ता करविता असल्याचे श्रेय देण्याचे त्याना कळत नसते तर तसे तू करू नकोस, सामान्य जनांच्या ओसंडल्या प्रवाहासमवेत वाहत जाऊ नकोस. तुझ्यामुखी सतत त्या श्रीरामाचे नाम असू दे. सदोदित, म्हणजे त्रिकाळ, अष्टोप्रहर हे नाम तुझ्या वाणीवर येत राहू दे. आणि मीच हे काम कोणाच्याही मदतीशिवाय करतो आहे, माझ्याखेरीज कोणी हे करू शकत नाही, असा अहंकार तुझ्यामध्ये बाळगू नकोस कारण असा गर्व, अहंकार हा पापमय असतो.

**मना वीट मानू नको बोलण्याचा**
**पुढे मागुता राम जोडेल कैचा**
**सुखाची घडी लोटता सूख आहे**
**पुढे सर्व जाईल काही न राहे ॥२५॥**

सरळ अर्थ:

हे मना, मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे त्याचा वीट मानू नकोस. कारण वेळ पुढे निघून गेली तर तुझ्या आयुष्याशी श्रीराम कसा जोडला जाईल? सुखाचा काल संपल्यानंतरदेखील सुख मिळू शकते पण अखेरीस सर्व काही संपायचेच आहे आणि काही मागे उरणार नाही हे ध्यानी घे.

विश्लेषण:

या श्लोकात समर्थ सांगताहेत की हे मना, मी जे वरचेवर तुला सांगतो आहे की रामाचे सदा सर्वदा, नेमाने नामस्मरण कर, त्या राघवाला आठव, त्याचे नाव जिभेवर असू दे, त्या माझ्या बोलण्याचा, वारंवार सांगण्याचा वीट येऊ देऊ नकोस

आणि विटून जाऊन कंटाळा करू नकोस. कंटाळा केल्याने तुझे त्याकडे दुर्लक्ष होईल आणि मग त्या रामाला तुझ्या मागील, पुढील कुठल्याच आयुष्याशी देणे घेणे, लागाबांधा उरणार नाही. आता इथे कदाचित तुम्ही म्हणाल, कंटाळा करण्यापूर्वी मी रामनाम घेत होतोच. त्याचं काय? आता थांबवलं तर माझ्या त्या मागच्या कृतीचा मला फायदा मिळायला नको का? मग रामाला माझ्याशी देणेघेणे का उरू नये? तर असं बघा, तुम्ही प्रामाणिक व्यवहार करून पैसे मिळवीत आहात, तुम्हाला त्यामुळे फायदा मिळतो आहे. पण कंटाळा येऊन तुम्ही तो व्यवहार करण्याचे थांबवलेत तर काय होईल? हळू हळू मिळालेला फायदा उणे होत होत हातात काहीच रहाणार माही. म्हणजे मागचेही गेले आणि पुढे तर काही मिळायचे नाही. अशी अवस्था तुमच्या रामनामविरहित आयुष्याची होईल. म्हणून म्हटले आहे, पुढे मागुता राम जोडेल कैचा? पुढे समर्थ म्हणतात, सुखाची घडी लोटता सूख आहे. सुखामागून दु:ख येणे हा नियत क्रमच आहे. त्या दु:खानंतर पुन्हा सुखाची वेळ येईल आणि सुख मिळेल. पण हे किती दिवस? तुझं आयुष्य सरल्यावर पुढं सुख काय, दु:ख काय? सारेच अखेरीला संपणार आहे. तेव्हा हे मना, पुन्हा पुन्हा सांगतो ते ऐक आणि श्रीरामाच्या, म्हणजेच परमेश्वराच्या नामजपाला कंटाळू नकोस. सदासर्वदा त्याचे स्मरण करत रहा.

**देहेरक्षणाकारणे यत्न केला**
**परी शेवटी काळ घेऊन गेला**
**करी रे मना भक्ति या राघवाची**
**पुढे अंतरी सोडि चिंता भवाची ॥ २६ ॥**

सरळ अर्थ:

शरीर टिकवण्यासाठी कितीही प्रयत्न केला तरी शेवटी मरण हे येणारच असते. तेव्हा हे मना, तू राघवाची भक्ती करत रहा आणि जन्म, आयुष्य, संसार, मरण, जग, सगळ्याची चिंता करणे तू सोडून दे.

विश्लेषण:

मागील श्लोकात समर्थांनी म्हटलं की आहे पुढे, म्हणजे भविष्यात  पुढे काहीच उरणार नाही. त्याचाच पुढे या श्लोकात ते विस्तार करताहेत. ते म्हणतात, अरे आयुष्य संपणार तेव्हा सुख कुठले आणि दु:ख कुठले. सगळेच तर  नाहीसे होणार आहे. मग शरीर व्याधीग्रस्त होऊन त्रासात असले तर तू जे त्याचा बचाव करण्यासाठी, त्याला आराम मिळण्यासाठी म्हणून प्रयत्न करतोस त्यांचा उपयोग काय? वेळ आली की मृत्यू येऊन ते शरीर घेऊन जाणारच आहे. तू काही त्याला “बाबारे, अजून थोडे सुख भोगायचे बाकी राहिले आहे तरी तू आत्ताच नेऊ नकोस” असे म्हणून थांबवू शकत नाहीस. तुझ्या हातात ते काहीही नाही. मग तू विनाकारण चिंता करण्यापेक्षा राघवाची भक्ती करण्यात काल व्यतीत करावा आणि जे काय व्हायचं असं अदृष्टात आहे त्याची चिंता केवळ त्याच्यावर सोडून द्यावी हेच योग्य होईल.

**भवाच्या भये काय भीतोस लंडी**
**धरी रे मना धीर धाकासि सांडी**
**रघूनायकासारिखा स्वामि शीरी**
**नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥२७॥**

सरळ अर्थ:

मना, अरे  या संसाराच्या, जन्ममरणाच्या फेऱ्याला तू घाबरतोस का असा भेकडासारखा? धीर धर आणि हा मरणाचा धाक सोडून दे. अरे ज्याला कोपिष्ट दंडधारी यमाबद्दल जाणीव आहे आणि जो त्या यमराजाची उपेक्षा करीत नाही असा हा रघुवंशाचा नायक असलेला रामासारखा अधिकारी पुरुष तुझ्या मस्तकावर वरदहस्त धरून आहे.

विश्लेषण:

मागील श्लोक, हा श्लोक आणि पुढला श्लोक असे तिन्ही एकत्रितपणे वाचले तर अर्थ स्पष्ट होतो. समर्थ म्हणतात, हे मना, भवाची म्हणजे जन्म, आयुष्य, संसार, मरण यांची सगळ्याची चिंता करणे थांबवायचे न सोडता भवसागराची तू एकाद्या भेकड माणसासारखी भीती का घेतो आहेस? भव हा तर सर्वांच्या नशिबी लिहिलेला आहे. कुणाला चुकलेला नाही. मग जे होणे अनिवार्य आहे, त्याची भीती कशासाठी बाळगायची? तेव्हा तू धीर धर आणि हा जो मरणाचा, यमराजाचा धाक तुला बसलेला आहे तो सोडून दे. अरे, ज्याला क्रोधाविष्ट, दंडधारी यमराजाच्या सामर्थ्याची पूर्ण कल्पना आहे आणि म्हणूनच त्याची उपेक्षा जो करत नाही असा रघुकुलाचा नायक प्रत्यक्ष श्रीराम तुझा पाठीराखा, स्वामी आहे. मग तू भीति, धाक का बाळगावा?

**दीनानाथ हा राम कोदंडधारी**
**पुढे देखता काळ पोटी थरारी**
**मना वाक्य नेमस्त हे सत्य मानी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२८॥**

सरळ अर्थ:

हा धनुर्धारी राम दीनांचा नाथ आहे. त्याला समोर पाहून प्रत्यक्ष काळ देखील थरथर कापतो अशी स्थिती आहे. असा हा श्रीराम दासांचा अभिमान बाळगतो आणि म्हणून त्यांची उपेक्षा करत नाही हे माझे वाक्य सत्य आहे याची तू खात्री बाळग.

विश्लेषण:

मागील श्लोकावरून समर्थ पुढे म्हणताहेत, हा रघुकुलनायक राम स्वत: कोदंडधारी म्हणजे धनुष्यधारी आहे आणि दीन अनाथांचा नाथ आहे, शरणागतांचा रक्षणकर्ता

आहे, त्याची सेवा करणाऱ्या दासांचा पालनकर्ता आहे. त्याला समोर ठाकलेला पाहून प्रत्यक्ष काळ, म्हणजे यमराजच पोटात गोळा येऊन थरथर कापतो. मग असा हा ताकदवर श्रीराम तुझ्या मस्तकावर अभयाचा हस्त धरून असताना तुला भीती का वाटावी? हा राम आपल्या दासांचा, आपल्या निष्ठावान सेवकांचा अभिमान बाळगतो म्हणूनच तो त्यांची कधी उपेक्षा करीत नाही. त्यांच्या गरजांकडे ध्यान ठेवतो. त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत नाही हे माझे वाक्य जे मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे ते सत्य आहे हे ध्यानात घे.

**पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे**
**बळे भक्तरीपूशिरी कांबि वाजे**
**पुरी वाहिली सर्व जेणें विमानी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२९॥**

सरळ अर्थ:

राघवाचे ब्रीद असे आहे की तो आपल्या भक्ताच्या शत्रूला शिक्षा करण्यासाठी ताकद वापरण्यात हयगय करीत नाही. हे त्याचे ब्रीद पदोपदी सतत समजून येते. त्याचप्रमाणे आपल्या भक्तांच्या सुखाकडे देखील त्याचे पूर्ण लक्ष असते हे देखील त्याने लंकेतून अयोध्येला परतताना सारी वानरसेना आपल्या पुष्पक विमानातून नेली होती यावरून दिसून येतेच. असा हा राम आपल्या दासांविषयी अभिमान बाळगतो आणि कोणाची उपेक्षा करत नाही.

विश्लेषण:

श्रीराम आपल्या सेवकांकडे आपलेपणाच्या भावनेने पहातो. लहानातल्या लहान वानरापासून ते शक्तिशाली हनुमानापर्यंत सगळे त्याच्याशी निष्ठा, भक्ती ठेवून असतात, त्याची मनोभावे सेवा करतात. याचे गमक निश्चितपणे राम त्यांच्यावर करीत असलेल्या प्रेमातच आहे. अन्यथा स्वत: वनवासी असणारा राम तेव्हा

त्याना काय देणार? रामाच्या कार्यात स्वत:च्या प्राणांचीही पर्वा न करता बलशाली राक्षसांशी लढायला जाण्याचे धाडस त्या वानरांमध्ये आले कोठून. रामाचे ब्रीद आपल्या सेवकांची, भक्तांची पूर्णपणे काळजी वहाणे आणि भक्ताच्या शत्रूवर वार करून भक्ताला वाचवणे हे आहे. रामाने आश्रयाला आलेल्या सुग्रीवासाठी वालीला ठार मारले. लंकाविजयानंतर अयोध्येला परत जाताना रामाने सारी वानर सेना पुष्पक विमानातून आपल्या बरोबर नेली. असा हा श्रीराम आपल्या निष्ठावान सेवकांचा अभिमान बाळगतो. त्यांची सर्वतोपरी काळजी घेतो. कुणाचीही उपेक्षा करत नाही.

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३०॥**

सरळ अर्थ:

जो ताकदवर आहे, सामर्थ्यवान आहे अशा व्यक्तीच्या सेवकाकडे वाकडा डोळा करून पहाणारा या संपूर्ण विश्वात कोणी असू शकणार नाही. ज्याची लीला, ज्याचा पराक्रम स्वर्ग, पृथ्वी, पाताळ या तीनही लोकात वर्णिली जाते तो श्रीराम आपल्या दासाबद्दल अभिमान बाळगणारा आहे. दासाची उपेक्षा तो कधीही करणार नाही.

विश्लेषण:

हे मना, श्रीरामासारख्या सामर्थ्यवान पुरुषाचा तू सेवक असशील तर याची खात्री बाळग की तुझ्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकेल असा कोणी माणूस, प्राणी, या पृथ्वीवरच काय, जिथेजिथे भूमी असेल अशा कुठल्याही ग्रहावर, म्हणजे संपूर्ण भूमंडळात असू शकणार नाही. इतके अभय श्रीराम हा समर्थ स्वामी, तुझा धनी तुला देतो आहे. केवळ अशा या भावनेनेसुद्धा तुझ्या अंगी हत्तीचे बळ संचारेल मग यापरते आणखी काय हवे? तेव्हा लक्षात ठेव, ज्याच्या लीलांची, पराक्रमाची,

औदार्याची, सौहार्दाची, गाथा त्रैलोक्यात  गाइली जाते तो हा दासाचा अभिमान बाळगणारा राम कुणाची आणि खास तर त्याच्या सेवक भक्तांची उपेक्षा, त्यांच्याशी प्रतारणा कधीही करणार नाही.
||श्रीराम||

## <u>दशक चौथे</u>

**महासंकटी सोडिले देव जेणे**
**प्रतापे बळे आगळा सर्वगूणे**
**जयाते स्मरे शैलजा शूलपाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३१॥**

सरळ अर्थ:

ज्यांनी पराक्रम करून देवांना संकटातून सोडविले, ज्याचे स्मरण प्रत्यक्ष शिव आणि पार्वती देखील करतात असा हा श्रीराम आपल्या दासाबद्दल अभिमान बाळगणारा आहे. दासाची उपेक्षा तो कधीही करणार नाही.

विश्लेषण:

विश्वामित्र ऋषीच्या विनंतीवरून दशरथ राजाने रामाला आज्ञा केली की ऋषीमुनींच्या तपात विघ्न आणणाऱ्या राक्षसांचा नाश करावा. त्याप्रमाणे राम आणि लक्ष्मण विश्वामित्रांच्या बरोबर गेले आणि त्यांनी ताटका या राक्षसप्रवृती अंगिकारलेल्या दुष्ट यक्षिणीचा वध केला, मारीच, सुबाहु इत्यादींचा बंदोबस्त करून तपोभूमी निर्विघ्न केल्या, राम-रावण युद्धानंतर रावणाने कैदेत टाकलेल्या कित्येक देवांची सुटका केली. अशा या महाप्रतापी रामाच्या आगळ्यावेगळ्या गुणांची जाण प्रत्यक्ष त्रिशुलधारी शिव आणि हिमालयकन्या पार्वती या दोघांनीही ठेवली असून ते दोघेही रामाचे म्हणजे तो ज्याचा अवतार आहे त्या विष्णूचे नित्य स्मरण करतात. रामाच्या आगळ्यावेगळ्या गुणांमध्ये आपल्या सेवकाचा, भक्ताचा सार्थ अभिमान बाळगण्याचा गुणही आहे आणि त्यामुळेच तो आपल्या सच्च्या भक्ताची, दासाची उपेक्षा कधी करत नाही.

**अहल्या शिळा राघवे मुक्त केली**
**पदी लागता दिव्य होऊनि गेली**
**जया वर्णिता शीणली वेदवाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३२॥**

सरळ अर्थ:

शिलास्वरूप झालेल्या अहिल्येची राघवाने मुक्तता केली. त्याचा केवळ पाय लागल्यावर त्या शिळेतून पूर्ववत मानवरुपात आलेली अहिल्या दिव्यस्वरूप मिळवून गेली. अशा या रामाचे वर्णन करता करता वेदवाणीदेखील थकून गेली तो हा श्रीराम आपल्या दासाबद्दल अभिमान बाळगणारा आहे. दासाची उपेक्षा तो कधीही करणार नाही.

विश्लेषण:

गौतम ऋषीची पत्नी अहल्या ही रूपसुंदर होती. पतिव्रताही होती. पण इंद्राने तिचा मोह धरला आणि गौतम ऋषी आश्रमात नाहीत असे पाहून त्यांचे रूप धारण करून अहल्येकडे गेला व तिला भ्रष्ट केले. अहल्येने खरे तर हे कपट ओळखले होते पण प्रत्यक्ष देवेंद्र आपल्यावर भाळलेला आहे याचा तिलाही मोह पडला आणि तिचा पाय घसरला. गौतम ऋषीना परत आल्यानंतर काय घडून गेले ते समजायला वेळ लागला नाही. त्यांनी इंद्राला त्याचें पुरुषत्व नाहीसे होण्याचा आणि अहल्येला शिळा बनून श्रीरामाचा पदस्पर्श होईपर्यंत पडून राहण्याचा शाप दिला. अहल्येला अचल दगडाचे शरीर मिळाले पण मन तसेच होते. तेव्हा मनोमन ती रामाची वाट बघत, त्याचा धावा करत राहिली. सीतेच्या स्वयंवरासाठी जाताना विश्वामित्रांनी श्रीरामाला हे सारे सांगितल्यावर राम आणि लक्ष्मण गौतम ऋषीचा आश्रम होता त्या ठिकाणी गेले आणि त्यांनी शिळेला पायाने स्पर्श केला. त्याक्षणी अहिल्येला पूर्ववत रूप प्राप्त झाले. देवांनी स्वर्गातून पुष्पवृष्टी केली ज्यामुळे अहल्याचे पाप धुवून गेले तिचा उध्दार झाला. अशा या

उध्दारकर्त्या श्रीरामाचे गुणगान गाता गाता देववाणी, वेदवाणी थकून गेली, तो हा श्रीराम भक्ताची जाणा ठेवतो, त्याच्याबद्दल अभिमान बाळगतो. त्याच्याकडे कधी दुर्लक्ष करत नाही.

**वसे मेरुमांदार हे सृष्टिलीला**
**शशी सूर्य तारांगणे मेघमाला**
**चिरंजीव केले जनीं दास दोन्ही**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३३॥**

सरळ अर्थ:

मेरू मांदार पर्वत, सूर्य, चंद्र तारे, मेघ, हे सर्व ज्याच्या लीलेमुळे या सृष्टीमध्ये अस्तित्वात आले आहेत, ज्याने आपल्या दोनही दासांना चिरंजीव होण्याचा वर दिला आहे तो हा आपल्या दासांबद्दल अभिमान बाळगणारा श्रीराम, त्यांची उपेक्षा कधीही करत नाही.

विश्लेषण:

या सृष्टीत जे जे काही आहे, सूर्य, चंद्र, तारे, ग्रह, मेघ, पर्वत, नद्या, सागर, सर्व काही, किंबहुना सारी सृष्टीच भगवंताची निर्मिती आहे. आपण कितीही बुध्दिवादी असलो तरीही या साऱ्याची उत्पत्ती कशी झाली ते सांगू शकत नाही. विज्ञानाचा आधार घेऊन हे सगळे निसर्गत: निर्माण झाले आहे असे म्हणालो तरी मग निसर्ग हे काय आहे? त्या निसर्गाला कोणी निर्माण केले असा प्रश्न रहातोच. आणि मग आपण ‘तो’- ‘परमेश्वर’ या एकाच ठायी या निर्मितीचे मूळ आहे हे मान्य करतो तेव्हाच हा प्रश्न संपतो. ब्रह्मा, विष्णू, महेश ही निर्मिती, पोषण आणि संहार या गोष्टी करणारी दैवतांची त्रिमूर्ती आहे. आणि त्रिमूर्ती म्हणजेच देव, परमेश्वर ! राम हा विष्णूचा म्हणजे पर्यायाने परमेश्वराचा अवतार आहे. म्हणून तो या साऱ्या सृष्टीचा निर्माणकर्ता आहे हे म्हणणे वावगे वाटू नये. ब्रम्हदेवाने रावणाचा

भाऊ बिभीषण याला त्रेतायुगाच्या समाप्तीपर्यंत चिरंजीव होशील असा वर दिला आणि हनुमानाला रामाने, म्हणजे साक्षात विष्णूने चिरंजीव होण्याचा वर दिला. अशा रीतीने रामाचे हे दोन्ही दास चिरंजीव झाले. तेव्हा राम आपल्या दासांकडे पूर्ण लक्ष ठेवून असतो त्यांना विन्मुख करत नाही हे पुन्हा दिसून येते.

**उपेक्षी कदा रामरूपी असेना**
**जिवा मानवा निश्चयो तो वसेना**
**शिरी भार वाहेन बोले पुराणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३४॥**

सरळ अर्थ:
रामाशी एकरूप झालेल्या भक्ताकडे तो कधी दुर्लक्ष करत नाही याबद्दल हे मानवा तू निश्चिंत असलं पाहिजे. धर्मग्रंथात, पुराणात प्रत्यक्ष भगवंतानं म्हटलं आहे की मी तुझा भार वाहीन, तुझी काळजी घेईन. (तरीही यावर तुझा विश्वास नसेल तर काय उपयोग?) खात्री बाळग श्री रामरूपी भगवंत आपल्या भक्ताचा अभिमान बाळगणारा आहे आणि म्हणून तो भक्ताला विसरत नाही.

विश्लेषण:
वरच्या सात आणि पुढच्या तीन श्लोकात समर्थ श्रीरामाचे दासाभिमानी असणे आणि तो भक्तांची, म्हणजेच दासांची कधीही उपेक्षा करत नसणे हे वारंवार तुमच्या आमच्या मनावर बिंबवायचा प्रयास करताहेत. दास असणे म्हणजे कोणी हरकाम्या गडी असणे नव्हे तर भक्त असणे. भक्तीचे जे नवविधा प्रकार आहेत त्यात चढत्या श्रेणीने दास्य हा सातवा प्रकार आहे. (याबाबतीतील श्लोक असा आहे: श्रवणं, कीर्तनं, विष्णोः स्मरणं, पादसेवनम् | अर्चनं, वंदनं, दास्यं, सख्यं, आत्मनिवेदनम् ||) तेव्हा श्रीराम आपल्या भक्ताची उपेक्षा करत नाही हेच समर्थ सांगतात. जो भक्त नाही तो रामरुपात रंगलेला नाही. रामाबद्दल भक्तीचा,

विश्वासाचा निश्चय तो मनात बाळगत नाही. त्यामुळे आपल्याकडे रामाने दुर्लक्ष केले असा आक्षेप त्याने घेऊ नये. ‘जो भक्त आहे त्याच्या संकटसमयी मी धावून जाईन, त्याचा भार मी स्वत: माझ्या शिरी वाहीन’ हे स्वत: परमेश्वराने म्हटले आहे. गीतेतील नवव्या अध्यायात बाविसाव्या श्लोकात भगवंत म्हणतात:

“अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम ॥

याचा मराठी भावानुवाद :

अनन्यभावे चिंतन माझे करूनी मज भजती|
त्यांच्या निर्वाहाची देतो, पार्था मी शाश्र्वती||

तेव्हा हे मना, रामाच्या ब्रीदाबद्दल निश्चिंत रहा आणि अनन्यभावे त्याची भक्ती कर म्हणजे भक्ताचा अभिमान बाळगणारा श्रीराम तुझा भार स्वत:च्या शिरी वाहील आणि तुझी उपेक्षा करणार नाही.

**असे हो जया अंतरी भाव जैसा**
**वसे हो तया अंतरी देव तैसा**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३५॥**

सरळ अर्थ:

मनात जशी कल्पना केली असेल तसाच देव तिथे वसत असतो. त्या देवाशी एकरूप झालेल्याच्या रक्षणासाठी तो धनुर्धारी राम उभा असतो. तो आपल्या सेवकाची, भक्ताची उपेक्षा कधीही करत नाही.

विश्लेषण:

हा श्लोक चौतिसाव्या श्लोकाच्या निरुपणात्मक आहे. मनात जसा कमी जास्त भाव असेल तसेच परमेश्वराचे अस्तित्व मनात असते. साऱ्या गोष्टींची चिंता सोडून केवळ परमेश्वरावर दृढ निष्ठा ठेवून त्याची भक्ती करत असाल तर तो

परमेश्वर तुमच्या अगदी सन्निध असेल. वरवरच्या, दिखाव्यादाखल केलेल्या भक्तीने तुम्ही स्वत:ला फसवाल पण देवाला? शक्यच नाही. आणि मग अशा परिस्थितीत देवाने तुमच्यासाठी काही का करावं? तुमच्या संकटसमयी सहाय्य करायला का धावून यावं? लक्षात ठेवा की प्रामाणिकणाने भक्तीपूर्वक त्याच्याशी एकरूप होऊन अनन्यभावाने त्याची भक्ती कराल तर तो धनुर्धारी श्रीराम जो स्वत: अशा भक्तांविषयी अभिमान बाळगतो तो तुमची निराशा करणार नाही, तुमचे कुठल्याही संकटामध्ये सदैव रक्षण करील.

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे**
**कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३६॥**

सरळ अर्थ:
देव नित्य तुमच्या जवळ असतो. तुमची त्याच्यावर भक्ती असेल तर ते त्याला माहित असतं. केवळ कधीकधी तो तुमची छोटीशी परिक्षा घेत असतो तीही मायेने, कृपाळूपणाने. तो देव, तो श्रीराम सुख, आनंद, मोक्ष देणारा आहे, भक्ताबद्दल अभिमान बाळगणारा आहे म्हणून भक्ताची तो कधी उपेक्षा करणं केवळ अशक्य आहे.

विश्लेषण:
समर्थ म्हणतात, देव सदा सर्वदा तुमच्या जवळ आहे. देव कुठे नाही? तो तर तुमच्यामध्येच आहे, तुमच्या हृद्यात आहे. सर्वत्र भरून राहिलेला आहे. शिवभक्त विसोबा खेचर हे मूर्तिपूजेचे विरोधक होते. महादेवाच्या देवळात एकदा ते शिवलिंगावर पाय ठेवून आराम करत पडलेले होते. हे पाहिल्यावर संत नामदेवाला राग आला आणि तो विसोबाना दूषणे देऊ लागला. संयम न सोडता विसोबांनी

सांगितले, "असे आहे का? मग मी पाय कुठे ठेवू? तूच माझे पाय अशा ठिकाणी ठेव जिथे महादेव नाही." नामदेवाने रागारागाने विसोबाचे पाय पिंडीवरून उचलून बाजूला ठेवले तर त्या पायांखालीच एक नवीन शिवलिंग तयार झाले. जिथेजिथे म्हणून नामदेवाने विसोबांचे पाय ठेवायचा प्रयत्न केला तिथे तिथे नवीन शिवलिंग निर्माण होत गेले. तेव्हा नामदेवाचे डोळे उघडले. जळी स्थळी, काष्ठी, पाषाणी, किंबहुना चराचराच्या अणुरेणुमध्ये देव आहे हे अशा प्रकारे विसोबांनी नामदेवाला समजावले. मथितार्थ हा की परमेश्वर नेहमी तुमच्या जवळ असतो. मग तो आपल्या प्रत्येक संकटात धावून येतो का? अनन्यभावाने भक्ती करत असाल तर नक्की येतो. कधीकधी संकट लांबले तर आपल्याला वाटते की देव आपल्या मदतीला येत नाही आहे. तेव्हा तो खरे तर आपल्याकडे बघत आपली थोडी परिक्षा घेत असतो. 'मी मदत करण्यापूर्वी तू स्वतःची मदत करण्यासाठी काय करतोस ते मला पाहू दे' अशा भावनेने तो तुमच्याकडे कृपाळूपणाने पहात असतो. तुम्ही धडपड करता आणि त्या संकटातून सुटता. मनात म्हणता, मी केवळ माझ्या प्रयत्नाने सुटलो या संकटातून. पण तेव्हा हे विसरता की तुम्ही आधी हताश होउन बसलेले असता तेव्हा त्याच्या परिक्षेला प्रारंभ झालेला असतो आणि प्रयत्न चालू केलेत की त्या परिक्षेत तुम्ही उत्तीर्ण झालेले असता म्हणून तुमच्या प्रयत्नाना तो यशाचे फळ देतो. कारण आनंद देणारा, सुख देणारा आणि मुक्तिदाता देवच आहे आणि तो तुमच्या जवळून तुम्हाला पाहतो आहे. तुमच्या प्रयत्नांचा त्याला अभिमान असतो म्हणून तो तुमची निराशा होऊ देत नाही, तुमची उपेक्षा करत नाही.

**सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा**
**उडी घालितो संकटी स्वामि तैसा**
**हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३७॥**

सरळ अर्थ:
चक्रवाक पक्ष्यांच्या जोडप्याला संकटात असलेलं पाहून प्रत्यक्ष सूर्यनारायण त्यांच्या मदतीला धावून जातो. तसाच दासाच्या संकटसमयी त्याचा स्वामी, श्रीराम, स्वत: ते संकट दूर करण्यासाठी उडी घेतो. कारण दास, भक्त आपली भक्ती करतो आहे याचा भगवन्ताला अभिमान वाटत असतो. आणि म्हणून तो अशा भक्ताकडे कधीही दुर्लक्ष करत नाही.

विश्लेषण:
कविसंकेत असा आहे की कमलवन फुलवणारा सूर्य अस्ताला गेल्यामुळे चक्रवाकीला आपला प्रियकर दिसेनासा होतो आणि ती आक्रोश करू लागते. चक्रवाक आणि चक्रवाकी दोघेही रात्रभर एकमेकांस आर्ततेने साद घालत बसलेले असतात. ते वस्तुत: एकाच कमलवेलीवर बसलेले असतात पण वेलीचे पान दोघांच्या मध्ये आल्याने अंधारात ते एकमेकांस पाहू शकत नाहीत. त्याना तसा शाप मिळालेला आहे. पण त्यांचा हा भ्रम सकाळी दिनमणि सूर्य उगवल्यावर दूर होऊन त्यांचे मीलन होते. इथे जसा सूर्य सकाळी त्या दोघांचा साह्यकर्ता बनून येतो तसा, हे मना, तुझ्या संकटामध्ये तुला साह्य करण्यासाठी तो हरी, परमेश्वर वेळ आल्यानंतर धावून येणार आहे. मात्र त्यासाठी तुझी अनन्यभावे केलेली हरीभक्ती सिद्‌ध व्हायला हवी. सिद्‌ध होण्यासाठी काही साक्षी-पुराव्याची आवश्यकता नाही. भक्ति तशी असेल तर त्याला कळतेच आणि मग तो, ज्याला भक्ताचा अभिमान वाटतो, तुझी उपेक्षा करत नाही.

**मना प्रार्थना तूजला एक आहे**
**रघूराज थक्कीत होऊनि पाहे**
**अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे**
**मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥३८॥**

सरळ अर्थ:
हे मना, तुला माझे कळकळीचे सांगणे आहे की राघवाचे तुझ्याकडे बारकाईने लक्ष आहे तेव्हा त्याची अवज्ञा होईल अशा प्रकारचं, काहीही वावगं कर्म करू नकोस. त्याच्या आसऱ्याला जा.

विश्लेषण:
समर्थांनी या आधीच्या दहा श्लोकात श्रीरामाचं भक्ताबद्दल अभिमान बाळगण्याचं आणि भक्ताकडे दुर्लक्ष न करण्याचं आणि ब्रीद आहे ते वारंवार सांगून मनावर ठसवायचा प्रयत्न केला. आता या आणि पुढच्या चार अशा एकूण पाच श्लोकात ते रामाच्या आश्रयाला जा आणि तेथे वास्तव्य कर असे पुन्हा पुन्हा सांगताहेत. ते म्हणतात, हे मना, माझे तुला कळकळीचे सांगणे आहे, रघुराज श्रीराम तुझ्याकडे लक्ष देउन आहे. बारकाईने लक्ष ठेवून आहे. समर्थ बरेचदा नवनवीन शब्दप्रयोग करतात. इथे त्यांनी 'थक्कीत' हा शब्द वापरला आहे. पण त्याचा अर्थ 'थक्क होऊन' असा घेता येत नाही. कारण देव थक्क कसा काय होईल? त्याला तर सर्व काही माहित असते. माणसाचा स्वभाव, त्याची करणी, त्याचा आगा, पीछा, भविष्य सर्व काही त्यानेच ठरवलेले आहे. मग कशामुळे त्याने थक्क व्हावे? तेव्हा श्रीराम लक्षपूर्वक, बारकाईने तुझ्या करणीकडे पाहतो आहे असा अर्थ इथे अपेक्षित आहे. त्यामुळे असे बारकाईने पहाणाऱ्या रघुराजाला अयोग्य वाटेल, त्याची अवज्ञा झाल्यासारखे वाटेल असे काहीही आणि कधीही तू करू नकोस. निव्वळ भक्तीने तू त्याला प्रिय हो, त्याच्या मनात आपल्यासाठी स्थान निर्माण कर आणि नेहमीसाठी तेथे रहा.

**जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणे**
**जयाचेनि योगे समाधान बाणे**
**तयालागि हे सर्व चांचल्य दीजे**
**मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥३९॥**

सरळ अर्थ:

वेद शास्त्र पुराणे ज्याचे गुणगान करतात आणि ज्याच्यामुळे तुला सुख समाधान, शांति मिळणार आहे त्या श्रीरामाकडे तू तुझ्या चिंता, काळज्या, उलाघाल आणि त्यापायी होणारी चंचलता भक्तिपूर्वक सोडून दे. आणि हे मना, त्या राघवावर विश्वास ठेवून त्याच्या आसऱ्याला जा.

विश्लेषण:

राघव, श्रीराम, रघुराज, रामचंद्र ही सारी नावे समर्थ एक 'परमेश्वर' या अर्थी वापरतात हे मागे स्पष्ट झाले आहेच. त्यामुळे श्रीराम हा अवतार जो वेद, पुराणे, शास्त्रे इत्यादी वाङ्मय निर्माण झाल्यानंतर घडला त्याचे गुणवर्णन हे देवाचे, परमेश्वराचे गुणवर्णन अशा स्वरूपात चार वेद, अठरा पुराणे आणि अठरा शास्त्रे यांच्यामध्ये आहे. तेव्हा अशा ज्या परमेश्वराचे गुणवर्णन या प्रचंड वाङ्मयात पदोपदी केले गेले आहे त्याच्या भक्तीमुळेच या विश्वात समाधान ही प्रवृत्ती मनात निर्माण होते आणि तिथे बाणवून रहाते. समाधान फक्त मिळणेच नाही तर अंगी बाणवून राहणे हे चिरशांतीप्राप्तीचे निदर्शक आहे. तेव्हा अशा समाधान, चिरशांतीसाठी तू त्या परमेश्वराला अनन्यभावे शरण जाऊन, त्याच्यावर दृढ विश्वास ठेवून आपल्या साऱ्या विवंचना, काळज्या, घालमेली, मनाची चंचलता या गोष्टी, त्यांचा शम होण्यासाठी, 'इदं न मम' म्हणून त्याला अर्पण कर आणि त्याच्या भक्तीत रममाण होऊन रहा.

**मना पाविजे सर्वही सूख जेथे**<br>
**अती आदरे ठेविजे लक्ष तेथे**<br>
**विविके कुडी कल्पना पालटीजे**<br>
**मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥४०॥**

सरळ अर्थ:

हे मना, ज्याच्या योगे तुला शाश्वत सुखे मिळणार आहेत त्याच्याकडे आदर पूर्वक, अनन्यभावे भक्तिपूर्वक पहा आणि त्याचे चिंतन कर. सारासार विचार करून वाईट कल्पना, देहाबद्दलची आसक्ती या गोष्टी सोडून दे आणि त्या राघवाकडे आश्रय घे.

विश्लेषण:

प्रत्येक माणूस सुखाची अपेक्षा करत असतो. पण ती ऐहिक सुखाची असते. मला हे मिळाले तर मी आनंदी होईन, ते मिळाले तर नक्की सुखी होईन अशा कल्पना जो तो मनात बाळगत असतो. पण ही सारी सुखे अल्पजीवि असतात. थोड्या काळानंतर ती संपतात आणि परत त्यांचा हव्यास सुरु होऊन त्यापोटी माणूस दु:खी होतो हे तो लक्षात घेत नाही. तीच अपेक्षा या क्षुल्लक सुखांच्या ऐवजी शाश्वत सुखासाठी ठेवली तर? असे  शाश्वत सुख हे खरं तर आपल्या मनावर अवलंबून असते. काम, क्रोध, मद, मत्सर या गोष्टी मनातून हद्दपार झाल्या आणि मन परमेश्वरस्मरणात एकाग्र झाले तरच ते शांत होते.  आणि मानसिक शांतीच्या पलीकडचे सुख ते कोणते? असे सुख ज्याच्या योगे मिळू शकेल त्याच्या म्हणजे परमेश्वराच्या ठायी अत्यंत आदरपूर्वक निष्ठा, लक्ष ठेवायला हवे. तेव्हा हे मना तू तसे लक्ष ठेव. काय चांगलं, काय वाईट याचं तारतम्य ठेवून विवेक बुध्दी दाखव आणि तुझ्यात असलेल्या काम क्रोध, मद, मत्सर या वाईट भावना बदलून सद्विचाराने भरून रहा, देहासक्ती सोडून देऊन केवळ राघवाच्या, म्हणजेच परमेश्वराच्या भक्तीमध्ये रममाण होऊन रहा ज्यायोगे तुला ते शाश्वत सुख प्राप्त होईल.

||श्रीराम||

# <u>दशक पाचवे</u>

**बहू हिंडता सौख्य होणार नाही ।**
**शिणावे परी नातुडे हीत काही ॥**
**विचारे बरे अंतरा बोधवीजे ।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे ॥ ४१ ॥**

सरळ अर्थ:

जास्त पायपिटी करण्यात सुख तर नाहीच, उलट शीण येऊन अहितच होते. तेव्हा हे मानवा, विचारपूर्वक तू आपल्याला मनाला नीट समजावून सांग की इतरत्र शोध न करता केवळ राघवाच्या ठायीच भक्ति ठेव.

विश्लेषण:

माणूस सुखाच्या शोधात असतो. या शोधात वावगे काही नाही. पण कुठपर्यंत? मिळाले सुख तरी ते अल्प आहे, आणखी जास्त मिळाले पाहिजे ही लालसा नसेल तिथपर्यंत. मिळालेल्या सुखात समाधान मानून शोध तिथेच थांबला तर ठीक आहे. पण तसं होत नाही. या शोधाला अंत नसतो. मला इथे मिळणारी एक भाकरी पुरेशी नाही. दुसरीकडे जाऊन जास्तीची मिळते का ते बघतो, या 'लुकिंग फॉर ग्रीनर पाश्चर' मनोधारणेपायी ही नोकरी सोड ती धर, इथले बस्तान उठव तिकडे स्थलांतर कर असा हा माणसाचा प्रवास चालू असतो. आणि या प्रवासात खरं सुख, समाधान मिळतच नाही. चालतच रहायचं, चालतच रहायचं अशी ही पायपीट असते. आणि अंती पाय भेंडाळतात. जे साध्य केलं असं आपल्याला वाटतं त्याची किती अवास्तव किंमत आपण मोजली आहे हा विचार मनात येऊन मन:शांती नष्ट पावते. तेव्हा आपण हे असं उरीपोटी धावायचं का आणि कुठपर्यंत? हे आपण मनाला समजावलं पाहिजे. अध्यात्माबाबतही हेच म्हणता येईल. याला गुरु करावे की त्याला? शिरडीला जाऊ का? की गणपती पुळ्याला

जाऊन अनुष्ठान करू? सत्यनारायणाची पूजा करू की तिरुपतीला बालाजीचं दर्शन घेऊन येऊ? असे हे बहु हिंडणे असते आणि त्यात हित काहीच प्राप्त होत नाही. चारी धाम यात्रेची दगदग मात्र होते. तेव्हा समर्थ म्हणतात, या सगळ्या गोष्टी बाजूला ठेवण्याची मनाची तयारी कर आणि केवळ त्या राघवाच्या ठायी मन केंद्रित कर. त्यापलीकडे तुला जावेही लागणार नाही. कारण तिथेच तुझी वस्ती रहावी.

**बहुतांपरी हेचि आता धरावे ।**
**रघूनायका आपुलेसे करावे ॥**
**दीनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे ।**
**मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥ ४२ ॥**

सरळ अर्थ:
अनेक गोष्टींचा विचार करण्यापेक्षा आता हेच तू आपल्या मनात धर की त्या रघुनायकालाच तुला आपलेसे करायचे आहे. कारण त्याचेच ब्रीद दीनांचा नाथ, कैवारी असे आहे. तेव्हा तू त्याच्याच भक्तीत रत होऊन रहा.

विश्लेषण:
'अचपळ मन माझे नावरे आवरीता' म्हणतात. कुठल्याही वेळी मनात एकच एक विचार असा कधी असत नाही. एका गोष्टीचा विचार करताना तिच्या अनुषंगाने आणखी दहा गोष्टी मनाला आठवत असतात. आणि त्याना आवर घालणं शक्य नसतं. संसारातल्या गोष्टीचं उदाहरण घ्या. मध्यमवर्गीय, पगार मिळालाय. मिळाल्याचा आनंद वाटत असतानाच त्याला वाटा किती आहेत त्याचा विचार येतो, कुणाची बिले द्यायची आहेत, किती? बँकेचा हप्ता जाऊन किती उरतात? गेल्या दोन महिन्यांपासून मुलाची मोबाईल घेण्याची मागणी पुरवता आली नाही. या पगारातून घ्यावा काय? कुठला? पडदे नवीन करायचेत असं बायको म्हणाली होती. बाबुभाई भवानजीकडं चांगली टप्रेस्ट्री मिळते. तिला घेऊन यायला पाहिजे

पसंतीला. नाहीतर नंतर बोलणी खायला लागतील आयुष्यभर. हे आणि ते. वरच्या वर्गाच्या विवंचना आणखी वेगळ्या. सांगायचं काय तर मिनिटामिनिटाला नानाविध विचारांनी माणसाचं मन बजबजलेलं असतं. समर्थ म्हणतात, हे असे अनेकविध प्रकारचे विचार बाजूला सारून आता फक्त एकच विचार मनात ठामपणे धरा. कोणता? या सगळ्या विवंचनांतून सोडवणूक करणाऱ्या रघुनायकाला हाक दिली पाहिजे, त्याला आपलंसं करायला पाहिजे. त्याला प्रिय होईल आणि तो आपलासा होईल अशा प्रकारची त्याची भक्ति करायला हवी. कारण अनाथांचा नाथ, दीनदुबळ्यांचा, रंजल्या गांजल्यांचा साह्यकर्ता तोच आहे आणि हे त्याचं ब्रीद तीनही लोकांत गाजत आहे. तेव्हा हे मना त्याची श्रध्दापूर्वक भक्ती करून तू त्याला प्रिय होऊन रहा.

**मना सज्जना एक जीवी धरावे ।**
**जनीं आपुले हीत तुवां करावे ॥**
**रघूनायकावीण बोलो नको हो ।**
**सदा मानसी तो निजध्यास राहो ॥ ४३ ॥**

सरळ अर्थ:

हे सज्जन मना, एक गोष्ट ध्यानात घे. तुझे हित तुलाच करून घ्यायचे आहे. तेव्हा ते साध्य होण्यासाठी तू रघुनायकाचाच ध्यास धार आणि त्याच्या नामजपाव्यतिरिक्त इतर काही बोलू नको.

विश्लेषण: आपले हित कशात आहे हे आपणच ओळखळे पाहिजे. दुसरा कोणी तुम्हाला तितका ओळखत नाही जितके तुम्ही स्वत: ओळखता. मग अशा परिस्थितीत तुमचे हित कशात आहे ते अचूकपणे जाणणे हे त्या दुसऱ्या कोणाहीपेक्षा तुम्हालाच शक्य असते. हे ध्यानात पक्के बिंबवून घ्या आणि तसे हित प्राप्त करून घेण्यासाठी काय करायला पाहिजे तेही बाणवून घ्या. अफाट बोलणे, जगातील सगळ्या गोष्टी केवळ तुम्हीच जाणता या आविर्भावात बोलायला

जाल तर तुमच्याच  शब्दात पकडले जाऊन तुम्हीच स्वत:चे अनहित करून बसाल.  हे टाळा कारण.  श्री राघवाचे नाव घेणे, त्याला स्मरून आणि त्याच्याविषयीच भक्तिभावाने बोलणे हितकारी असते हा ध्यास मनात बाळगा, सदैव बाळगा.  यापरते दुसरे काही नको.

**मना रे जनीं मौनमुद्रा धरावी ।**
**कथा आदरे राघवाची करावी ॥**
**नसे राम ते धाम सोडूनि द्यावे ।**
**सुखालागि आरण्य सेवीत जावे ॥ ४४ ॥**

सरळ अर्थ:

अरे मना, लोकांबरोबर असताना तू न बोलता, मौन धरल्यासारखा चेहरा कर. पण राघवाच्या संबंधी उल्लेख आल्यास आदरपूर्वक त्याचा उल्लेख करून बोल. जिथं राम पुजला जात नाही त्या ठिकाणी तू मुक्काम करू नकोस. त्यापेक्षा एकांतवास, अरण्यवास स्वीकार कारण त्यात तुला सुख मिळेल.

विश्लेषण:

श्री समर्थ इथे सांगताहेत की हे मना, जेव्हा तू अनेक लोकांबरोबर असशील तेव्हा वायफळ बडबड करण्यात वेळ घालवू नकोस. वाचाळतेपायी गोत्यात येण्याची शक्यता असते. किंबहुना, उगी रहावे, कानी पडेल ते फक्त ऐकावे हे श्रेयस्कर असते. श्रुति द्यावी, उक्ति देऊ नये. आणि हे साध्य करण्यासाठी मौन असल्याचा आविर्भाव आणावा. मौन मुद्रा धारण करावी म्हणजे काहीच बोलू नये असे नसून, आपण बोलू इच्छीत नाही असे दर्शवणे. मग बोलायचेच असेल तर काय बोलायचे? राघवाविषयी बोलावे, आदरपूर्वक श्री रामाविषयी बोलावे. पण आता समोरचा माणूस जर दुसरेच काही बोलत असेल तर? शक्य असेल तर आपण हलकेच श्री रामाचा उल्लेख बोलण्यात आणून  त्याचे गुणगान आदराने ऐकवावे. आणि ते शक्य

नसेल तर मग ते स्थान सोडून निघून जावे. जिथं राम नाही तिथं माझं काही काम नाही अशी वृत्ती धारण करून, तिथून निघून दुसरीकडे, फार तर एकांतातसुध्दा जावे. या एकांतालाच समर्थ अरण्यवास म्हणताहेत. नको त्या गोष्टी कानावर पडून आपल्या राघव भक्तीत बाधा येण्यापेक्षा असा एकांतवास स्वीकारून आपले आपण श्रीरामाचे चिंतन करीत राहण्यामध्ये सुख आहे.

**जयाचेनि संगे समाधान भंगे ।**
**अहंता अकस्मात येउनि लागे ॥**
**तये संगतीची जनीं कोण गोडी ।**
**जिये संगतीने मती राम सोडी ॥ ४५ ॥**

सरळ अर्थ:
जिच्यामुळे मनाचे समाधान नष्ट होईल, मनात अहंकार निर्माण होईल आणि श्री रामाचा विसर पडेल अशी संगत काय कामाची?

विश्लेषण:
माणसाच्या जीवनावर संगतीचा फार मोठा प्रभाव असतो. सुसंगती वा कुसंगती या दोन प्रकारच्या, टोकाच्या संगती आहेत. संगती संगदोष: म्हणतात. कोणती साथसांगत धरावी हे तारतम्य माणसाने ठेवाले पाहिजे. कुसंगतीमध्ये येणाऱ्या संपर्काच्या परिणामस्वरूप आपले मनदेखील तसे होण्याचा संभव जास्त असतो. आणि जरी तसा होऊ न देण्याइतके आपले मन दृढ असले तरी ‘हे खरंच का वाईट असेल? एकदा अवलंबून पहायला काय हरकत आहे? करावे का?’ अशी द्विधा मनस्थिती होऊन मन:शांती, मनाचे समाधान भंग पावते. तेव्हा अशी संगत, किंवा जिच्या योगे मनाला गर्वाची बाधा व्हायला मदत होईल अशा संगतीची गोडी कशासाठी धरायची? जी संगत आपल्याला सन्मार्गापासून परावृत्त करत असेल, जिच्यामुळे आपली बुध्दी भ्रष्ट मार्गाला लागणार असेल, श्रीरामाच्या, परमेश्वराच्या

भक्तीपासून दूर जाणार असेल अशा संगतीची गोडी ठेवणे काही कामाचे नाही. (तेव्हा हे मना, अशी कुसंगत ठेऊन तू आपल्या मनाची शांती, समाधान आणि भक्तिभावना यांचा नाश होऊ देऊ नये.)

**मना जे घडी राघवेवीण गेली ।**
**जनीं आपुली ते तुवा हानि केली ॥**
**रघूनायकावीण तो शीण आहे ।**
**जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ॥ ४६ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, तू जेव्हढा वेळ रामनामस्मरणाशिवाय घालवशील तेव्हढा सगळा फुकट गेलेला असेल आणि त्यापायी तुझेच नुकसान झालेले असेल. असा कालापव्यय म्हणजे केवळ फुकटचा शीण घेणे आहे. जे लोक दक्ष, सावध असतात त्यांच्या ध्यानात ही गोष्ट येते कारण ते (उचित- अनुचिताकडे) लक्षपूर्वक पाहत असतात.

विश्लेषण:

माणूस आपलं आयुष्य कंठताना अनेक गोष्टीत आपलं लक्ष गुंतवून असतो. संसारातल्या गोष्टी, ज्या आवश्यक असतात त्यांचा विचार तर तो करत असतोच, पण त्याशिवाय इतर अनेक वायफळ, ज्यांचा त्याच्या स्वत:च्या किंवा कुटुंबियांच्याही जीवनाशी संबंध नसतो अशा गोष्टीतही तो मन गुंतवून असतो. पण परमेश्वराच्या भक्तीसाठी, त्याच्या नामस्मरणासाठी त्याच्याकडे वेळ नसतो. समर्थ म्हणतात असा जो वेळ परमेश्वराचे स्मरण केल्याशिवाय, अवांतर, अनावश्यक गोष्टींच्या विचारात आणि त्या प्राप्त करण्याच्या प्रयत्नात घालवला जातो तो केवळ वाया गेलेला आहे हे निश्चित समजावे. आणि असा अमूल्य वेळ वाया घालवण्यामध्ये तो स्वत:चेच नुकसान करून घेत असतो हेही स्पष्ट आहे कारण जगण्याचा मोजकाच काल घेऊन यायचे आणि त्यातून बराचसा वाया

घालवायचा हे नुकसानच ना? आणि त्यात होणारी दमछाक, सर्वच प्रकारचा स्वास्थ्यभंग म्हणजे फुकाचा शीण घेणेच होते हे समजून येईपर्यंत परमार्थ न साधल्याने व्हायचे ते नुकसान होऊन गेलेले असते. तेव्हा जे कोणी हे जाणतील ते सदैव अशा कालव्ययाच्या बाबतीत सावध, दक्ष राहतील आणि आपले नुकसान होऊ देणार नाहीत.

**मनीं लोचनी श्रीहरी तोचि पाहे ।**
**जनीं जाणता मुक्त होऊनि राहे ॥**
**गुणी प्रीति राखे क्रमू साधनाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४७ ॥**

सरळ अर्थ:
या जगात परमेश्वर भक्तीमध्ये पावन होऊन, सर्वसंगाचे अवधान विसरून गेलेला आहे असा भक्त बाह्य लोचनांनी तसेच अंतर्मनाच्या डोळ्यांनी श्रीहरीचे, सर्वोत्तम परमेश्वराचे दर्शन घेतो आणि अशा रीतीने भक्ती, सर्वसंग परित्याग, मुक्ती आणि मग परमेश्वराचे सगुण रुपात दर्शन असा साधनेचा क्रम राखतो. तो श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो.

विश्लेषण:
समर्थ या आणि पुढच्या नऊ श्लोकात ज्याचे जीवन धान्य झालेले असते अशा भक्ताचे वर्णन करताहेत. या दहा श्लोकांचा शेवटचा चरण त्यांनी एकच ठेवलेला आहे – जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा. पहिल्या तीन चरणात हा असा धन्य दास कोण? याचं विवेचन आहे. या श्लोकात ते सांगतात, मोक्ष मिळवणे या साधनेच्या ज्या पायऱ्या आहेत त्या क्रमाक्रमाने घ्यायच्या असतात. तिथं जवळची पायवाट (शॉर्टकट) नसते. परमेश्वरची, जो सर्वत्र आहे, सर्वज्ञ आहे, सर्वस्व आहे, सर्वोत्तम आहे अशा परमेश्वराची अनन्यभावे भक्ती करणे, त्याला जाणणे, त्याच्या

भक्तीमध्ये बाकी ऐहिक असे सर्व काही विसरून त्यांच्यापासून अलग रहाणे (मुक्त होऊन राहणे), त्याच्या शिवाय अंतर्मनात दुसरे काहीही न दिसणे आणि डोळ्यांपुढेही त्याचीच ती मनातली सगुण मूर्ती उभी राहून तल्लीनता येणे हा साधना क्रम आहे. जो श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, हा साधनेचा क्रम प्रेमपूर्वक, भक्तीभावपूर्वक राखतो तो या जगात धन्य होतो.

**सदा देवकाजी झिजे देह ज्याचा ।**
**सदा रामनामे वदे नित्य वाचा ॥**
**स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४८ ॥**

सरळ अर्थ:
देवाच्या कार्यामध्ये ज्याचा देह झिजत असतो, ज्याच्या मनात नेहमी श्रीरामाचे स्मरण आणि बोलण्यात श्रीरामाचे नामच येते, आणि जो परमेश्वराचा धर्मच आपला धर्म हे ब्रीद ठेवून त्या धर्मानुसार वर्तन ठेवतो तो श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो.

विश्लेषण:
धन्य असलेल्या सेवकाचे पुढचे लक्षण इथे समर्थ वर्णन करून सांगताहेत. ते म्हणतात असा सेवक नेहमी देवकार्यात आपला देह झिजवत असतो. आता देवकार्य म्हणजे काय? केवळ पूजा अर्चा, इतर गोष्टींमध्ये निष्क्रीयता असे देवकार्य नाही. देवाचे पूजन, भजन, कीर्तन हे सर्व देवकार्याचा केवळ एक भाग आहे. आपल्याला देवाने जगात पाठवलेलं आहे काही कर्तव्यं आपल्यासाठी निश्चित करूनच. नेटका संसार हेही त्यातले एक कर्तव्य आहे. तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करून देवदेव करत रहा असं देव सांगत नाही. संसार करून, देवभक्ती करून शिवाय परमार्थ साधण्यात मदत करणारी सद्‌गुणाची कार्ये या गोष्टींचा समावेश

देवकार्यात होतो. सर्वोत्तम परमेश्वराचा सेवक, दास असे देवकार्य करण्यासाठी काया वाचा माने झिजत असतो. आणि देवकार्य करताना सदा, सर्वदा, निरंतर श्रीरामाचे नाम मुखाने जपत असतो. इतकेच नाही तर परमेश्वराकडूनच मिळालेला धर्म, ज्यात दया, क्षमा, शांति, प्राणीमात्रावर प्रेम, परोपकार इत्यादींचा समावेश आहे, हाच स्वधर्म आहे हे ओळखून त्याचे नित्य, न चुकता पालन करत असतो. हे सगळे करणारा श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो.

**सदा बोलण्यासारिखे चालताहे ।**
**अनेकी सदा एक देवासि पाहे ॥**
**सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४९ ॥**

सरळ अर्थ:
बोलेल त्याप्रमाणेच वागेल, असंख्य देव देवतांचे अवडंबर न माजवता परमेश्वर हे एकच स्वरूप आहे असे ओळखून असेल आणि सद्गुणांचा ध्यास घेताना ज्याचे विचार शंकाकुशंकाविरहित, पक्के असतील असा श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो.

विश्लेषण:
सामान्य माणसे बोलतात तसेच वागतील याची शक्यता तशी कमीच असते. किंबहुना बोलायचे एक आणि करायचे त्यापेक्षा वेगळे हेच दृश्य फार दिसते. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले असे म्हणतात. असे चालणारा मनुष्य सामान्य नसतो म्हणून त्याचे वर्तन वंदनीय ठरते. हा मनाच्या श्लोकांचा अभ्यास करताना मला ज्या डॉ. सुषमाताई वाटवे यांच्या प्रवचनांचा उपयोग होतो त्यांनी एक फार छान उदाहरण दिले आहे. समर्थांकडे एकदा एक स्त्री आपल्या मुलाला घेऊन आली आणि तिने विनंती केली की आपला मुलगा गूळ फार खातो त्याला

त्यापासून होणारा अपाय समर्थांनी समजावून सांगावा आणि त्यापासून परावृत्त करावे. समर्थांनी मुलाला काहीही न सांगता त्या स्त्रीला एक महिन्यानंतर यायला सांगून परत पाठवले. एक महिन्यानंतर जेव्हा ती मुलाला घेऊन आली तेव्हा समर्थांनी मुलाला गूळ खात जाऊ नकोस असे समजावून सांगितले. त्या स्त्रीने विचारले, स्वामी, इतके तर आपण मागल्या वेळीच सांगू शकला असातात मग त्यासाठी एक महिना का वाट पहायला लावले? तेव्हा समर्थ म्हणाले, " बाई, तुम्ही मागे आला होतात तेव्हा मी स्वत:च गूळ खायचो. मग मुलाला परावृत्त कसा करू? या एक महिन्यात मी माझी गूळ खायची सवय सोडून दिली आणि मगच मला तुमच्या मुलाला उपदेश करायचा अधिकार मिळाला." हे आहे धन्य झालेल्या भक्ताचे रूप. केवळ बोले तैसा चाले असेच नव्हे तर आधी चाले आणि मगच अधिकारवाणीने इतरांना बोले. अशा भक्ताची आणखी लक्षणे काय? तर आपल्याकडे असलेल्या अगणित देवदेवतांमध्ये तो सर्वोत्तम सर्वसमावेशक परमेश्वर हेच रूप मानतो, शंकर, गणपती, विष्णू, विठोबा, जोतीबा, जाखाई, जोखाई, मरगाई, म्हसोबा, अश्या नाना नावांच्या देवांमधला देव एकच आहे आणि तो म्हणजे परमेश्वर हेच तो जाणतो आणि मानतो. अशा या सगुण आणि निर्गुण या दोन्ही स्वरुपांबद्दल त्याचे विचार अगदी नि:संदिग्ध, स्पष्ट आणि शंकेच्या पलीकडील असतात. तो त्याबाबत काहीही भ्रामक कल्पना करत नाही. असा श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो.

**नसे अंतरी काम नानाविकारी ।**
**उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ॥**
**निवाला मनीं, लेश नाही तमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५० ॥**

सरळ अर्थ:

त्याच्या मनात नाना विकार निर्माण करेल असा काम –मोह नसतो. तो तपस्वी, ब्रम्हचारी असून प्रापंचिक समस्यांकडे निर्विकारपणे, अलिप्त होऊन पाहतो. मनात खरोखरीची शांती धारण करणारा, तामसी विचारांचा लवलेशही ज्याच्या मनाला स्पर्श करत नाही असा श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो,

विश्लेषण:

मनात कुठल्याही प्रकारची कामना, मोह, इच्छा नसेल असा माणूस या जगात विरळा. ऐहिक सुखांचा, वैयक्तिक प्रगतीचा, मुलाबाळांचा, संपत्तीचा मोह हा प्रापंचिक माणसाना असतोच. या मोहापायीच, क्रोध, मत्सर, द्वेष इत्यादी अनेक प्रकारचे विकार माणसाला कोंडीत पकडतात आणि अखेरीस '.....संमोहात□स्मृतीविभ्रम: स्मृतीभ्रंशात□बुध्दिनाश: बुध्दिनाशात□विनश्यति |' अशी गत होते. जो सर्वोत्तमाचा दास असतो त्याला हा नाना विकारांना जन्म देणारा काम, म्हणजे मोह उरलेला नसतो. शिवाय प्रापंचिक गोष्टींसंबंधी अनौत्सुक्य, उदासीनता असते. त्यामुळे तो या सर्वांपासून दूर होऊन तपस्येत मग्न झालेला असतो.  ही तपस्या म्हणजेच परमेश्वरदर्शनाची, त्याच्या प्राप्तीची ओढ घेऊन केलेली साधना. साधनेच्या क्रमातील ही अंतिम पायरी गाठेपर्यंत या दासाचे मन निवालेले असते. सात्विक बनलेले असते त्यामुळे तामस गुणांचा, मद, मत्सर, अहंकार, यांचा त्याच्या मनात लवलेश उरलेला नसतो. म्हणूनच असा हा श्रीहरीचा भक्त, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा सेवक, जगात धन्य ठरतो.

||श्रीराम||

## दशक सहावे

**मदे मत्सरे सांडिली स्वार्थबुद्धी ।**
**प्रपंचीक नाही जयाते उपाधी ॥**
**सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५१ ॥**

सरळ अर्थ:

मद, मत्सर, स्वार्थ या सर्वांना ज्याने दूर केले आहे, जो केवळ प्रपंचातच गुरफटून राहिलेला नाही आणि ज्याचे बोलणे नेहमी नम्रतेचे, चांगले असते तो सर्वोत्तमाचा दास धन्य असतो.

विश्लेषण:

वृथा अभिमान - गर्व म्हणजे मद, हेवादावा म्हणजे मत्सर आणि 'हे तर माझेच आणि तेही काही झाले तरी मलाच हवे' अशी भावना म्हणजे स्वार्थ, हे विकार सामान्य माणसाला आपला प्रपंचाचा गाडा ओढत असताना टाळता येणे हे कठिणातले कठीण काम आहे. त्याच्या कळत नकळत असे प्रसंग संसारात येतात की यापैकी एक ना एक भावना त्याला होते. "आज मी माझ्या मुलाला मेडिकलला प्रवेश मिळवण्यासाठी लागणारे वीस लाखांचे डोनेशन चुटकीसरसा देऊ शकलो, आहे कुणाची इतकी ताकत माझ्या नातलगांत?" किंवा, "त्या सोम्यागोम्याचा मुलगा शरद अमेरिकेत जाऊ शकला, तेव्हढ नाही करू शकलो आपण. खरं तर त्याची काय लायकी होती माझ्या विकासपुढे? पण चान्स त्यालाच मिळावा? असं व्हायला नको होतं." हे विचार, साधे वाटतात पण आहेत ते गर्व आणि मत्सराचे. किंवा याहून, "दादाला आज अडचण आलेली आहे, त्याला तातडीनं दोन लाख हवे आहेत. माझ्याकडे बँकेत आहेत पण मग पुढंमागं माझ्या सुनील किंवा अमित किंवा लतिकेचं लग्न राजेशाही थाटात करण्यासाठी मला ते ठेवायला

पाहिजेत. देऊन चालणार नाही.” वाटतं, हा शहाणपणाचा विचार आहे पण नाही, ही स्वार्थबुद्धी आहे. तर  असे हे मद, मत्सर आणि स्वार्थ हे विकार सांडणे, म्हणजे त्यागणे हे फक्त संतच करू शकतात. याहून वरची पायरी म्हणजे प्रपंच करत असूनही त्यात गुंतून पडलेले नसणं. संतपुरुषाला, भक्ताला संसार नसतो असं नाही, तोही तुमच्याआमच्यासारखा संसारी असू शकतो. पण फरक इतका की या तीन आणि इतरही संसारोद्भव विकारांचा त्याला स्पर्श नसतो. म्हणजे तो अलिप्त असतो. प्रपंच करत असूनही प्रापंचिक नसतो. आणि इतके असूनही त्याची वर्तणूक नम्रतेची असते. चिडचीड करून समोरच्याला अपशब्द बोलणे हे तो करत नाही. त्याचे बोलणे नेहमी नम्रपणाचे, समोरच्याला आनंदित करणारे असते. अशा माणसाला सर्वोत्तम परमेश्वर हा आपला भक्त, दास म्हणून आनंदाने स्वीकारतो आणि मग तो दास धन्य ठरतो.

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे ।**
**न लिंपे कदा दंभ वादे विवादे ॥**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५२ ॥**

सरळ अर्थ:

जो आपला वेळ दांभिक वाद विवादात घालवत नाही तर तत्वचिंतन करण्यात घालवतो, आपला उगम कुठून झाला त्याबद्दल, म्हणजेच परमात्म्याबद्दल आदरपूर्वक, मनोभावे आणि आनंदाने बोलतो असा सर्वोत्तमाचा दास जगात धन्य होय.

विश्लेषण:

सर्वोत्तम परमेश्वराच्या धन्य झालेल्या दासाची, म्हणजे भक्ताची आणखी लक्षणे सांगताना समर्थ पुढे म्हणतात, तो आपला वेळ ‘सोऽहं या स्वरूपातल्या

परमात्म्याचे अस्तित्व' या तत्वाचे मनन, चिंतन करत आणि लोकांना ते तत्व समजावून सांगत कालक्रमणा करत असतो. दुसऱ्याला उकसून उगीचच काही अर्थ नसलेले वाद उकरून काढून त्यावर चर्वितचर्वण करण्यात, वितंडवाद घालण्यात तो वेळ दवडत नाही. किंबहुना परमेश्वराच्या स्मरणचिंतनात त्याच्याकडे अशा व्यर्थ गोष्टीसाठी ना वेळ असतो ना इच्छा. याचा अर्थ असा नव्हे की तो केवळ स्मरणचिंतनातच मग्न असतो आणि काही बोलत नाही, मौन धरून असतो. तोही बोलतो पण काय आणि कसे? मागील श्लोकात सांगितल्याप्रमाणे नम्र, चांगल्या शब्दात तो परमेश्वराने योजिलेल्या आणि घडवलेल्या विश्वाच्या उगमाबद्दल लोकांशी बोलतो. त्याबद्दल म्हणजेच पर्यायाने परमेश्वराच्या करणीबद्दल, अस्तित्वाबद्दल इतरांशी संवाद साधतो. असा हा जो सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा भक्त तो धन्य, कृतकृत्य असतो.

**सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकी ।**
**सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५३ ॥**

सरळ अर्थ:

सर्वांशी जो नेहमी मार्दवाने, नम्रपणे आणि मधु संभाषण करतो, जो लोकप्रिय आहे, सदैव विचारपूर्वक आणि सत्याचा आग्रह धरूनच बोलतो, कधीही खोटे बोलत नाही तो सर्वोत्तम परमेश्वराचा भक्त धन्य होय.

विश्लेषण:

धन्य भक्ताची लक्षणे सांगताना समर्थ पुढे म्हणताहेत की असा हा सर्वोत्तम परमेश्वराचा भक्त लोकांबरोबर बोलताना कठोर संभाषण करत नाही तर नेहमी मार्दवपूर्ण भाषा वापरतो आणि म्हणून तो लोकांना प्रिय असतो. गम्मत बघा, "हे

बघा...., हवं तर घ्या नाही तर घेऊ नका, माझं काही बिघडत नाही" हे अगदी शुध्द शहरी भाषेतले शब्द आणि रांगड्या समजल्या जाणाऱ्या आमच्या कोल्हापुरातले, "तसं न्हाई द्येवा, घ्याचं का न्हाई ही तुमची मर्जी, तेच्यात आमचं काई म्हन्नं न्हाई जी." हे शब्द यात रांगडे वाटणारे बोलही मार्दवपूर्ण वाटतात ना? मग ते बोल बोलणाऱ्यावर समोरचा माणूस रागावेल का? आणि त्या शुध्द शहरी बोलातला कोरडेपणा समोरच्याच्या मनात आपुलकी निर्माण करेल? शक्यच नाही. तेव्हा मृदू, आर्जवी बोलणारा लोकांमध्ये प्रिय होईल यात काय संशय? पण एव्हढेच पुरे नाही. त्या भक्ताने खऱ्याखोट्याचा विवेक बाळगून नेहमी, अगदी समर्थांच्याच शब्दांत सदा, सर्वदा सत्यवचन बोलायला हवं, कधीही बाष्फळ, वावगे, असत्य बोलू नये. आताच्या जगात कदाचित हे 'सदासर्वदा' जमणे कठीण असेल. पण म्हणूनच विवेक बाळगून अशी जोड या उपदेशाला असावी. तसं म्हटलं तर महाभारतातले 'नरो वा कुंजरो वा' हे युधिष्ठिराचे बोल असत्य या कोटीतच जातात पण सत्यं ब्रूयात, प्रियं ब्रूयात, न ब्रूयात सत्यमप्रियम ही उक्ती एक पळवाट होतीच. अर्थात युधिष्ठिरालाही हे असत्य बोलल्याबरोबर त्याचा नेहमी चार बोटे हवेतून जाणारा रथ दणकन खाली आपटून जमिनीवर चालायला लागण्याची शिक्षा जिथल्यातिथं मिळालीच. असो. हे थोडे विषयांतर झाले. तर अशी पळवाट धन्य भक्ताला नसते. त्याने सदासर्वदा, तीनही त्रिकाळ आपलं बोलणं, आपली वाचा, भाषा असत्यविरहित, विवेकी, सत्याला धरून आणि नम्र, मृदू ठेवायला हवी तरच तो लोकप्रिय होतो आणि धन्य ठरतो.

**सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी ।**
**मिळेना कदा कल्पनेचेनि मेळी ॥**
**चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५४ ॥**

सरळ अर्थ:
तरुण असतानासुध्दा अखंड अरण्यवास स्वीकारतो, कल्पनारंजनात रममाण होत नाही, आणि जो दृढनिश्चयी असतो असा भक्त धन्य असतो.

विश्लेषण:
असं म्हणतात की माणूस हा एक समाजप्रिय प्राणी आहे. म्हणजे, त्याला इतर माणसांच्या घोळक्यात असायला आवडतं. एकाद्याला आपण म्हणतोसुध्दा, “अरे काय असा एकलकोंडा बसला आहेस? जा, चार चौघात मिसळ, बोल त्यांच्याशी, हास्यविनोद कर म्हणजे बरं वाटेल तुला.” तरुणपणी तर माणूस घर सोडून मित्रमंडळींच्या कंपनीतच जास्त रमतो. बोलतो, हसतो, खिदळतो आणि असं करता करता कधी धरबंद सुटतो त्याचा नेम नाही रहात. पण याच्यावर उपाय म्हणून तरुणांनी सगळं सोडून दूर रानावनात जावं असं नाही. जनसामान्याना ते शक्य नाही. पण समर्थ म्हणतात, जो परमेश्वराचा एकनिष्ठ भक्त असतो, तो तरुणपणी अरण्यवास पत्करतो. मनन, चिंतन, साधना करतो, बारा पंधरा वर्षं अशी एकांतवासात, अरण्यात काढतो आणि मग बाहेर येऊन समाजप्रबोधनाचे कार्य आरंभ करतो. परमेश्वरापासून विन्मुख झालेल्या समाजाला सन्मुख करवतो. या काळात तो कधी कल्पनाविलासात रमत नाही. म्हणजे कशाचीही कल्पनाच करत नाही असे नाही. कारण संत झाले तरी लोकांचे प्रबोधन करताना काय बोलायचं, कसं बोलायचं याची कल्पना मनातल्या मनात त्यांना करावी लागत असतेच. इथे फक्त तो भक्त कल्पनाविलासात वहावत जात नाही असा करायचा. आणि तो धन्य भक्त कसा असतो? समर्थ म्हणतात, त्याने एकदा काही निश्चय केला की त्यापासून तो ढळत नाही, ’निश्चयाचा महामेरु’ बनून रहातो. सामान्यजनांच्यासारखी धरसोड वृत्ती त्याच्यात असत नाही. या सगळ्या कसोट्यांमध्ये उतरणारा भक्त धन्य ठरतो.

**नसे मानसी नष्ट आशा दुराशा ।**
**वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा ॥**
**ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ७५ ॥**

सरळ अर्थ:

भक्ताच्या मनात चांगल्या वाईट कसल्याच गोष्टींची अपेक्षा नसते. असते केवळ प्रेमाची तहान. आणि असे असल्याने देवाला तो आपला भक्त आहे यात त्या भक्ताचेच आपण कर्जदार आहोत असे वाटावे असा सर्वोत्तम परमेश्वराचा भक्त धन्य असतो.

विश्लेषण:

खऱ्या भक्ताच्या मनात काही लालसा, अपेक्षा, नसते. जर असेल तर मग तो केवळ देवाकडून काही मिळावं अशा बुद्धीनं देवाची भक्ती करतो आहे असे होईल आणि ते तर भक्तीचे लक्षणच नव्हे. निष्काम भक्ती असायला हवी. नाहीतर आपण रोजची पूजाअर्चा घाईघाईने उरकतो आणि मग देवाची आरती करून मागणी करतो, 'देवा मला, माझ्या मुलाबाळाना सुखी ठेव, थोरल्याला चांगली नोकरी लागू दे, धाकट्याला कॉन्व्हेंटमध्ये अॅडमिशन मिळू दे, माझे पेन्शनचे काम लवकर होऊ दे' हे असे सगळे 'दे दे' करतो. खरा भक्त केवळ 'देवा, देवा' असा जप करत असतो. काही मागत नाही. कारण त्याला चांगली वाईट कसलीच आशा नसते. असते ती केवळ प्रेमाची तहान असते, परमेश्वराकडे प्रेमभावनेची ओढ असते, दर्शनाची पिपासा असते. आणि असे असल्याने तो आपला भक्त आहे यात देवालाच अभिमान वाटावा, आपणच त्या भक्ताचेच कर्जदार आहोत असे वाटावे असा असतो सर्वोत्तम परमेश्वराचा धन्यता पावलेला भक्त.

**दीनाचा दयाळू मनाचा मवाळू ।**
**स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ॥**
**तया अंतरी क्रोध संताप कैचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५६ ॥**

सरळ अर्थ:

दीनदुबळ्यांवर दया करणारा, कोमल मनाचा, सर्वांशी मैत्री करणारा, कृपावंत, जगातील सर्व भक्तांबद्दल आस्था बाळगणारा असा हा सर्वोत्तम भगवंताचा दास, भक्त. त्याच्या मनात कुणाही विषयी संताप, कशाही विषयी क्रोध कसा असेल? शक्य नाही. म्हणून तर तो दास, तो भक्त धन्य झालेला असतो.

विश्लेषण:

सत्तेचाळीसाव्या श्लोकापासून समर्थांनी प्रत्येक श्लोकासाठी शेवटचा चरण जो वापरला होता 'जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा' तो या श्लोकात वापरून थांबवलेला आहे. म्हणजे धन्य झालेल्या भक्ताची लक्षणे या श्लोकामध्ये संपूर्ण झाली. तर आतापर्यंत वर्णन केलेला असा भक्त दीनदुबळ्यांसाठी दयावंत आणि मनाचा मवाळ म्हणजे मृदू असतो. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास' असे संत म्हणतात. म्हणजे कसे? कणा नसलेले, सतत पडते घेणारे, रडतराऊत का? नाही. तुकोबा म्हणतात, 'भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथा हाणू काठी' म्हणजे दुर्जनांबरोबर कठोर सक्तीचे वर्तन करण्याचा सल्ला ते देतात. मग समर्थ असे का म्हणतात की खरा भक्त मनाचा मऊ असावा? तर त्याचा संबंध पहिल्या दोन शब्दांशी आहे. दीनांसाठी दयाळू आणि त्यांच्यासाठीच मनाचा मवाळू. दीन दुबळ्यांवर दया करणारा आणि त्यांच्या बाबतीत मनात मृदू भाव बाळगणारा असा तो असतो. सर्वांशी स्नेह, मैत्री जोडणारा असतो. तो स्वत: होऊन कोणाशी वैर करायला जाणार नाही, उलट मैत्रीचाच हात पुढे करेल. दीनांवर तर तो कृपावंत होऊन शक्य असेल ती मदत त्याना करेल. सर्वांचा आदर करेल, इतर भक्तांची

अवहेलना न करता त्यांना आधार देईल असा असतो हा भक्त. अशा या दयावान, प्रेमळ मृदू स्वभावाच्या, सर्वांविषयी स्नेहभावना ठेवणाऱ्या आणि कृपावंत असलेल्या भक्ताच्या अंत:करणात संतापाची, क्रोधाची भावना निपजेल का? कदापि शक्य नाही. या साऱ्या सद्‌गुणानी बनलेल्या शांत स्वभावाचा असा हा ईश्वरभक्त धन्य होतो.

**जगी होइजे धन्य या रामनामे ।**
**क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें ॥**
**उदासीनता तत्त्वता सार आहे ।**
**सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ॥ ५७ ॥**

सरळ अर्थ:

श्रीरामाचे नाव घ्या म्हणजे या जगात धन्य व्हाल. हे नाव घेत घेत आवश्यक ती क्रिया कर्मे नित्य नेमाने  करा, भक्ती करा आणि उपासना करा. अलिप्तता हेच तत्व अंगी बाणवा आणि मनोवृत्ती सदैव मोकळी राहील, कशात गुंतलेली रहाणार नाही असे वर्तन करा.

विश्लेषण:

धन्य भक्त कसा असतो ते मागील दहा श्लोकात सांगून झाल्यावर ही धन्यता कशाने प्राप्त होईल ते समर्थ या श्लोकात सांगत आहेत. ते म्हणतात रामाचे नामस्मरण, नैमित्तिक कर्मांचे आचरण, परमेश्वराचे सान्निध्य आहे अशा कल्पनेने त्याची भक्ति करणे या गोष्टी न चुकता, नित्य नेमाने केल्या पाहिजेत तेव्हाच ही अशी धन्यता मिळवायला तुम्ही पात्र व्हाल. कर्मे करूच नका असं ते सांगत नाहीत. उलट नित्य नियमाने करा असंच ते म्हणतात. अर्थात ही कर्मे नित्य नैमित्तिक, तुमच्या या जगातल्या अस्तित्वासाठी जी आवश्यक आहेत अशी सत्कर्मेच असावीत हे उघड आहे. आणि अशी कर्मे करतानाही श्रीराम, तो सर्वोत्तम परमेश्वर, आपल्या जवळ आहे अशी भावना ठेऊन भक्तिभावाने त्याचे नामस्मरण

करायचे आहे. त्याशिवाय आणखी एक गोष्ट करणे आवश्यक आहे ती म्हणजे आपलं मन कुठे भरकटत असता कामा नये. त्याज्य, अनावश्यक कल्पनांनी, विचारांनी लिप्त असता कामा नये. तरच रामनामाच्या उच्चारणात ते गुंगून जाईल. अश्या अलिप्ततेला समर्थ उदासीनता म्हणतात. उदासीन म्हणजे मरगळलेले, अवसान गळाल्याप्रमाणे काहीही न करता बसून रहाणे असे नाही. मोहाच्या, मन विचलित करणाऱ्या गोष्टींबद्दल अनौत्सुक्य, अनास्था असणे हे उदासीनता या तत्वाचे सार आहे. तेव्हा अशी उदासीनता, अलिप्तता असावी म्हणजे सद्विचारांचा, परमेश्वरभक्तीचा, उपासनेचा प्रवेश त्यात होईल आणि तुम्हाला स्वत:ला धन्य वाटेल.

**नको वासना वीषयी वृत्तिरूपे ।**
**पदार्थी जडे कामना पूर्वपापे ॥**
**सदा राम निष्काम चिंतीत जावा ।**
**मना कल्पनालेश तोहि नसावा ॥ ५८ ॥**

सरळ अर्थ:

विषयवासना ही वृत्ती बनून राहू नये. अशा गोष्टींबद्दल, ऐहिक सुखाच्या साधनांबद्दल आकर्षण हे पूर्वजन्मीच्या पापांमुळे निर्माण होते. म्हणून निरिच्छेने, मनात इतर कल्पनांचा गुंता, किंबहुना त्यांचा लवलेशही  न ठेवता सदैव रामाचे स्मरण चिंतन करत रहावे.

विश्लेषण:

मनुष्यदेह आहे म्हणजे त्या देहाच्या भरणपोषणासाठी आवश्यक असणाऱ्या विषयांच्या प्राप्तीची इच्छा करणे हे ओघानेच आले. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा आहेत. या मिळाल्यानंतर मानव देहाचे समाधान व्हायला पाहिजे. पण होतं काय? अन्न मिळत असेल तर त्यात भोज्य, लेह्य, चोष्य, पेय हे जिभेचे

चोचले येतात, मग कडू, गोड, आंबट, तिखट अशा चवींची चटक येते. वस्त्रांमध्ये भरड, तलम, सुती, रेशमी अशा स्पर्शानुरूप प्रकारांची रुची लागते, निवारा म्हटला की चार भिंती आणि छप्पर येव्हढे मिळून समाधान होत नाही, दोन खणी, चारखणी, इमला, प्रासाद अशी अपेक्षा वाढत जाते. म्हणजेच प्राथमिक गोष्टींपेक्षा जास्त मिळवण्याची मनाला ओढ लागते. आणि त्यात माणसाला काही वावगे वाटत नाही. ही वाढत जाणारी ओढ म्हणजेच विषयवासनांकडे झालेली प्रवृत्ती. समर्थ म्हणतात ही अशी प्रवृत्ती मनात असायला नको. पोटापुरता पसा पाहिजे इतपत विषयाची गोडी, कामना, वासना ठीक आहे पण वाढत्या मागणीने तिची वृत्ती बनू देऊ नका. ही वासना, कामना तुमच्या मनात निर्माण का होते? पूर्वजन्मातील असमाधानामुळे, अतृप्त राहिल्याने या जन्मात ती आसक्ती वाढून रहाते. कावळा पिंडाला शिवत नसला तर म्हणतात, 'काही इच्छा अपुरी राहिलीय का विचार करा'. अशी इच्छा अपुरी राहणे म्हणजे त्या जीवाने पुण्यप्रद अशी समाधानी वृत्ती ठेवलेली नसणे. त्यामुळे ती अपुरी इच्छा पापाच्या खाती जमा होते, आणि मग नव्या जन्मात त्या पापाचं फळ पुन्हा वासनांनी मोहवश होण्यात भोगावं लागतं, असं हे दुष्ट चक्र आहे. तेव्हा समर्थ म्हणतात, हे मानवा, पूर्वपापातून जन्मणारी ही विषयवासनांची वृत्ती टाळ. ती टाळण्यासाठी तू निरिच्छ होऊन, कोऱ्या पाटीसारख्या मनाने श्रीरामाचे, भगवंताचे चिंतन सतत करत रहा. ते करताना मन विषयांबद्दलच्या कल्पनाविलासात गुंतू देऊ नकोस. किंबहुना अशा कल्पनांचा लवलेशही मनात येऊ देऊ नकोस.

**मना कल्पना कल्पिता कल्पकोटी ।**
**नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ॥**
**मनी कामना राम नही जयाला ।**
**अती आदरे प्रीति नाहि तयाला ॥ ५९ ॥**

सरळ अर्थ:

कोट्यावधी कल्पना मनात उद्भवत असतात. पण जर परमेश्वराच्या भेटीची ओढ तुझ्यात नसेल तर हे मना, त्या सगळ्या व्यर्थ आहेत. ज्या मनात श्री रामाच्या, प्राप्तीची साधी इच्छा नाही, त्या मनात त्याच्याबद्दल प्रेमभाव, आदर असणार नाही.

विश्लेषण:

मागील श्लोकाचाच धागा पुढे नेत समर्थ म्हणताहेत, हे मना, तू विचार करायला लागलास तर इतके नाना प्रकारचे विचार, कल्पना तुझ्यामध्ये येतील की त्यांची गणती कित्येक कोटींमध्ये होईल. एकीतून दुसरी, दुसरीतून तिसरी असे करत करत हा गुंता वाढत जाईल. करुणाष्टकातही समर्थ म्हणतात ‘अचपळ मन माझे नावरे आवरीता’. म्हणजे काय तर हा भल्याबुऱ्या सर्व प्रकारच्या कल्पनांचा वारू मनातल्या मनात पळतच असतो, जागेपणी काय आणि झोपेत काय, थांबत कधी नाहीच. स्वप्न म्हणजे तरी काय असते? सुसंगत, विसंगत अशा कल्पनांचा खेळच. तर अशा या अपरिमित, असंख्य कल्पनांमध्ये परमेश्वराची भेट कधी आणि कशी होईल यासंबंधी विचार, कल्पना कधीच येत नसेल तर अशा माणसाला त्या रामाबद्दल, त्या सर्वोत्तम परमेश्वराबद्दल प्रेम नाही, आदर नाही हेच सिद्ध होते. परमेश्वर प्राप्तीसाठी त्याची प्रेमाने, पराकोटीच्या आदराने भक्ती करायला हवी. मनात जर तशी प्राप्ती व्हावी अशी इच्छाच नसेल तर मग त्याच्याबद्दल आदर असणे दुरापास्तच.

**मना राम कल्पतरू कामधेनू ।**
**निधी सार चिंतामणी काय वानू ॥**
**जयाचे नियोगे घडे सर्व सत्ता ।**
**तया साम्यता कायसी कोण आता ॥ ६० ॥**

सरळ अर्थ:

हे मना, श्री राम हा कल्पवृक्ष आहे, कामधेनु आहे, अमर्याद ज्ञाननिधीचे साररूप आहे, इतकंच काय तो चिन्तामणीही आहे. त्याच्या इच्छेनेच तर हे सर्व विश्व चालते. मग अशा या रामाला उपमा कोणाची द्यायची?

विश्लेषण:

समर्थ ज्याच्याबद्दल सांगतात 'नेहमी, नित्य नेमाने, सदा, सदैव, सर्वदा त्याचे स्मरण चिंतन करत रहा' तो श्रीराम आहे तरी कसा? कुणासारखा? त्याचं वर्णन काय? या श्लोकात समर्थ स्वत:च सांगताहेत, 'अरे मना, श्रीरामाबद्दल मी काय सांगू? तो कल्पवृक्ष आहे. ज्याच्या सावलीत बसून एखाद्या गोष्टीची केवळ इच्छा केली तरी ती मिळते तो कल्पवृक्ष. इच्छा धरताच वस्तू मिळण्यासाठी सर्व प्रथम म्हणजे त्या कल्पवृक्षाच्या सावलीत यायला हवे. दूरवरून तो वृक्ष दिसताच इच्छा करून भागत नाही. म्हणजे श्रीराम जो कल्पवृक्ष आहे, त्याच्या कृपाछत्राखाली येणे आवश्यक आहे. त्याचे सदासर्वदा अति आदरें स्मरण चिंतन, त्याची भक्ती करूनच आपण त्याच्या प्रेमछायेमध्ये येऊ शकतो. श्रीराम हा कामधेनु आहे. कामधेनु कपिला ही तिच्याकडे जे मागाल ते देणारी गाय. ऋषिवर वशिष्ठ यांच्या आश्रमात असलेल्या या गाईमुळे आश्रमात पाहुणचार घेत असलेल्या विश्वामित्र राजाच्या लक्षावधीच्या संख्येने असलेल्या सैन्याच्या भरणपोषणात कशाचीही कमतरता पडली नाही. त्यामुळे आश्चर्यचकित झालेल्या विश्वामित्राने वशिष्ठांकडे कामधेनूची मागणी केली. आणि ती वशिष्ठांनी नाकारल्यामुळे संतप्त होऊन जबरदस्तीने तिला ओढून नेण्याचा प्रयत्न केला. कामधेनूने तेव्हा आपल्या खुरांनी जमीन खरवडून निघालेल्या रज:कणांचे सैनिकांत रुपांतर केले आणि विश्वामित्राचा पराभव केला. पराजित विश्वामित्राने नंतर राज्यत्याग करून घोर तपस्या केली आणि ऋषिपद मिळवले अशी कथा आहे. तर श्रीराम हा या कामधेनूसारखा आहे जो भक्ताला कधीही काहीही कमी पडू देत नाही. आणखी कसा आहे हा श्रीराम? तो चिंतामणी आहे. चिंतामणी

देखील चिंतिले ते मिळवून देणारे रत्न आहे. अश्या या रामरुपी रत्नाचं आणखी काय वर्णन मी सांगू? रामाने ठरवल्याप्रमाणेच या विश्वातल्या साऱ्या हालचाली होतात. त्याचे नियोजन, व्यवस्थापन हेच या विश्वातल्या सगळ्या गोष्टींच्या अस्तित्वाचे मूळ आहे तर मग अशा या रामाशी कुठल्या गोष्टीचं साम्य कसं असू शकेल? केवळ 'श्रीराम हा श्रीरामासारखा आहे' असेच म्हणायला हवे'.

||श्रीराम||

## दशक सातवे

**उभा कल्पवृक्षातळू दुःख वाहे ।**
**तया अंतरी सर्वदा तेचि आहे ॥**
**जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ।**
**पुढे मागता शोक जीवी धरावा ॥ ६१ ॥**

सरळ अर्थ:

कल्पवृक्षाच्या सावलीत बसून दु:खाची कल्पना करतो त्याच्या मनात सतत दु:खच होत रहाते. आणि असा माणूस लोकांपुढे, संतसज्जनांच्यापुढेही हे दु;खाचे रडगाणेच गात रहातो. मागच्या पुढच्या सगळ्या गोष्टींबद्दल शोक व्यक्त करत रहातो.

विश्लेषण:

समर्थ या श्लोकात उल्लेख करताहेत तो निराशावादी माणसांचा. अशी माणसे कल्पवृक्षाखाली जरी उभी असली तरी मागाल ते देणाऱ्या या वृक्षाकडे सुख मागून घ्यायला विसरतात आणि सदोदित आपल्या असलेल्या वा नसलेल्याही दु:खांचा विचार करण्यात मग्न रहातात. मग हे उघडच आहे की कल्पवृक्ष “तथास्तु” म्हणेल आणि मग त्यांना नेहमीसाठी तसेच दु:खाचे, नैराश्यपूर्ण विचारांचे दान देईल. अशी माणसे मग आपल्या नातेवाईकांकडे, मित्रांकडे, परिचायातील सज्जनांकडे, आपले दु:खाचे रडगाणेच गात राहतील. कधीकाळी होऊन गेलेल्या दुर्दैवी दु:खद घटनांपासून ते अगदी ‘उद्या कदाचित असं घडेल आणि ते किती आणि कसे दु:खदायक असेल याचेच पाढे उजळत बसतील. या अशा वर्तणुकीचे परिणाम काय होतील ते समर्थ पुढल्या श्लोकात सांगतात.

**निजध्यास तो सर्व तूटोनी गेला ।**
**बळे अंतरी शोक संताप ठेला ॥**
**सुखानंद आनंद भेदे बुडाला ।**
**मना निश्चयो सर्व खेदे उडाला ॥ ६२ ॥**

सरळ अर्थ:

खेद करण्यामुळे चिंतनातली एकाग्रता भंग होते आणि मग मनात संतापाचा, शोकाचा प्रादुर्भाव होतो, त्यापायी सुखाची अनुभूती, आनंद मिळत नाही आणि मनात जे काही चांगले निश्चय केले असतील त्या सर्वांचा नाश होतो.

विश्लेषण:

असे नैराश्यपूर्ण विचार सतत मनात येत राहिले तर मग चांगल्या, आशावादी विचारांना तिथे स्थान मिळत नाही. मनाची सारखी चलबिचल होत राहते. “काय आपलं नशीब तरी बघा, पोराला चांगल्या पगाराची सिमेन्समधली नोकरी मिळेलसं वाटत होतं तर परवा इंटरव्ह्यूमध्ये फेल झाला दिवटा. इंजिनियर असून काय उपयोग? आता दुसरा कॉल आलाय म्हणतोय खरा. पण तिथे तरी काय दिवे लावणार आहे? रड्या आहे. तिथंही पहिले पाढे पंचावन्न हीच गत होणार दिसतंच आहे. आमच्या नशिबात काही रिटायर होऊन  आराम करायचं लिहिलेलं नाही ही अगदी काळ्या दगडावरची रेघ!” असा विचार करणाऱ्याची गम्मत बघा. या माणसाला मुलगा मिळाला आहे या गोष्टीचा आनंद नाही, मुलानं इंजिनियरिंगमधली पदवी मिळवली आहे यात आनंद नाही, मुलाची एक संधी हुकली तरी दुसरी लगेच उपलब्ध आहे यात आनंद नाही, स्वत:ला नोकरी आहे त्यामुळे प्राप्ती चालू आहे याचं समाधान नाही, एकीत नाही तर दुसरीत दुसरी नाही तर तिसरीत त्याला यश मिळेल असा आशावाद या माणसाकडे नाही, मुलाच्या कर्तृवावर विश्वास नाही, तो याला दिवटा वाटतोय. सगळे निराशावादी विचार मनात. अशा मनामध्ये मग चांगल्या विचारांचा प्रादुर्भाव कुठून होणार?

तिथं कुढणे, वैताग करणे, संतापणे आणि मग दु:ख मानत शोक करणे हेच कायम रहाणार. आशापूर्ण विचारांना थारा नाही मग त्यातून जो आनंद मिळाला असता तो मिळणे नाही. म्हणून समर्थ म्हणतात, खेद करत रहाण्यामुले नैराश्य वाढून संताप, शोक या भावना ताबा घेतात आणि मग कुठल्याही गोष्टीतले सुख, आनंद घेता येत नाही. जे काही चांगले चिंतिले असेल त्यावर विश्वास वाटेनासा होतो, मनाची चलबिचल होते, चांगल्या विचाराकडे मन एकाग्र करता येत नाही.

**घरी कामधेनू पुढे ताक मागे ।**
**हरीबोध सांडोनि वेवाद लागे ॥**
**करी सार चिंतामणी काचखंडे ।**
**तया मागता देत आहे उदंडे ॥ ६३ ॥**

सरळ अर्थ:
दारात कामधेनु असताना तिच्याकडे मागून मागायचं काय तर ताक म्हणजे परमेश्वराबद्दलचं ज्ञान सोडून निरर्थक वाद विवादाची इच्छा ठेवण्यासारखं किंवा हातात चिंतामणी, जो काहीही मागितलं तर उदंड देतो तो, असताना त्याच्याकडे काचेचे तुकडे मागण्यासारखं आहे.

विश्लेषण:
कोणाकडे काय मागायचं हे तारतम्य असणं महत्वाचं असतं. आपण जे आणि ज्याच्याकडे मागतो आहोत ते देण्याची क्षमता त्याच्याकडे आहे का? आणि जर त्याची त्याहूनही मोठी क्षमता असेल तर त्याच्याकडे क्षुल्लक गोष्टीची मागणी करावी का? क्षुल्लक गरज असेल तर ती पुरी करण्यासाठी मोठ्यात मोठे दान देण्याची ऐपत असलेल्याकडे साकडं घालण्यात काय अर्थ आहे हा विचार करून मोठी आवश्यकता असेल तेव्हासाठीच आपला शब्द त्या समर्थ व्यक्तीकडे टाकावा असे हे साधे सरळसोट व्यवहारज्ञान आहे. कामधेनु ही गाय तुमची मोठ्यात

मोठी मागणीही पुरवू शकते मग तिच्याकडे फक्त ताकासारख्या क्षुल्लक गोष्टीची मागणी करणारा तो एक पढतमूर्खच. ज्ञानदायिनी देवी सरस्वती ही कामधेनुसारखी आहे. तिच्याकडे हरीबोधाचं म्हणजे परमेश्वरभक्तीचं ज्ञान मागून घ्या. निव्वळ आणि निरर्थक वाद विवाद करण्याची इच्छा बाळगू नका. तीच गोष्ट चिंतामणीची. चिंतामणी हे एक रत्न आहे. जसा स्यमंतकमणी, कौस्तुभमणी, नागमणी तसा हा चिंतामणी. मनात ज्या गोष्टीचे चिंतन कराल ती गोष्ट देणारा, मनातली इच्छा पुरवणारा. तो हातात धरून त्याच्याकडे, "हे चिंतामणी, मला थोडे काचेचे तुकडे दे" अशी मागणी करणे किती हास्यास्पद असेल? कुंभकर्णाला ब्रम्हदेवाकडे 'इंद्र'पद मागण्याऐवजी 'निद्रा' मागणारी जिव्हा देवी सरस्वतीने दिल्याची कथा आहे. तीही 'काय मिळाले असते आणि काय मागितले?' अशातलीच आहे मग भलेही ती चूक देवांनी दानवांना हतबल करण्यासाठी मुद्दाम कुंभकर्णाकडून करवलेली असो. परिणाम तर चिंतामण्याकडून काचेचे तुकडे किंवा कामधेनूकडून ताक मागण्यासारखाच नुकसानकारक झाला.

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना ।**
**अती काम त्या राम चित्ती वसेना ॥**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।**
**अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा ॥ ६४ ॥**

सरळ अर्थ:

जो अतिशय मंद मतीचा आहे त्याच्याकडे दृढ बुद्धी नसते. ज्याच्या मनात वासनाची, कामनांची भरमार आहे त्याच्या मनात श्रीरामाला जागा नसते. अति लोभ ज्या मनात आहे त्या मनात चलबिचल, अस्वस्थता असते आणि जे मन विषयवासनांनी लडबडलेले असते त्याची अवस्था दयनीय, बापुडवाणी असते हे निश्चित.

विश्लेषण:

या श्लोकात समर्थ हे अज्ञान, कामना, लोभ आणि विषयवासना या चार दुर्गुणांचा अतिरेक झाला तर काय होईल ते वर्णन करत आहेत. हे चारही दुर्गुण थोड्याफार प्रमाणात सर्वांमध्ये असतातच. आणि ते उचित प्रमाणात असले तर त्याने काही बिघडत नाही. किंबहुना ते असणे हा व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव आहे. कोणीही माणूस सर्वज्ञ नसतो. दहा विषयांची माहिती त्याच्याकडे असली तरी असाही एकादा विषय असतो की त्यात त्याला सर्व काही माहित नसतं, जुजबी ज्ञान असतं. अशा जुजबी ज्ञानावरही तो धकवून नेऊ शकतो. पण शून्यच ज्ञान असलं तर? तो त्यात फसतो हे ओघाने आलंच. मग कुठल्याही गोष्टीचं काहीही ज्ञान नसेल तो माणूस नुसताच मूढ, मूर्ख नाही तर अती मूढ, म्हणजे मूर्खशिरोमणी असतो. अशा मूर्खशिरोमण्याकडे स्थिर बुद्धी असत नाही कारण ज्ञानाच्या अभावी कुठं, काय, आणि कसं करावं याबद्दल त्याचा ठाम विचार होऊ शकत नाही. तीच गोष्ट ज्या मनात कामनांचा अतिरेक आहे, आपल्या अस्तित्वाला आवश्यक तितक्याच गोष्टींची इच्छा धरावी, जास्तींची नाही हे ज्या मनाला मान्य नाही त्या हव्यासी मनात श्रीरामाच्या प्राप्तीची इच्छा कुठून उगम पावणार? त्या परमेश्वरप्राप्तीच्या इच्छेला इतर इच्छांनी व्यापून राहिलेल्या मनात जागाच मिळत नसते. आणि अशा हव्यासापायी, ‘मला अजून पाहिजे, अजून आणखी पाहिजे, दुसऱ्याकडे आहे तेही मला पाहिजे’ अशा लोभी वृत्तीमुळे त्या मनाला शांति मिळत नाही. त्या मनाचा असमाधान, अतृप्तता, घालमेल या गोष्टी - ज्यांना समर्थ क्षोभ म्हणतात – ताबा घेतात. उपभोगाच्या सर्व विषयांचा अति हव्यास मनात असला तर त्या गोष्टी मिळवण्यासाठी माणूस कुठल्याही थराला जातो. लाचारीसुध्दा पत्करतो. ज्याच्याकडून या गोष्टी मिळू शकतील त्याच्याकडे तोंड वेंगाडणे, त्याच्या हातापाया पडणे, अशा बापुडवाण्या कृतीही तो करतो. म्हणजे या विषयवासनांपायी त्याचे जीवन दीनवाणे होऊन रहाते. म्हणून अशा कुठल्याही

गोष्टींचा अतिरेक असणे योग्य नाहे असे समर्थांनी या श्लोकात दाखवून दिले आहे.

**नको दैन्यवाणे जिणे भक्तिऊणे ।**
**अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणे ॥**
**धरी रे मना आदरे प्रीति रामी ।**
**नको वासना हेमधामी विरामी ॥ ६५ ॥**

सरळ अर्थ:
भक्तिरहित जगणे हे दरिद्री जगणे आहे, असले जिणे नसावे. जो कमालीचा बुद्धिहीन असतो त्याला दु:खेही जास्त असतात. तेव्हा हे मना, रामाविषयी आदरपूर्ण प्रीति, भक्ति बाळग. रामाशिवाय असेल तर अशा सुवर्णमहालाचीही इच्छा करू नको.

विश्लेषण:
मागच्याच श्लोकातील अर्थाला पुढे नेत समर्थ सांगताहेत की या अतिरेकाच्या गोष्टी टाळल्या पाहिजेत. श्री रामाची भक्ती करायला हवी आणि जर अशी भक्ती मनात नसेल तर असल्या भक्तीरहित जिण्याची किमत ती काय? ते दरिद्री जिणे आहे. दीनवाणेपणाने जगणे आहे. आणि असे दीनवाणे जीवन जो स्वीकारतो त्याला खऱ्या आनंदाचे, ईश्वरभक्तीच्या परमानंदाचे ज्ञानच नसते म्हणजे एका अर्थी तो अती मूढ - मूर्खशिरोमणीच असतो. अशा मूर्खशिरोमण्याला जीवनात दु:खच मिळत राहील हे नक्की. तेव्हा हे मना, रामाबद्दलची, ईश्वराबद्दलची आदरभावना, प्रेम, भक्तीभावना तुझ्यामध्ये दृढपणे धारण कर. जिथं श्री रामाला जागा नसेल, म्हणजेच रामाची भक्ती होऊ शकणार नसेल अश्या जागेची, ती जागा म्हणजे अगदी सुवर्णमहाल असली तरीही इच्छा धरू नको.

**नव्हे सार संसार हा घोर आहे ।**
**मना सज्जना सत्य शोधूनि पाहे ॥**
**जनीं वीष खाता पुढे सूख कैचे ।**
**करी रे मना ध्यान या राघवाचे ॥ ६६ ॥**

सरळ अर्थ:

संसार असार आहे, घोर अंध:काराचा आहे. त्यात हे मना, सत्य काय असते ते तू शोधावेस. वीष भक्षण करणाऱ्याला सुख कोठून मिळणार? श्री रामाचे ध्यान हे सुखकारक सत्य आहे. तेच तू करावेस.

विश्लेषण:

संसार हा शाश्वत, कायमस्वरूपी नाही. कारण त्यात असलेल्या सर्वच गोष्टींना अंत आहे. माझ्याकडे आज हे आहे, पण उद्याही ते असेल का? काही शाश्वती नाही. आजचा पैसा, मानमरातब, जमीनजुमला, सारं जे काही आहे ते उद्या असणार का? असेल पण ते माझं नसेल. मीच नाशवंत आहे मग जाताना हे सारं माझ्याकडे कसं असेल? मग जे माझं नसणार आहे त्याच्या प्राप्तीसाठी, राखून ठेवण्यासाठी मी जीवाला घोर का लावून घ्यायचा? या असार संसाराची दु:खदायी खोटी, निष्फळ माया का लावून घ्यायची? हा घोर लावणारा संसार, ऐहिक जीवन, वरवरचं आहे. मी हव्यासाने जे मिळवतो आहे त्यात सुख आहे ही माझी मी करून घेत असलेली फसवणूक आहे, असत्य आहे. मग सत्य काय आहे? ‘सत्यम संसृतीगर्तेयम दु:खै: पूर्णा निरंतरम’– ही संसृतीगर्ता, संसार दु:खाने पूर्ण भरलेला आहे हेच सत्य आहे. अरे मना, हे सत्य तू जाणून घे. पण या असार संसाराच्या गर्तेतून मोक्ष कसा मिळायचा? रामनामाने. कारण ‘रामनाम सत्य है’. रामनामाविना, परमेश्वराच्या प्रेमाविना जीवन हे विषासारखेच आहे. मग हे विषच जर तू स्वीकारत राहिलास तर रामनाम, श्रीरामाचे, राघवाचे ध्यान, चिंतन, मनन यातलं सुख तुला कोठून

मिळणार? तेव्हा ते मिळवायचे असेल तर तू या संसारातील फापटपसाऱ्याच्या, निष्फळ गोष्टींचा मोह सोडून दे आणि राघवाचे ध्यान करत जीवन व्यतीत कर.

**घनश्याम हा राम लावण्यरूपी ।**
**महाधीर गंभीर पूर्णप्रतापी ॥**
**करी संकटी सेवकांचा कुडावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ६७ ॥**

सरळ अर्थ:
घनश्याम रामाचे रूप सुंदर आहे, तो कमालीचा धीर गंभीर आणि महा पराक्रमी आहे. भक्त संकटात असतील तर तो त्यांचा आधार बनतो. तेव्हा रोज प्रभातसमयी रामाचे चिंतन करीत जावे.

विश्लेषण:
या श्लोकापासून पुढचे दहा श्लोक समर्थ हे श्रीरामाचे चिंतन, त्याचे गुणगान, उपासना उष:काल म्हणजे प्रभात होताच करावे आणि करत राहावे असे सांगतात. हा राम आहे तरी कसा? अगडी लडिवाळ शब्दात ते म्हणतात, सावळ्या मेघासारखी कांती असलेला हा माझा राम रूपसुंदर आहे. मूर्तिमंत सौंदर्य, लावण्य म्हणजे श्री राम. आणि असा हा लावण्यरूपी श्यामलमेघवर्णी राम धीरगंभीर, महाप्रतापी देखील आहे. धीरगंभीर कसा? पिता दशरथाकडून अयोध्येचा राज्याभिषेक व्हायचा असताना केवळ सावत्र मातेला पित्याने दिलेल्या वचनाचा मान राखायचा म्हणून जन्मसिध्द अधिकारावर पाणी सोडताना तो निर्विकार राहिला वर वनवासदेखील स्वीकारून निघून गेला हे धैर्य, या प्रसंगी धारण केलेलं गांभीर्य हे त्याच्या धीरगंभीर असण्याचं द्योतक आहे. पूर्णप्रतापी तर आहेच आहे, लहान वयातच विश्वामित्रऋषींबरोबर जाऊन ऋषीमुनींचे तपोभंग करणाऱ्या कित्येक राक्षसांना यमसदनाला पाठवण्याचा आणि नंतर रावणासारख्या प्रबळ शत्रूचाही नाश करण्याचा प्रताप त्याने केला होता. असा हा धीरगंभीर पूर्णप्रतापी राम संकटात

असलेल्या अनुयायांचा आधार, आसरा बनतो. प्रजेचं भरण पोषण, पालन, रक्षण करतो म्हणून हे मना, या श्रीरामाचं चिंतन तू प्रात:काली करावस हेच तुझ्यासाठी उचित ठरेल.

**बळे आगळा राम कोदंडधारी ।**
**महाकाळ विक्राळ तोही थरारी ॥**
**पुढे मानवा किंकरा कोण केवा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ६८ ॥**

सरळ अर्थ:

धनुर्धारी रामाचे बळ हे आगळे वेगळे आहे. त्याच्यापुढे महाभयंकर काळ देखील थरथर कापतो तिथं मनुष्यप्राण्याची काय कथा? तेव्हा हे मना, रोज प्रभात समयी त्याचे स्मरणचिंतन  करावे.

विश्लेषण:

आणखी पुढं श्री समर्थ म्हणताहेत, हा राम आहे तो कोदंडधारी, म्हणजे धनुष्य धारण केलेला, धनुर्धारी आहे. आणि अशा या कोदंडधारी रामाचं बळ आगळं वेगळं असं आहे. म्हणजे कसं? त्याच्यापुढं अक्राळविक्राळ असा प्रत्यक्ष महाकाळ, साक्षात मृत्यू जरी उभा राहिल तर थरथरून गर्भगळीत होऊन जातो. बाणांच्या वर्षावानं त्यानं प्रत्यक्ष समुद्राला हात जोडून उभं रहायला लावलं समोर आणि लंकेपर्यंतची वाट द्यायला लावली. रावणाचं आणि त्याच्या सगळ्या राक्षस सैन्याचं काय झालं? पार नायनाट करून टाकला त्यांचा या कोदंडधारी रामानं. मग अशा या पराक्रमी पुरुषाच्या समोर सामान्य मनुष्याची आणि किंकरांची म्हणजे दासांची काय अवस्था होईल याचा विचार करा. तेव्हा या रामासमोर आपण या:कश्चित आहोत याची मनोमन जाणीव ठेवा आणि त्याच्याकडून अभय मिळवायला म्हणून त्याचं मनोमन चिंतन प्रभातकालापासून सुरु करा. अर्थात समर्थ जेव्हा सांगतात प्रभात काळी त्याचं चिंतन कर. म्हणजे काही सकाळी एकवेळ त्याचं नाव घ्यायचं

आणि एरवी नाही असा याचा अर्थ नाही. तर मनोभावे त्यास्मरण, चिंतन ध्यान करायला प्रभातकाळी सुरुवात करा आणि तोच ध्यास दिवसभरासाठी ठेवा असा त्यांच्या सांगण्याचाअर्थ आहे. (अशा भक्तीभावपूर्ण चिंतनानं, ध्यानानं तुम्ही त्याला प्रसन्न करून घ्याल तर तो नक्की तुम्हाला पावेल आणि तुमचा या घोर अशा असार संसारातून उध्दार होईल.)

**सुखानंदकारी निवारी भयाते ।**
**जनीं भक्तिभावे भजावे तयाते ॥**
**विवेके त्यजावा अनाचार हेवा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ६९ ॥**

सरळ अर्थ:

सुख, आनंद देणारा राम भयाचे निवारण करतो. तेव्हा भावभक्तीने त्याचे स्मरण पूजन करावे. दुराचरण, हेवा या गोष्टी टाळून सद्बुद्धी ठेवावी आणि रोज प्रभातकाळी श्री रामाचे चिंतन करावे.

विश्लेषण:

श्रीराम कसा आहे? सुख, आनंद देणारा असा आहे.त्याचे नाव जरी मनात उद्भवले तर आनंद होतो, आधार वाटतो, किंबहुना सुखाची भावना मनात निर्माण होते. रामाच्या स्मरणात हेवादावा, अनादर वृत्ती कधीच मनात उपजत नाही. तेव्हा असा हा राम जो सुखानंदकारी आहे तो आपल्या मनातल्या भयभावनांचा नाश करतो. छोटसं उदाहरण देतो. घरात लहान मुलाच्या मनात भुताची भीती असते. मग ते मूल जेव्हा अंधारात आपल्याला बिलगून ‘भुताची भीती वाटते’ असं सांगतं तेव्हा आपण त्याला म्हणतो, ‘भिऊ नकोस, ‘राम, राम’ म्हण म्हणजे भूत पळून जाईल’. मग ते मूल ‘राम, राम, राम, राम’ असं म्हणत निर्धास्त होऊन झोपी जातं. आपल्यावर आणि रामावर विश्वास ठेवून ते रामनाम घेत निर्धास्त होतं, त्याच्या मनातली भीती नष्ट होऊन जाते. तसंच लहान मोठ्या सर्वांचं आहे. दुराचार करू

नये, विचारपूर्वक मनातल्या द्‌वेष, मत्सर या भावना काढून टाकाव्यात, निष्कलंक वर्तन ठेवावं आणि भक्तिभावपूर्वक रामाचं नामस्मरण, त्याचं उच्चारण करावं. आणि या नामस्मरणाची, चिंतनाची सुरुवात प्रभात होताच, म्हणजे झोपेतून जाग येताच करावी.

**सदा रामनामे वदा पूर्णकामे ।**
**कदा बाधिजेनापदा नित्य नेमे ॥**
**मदालस्य हा सर्व सोडोनि द्‌यावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७० ॥**

सरळ अर्थ:
नेहमी मनापासून रामनामाचे उच्चारण करावे, तसे केल्याने आपदांची बाधा कदापि होत नाही. अहंकारापोटी, आळसापोटी आलेली निष्क्रीयता सोडून द्‌यावी आणि प्रभात होताना श्री रामाचे नामस्मरण करावे.
विश्लेषण:
नेहमी न चुकता श्री रामाचे नाम अगदी पूर्णत: मन:पूर्वक, स्वेच्छेने घ्यायला हवे. जुलमाचा रामराम नसावा. यात रामावरची निष्ठा व्यक्त होते. अशा नामस्मरणामुळे संकटाची बाधा होत नाही. संकटे येणारच नाहीत असं इथं समर्थ म्हणत नाहीत. यायची ती संकटे, आपदा, विपदा येणारच. त्या कुणाला चुकणार नाहीत. मग राम नाम जपाचा फायदा काय? तर त्या संकटांमधून, विपदांमधून भक्त तरून जाईल. तो हतबल होणार नाही. त्या आपदाचं निवारण करण्याची शक्ती त्याला मिळेल. आणि त्या जोडीला भक्ताने अहंकार, आळस झाडून टाकला, 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' अशी वृत्ती न ठेवता, निष्क्रीयता न अवलंबता प्रयत्न केला तर नक्कीच त्या आपदामुळे त्याला बाधा होणार नाही. तेव्हा अशी विनम्र सक्रीयतेची वृत्ती अंगिकारून रोज प्रभात समयी श्रीरामाचे मनोमन चिंतन करावे.
||श्रीराम||

## <u>दशक आठवे</u>

**जयाचेनि नामे महादोष जाती ।**
**जयाचेनि नामे गती पाविजेती ॥**
**जयाचेनि नामे घडे पुण्यठेवा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७१ ॥**

सरळ अर्थ:

ज्याच्या नावामुळे मोठ्यात मोठे दोष नष्ट होतात, सद्‌गती मिळते आणि पुण्य जोडले जाते अशा रामाचे नामस्मरण रोज प्रभात काळी करावे.

विश्लेषण:

श्रीरामाचे नाव घेऊन समुद्रात टाकलेले दगड तरले आणि लंकेला जाण्यासाठीचा सेतू तयार झाला असे आपण ऐकतो, वाचतो. यातला अंधश्रध्देचा भाग सोडला तरी त्यात रामनामाच्या प्रभावाने दगडांमधला, जडपणामुळे असलेला बुडण्याचा, दोष गेला आणि त्याजागी वर तरंगण्याचा गुण उत्पन्न झाला अशी कल्पना आहे. समर्थ तीच भावना पुढे नेऊन म्हणताहेत की रामाच्या नामचिंतनामध्ये मनातल्या क्रोध, मद, मत्सर, स्वार्थ अशा नाना प्रकारच्या दोषांचे अस्तित्व नष्ट करण्याचे सामर्थ्य आहे. आणि असे सारे दोष गेले तर माणसाची होणारी अधोगती थांबून त्याला चांगली, परम सत्याकडे नेणारी गती – सद्‌गती- लाभते. मरा-मरा-मरा-मरा असा जप करणाऱ्या वाल्या कोळ्याला त्या जपातून अभावितपणे निर्माण होणारा राम-राम-राम-राम हा जप वाल्मिकी म्हणून ऋषिपद मिळण्याइतके पुण्य देता झाला. म्हणून समर्थ सांगतात की अशा या दोषनाशक, सद्‌गतीदायक, आणि पुण्यप्रद रामनामाचे स्मरण, चिंतन आणि उच्चारण दररोज प्रभातकाळी करावे.

**न वेचे कदा ग्रंथीचे अर्थ काही ।**
**मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही ॥**
**महाघोर संसारशत्रू जिणावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७२ ॥**

सरळ अर्थ:

रामनाम घेण्यात ना काही खर्च आहे, ना काही कष्ट. कष्ट तर हा भयंकर शत्रूसमान असलेला संसार चालवत जगण्यात असतात. तेव्हा असे हे सोपे रामनाम रोज सकाळी मनापासून घ्यावे.

विश्लेषण:

जे साध्य करण्यासाठी पदरमोड करावी लागत नाही किंवा ज्याच्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत नाही, कष्ट करावे लागत नाही असं या मायावी, संसारी जगात काय आहे? हे काही कोडे नाही. चैनीच्या वस्तू तर सोडाच, जगण्यासाठी आवश्यक असलेली हरेक गोष्ट - अन्न, वस्त्र, निवारा - मिळवताना ती विनासायास, गाठीचा पैसा खर्च केल्याशिवाय मिळत नाही. आणि तो पैसा मिळवण्यासाठी माणूस नाना परीचे कष्ट करतो. नोकरीत त्रास आहे, व्यवसायात विवंचना आहे, कराव्या लागणाऱ्या धावपळीत, धडपडीत शारीरिक, मानसिक, सगळ्याच प्रकारचे कष्ट आहेत. पण रामनाम? उच्चारण्यात ना कष्ट पडतात ना त्याच्यासाठी चार चव्वल मोजावे लागतात. ‘राम’, किती सोपा शब्द आहे हा! आणि तो मनापासून उच्चारल्यामुळे या महाघोर, जिकिरीच्या संसारातलं जिणं सुसह्य होतं. रामनाम नुसतं मनोभावे स्मरलं तरी शांत शांत वाटतं. म्हणूनच समर्थ म्हणतात, अशी ही विनासायास, विनामूल्य मिळणारी शांती प्राप्त करायची असेल तर हे मना, प्रभातसमयी रामनामाचे चिंतन करण्याचा परिपाठ ठेव.

**देहेदंडणेचे महादुःख आहे ।**
**महादुःख ते नाम घेता न राहे ॥**
**सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७३ ॥**

सरळ अर्थ:

देहाला कष्ट देणे हे अतिशय दु:खप्रड आहे. पण हे दु:ख (श्रीरामाचे) नामस्मरण केल्यावर नाहीसे होते. जो या देवाच्या (श्रीरामाच्या) नामाचे चिंतन करतो तो सदा शिव, म्हणजे नेहमी पवित्र भावना बाळगून रहातो (पाठभेद : सांब सदाशिव देखील देवाचे नामचिंतन करत असतो). प्रभात होताच श्री रामाचे चिंतन करावे.

विश्लेषण:

कित्येक योगी, हठयोगी, साधुसंत हे आपल्या शरीराला क्लेशदायक अशा आचरणाने तप साधना करत असतात. एका पायावर उभं रहायचं, त्रिकाल, अहर्निश पाण्यात उभं राहून तपस्या करायची, निबिड जंगलात वास्तव्य करायचं, अन्नपाण्याविषयी अनास्था बाळगायची, अशा गोष्टींचे आचरण हे सारे प्रकार देहदंडन, अघोरी या स्वरूपात मोडतात. असे देहदंडन स्वेच्छेने केलेले असले तरी क्लेश, दु:ख पोचवतेच. पण ते करणाऱ्या साधकाचं मन मात्र  हे दु:ख विसरतं. याचं कारण ते नामस्मरणात, संकीर्तनात गुंगून गेलेलं असतं.  सदाशिव महादेव आणि सांब तसेच त्या सदाशिव शंकराचे उपासक, अशी अघोरी तपस्या करणारे शाक्तपंथी, तेही त्रिदेवांचे, श्री विष्णूचे म्हणजे पर्यायाने श्री रामाचे चिंतन करत असतात ज्यायोगे त्यांचे देहदंडन त्यांना सह्य होते. म्हणून हे मानवा, तूही प्रभात होताच श्रीरामाचे चिंतन करायला सुरुवात करत जा.

**बहुतांपरी संकटे साधनांची ।**
**व्रते दान उद्यापने ती धनाची ॥**
**दीनाचा दयाळू मनी आठवावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७४ ॥**

सरळ अर्थ:

कुठल्याही प्रकारच्या साधना करतांना नाना प्रकारची संकटे उभी रहात असतात. दानधर्म करायचा, व्रतवैकल्ये करायची, त्यांची उद्यापने करायची या सगळ्या गोष्टी साधना म्हणून केल्या जातात. आणि त्या खर्चिक स्वरूपाच्या असतात. त्यापेक्षा लीन, दीनांवर दया करणारा श्रीराम मनापासून आठवावा आणि त्याचे चिंतन प्रभातकालापासून करावे.

विश्लेषण:

या मनुष्यजन्मामध्ये स्वार्थ किंवा परमार्थ, दोन्हीपैकी कोणतीतरी गोष्ट साध्य करण्यासाठी माणूस धडपडत असतो. म्हणजे एका परीने त्यासाठी साधना करत असतो. स्वार्थासाठी लांगुलचालन, लाचलुचपत, हेवेदावे, वैर या गोष्टी आणि परमार्थासाठी वेगवेगळ्या देवांच्या नाना प्रकारच्या पूजाअर्चा, दर्शनाच्या, इच्छापूर्तीच्या लालसेने केलेली तीर्थाटने, दानधर्म, व्रतेवैकल्ये, त्यांची उद्यापने इत्यादी गोष्टी करतो. त्यातून त्याला हवे ते प्राप्त होतेच असे नाही. स्वार्थाच्या साधनेमध्ये त्याच्यापायी कष्ट, मन:शांतीचा नाश, प्रसंगी होणारी हानी या गोष्टी त्याच्या वाट्याला येऊ शकतात. तर वर सांगितलेल्या परमार्थाच्या साधनांमध्ये धनाचा व्यय, म्हणजे खर्च होतो, प्रकृतीची हेळसांड, त्यापाये येणारी आजारपणे आणि त्यातून बरे होण्यासाठी पुन्हा खर्च अशी फलिते साधना करणाऱ्याच्या वाट्याला येतात. मग या अशा साधना का करायच्या? त्यापेक्षा स्वार्थ सोडून द्यायचा आणि परमार्थासाठी, परमेश्वराचा अनुग्रह होण्यासाठी, सद्गती मिळण्यासाठी म्हणून कपर्दिकेचाही खर्च करावा न लागता, देहदंडन करावा न

लागता करता येण्यासारखी एक गोष्ट आहे. आणि ती म्हणजे दीनांचा दयाळू, कृपाळू असलेल्या ईश्वराच्या ठायी लीन होऊन त्याला मनोमन श्रद्धेने आठवायचे आणि त्याची प्रार्थना करायची. यासाठी हे मना, त्या ईश्वराचे, श्रीरामाचे नामचिंतन तू प्रभात होताच सुरु करावे.

**समस्तांमधे सार साचार आहे ।**
**कळेना तरी सर्व शोधून पाहे ॥**
**जिवा संशयो वाउगा तो त्यजावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७५ ॥**

सरळ अर्थ:
समर्थ म्हणतात या सगळ्या साधनांमध्ये प्रमुख, महत्वाची साधना म्हणजे सद्वर्तन ठेवणे हे आहे. म्हणजे काय हे कळत नसेल तर शोध घ्या, विचारविमर्श करा. मनातल्या व्यर्थ शंका कुशंका दूर करा आणि रामाच्या चिंतनाने दिवसाची सुरुवात करा.

विश्लेषण:
वरच्या श्लोकात वर्णन केलेल्या नाना प्रकारच्या परमार्थसाधनांमध्ये सारभूत, प्रमुख, महत्वाची अशी जी साधना आहे ती म्हणजे आपले वर्तन चांगले, साचार ठेवावे, प्रामाणिकपणाचे ठेवावे. मुखमे नाम और बगलमे छुरी असा प्रकार होऊ देऊ नये, पूजाअर्चा, व्रतवैकल्ये आदींचे खर्चिक स्तोम न माजवता ईश्वराठायी नम्र, नतमस्तक, लीन व्हावे. तसे होण्यासाठी काय करायला हवे ते जर कळत नसेल तर त्याचा शोध घ्यावा, साधूसंत अशांसारख्या अधिकारी, अनुभवी व्यक्तीना विचारावे आणि आपल्या मनातला संशय दूर करून घ्यावा. अशा अधिकारी व्यक्तीही स्वानुभवाने हेच सांगतील की श्री रामाच्या ठायी काया वाचा मने लीन होऊन त्याचे मनोमन चिंतन करून प्रात:काल शुभ, शुचिर्भूत करावा.

**नव्हे कर्म ना धर्म ना योग काही ।**
**नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही ॥**
**म्हणे दास विश्वास नामी धरावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७६ ॥**

सरळ अर्थ:

माणूस आपल्या परीने कर्म, धर्म, भोग त्याग सारे काही करत असतो परंतु हे सारे यथासांग, जसे व्हायला हवे तसे होत नाही कारण हे नीट कसे करावे हेच माहित नसते. अशा परिस्थितीत काय करायला हवे? तर समर्थ रामदास म्हणतात, रामनामावर विश्वास ठेवा आणि यातल्या ज्या ज्या गोष्टी कराल त्या त्या रामावर त्याच्यावर भरोसा, विश्वास ठेवून करा.

विश्लेषण:

मनुष्य जन्माला येतो तेव्हा त्याच्या प्राक्तनात त्याने काही कर्मे करावी, धर्म पाळावा, उचित आणि आवश्यक ते भोग घ्यावेत, अनुचित गोष्टींचा त्याग करावा हे सारे लिहिलेले असते. जीव जन्माला आल्यानंतर यथाकाल तो या गोष्टी करतोही. कर्मे करतो, पण कोणती उचित, कोणती अनुचित यातलं तारतम्य न बाळगता करतो. त्यामुळे त्या योग्य म्हणाव्यात अशा होत नाहीत. अगदी साधी उदाहरणे घ्यायची झाली तर शाळेत अभ्यास करायचे कर्म तो करतो पण प्रामाणिकपणे न करता शॉर्टकट घेऊन, कॉप्या करून करतो, कचेरीत काम करतो पण तिथंही चुकारपणा करत करतो, व्यापारउदीम करतो पण प्रामाणिकपणाला फाटा देऊन करतो. धर्मकार्य करतो पण केवळ आपली सोय पाहून, सोयीचे असेल तेच आणि तेव्हढेच करतो. म्हणजे जे केले ते जसे करायला हवे तसे होत नाही, कारण? साधनशुचिता पाळलेली नसते. ज्याला यथासांग – सांगितले आहे तसे – म्हणता येईल असे ते करणे, पाळणे, भोगणे वा त्यागणे नसते. सांगितले आहे तसे म्हणजे शेजाऱ्याने, किंवा कोणीतरी स्वार्थीपणाने सांगितलेले असे नव्हे. कारण

चुकीचे मार्ग सुचवणारेही असतातच. मग? खऱ्या साधुसंतांनी, सज्जनांनी, योग्यतेच्या गुरुंनी सांगितल्याप्रमाणे. असे सांगोपांग, यथासांग कर्म, धर्म, भोग वा त्याग जर मनुष्याकडून घडला तर त्याच्या जीवनाचे सार्थक झाले असे म्हणता येते. मग असा गुरु कोण? तर समर्थ रामदास म्हणतात त्याप्रमाणे श्रीराम हा तो गुरु आहे. पण तो तर प्रत्यक्ष आपल्या समोर नाही, मग त्याची शिकवण कशी मिळायची? तर ती त्याच्या नामस्मरणाने त्या नामावर विश्वास ठेऊन मिळवायची. आपल्या मनात श्रीराम सद्भावनाच निर्माण करेल, आपल्याला योग्य असा मार्ग तोच दाखवेल असा विश्वास, भरोसा ठेवून मिळवायची. आणि यासाठी त्याच्या नामाचे मनोभावे स्मरण, मननचिंतन करायचे अगदी प्रभात होता होता पासून.

**करी काम निष्काम या राघवाचे ।**
**करी रूप स्वरूप सर्वां जिवांचे ॥**
**करी छंद निर्द्वंद्व हे गूण गाता ।**
**हरीकीर्तनी वृत्तिविश्वास होता ॥ ७७ ॥**

सरळ अर्थ:

राघवाचे नाम घेण्याचे हे कर्म काहीही कामना मनात न बाळगता करावे, त्यावेळी आपले पंचप्राण एकच असल्यासारखे तल्लीन व्हावे, आणि त्याचे म्हणजेच हरीचे गुणसंकीर्तन गाताना त्याच्यावर दृढ विश्वास ठेवून, सुखदु:खाची पर्वा न करता, आवडीने, नित्यनैमित्तिक छंद घेतला असल्यासारखे गावे.

विश्लेषण:

मागल्या दहा श्लोकांत समर्थांनी प्रभाते मनी राम चिंतीत जावा हा चरण उपदेशात्मक वारंवार वापरला होता. मनावर अशा चिंतनाची आवश्यकता पूर्णपणे ठसावी म्हणून. आता या श्लोकात असे चिंतन करतांना आपल्या वृत्ती कशा असायला पाहिजेत ते ते सांगत आहेत. राघवाने आपल्याला अमुक द्यावे, तमुक

द्यावे अशी लालसा, कामना बाळगून चिंतनकर्म करू नका, तर राघवाची निष्काम, फलाशाविरहित अशी  कर्म सेवा करा अगदी आपले सर्व जीव, पंचप्राण एकवटून. म्हणजे इतर संसारी गोष्टींवरचे ध्यान विसरून, निर्द्वंद्व म्हणजे नफातोटा, सुखदु:ख यांचा विचार बाजूला ठेवून. आणि हरीचे म्हणजेच श्री रामाचे गुणसंकीर्तन गाताना हा नित्यनियमाने करायचा छंदच आपण घेतला आहे अशा भावनेने, श्रीरामच आपल्याला या भवसागरातून पार नेणार आहे, आपल्याला सद्गती देणार आहे असा दृढ विश्वास त्याच्यावर ठेवून करा.

**अहो ज्या नरा रामविश्वास नाही ।**
**तया पामरा बाधिजे सर्व काही ॥**
**महाराज तो स्वामि कैवल्यदाता ।**
**वृथा वाहणे देहसंसारचिंता ॥ ७८ ॥**

सरळ अर्थ:

ज्या माणसाला श्रीरामावर विश्वास नाही त्याला सर्वच गोष्टींची बाधा होत असते. शरीराच्या व्याधी, संसार चिंता या साऱ्या गोष्टींनी तो गांजला जातो. पण या सगळ्यातून मुक्ती देणारा स्वामीमहाराज दुसरा तिसरा कोणी नसून श्री रामच असतो. असे असताना माणसाने संसारचिंता बाळगत राहाण्याचे कारण नाही.

विश्लेषण:

समर्थ या श्लोकात सांगताहेत की जो पामर, - इथे ते मानव, मनुष्य, मन असा नेहमीचा उल्लेख करत नाहीत तर पामर, म्हणजे मूर्ख, अविचारी व्यक्ती असा स्पष्ट निर्देश करताहेत. –जो मूर्ख मनुष्य श्रीरामावर विश्वास ठेवत नाही, रामाचा अधिक्षेप, हेटाळणी करतो त्याला कुठल्याच गोष्टीने शांती, तृप्ती मिळत नाही, विकारांची दुर्विचारांची बाधा होते कारण त्याची मती स्थिर नसते. रामावर विश्वास, भरोसा असता तर त्याचे मन तिथे स्थिर झाले असते आणि मग तो सैरभैर, सारासार विचार करण्याइतपत बुद्धी नसलेला झाला नसता. अशा त्याच्या

अवस्थेमुळे, त्याच्या स्वत:च्याच नकारार्थी मानसिकतेमुळे त्याला जीवनात अनेक प्रकारच्या बाधा, अडथळे येत राहतात.  उघड आहे, रामावर भरोसा ठेवून, माझं बरं वाईट जे काही व्हायचं ते श्रीरामच करेल, मी त्यात संतुष्ट राहीन, माझा भार त्याच्यावरच आहे आणि तोच मला सुबुध्दी, मन:शांती, सद्‌गती, मोक्ष देणार आहे अशी ठाम भावना मनात ठेवली तर मन स्थिर होते आणि जे काही आयुष्यात घडते त्यामुळे बुद्‌धी विचलित, चिंतातुर, बाधित होत नाही. तेव्हा आपल्या स्वत:च्या देहाची, सग्यासोयऱ्याचीं, संसाराची, वृथा काळजी करणे सोडून ठाम विश्वास ठेवला पाहिजे की तो ईश्वर, सर्व जगाचा अधिपती, स्वामी, श्रीराम हाच सर्वांना मोक्ष देणारा आहे.

**मना पावना भावना राघवाची ।**
**धरी अंतरी सोडि चिंता भवाची ॥**
**भवाची जिवा मानवा भूलि ठेली ।**
**नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली ॥ ७९ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, श्री राघवाची भावभक्ती तू बाळगावीस आणि या असार संसाराची चिंता सोडावीस. कारण या चिंतेमुळेच तुझ्याकडून चुका होत रहातात आणि मग जीवन व्यर्थ गेल्यासारखे होते.

विश्लेषण:

हे मना पावना, - इथेही समर्थ स्पष्ट निर्देश करताहेत, तो पावन मनाचा! पामराचा नाही. जे मन श्रीरामाच्या चिंतनस्पर्शाने  पावन, पवित्र झालेले आहे असे ! अविचारी, मूर्ख नाही.  मूर्खाचे मन कसे असते? पालथ्या घड्यावर पाणी असे. त्याला श्रीरामाची भक्ती कर असे कितीही प्रकारे सांगितले तरी ते करत नाही. तेव्हा अशा मनाला बाजूला ठेवून समर्थ म्हणताहेत, हे निष्पाप, निरागस आणि म्हणून पावन झालेल्या मना, तू तुझ्यातली भवाची चिंता -  संसारचिंता सोड आणि राघवाची भावना, भावभक्ती अंतरात बाणवून घे. या असार संसाराची,

फिकीर करत राहशील तर ती तुझी भूल होईल आणि तू श्रीरामाला मुकशील. त्याच्या कृपेला मुकशील, तो तुला ज्या मोक्षापर्यंत घेऊन जाणार आहे त्या मोक्षाला तू मुकशील. आणि मग भव, संसार या कल्पनेचा, जी फक्त तुझ्या आयुष्याच्या काळापुरतीच असते, नश्वर असते, तिचा विचार, तिची धारणा धरल्यामुळे तुझे जीवन व्यर्थ गेल्यात जमा होईल.

**धरा श्रीधरा त्या हरा अंतराते ।**
**तरा दुस्तरा त्या परा सागराते ॥**
**सरा वीसरा त्या भरा दुर्भराते ।**
**करा नीकरा त्या खरा मत्सराते ॥ ८० ॥**

सरळ अर्थ:

त्या श्रीधराला, राघवाला मनात वास्तव्याला ठेवून घ्या, त्याच्या आणि तुमच्यातील अंतर मिटवा, ओलांडून जायला कठीण असा हा महासागर तरून जा. कधी भागवली जात नाही अशी अमाप उदरभरणाची विवंचना विसरा, तसेच मनातील मत्सर, हेवा दावा या दुर्गुणाना दूर करा. (म्हणजे तुमची रामभक्ती कसोटीला उतरेल आणि तुम्हाला मोक्षप्राप्ती होईल.)

विश्लेषण:

मागील श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे जीवन निष्फळ न होता, व्यर्थ न जाता मोक्ष मिळवायचा असेल, प्रभूपदाशी पोचायचे असेल तर काय करायला पाहिजे हे समर्थ या श्लोकात सांगताहेत. ते म्हणतात, हे बध्द अवस्थेतील मना, (इहलोकातील प्रपंचप्रीतीत लिप्त असलेले म्हणजे बध्द) सर्वप्रथम तू श्रीरामाला, जो स्वत: श्रीधर, हरीचा अवतार असल्यामुळे त्रिदेवांतल्या महेश म्हणजे शंकर, हर यालाही अंतरातून प्रिय आहे, अशा राघवाला तुझ्यामध्ये अधिष्ठान दे. आणि अशा रीतीने तुझ्या आणि त्याच्यातील अंतर मिटवून टाक. त्यामुळे काय होईल? तर हा

अतिविशाल, तरून जायला कठीण असा भवसागर तू त्याच्या अनुग्रहामुळे तरून जाऊ शकशील. यासाठी आणखी काय करायला पाहिजे? समर्थ पुढे सांगतात, अरे हे जे सदैव वखवखलेले पोट आहे जे भरू म्हटले तरी भरत नाही, थोड्या थोड्या वेळाने आणखी हवे, आणखी हवे अशी भावना निर्माण करणारे, दुर्भर असे आहे, त्याचे समाधान कसे करू अशी विवंचना करणे सोड. म्हणजेच प्रपंचप्रीति सोड. अंतिम ध्येय, जे मोक्ष आहे त्याच्या मार्गात या अशा क्षुद्र विवंचना अडथळे आणतात तेव्हा तू त्यांना बाजूला सार, त्यांना विसरून जा. आणि तुझ्यामध्ये वास्तव्याला असलेल्या हेवेदावे, मत्सर, या खरबुध्दी, म्हणजे गर्दभ बुध्दिपोटी, अंतिम सत्याविषयीच्या अज्ञानापोटी, निर्माण होऊन ठाण मांडून बसलेल्या दुर्गुणाना नाकारून, झिडकारून टाक. हे सगळे करशील तर तुला हरिपदी पोचणे, त्याची कृपा मिळवणे शक्य होईल.

||श्रीराम||

## <u>दशक नववे</u>

**मना मत्सरे नाम सांडू नको हो ।**
**अती आदरे हा निजध्यास राहो ॥**
**समस्तांमधे नाम हे सार आहे ।**
**दुजी तूळणा तूळिताही न साहे ॥ ८१ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, मत्सरापोटी तू नाम घेणे टाळू नकोस. ते अत्यंत आदरपूर्वक घेण्याचा ध्यास घे. साऱ्या गोष्टींमध्ये हे नामच सत्य आहे. त्याच्याशी कशाचीच तुलना होऊ शकत नाही.

विश्लेषण:

मत्सरापोटी वैर निर्माण होत असते. मत्सर म्हणजे 'आज अमक्याकडे जे आहे ते माझ्याकडे नाही. मलाही ते मिळायला हवे होते. का मिळाले नाही? तोच कोण एव्हढा टिकोजी लागून गेला आहे? लोक सारखा त्याचा उदो उदो करतात. मी नाही करणार. का करावा? उल्लेखही करणार नाही मी त्याचा' अशी धारणा. पण असे केल्याने नुकसान कोणाचे होते? ज्याचा मत्सर केला जातो त्याचे? की जो मत्सर करतो, वैर धरतो त्याचे? समर्थ अजाण मनाला हेच समजावून सांगताहेत. अरे मना, प्रभू परमेश्वर तुझ्यापेक्षा खूप मोठा आहे आहे, उदात्त आहे त्याची आणि आपली तुलना करून तू त्याच्यावर बहिष्कार टाकू नकोस. त्याचे नामस्मरण करण्याने तुझा फायदाच होणार आहे. तुला मन:स्वास्थ्य शांति आणि मुक्ति मिळणार आहे. त्याचे नाव टाळून तुझ्या होणाऱ्या फायद्याला मुकू नकोस. उलट अत्यंत आदराने, भक्तिभावाने त्याचे नामस्मरण, चिंतन आणि उच्चारण करण्याचा परिपाठ ठेव, त्याचे नामोच्चारण करण्याचा स्वत:ला ध्यास लावून घे. कारण प्रभूचे नाम हेच केवळ या विश्वामध्ये इतर सगळ्या गोष्टींपेक्षा सत्य आहे. हरीॐ

तत्सत।त्याच्याशी दुसऱ्या कशाचीही तुलना होऊ शकत नाही आणि तुलना करायचा प्रयत्नही करू नकोस.

**बहू नाम या रामनामी तुळेना ।**
**अभाग्या नरा पामरा हे कळेना ॥**
**विषा औषधा घेतले पार्वतीशे ।**
**जिवा मानवा किंकरा कोण पूसे ॥ ८२ ॥**

सरळ अर्थ:
कितीतरी नावे या जगात आहेत पण त्यातले एकही रामनामाच्या तोडीचे, बरोबरीचे नाही. पण अभागी पामर माणसाला हे कळत नाही. विषावर उतारा म्हणून पार्वतीपती महादेवानेही या रामनामाचा जप केला होता मग सेवकासारखा असलेल्या सामान्य माणसाची काय कथा?

विश्लेषण:
सर्वसामान्य माणसे ज्याला त्याला पसंत असलेल्या देवाचे अथवा देवीचे नाव घेतात. त्या देवाने किंवा देवीने आपल्याला पावावे म्हणून धावा करतात. अशी दैवतांची नावेही अगणित आहेत. जाखाई, जोखाई, मरगाई, बिरोबा, रोकडोबा ! पण सत्य हे आहे की परम ईश्वर असलेल्या रामाच्या नामाचे महात्म्य या सगळ्या नावांपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. दुर्दैव हे की अजाण, अबोध, अभागी माणसाला ते कळत नाही. समुद्रमंथनातून वर आलेल्या हलाहल विषाचे प्राशन जेव्हा पार्वतीचा पती असलेल्या साक्षात महादेवाने केले तेव्हा त्या विषामुळे झालेला कंठाचा, सर्वांगाचा दाह शमवण्यासाठीचे औषध म्हणून श्रीरामाच्या नामाचा मनोमन जप केला होता. इतकी त्या नामाची महती, त्याचे सामर्थ्य आहे. हे न कळणाऱ्या जीवाचा, परमेश्वरापुढे य:कश्चित सेवकासारख्या (किंकर) असलेल्या

माणसाचा काय पाड? त्याने तर संसारदु:खांच्या, आपदांच्या विषावर उतारा म्हणून अहर्निश रामनाम घ्यायला हवे.

**जेणे जाळिला काम तो राम ध्यातो ।**
**उमेसी अती आदरे गूण गातो ॥**
**बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथे ।**
**परी अंतरी नामविश्वास तेथे ॥ ८३ ॥**

सरळ अर्थ:

ज्याने कामदेवाला जाळले तो रामाचे स्मरण ठेवतो आणि अत्यंत आदराने स्वपत्नी पार्वतीला त्याचे गुणगान करून ऐकवतो. म्हणजे ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य हे सारे जरी शंकराचे ठायी एकवटलेले असले तरी तिथे रामनामाची प्रीति, त्याच्यावरील विश्वासही वसलेला होता.

विश्लेषण:

असे मानले जाते की श्रीरामाची कथा महादेवाने पार्वतीला सर्वप्रथम ऐकवली आणि ते ती सांगत असताना एका कावळ्याने ऐकली. या कावळ्याला पुढे मनुष्यजन्म प्राप्त झाला. आणि तो काकभृशुंडी या नावाचा ऋषी बनला. काकभृशुंडीला मागल्या जन्मात महादेवाकडून ऐकलेली रामकथा आठवत होती. ती त्याने पुढे आपल्या शिष्यांना ऐकवली जी ‘अध्यात्मरामायण’ म्हणून प्रसिध्द आहे. अध्यात्मरामायण हे शंकर-पार्वती यांच्यातल्या संवाद रुपात आहे. समर्थ याच्याच आधारे म्हणतात की ज्या महादेवाने कामदेवाला, मदनाला भस्म केले तो महादेव स्वत: उमेला श्रीरामाबद्दल अत्यंत आदराने सांगतो, त्याचे गुणवर्णन करतो कारण तो स्वत: श्री रामाचा भक्त आहे, रामनामाचा ध्यास धरून आहे. अशा महान ज्ञानी, वैराग्यसामर्थ्य असणाऱ्या, देवांचा देव असलेल्या महादेवालाही अंत:करणामध्ये रामनामाबद्दल विश्वास वाटत होता.

**विठोने शिरी वाहिला देवराणा ।**
**तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ॥**
**निवाला स्वये तापसी चंद्रमौळी ।**
**जिवा सोडवी राम हा अंतकाळी ॥ ८४ ॥**

सरळ अर्थ:

विठ्ठलाने डोक्यावर महादेवाला धारण केले आहे. महादेवाच्या मनातला (रामाचा) ध्यास उघड झाला नव्हता (तरीही त्या ध्यासामुळेच) चंद्रमौळी शंकराचा (विषप्राशनानंतरचा) ताप आपोआप निवारण झाला. असा हा राम अंतिम समयी जिवाला मुक्ती मिळवून देतो.

विश्लेषण:

या आणि मागील दोन श्लोकात श्रीसमर्थांनी महादेवाच्या रामभक्तीचे दाखले दिले आहेत. त्रिदेवांपैकी दोघे, म्हणजे शंकर आणि विष्णु (ज्याचाच श्रीराम हा अवतार आहे) यांची एकमेकाविषयी आदराची भावना होती. रामभक्त हनुमान हे महादेवाचेच स्वरूप होते. ही गोष्ट ध्यानात घेतली तर महादेव हे श्रीविष्णूचे म्हणजेच श्रीरामाचे भक्त होते, तर जेजुरीच्या खंडेरायाच्या दरबारात हेगडी, म्हणजे प्रधान श्रीविष्णु होते आणि विष्णूचेच रूप असलेला पंढरीचा विठोबा मस्तकावर शिवलिंगाच्या आकाराचा मुकुट म्हणजे पर्यायाने महादेवाला शिरावर धारण करून आहे हे समर्थांचे प्रतिपादन, ही रूपके त्या दोघांच्या एकमेकांवरील भक्तिभावाची निदर्शक आहेत. हनुमंताने छाती फाडून आत श्रीराम असल्याचे दाखवले होते म्हणजेच हनुमंताच्या - महादेवाच्या अंत:करणात श्री विष्णूच्या नामाचा - रामनामाचा ध्यास होता ही सहजसिद्ध गोष्ट मनोमन असल्यामुळे कळली नसली तरी, म्हणजे प्रकट झाली नसली तरी त्या ध्यासामुळेच विषबाधेच्या दाहातून तसेच कामदेवाला जाळतानाच्या क्रोधाग्नीतून चंद्रमौळी महादेव शांत झाला. असा

हा राम, हे मना, शरीराचा अंतिम समय येतो तेव्हा त्याच्यातल्या आत्म्याला मुक्ति मिळवून देतो.

**भजा राम विश्राम योगेश्वरांचा ।**
**जपू नेमिला नेम गौरीहराचा ॥**
**स्वये नीववी तापसी चंद्रमौळी ।**
**तुम्हां सोडवी राम हा अंतकाळी ॥ ८५ ॥**

सरळ अर्थ:

योगेश्वर महादेव यांच्यासाठी विश्राम असलेल्या श्रीरामाचे भजन करा, गौरी आणि हर या दोघांनी नित्य केलेला रामनामाचा जप तुम्हीही करा कारण ज्या रामाने चंद्रमौळी शंकराला शांत केले तो रामच तुम्हाला अंतिम समयी मुक्ति देतो.

विश्लेषण:

वरच्या श्लोकामधील उपदेशच समर्थ इथे या श्लोकात पुन्हा करत आहेत. विश्वकार्यातून शंकराला विसावा रामनामात मिळतो. म्हणूनच ते आणि देवी पार्वती हे दोघेही रामनामाचा नित्य, सातत्याने जप करत असतात. पहा ना, विश्राम, आराम या शब्दांतच राम सामावलेला आहे म्हणूनच आपणही जेव्हा बराचवेळ एखादे काम करतो आणि ते काम आटपल्यावर शिणवटा दूर करण्यासाठी थांबतो तेव्हा "हरे रामा', 'पांडुरंगा', 'विठ्ठला', थकलो रे बाबा" यासारखे उद्गार काढून विसाव्यासाठी, विश्राम, आराम करण्यासाठी बसतो. ही सारी नामे श्री विष्णूची म्हणजेच श्रीरामाची आहेत. म्हणजे या श्रीरामाच्या नामस्मरणानेच पहिल्याप्रथम मनातला बराचसा शीण दूर होतो. हा रामनामाचा जप उमा, महेश हेही करत असतात. म्हणून समर्थ म्हणतात की हा जो विश्रामकारी जप गौरी म्हणजे पार्वती आणि हर म्हणजे स्वत: महादेव करतात तोच जप, हे मना, तूही नित्य नियमाने आणि भक्तिभावाने करीत रहा. म्हणजे तापसी, योगीराज, चंद्रमौळी शंकराला विसावा देणारा हा नामजप ज्याचा आहे तो

श्रीराम तुला भवसागरातून तारून नेईल, पर्यायाने देहान्तानंतर मुक्ति मिळवून देईल.

**मुखी राम विश्राम तेथेचि आहे ।**
**सदानंद आनंद सेवोनि आहे ॥**
**तयावीण तो शीण संदेहकारी ।**
**निजधाम हे नाम शोकापहारी ॥ ८६ ॥**

सरळ अर्थ:

मुखातून रामनाम घेणे हे विश्रामकारी असते, त्यातला आनंद स्वत: महादेव (सदानंद) घेत असतात. आणि हे मना, जर मुखी रामनाम नसेल तर शीण दूर होणार की नाही यात संदेह, शंका आहे. मात्र हे स्वर्गीय नाम शोक दूर करते.

विश्लेषण:

मुखातून रामनाम घेतले जाते तेव्हा मनाला शांति, विश्रांती मिळते हे आपल्या रोजच्या अनुभवावरून आढळून येते हे वरच्या श्लोकाच्या विश्लेषणात स्पष्ट केले आहेच. म्हणूनच हा रामनाम जप केल्यामुळे मिळणारा खराखुरा आनंद सदानंद म्हणजे महादेव स्वत: घेत असतात. या अशा आनंदातच विश्रांती, आराम असतो. मनात दु:ख, चिंता असेल तर त्याला आराम कुठला? हे उघडच आहे. आनंदाने मन भरलेले असेल तर मनालाच काय शरिरालाही विश्राम मिळत असतो. त्यालाच आपण शीण दूर होणे म्हणतो. म्हणून समर्थ इथे म्हणतात रामनाम घेत सदानंद महादेव हे स्वत: हा आनंद सेवन करीत असतात, उपभोगत असतात. हा आनंद जेव्हा मिळत नसतो तेव्हा शरीराला आलेला शीण, मनाला आलेली खिन्नता नुसते बसून दूर होईल का? कामानंतर माणूस नुसता बसेल पण तेव्हा मन इतर नाना विचारांनी, काळज्यांनी भरलेले असेल तर कसा काय विश्रांतीचा आनंद मिळणार? शंकाच आहे. पण स्वर्गीय म्हणजे निजधामाची प्रचीती देणारे रामनाम मुखातून जपले जाणे हे मनाची खिन्नता, शोकाची भावना दूर करते यात काही शंका नाही.

**मुखी राम त्या काम बाधू शकेना ।**
**गुणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना ॥**
**हरीभक्त तो शक्त कामास भारी ।**
**जगी धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥ ८७ ॥**

सरळ अर्थ:

ज्याच्या मुखात रामनाम असेल त्याला कामनांची बाधा होत नाही. आणि त्या टाळण्यासाठी लागणारे धारिष्ट्य त्याला मिळते. जो हरीचा भक्त आहे तो अशा कामनाचा धैर्याने विरोध करू शकतो. म्हणूनच हरीचा म्हणजे रामाचा भक्त ब्रम्हचारी मारुती हा जगात धन्य झाला आहे.

विश्लेषण:

समर्थ नेहमी सांगतात मुखाने रामनामाचा जप करा. पण इथे लक्षात घेतले पाहिजे की त्यांना अभिप्रेत असलेला हा जप केवळ वरवरचा, तोंडाने केलेला जप नव्हे. जप हा भक्तिपूर्वक, मनापासून, हृदयातून आलेला असायला हवा. ‘मुखमे राम, बगलमे छुरी’ किंवा ‘मुखी घोष रामाचा, मनात केवळ दामाचा’ अशा प्रकारच्या जपाचा काही उपयोग नाही. ज्याच्या मुखातून अंत:करणापासून निघालेला रामनामाचा जप होत असतो तो खराखुरा भक्तच निरिच्छ असतो. त्याला कामना वासनांची बाधा झालेली नसते. पूर्णतया निरिच्छ असणे शक्य नसते हे खरे आहे. जीवनावश्यक असलेल्या इच्छा, आकांक्षा, कामना, वासना असणे चुकीचे नाही. परंतु त्यांचा हव्यास असणे ही बाधा आहे. अशी बाधा नसावी. आणि ती नसणे हे केवळ जो कायावाचामनेकरून हरिनामाचा जप करतो त्यालाच शक्य असते. वासना टाळणे, मोह टाळणे हे धैर्यवंताचे काम आहे. येरागबाळ्याचे नाही. खऱ्या हरिभक्ताकडेच असे वासना, कामना टाळण्यासाठी आवश्यक ते धारिष्ट्य, धैर्य असते. आणि या धैर्यामुळे तो हरीचा भक्त अशा अवास्तव इच्छा, वासनांचा

विरोध करण्याची, त्यांच्यावर विजय मिळवण्याची शक्ति बाळगून असतो. श्री रामाचा नि:सीम भक्त असलेला मारुती कुठल्याही प्रकारची वासना न बाळगता रामाच्या सेवेत स्वत:ला मग्न ठेवून त्यातच आनंद मानत राहिला म्हणूनच तो धन्य, चिरंजीव ठरला आहे.

**बहू चांगले नाम या राघवाचे ।**
**अती साजिरे स्वल्प सोपे फुकाचे ॥**
**करी मूळ निर्मूळ घेता भवाचे ।**
**जिवा मानवा हेचि कैवल्य साचे ॥ ८८ ॥**

सरळ अर्थ:
राघवाचे नाव हे अतिशय चांगले आहे. ते साजिरे, छोटेसे, सोपे आणि घेण्यासाठी छदामही खर्च करावा लागत नसणारे असे आहे. भवसागराचे मूळ नाहीसे करणारे हे नाव मानवाला खरा मोक्ष मिळवून देते.

विश्लेषण:
आतापर्यंत समर्थांनी बहुतेक सगळ्या श्लोकात रामनामाच्या जपाचा आग्रहपूर्वक आदेश दिला आहे. तसा आग्रह धरण्यासारखे त्या नामात खास असे काय आहे? जे रामनाम सदैव मुखी राहावे असे आपण म्हणतो ते आहे तरी कसे ? याविषयी समर्थ या श्लोकात सांगत आहेत. ते म्हणतात एक तर हे परमेश्वराचे नाव अतिशय चांगले आहे, गोड आहे. 'राघव'मध्ये लाघव आहे, 'राम'मध्ये विश्राम आहे, आराम आहे. अत्यंत सोज्वळ, साजिरे आणि लहानसे, उच्चारायला एकदम सोपे असे हे नाव आहे. ते घेण्यासाठी तुम्हाला काही पैसे मोजावे लागत नाही. मनात आणा आणि उच्चारण करा. कोठेही म्हणा, केव्हाही म्हणा. घरी, दारी, बाहेर, सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री, कधीही, आनंदात असा, दु:खात असा, तरीही हे सोपे नाव छदामही मोजायला न लागता आणि कितीही वेळा तुम्ही घेऊ शकता.

फक्त एकच  अट - नाव भक्तिभावपूर्वक, अगदी अंतर्मनातून आलेले असावे. असे खोलवर अंत:करणातून मुखावाटे उमटलेले हे रामनाम तुमच्या मनात असलेली संसारातील नाना समस्यांची काळजी विस्मृतीत ढकलते. भवाच्या म्हणजेच संसाराच्या मुळाशी असलेल्या चिंतेचेच समूळ निर्मूलन करते. मनाला भवसागर तरून जायचे धैर्य देते. असा भवसागर तरून जाणे म्हणजेच मोक्षप्राप्ती होणे. म्हणून हे मना, राघवाचे नाम हेच कैवल्य, हाच मोक्ष आहे हे जाण.

**जनीं भोजनीं नाम वाचे वदावे ।**
**अती आदरे गद्यघोषे म्हणावे ॥**
**हरीचिंतने अन्न सेवीत जावे ।**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥ ८९ ॥**

सरळ अर्थ:

भोजनाच्या वेळी तसेच इतर लोकांबरोबर असताना श्रीरामाच्या नावाचा उच्चार अत्यंत आदराने आणि मोठ्याने करावा. अन्न ग्रहण करतानादेखील हरिनामचिंतन करत असावे म्हणजे तो श्रीहरि तुम्हाला पावेल.

विश्लेषण:

श्रीहरीचे, रामाचे नाव नित्य घेत असावे असे समर्थ नेहमी सांगतात. आता या श्लोकात हे हरिनाम विशेषेकरून केव्हा आणि कसे घ्यावे हे सांगितले आहे. ते म्हणतात तुम्ही जेव्हा जनसमुदायात असाल तेव्हा आणि खास करून जेवायला बसलेले असाल तेव्हा हा नामोच्चार करणे आवश्यक आहे. माणूस एकटाच असेल, निवांत बसलेला असेल तेव्हा कळत नकळत देवाचे स्मरण होऊन ‘हरे रामा’, ‘पांडुरंगा’, ‘विठ्ठला’ असे देवाचे नाव तो घेतो. पण चारचौघात असताना, काही संवाद होत असताना असे होण्याची शक्यता कमी असते. इकडच्या तिकडच्या फापटपसारा गप्पागोष्टी करण्यात आणि ऐकण्यात चित्त गुंगलेले असते. अशा

वेळीदेखील तुम्ही रामनाम घ्यावे आणि तेदेखील मनातल्या मनात न घेता मोठ्याने, आजूबाजूच्या लोकांना ऐकू जाईल असे आणि अत्यंत आदरपूर्वक घ्यावे. नामाचा घोष व्हावा. असा घोष होत असला म्हणजे सात्विक भाव उत्पन्न होतात आणि पसरतात. समुदायातले लोकही मग अशा घोषात सहभागी होतात व सगळे वातावरण उल्हसित होते. त्याचप्रमाणे ताटासमोर पाटावर बसल्यानंतर (यात आताच्या टेबल खुर्च्याही आल्या) पहिला घास घेण्यापूर्वी भक्तिभावपूर्वक, अत्यंत आदरपूर्वक हरिनाम घ्यावे. याचे कारण असे की जठराग्निरुपात स्वत: भगवान श्रीकृष्ण आपल्या देहात उपस्थित असतात आणि खाल्लेल्या अन्नाचे पचन करीत असतात (जठराग्नीच्या रूपाने मी प्राण्यांच्या देहात वसे । प्राण, अपान या वायूंने मी अन्न चतुर्विध पचवितसे ॥ श्रीमद्भगवद्गीता सोप्या मराठीत - अध्याय १५ श्लोक १४). तेव्हा त्याचे, म्हणजे श्रीहरीचे, नाम उच्चारून आपण त्याला अन्नग्रहण करण्यासाठी आवाहन करायचे आणि मग जेवायला सुरुवात करायची. अशा या नामोच्चारणाने श्रीहरि त्याच्या कनवाळू स्वभावानुसार सहजतेने प्रसन्न होतो.

**न ये राम वाणी तया थोर हाणी ।**
**जनीं व्यर्थ प्राणी तया नाम काणी ॥**
**हरीनाम हे वेदशास्त्री पुराणी ।**
**बहू आगळे बोलिली व्यासवाणी ॥ ९० ॥**

सरळ अर्थ:

ज्याच्या मुखातून राम हे नाम घेतले जात नाही त्याचे फार मोठे नुकसान होते. अशा मनुष्याचा जन्म वाया गेलेलाच समजावा. हरीचे नाव हे वेदांमध्ये तसेच पुराणांमध्येही आहे आणि ते सर्वांहून निराळे आहे असे महर्षी व्यासांनी देखील सांगितले आहे.

विश्लेषण:

मनुष्य भक्तिभावाने, अति आदराने रामनाम घेत नसेल तर त्यात रामाचे, परमेश्वराचे काही नुकसान होत नाही तर तो मनुष्यच रामनामजपामध्ये मिळणाऱ्या स्वर्गीय आनंदाला मुकतो. अंतिम मोक्षप्राप्तीला मुकतो म्हणजे मग यात नुकसान कोणाचे होते ? या श्लोकाच्या पहिल्या चरणात समर्थ म्हणतात त्याप्रमाणे त्या हतभागी माणसाचीच अपार हानी होते. रामाची नाही. जो करंटा मनुष्यप्राणी हरिनामाला तुच्छ समजून त्याचा अव्हेर करतो त्याचा जन्म फुकट गेला हे निश्चित. भले देहांतानंतर त्याचे सगेसोयरे त्याचे कलेवर घेऊन जाताना 'रामनाम सत्य है' किंवा 'राम बोलो भाई राम' असा घोष करत चाललेले असले तरी त्याचा उपयोग त्या माणसाला होतो का? अर्थातच नाही कारण तेव्हा ना तो स्वत: हे नाम घेऊ शकतो ना ऐकू शकतो ! जीवित असताना जी हरिभक्ति करायची, हरीचे नामचिंतन आणि उच्चारण करायचे ते न करण्याचा करंटेपणा केला म्हणजे मग दुष्प्राप्य असा मनुष्यजन्म मिळूनही तो निरर्थ, फुकापासरी घालवला असेच होते. हरिनाम, त्याचे महात्म्य अगदी पूर्वापारपासून, वेद, उपनिषदे, पुराणे या समस्त साहित्यांत वर्णन केले गेलेले आहे आणि असे हे अवीट गोडीचे नाम आगळे वेगळे, सर्वात श्रेष्ठ आहे असे श्री व्यासमहर्षिही म्हणतात. तेव्हा हे मनुजा, अशा या आगळ्या नामाचा आदरपूर्वक उद्घोष करण्याकडे काणाडोळा करून तू स्वत:चेच नुकसान करून घेऊ नकोस. आपला जन्म व्यर्थ घालवू नकोस.

॥ श्रीराम ॥

## दशक दहावे

**नको वीट मानू रघूनायकाचा ।**
**अती आदरे बोलिजे राम वाचा ॥**
**न वेचे मुखी सापडे रे फुकाचा ।**
**करी घोष त्या जानकीवल्लभाचा ॥ ९१ ॥**

सरळ अर्थ:
रघुनायकाला कंटाळू नकोस तर अत्यंत आदराने त्याचे नाव घे. अरे हे नाव घेण्यासाठी तुला काहीच खर्च पडत नाही. फुकटात ते घेऊ शकतोस मग त्या जानकीवल्लभ रामाच्या नावाचा घोष कर ना !

विश्लेषण:
रोजच्या परिपाठातली एखादी गोष्ट करत असताना तीच तीच कितीदा करायची असा प्रश्न पडून माणसाच्या मनात कंटाळा येऊ शकतो. एखाद्याला आपण विचारले की बाबा रे, तुझा व्यवसाय, नोकरी, कशी चालली आहे? तो उत्तर देतो "काही नाही हो, बस्स पाट्या टाकतोय नुसता इतकेच". पाट्या टाकणे हा वाक्प्रचार 'केवळ नाईलाज आहे म्हणून ते काम तो करतो आहे' अशा अर्थाचा असतो. म्हणजे तो जे काही करतोय त्यात त्याला रुची वाटत नाही तर त्याला त्यात कंटाळा, वीट आलेला असतो आणि नाईलाज म्हणून तो ते करतो. रामनामघोषांचे तसे होऊ नये. समर्थ नेहमीच सांगतात, बाबा रे, रामनाम घे, नित्य घे, नियमाने घे. आणि मुख्य म्हणजे ते अत्यंत आदराने घे. तुला त्याचा कंटाळा, वीट येऊ देऊ नकोस. ताकापुरतं रामायण ऐकणे असा एक वाक्प्रचार आहे. तसे होता कामा नये. मनात रामाबद्दल प्रेम नसेल तर त्याचं नाव नुसतं वर वर, कंटाळल्या सुरात घ्यायचे नाही. ते अत्यंत प्रेमाने, आदराने, अगदी समर्थांच्या शब्दात अती आदराने घ्यायला पाहिजे, न कंटाळता. आणि तेही कसे? मुळूमुळू आवाजात,

तोंडातल्या तोंडात नाही, तर मोठ्याने, स्पष्टपणे आणि घोषपूर्वक. म्हणजे मग त्या नामजपाचा, ज्याच्यासाठी पदरचे चार चव्वल खर्च करावे लागत नाहीत फुकट घेता येते अशा त्या जानकीवल्लभ रामाच्या नामघोषाचा वीट येत नाही.

**अती आदरे सर्वही नामघोषे ।**
**गिरीकंदरी जाईजे दूरि दोषे ॥**
**हरी तिष्ठतू तोषला नामघोषे ।**
**निशेषे हरामानसी रामपीसे ॥ ९२ ॥**

सरळ अर्थ:
अत्यंत आदराने जर त्याच्या नावाचा घोष केलास तर तुझ्यातले दोष सारे तुला सोडून पार दूर डोंगरदऱ्यांमध्ये जातील. या नामघोषाने तो हरी, स्वत: विष्णु आनंदित होईल. महादेवाच्या मनालाही या रामनामाचे वेडच लागले होते.

विश्लेषण:
आता या अती आदराने केलेल्या नामघोषाचा फायदा काय ? समर्थ या श्लोकात सांगताहेत की अशा घोष करण्याने आपल्या मनात येऊ पहात असलेल्या वाईट विचारांना, अवगुणांना म्हणजे दोषांना आत येता येणार नाही. ते दूरच राहतील. नामघोष तेव्हाच होतो जेव्हा मन त्या नामाशी निगडित झालेले असते, त्या नामाने भारलेले असते. मग अशा भारलेल्या मनात दोषांना जागा कुठून मिळायला? ते दूर गिरीकंदरात, कडेकपारीत कुठच्याकुठे जातील आणि मन विकारविरहित, दोषरहित राहील. अशा अती आदराने घोषपूर्वक केलेल्या नामजपामुळे तो राम, तो विष्णु भगवान संतुष्ट होईल. आणि आपल्या पाठीशी उभा राहील. असा हा अत्यंत आदराने केलेल्या नामघोषाचा छंद, रामनामाचे वेड, जसे साक्षात महादेवाच्या मनाला लागले होते तसे तुमच्या आमच्या मनाने लावून घेतले पाहिजे.

**जगी पाहता देव हा अन्नदाता ।**
**तया लागली तत्त्वता सार चिंता ॥**
**तयाचे मुखी नाम घेता फुकाचे ।**
**मना सांग पा रे तुझे काय वेचे ॥ ९३**

सरळ अर्थ:
या जगाला अन्न देणारा परमेश्वर आहे. या संसाराची चिंता तोच वाहतो आहे. मग आता सांग, अशा या परमेश्वराचे विनासायास, विनामूल्य मिळणारे नाव उच्चारण्यात तुझे काय जाते?

विश्लेषण:
या श्लोकात समर्थ अशा लोकांना उद्देशून सांगताहेत जे नाना सबबी सांगून प्रभूचे नाव अती आदरानेच काय साधे, सहजपणेही घ्यायचे टाळतात. सबबी काय? तर ‘काय करणार वेळच नाही, मी नामजप करत बसलो तर नोकरी धंदा कोण करेल? आणि मग मी खाऊ काय? माझा निर्वाह कसा होईल? माझ्या बायकोपोरांच्या पोटात काय आणि कसे घालू?’ समर्थ म्हणताहेत, अरे बाबा, या विश्वाचा अन्नदाता तो परमेश्वर आहे. तुझ्या निर्वाहाची चिंता तो स्वत: करतो. तू काय बायकोपोरांचे पोट भरणार? अरे तुझ्या पोटासकट तुझ्या बायकोपोरांची चिंता तो स्वत: वाहत असतो. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत श्रीकृष्ण भगवान स्वत: म्हणतात :
"अनन्याश्चिन्तयन्तो माम□ये जनाः पर्युपासते |
तेषाम□नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम" || ९.२२||
याचे मराठीत रुपांतर असे :
अनन्यभावे चिंतन माझे करूनी मज भजती |
त्यांच्या निर्वाहाची देतो, पार्था मी शाश्र्वती || ९.२२||

समस्त विश्वाची चिंता तो वाहत असतो तर मग तू त्याच्या नामघोषात मग्न असताना तो तुला वाऱ्यावर कसा आणि का सोडेल? मग अशा परिस्थितीत त्याचे नाव मुखातून घ्यायला का नाही म्हणतोस? तुला ते फुकटच मिळते आहे, त्यासाठी काही खर्च करावा लागणार नाही मग तुझे काय जाणार आहे ते नाम घेण्याने?

**तिन्ही लोक जाळू शके कोप येता ।**
**निवाला हरू तो मुखे नाम घेता ॥**
**जपे आदरे पार्वती विश्वमाता ।**
**म्हणोनी म्हणा तेचि हे नाम आता ॥ ९४ ॥**

सरळ अर्थ:

जो रागावला तर स्वर्ग, पृथ्वी, पाताळ हे तीनही लोक जाळून टाकू शकेल तो साक्षात महादेव परमेश्वराचे नाव घेउन शांत होतो. त्याची पत्नी, पार्वतीदेखील ते नाव आदरपूर्वक उच्चारते. तेव्हा तूही तसेच हे नाव घ्यावे, उच्चारावे.

विश्लेषण:

८२, ८३, ८४, ८५ या चारही श्लोकात दिल्याप्रमाणे शंकर-पार्वतीच्या हरिभक्तीचा दाखला समर्थ इथेही देतात. कोपलेला महादेव शंकर केवळ मदनालाच जाळण्याची क्षमता बाळगतो असे नाही. अतिशय रागावला म्हणजे आपला तिसरा डोळा उघडून स्वर्ग, पृथ्वी, पाताळ हे तीनही लोक जाळून भस्मसात करण्याची ताकत त्याच्यात आहे. इतका पराकोटीचा जहाल कोप सहजासहजी शमेल का? तो कोप शांत करणारा उतारा तशाच ताकतीचा असायला हवा. मग ते काम कोण करते? हरिनाम ! मुखे नाम घेता तो हरु – हर म्हणजे शंकर – निवाला, शांत झाला. हे त्या हरिनामाचे महात्म्य विश्वाची माता, आदिमाया पार्वती हिलाही माहित आहे आणि म्हणून तीदेखील आदरपूर्वक त्या नामाचा जप करते. मग हे मना, तुला तो जप करायला काय हरकत आहे? कसलीही शंका न बाळगता तूही आता मुखाने ते नाम घ्यावेस.

**अजामेळ पापी वदे पुत्रकामे ।**
**तया मुक्ति नारायणाचेनि नामे ॥**
**शुकाकारणे कुंटणी राम वाणी ।**
**मुखे बोलिता ख्याति जाली पुराणी ॥ ९५ ॥**

सरळ अर्थ:

पापी अजामेळाने त्याच्या नारायण नावाच्या मुलाला हाक मारली तरी केवळ त्या नामोच्चाराने तो पापमुक्त झाला. एका वेश्येने आपल्या पोपटाला – राघूला संबोधताना या नामाचा उच्चार केल्याने तिला पुराणात स्थान मिळून ती विख्यात झाली.

विश्लेषण:

नाम महात्म्य सांगण्यासाठी समर्थांनी इथे दोन उदाहरणे दिली आहेत. एक अजामेळाचे आणि दुसरे एका कुंटिणीचे - म्हणजे वेश्येचे. या दोघांचेही आयुष्य पापमय होते आणि तरीही अखेरीस त्यांनी केलेल्या हरीनामजपामुळे त्यांच्यावर परमेश्वराची कृपा झाली आणि त्यांना मुक्ति मिळाली. अजामेळ हा एक विद्वान ब्राम्हण होता. परंतु उतार आयुष्यात त्याच्याकडून प्रमाद घडला आणि तो विषयाधीन झाला. त्याला अनेक पुत्र होते. त्यांपैकी सर्वात धाकट्या, लाडक्या पुत्राचे नाव होते नारायण. विद्वत्ता असूनही पापाचरणात बुडालेल्या या ब्राम्हणाचा अंत जवळ आला. मृत्युशय्येवर असताना तो आपल्या लाडक्या पुत्राला वरचेवर नारायणा, नारायणा असे बोलावू लागला. नेमके त्याचवेळी यमदूत त्याला न्यायला आले. परंतु त्यांनी टाकलेला पाश त्याला न बांधताच श्रीविष्णूच्या आज्ञेने मागे जाऊ लागला. विष्णूच्या दूताचा आणि यमदूताचा संवाद अजामेळाच्या कानी पडला आणि त्याला उपरती झाली, पश्चात्ताप वाटला. तिथून पुढे तो पुनश्च हरीभक्तीला लागला आणि अंती मुक्त झाला. असेच घडले पिंगला नावाच्या वेश्येचे. रूपसुंदर अशा या गणिकेने घरात एक पोपट पाळला होता. या पोपटावर

तिची खूप माया होती. त्याला ती राघू म्हणायची. उतारवयात तिचा व्यवसाय अर्थातच कमी झाला लोक तिला विसरले आणि त्यामुळे अर्धपोटी रहायची वेळ आली. मृत्यू समीप आला तेव्हा आपल्या पश्चात या पोपटाचे काय व्हायचे या काळजीने ती राघवा, राघवा असे म्हणत राहिली. स्वत:पेक्षाही त्या मूक जीवाची काळजी करीत हवालदिल होणाऱ्या त्या गणिकेने अभावितपणे का होईना केलेल्या नामजपाने परमेश्वर संतुष्ट झाला आणि त्यामुळे तिची पुराणामध्ये ख्याती होऊन तिला अंती मोक्षप्राप्ती झाली. यात  कदाचित असा गैरसमज होईल की पापे करून सुध्दा अभावितपणे देवाचे नाव घेतले तरी ते पुरेसे असते. पण तसे नाही. या दोन्ही व्यक्तींना उपरती झाली होती हे महत्वाचे. आणि त्याच्या जोडीने त्यांच्याकडून नामजपही घडला. त्याचे हे फळ होते.

**महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळी ।**
**जपे रामनामावळी नित्यकाळी ॥**
**पिता पापरूपी तया देखवेना ।**
**जनीं दैत्य तो नाम मूखे म्हणेना ॥ ९६ ॥**

सरळ अर्थ:

दैत्य कुळात जन्मलेला प्रल्हाद हा महान भक्त हरिनामाचा सदैव जप करायचा. पापी पित्याच्याने ते पाहवत नसे आणि तो स्वत: तोंडाने कधीही हरिनाम घेत नसे.

विश्लेषण:

मागील श्लोकातला धागाच समर्थ या आणि नंतरच्या श्लोकात पुढे नेत आहेत. इथे ते म्हणतात, भक्त प्रल्हाद हा दैत्यकुळात जन्माला होता. दैत्य आणि देव यांचे वैर असले तरी कित्येक दैत्य परमेश्वराचे भक्तही होते. रावण महादेवाचा परमभक्त होता हे आपल्याला माहित आहेच. तसेच प्रल्हादाचे. हिरण्यकश्यपु या

दैत्य राजाचा हा पुत्र. पण अगदी लहान वयात तो श्रीविष्णूचा भक्त बनला होता. समर्थ नेहमी सांगतात तसे अति आदरे, मनोभावे तो श्रीहरीचे नामस्मरण आणि नामजप करीत असे. परंतु ही त्याची हरिभक्ती त्याच्या पित्याला, हिरण्यकश्यपूला अजिबात पसंत नव्हती. देवांकडून जवळजवळ अमरत्वाचा वर मिळाल्यानंतर उन्मत्त झालेला तो दैत्य. त्याला ही प्रल्हाद नित्य जपत असलेली रामनामावळी कशी आवडणार? त्याला हे प्रल्हादाचे रामनामजपात गुंगून जाणे पाहवत नव्हते. उन्मततेमुळे सारासार विचार करण्याची, ज्यांनी आपल्याला वरदान दिले त्या भगवंताच्या चरणी लीन व्हावे अशी भावना ठेवण्याची बुद्धीच त्या दैत्याला होणे दुरापास्त होते. त्यामुळे त्याने स्वत: मुखाने रामनाम घेणे हे तर अशक्यच होते.

**मुखी नाम नाही तया मुक्ति कैची ।**
**अहंतागुणे यातना ते फुकाची ॥**
**पुढे अंत येईल तो दैन्यवाणा ।**
**म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ॥ ९७ ॥**

सरळ अर्थ:

ज्याच्या मुखातून हरिनाम येत नाही त्याला मुक्ती कशी मिळेल? उलट अहंकरापोटी यातनाच मिळायच्या. आणि त्याचा शेवटही दीनवाणा असाच व्हायचा. तेव्हा तुम्ही त्या देवराणा हरीचे नाव घ्या.

विश्लेषण:

पुढे समर्थ म्हणतात, मग ज्या मुखातून, जप सोडाच, एकदाही रामनाम भक्तिभावाने निघत नाही ते मुख मनुष्याचे असले काय नि दैत्याचे असले काय, त्याच्या मालकाला मुक्ति मिळणे शक्य नाही. जननमरणाच्या फेऱ्यात त्याला खितपतच पडावे लागेल. ‘कोण हा हरि? कोठे आहे तो आता ? जो स्वत: आज माझ्यासमोर येऊ शकत नाही तो मला काय शासन करू शकणार आहे? मी

त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे, अमर आहे, कोणीही मला मारू शकणार नाही’ असा अहंकार बाळगून असलेला तो हिरण्यकश्यपु. काय झाले त्याचे? अहंकारापोटी यातनांचाच धनी झाला. ब्रम्हदेवाने दिलेल्या वरामुळे ‘माणूस, देव, दानव कोणीही, दिवसा वा रात्री, घरात वा बाहेर, शस्त्राने वा अस्त्राने, हवेत वा जमिनेवर मला मारू शकणार नाही’ ही घमेंड बाळगणारा तो दैत्य. त्याचा अंत कसा झाला? अगदी हीन दीन होऊन भयानक रीतीने. नृसिंहावतार घेऊन भगवंतानी त्या गर्विष्ठ दैत्याचा संध्याकाळच्या वेळी, उंबरठ्यावर बसून, मांडीवर घेऊन आपल्या नखांनी त्याची छाती फाडून वध केला. तेव्हा यातून आपण धडा घ्यायला हवा. दीनवाणा अंत होऊ नये म्हणून आयुष्यभरात आपण देवाला विसरता कामा नये. त्यासाठी अति आदराने, भक्तिभावाने त्या सर्वश्रेष्ठ देवाच्या, भगवंताच्या नावाचा आपण जप केला पाहिजे.

**हरीनाम नेमस्त पाषाण तारी ।**
**बहू तारिले मानव देहधारी ॥**
**तया रामनामी सदा जो विकल्पी ।**
**वदेना कदा जीव तो पापरूपी ॥ ९८ ॥**

सरळ अर्थ:

हरीचे नाव दगडांनाही तरंगायला लावते. मनुष्यदेह धारण केलेल्या कित्येकांना देखील त्या नावाने तारून नेले आहे. अशा त्या रामनामावर जो शंका घेतो आणि नामजप करत नाही तो जीव पापीच म्हणायचा.

विश्लेषण:

या श्लोकात समर्थ हरिनामाचा महिमा काय आहे ते सांगत आहेत. रामायणातला सेतु बांधण्याचा दाखला देऊन ते म्हणतात हरीचे, श्रीरामाचे नाव लिहिल्यानंतर दगड पाण्यावर तरंगले आणि त्यासेतूवरून देहधारी सैनिक- मानवसदृश्य रूपात

असलेले वानर- चाल करून लंकेला रामाच्या कार्यासाठी पोचले. इतकी ताकद त्या नामात आहे. अशी कमालीची ताकद, क्षमता असलेल्या रामनामाबद्दल जे शंका घेतात आणि रामनाम कधी उच्चारत नाहीत त्या लोकांबद्दल काय बोलावे? रामनामजपाचे पुण्यप्रद काम त्यांच्याकडून होत नसेल तर ते कर्मदरिद्री पापी असतात असेच म्हणायला पाहिजे.

**जगी धन्य वाराणसी पुण्यराशी ।**
**तयेमाजि आता गती पूर्वजांसी ॥**
**मुखे रामनामावळी नित्यकाळी ।**
**जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ॥ ९९ ॥**

सरळ अर्थ:

वाराणशी हे पुण्याचे भांडार आहे आणि म्हणून जगात धन्य आहे. वाराणशीमधून पूर्वजांना मुक्ति प्राप्त होते. कारण त्या जीवाला भगवान शंकर स्वत: हितोपदेश करत असतात.

विश्लेषण:

वाराणसी, म्हणजेच काशी. गंगा नदीच्या तटी असलेले हे नगर हिंदु धर्मात ओळखल्या जात असलेल्या सात पवित्र स्थानांपैकी एक आहे. वरुणा आणि असी या दोन नद्यांच्या मध्ये वसलेले म्हणून याचे नाव वाराणसी. हे पहिल्या ज्योतिर्लिंगाचे स्थान म्हणजे विश्वेश्वर भगवान शंकराचे पृथ्वीवरील स्थायी स्वरूपाचे निवासस्थान असेही मानले जाते. अर्थातच त्यामुळे वाराणसी म्हणजे पुण्यराशी अशी भावना तेथे आहे. काशीला गेले म्हणजे जाणाऱ्यालाच नव्हे तर त्याच्या पूर्वजांनाही सद्गती मिळते. कुठेही जन्माला यावे पण काशी-वाराणसीमध्ये देह ठेवावा अशी श्रध्दा प्रत्येक हिंदू धर्मियाची असते. तिथे रामनामाचा गजर नित्य होत असतो. वाराणसीच्या कणाकणात महादेव शंकराचे अस्तित्व आहे. किंबहुना वाराणसी हे नगर शिवशंकराच्या त्रिशुलावर स्थापित

आहे. त्यामुळे समर्थ सांगतात की शंकराला प्रिय असलेल्या रामाच्या नामाचा जप नित्य तुमच्या मुखातून व्हायला हवा, त्यातच तुमचे हित आहे असा उपदेश स्वत: चंद्रमौळी शंकर या वाराणसीक्षेत्री करत असतात.

**यथासांग रे कर्म तेही घडेना ।**
**घडे धर्म ते पुण्यगाठी पडेना ॥**
**दया पाहता सर्व भूती असेना ।**
**फुकाचे मुखी नाम तेही वसेना ॥ १०० ॥**

सरळ अर्थ:

धर्म कार्य करायचे तेही जो विधीवत, यथासांग करत नाही त्याच्या पदरी पुण्य जमा होत नसते. प्राणिमात्रासाठी त्याच्या मनात दया नसते आणि जे हरीनाम फुकटचे मिळते तेही त्याच्या मुखात येत नाही.

विश्लेषण:

या श्लोकात सर्वसामान्यपणे माणसाची प्रवृत्ती काय असते आणि ती तशी ठेवल्यामुळे काय होते हे समर्थ सांगतात. माणूस कर्मे करतो, नाना प्रकारची कर्मे करतो. जन्माला आल्यानंतर शिक्षणासाठी, निर्वाहासाठी, धर्मासाठी इत्यादी सगळ्या गोष्टींसाठी, माहित असल्याने किंवा अभावितपणे, तो ज्या क्रिया करतो ती कर्मे. शिक्षण घेताना अभ्यास करणे हे कर्म, निर्वाहासाठी काही व्यवसाय, नोकरी करणे हे कर्म, पूजापाठ, ईश्वरभक्ति करणे हेही कर्मच. या सगळ्या गोष्टी करताना त्या जशा केल्या पाहिजेत तशा तो करतो का? हे महत्वाचे. अभ्यास करताना नीट लक्ष लावून समजून घेऊन होतो का? नाही. घोकंपट्टी, शॉर्टकट, कॉपी करणे हे हातकंडे अवलंबले जातात. नोकरी करताना, मागे एके ठिकाणी म्हटल्या प्रमाणे केवळ पाट्या टाकायच्या म्हणून ते कर्म केले जाते. आळस, चालढकल, दुसऱ्याला वेठीस धरणे हे प्रकार केले जातात. धर्मकार्य करतानाही लक्षपूर्वक, विधीपूर्वक होते

का? यापेक्षा "झाले बुवा, पार पडले एकदाचे, किती दिवस म्हणत होतो सत्यनारायणाची पूजा करावी म्हणून, शेवटी पूजा एकदाची झाली बुवा" अशा भावनेने ती केली जातात. भटजी म्हणाले मम म्हणा, म्हटले. आत्मना म्हणा, म्हटले. हात जोडा, हात जोडले, आचमन करा, केले असे हे सांगकाम्याचे काम, भटजीने सांगितले म्हणून केले, म्हणजे ते यथासांग का? नाही. ते का करायचे? कसे करायचे त्याला शास्त्राचा काही आधार आहे का? कसला? हे ज्ञान करून घेऊन कर्म केले तरच ते विधिवत,यथासांग केलेले कर्म होते. अहो भटजीदेखील 'आणखी चार पूजा सांगायच्या आहेत हो' म्हणून गडबड करत शॉर्टकट मारतात ते मी पाहिले आहे. म्हणजे ना ते यथासांग कर्म करतात ना आपण. तर असे असू नये, आपण वाचून, अभ्यास करून, विचारून समजून घेऊन केले तरच ते विहित कर्म. आणि मग असे विहित कर्म केल्यावर काय मिळते? शिक्षणातले फळ मिळते, नोकरी-व्यवसायातले फळ मिळते आणि धर्मकार्यातले खऱ्याखुऱ्या समाधानाचे आणि मन:शांतीचे फळ मिळते. केलेल्या धर्मकार्याचे पुण्य लाभते. नाही तर या श्लोकाच्या पहिल्या दोन चरणात म्हटल्याप्रमाणे यथासांग कर्म घडत नाही आणि देवाधर्माच्या कामातले पुण्यही गाठी पडत नाही. पुढे समर्थ म्हणतात असा हा अज्ञानी माणूस, इतर जीवांबद्दल दया, क्षमा, शांती या भावनाही ठेवत नाही. केवळ आपला कार्यभाग इतरांकडून साधून झाला म्हणजे बस्स, पुढे ते जगोत वा मरोत. आपल्याला काय त्याचे? अशी भावना, शेजारीपाजारी, सहकारी, अगदी आपले आप्तेष्ट, पाळलेले पशु, पक्षी इत्यादि प्राणिमात्राविषयी ठेवतो. एव्हढेच नव्हे तर ज्या परमेश्वराने आपल्याकडून हे सारे करवून घेतले, त्याला त्याचे श्रेय न देता 'मी हे सर्व केले' अशी घमेंड ठेवतो आणि त्या परमेश्वराचे फुकट घेता येणारे नाम देखील आपल्या मुखातून मनोभावे, आदरपूर्वक घेत नाही. केवळ देखल्या देवा दंडवत असा प्रकार करून जातो.

||श्रीराम||

# <u>दशक अकरावे</u>

**जया नावडे नाम त्या यम जाची ।**
**विकल्पे उठे तर्क त्या नर्कची ची ॥**
**म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे ।**
**मुखे बोलता दोष जाती स्वभावे ॥ १०१ ॥**

सरळ अर्थ:
ज्याला परमेश्वराचे नाव घेणे आवडत नाही त्याला यमयातना भोगाव्या लागतात आणि जो त्या नामाबद्दल शंका घेऊन, कां कूं करत, तर्ककुतर्क करत बसतो त्याला नरकवास मिळतो म्हणून जे परमेश्वराचे नाव आपल्या मुखाने घेताच घेणाऱ्याच्या सर्व दोषांचे परिमार्जन होते ते नाव कमालीच्या आदराने घ्यावे.

विश्लेषण:
या श्लोकात देखील समर्थ रामनाम घेणे का आवश्यक आहे आणि तेही कसे भक्तिभावाने, आत्यंतिक आदराने घ्यायला हवे ते सांगताहेत. नाही म्हटले तरी रामनाम न घेणाऱ्याच्या मनात थोडीशी भीती बसावी असेच त्यांच्या सांगण्याचे स्वरूप आहे. पण अखेरच्या चरणात मात्र ते मधाचे बोट लावतात आणि मुखाने रामाचे – ईश्वराचे नाम घेतल्यास काय फायदा होईल ते सांगतात. यम कोणी पाहिलाय? किंवा नरक कसा असतो तेही कोणी पाहिलंय? पण तरीही कुठल्याही प्रकारच्या असह्य वाटणाऱ्या यातना होणे हे यमयातना होण्यात गणले जाते. आणि अशा आत्यंतिक यातना होत असताना अगदी आलिशान महालात रहात असाल तर तोही नरकवास वाटू शकतो. यम हा पूजनीय मानला गेला नसला तरीही तो परमेश्वराचा कार्यकर्ता आहे. संहाराची देवता शंकर महादेव याचे कार्य तो निष्ठेने करीत असतो त्यामुळे परमेश्वराच्या नामघोषाची ज्याला नावड आहे त्याचा या यमराजाला राग येणे आणि त्यामुळे त्याने यातना देणे हे समर्थांच्या

मते साहजिकच बनते. आणि त्यातून नुसते स्वत: नामघोष करणे राहू द्या, “त्याने काय होणार आहे? मी नाही रामाचे नाव घेणार, कोण काय बिघडवणार आहे माझे? अरे कोण हा राम? कोण हरी? कोण ईश्वर? वालीला कपटाने मारणारा रामच होता ना? आणि वृन्देला फसवणारा तो विष्णू, मारुतीच्या रूपाने रावणाची लंका जाळणारा तो महादेव, यांची नावे मी कशासाठी घ्यायची?” असे तर्कवितर्क करणाऱ्या, शंकाकुशंका काढणाऱ्या व्यक्तीला तो परमेश्वराचा दूत यम इहलोकातून घेऊन गेल्यानंतर स्वर्गात नेणे शक्यच नाही. तो नरकातच त्याची पाठवणी करणार. तेव्हा असे होऊ देऊ नका. अत्यंत आदराने, श्रध्दापूर्वक, भक्तिभावाने परमेश्वराचे नाव मुखाने उच्चारा. त्या पवित्र नावाचा घोष करण्याने तुमची वाचा सुधारेल, मनात कुविचाराना यायला वाव मिळणार नाही आणि तुमचे जीवन सहजपणे भक्तिभावाने भरून जाईल.

**अती लीनता सर्वभावे स्वभावे ।**
**जना सज्जनालागि संतोषवावे ॥**
**देहे कारणी सर्व लावीत जावे ।**
**सगूणी अती आदरेसी भजावे ॥ १०२ ॥**

सरळ अर्थ:

मनापासूनची, स्वाभाविक अशी नम्रता धारण करून थोरांना, संतजनांना आनंद द्यावा, समाधान द्यावे. यासाठी पडतील ते कष्ट करावे, आपला देह झिजवावा, तन मन धन या कारणासाठी लावावे आणि ईश्वराचे आत्यंतिक आदराने भजन करावे.

विश्लेषण:

माणसाने दीन म्हणजे बापुडवाणे असू नये, हीन म्हणजे दुष्टवृत्तीचे असू नये पण लीन म्हणजे नम्र मात्र असावे. त्याने उर्मटपणा अंगी बाणवून घेऊ नये, विनम्रता

धारण करावी. महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळी वाचती. झाडाचा स्थायीभाव म्हणजे ताठ असणे. हा गुण वाईट नाही. पण ज्या प्रसंगी ताठपणा धारण केल्याने नुकसान होणेच संभवते अशा प्रसंगी हाच गुण अवगुण ठरतो. हा ताठपणा महापुराच्या प्रवाहांत पाण्याच्या प्रचंड दबावाला विरोध करतो आणि परिणामी झाड मुळासकट उपटले जाते आणि वाहून जाते. पण काठावरची गवताची पाती त्यांच्या लवचिकपणामुळे तग धरून राहतात. हा तृणपात्यांचा लवचिकपणा म्हणजे माणसांमधला नम्रपणा. आणि हा सर्वांना प्रिय असतो. तुम्ही विनम्र असाल तर समोरच्या कोपिष्ट माणसाच्या क्रोधाची धार कमी होते. मग समोरचा माणूस शांत प्रवृत्तीचा सज्जन असेल तर त्याला तुमच्या अशा विनम्रपणामुळे, लीनतेमुळे समाधान, संतोष होतोच. तेव्हा समर्थ म्हणतात, विनम्र बना आणि संतसज्जनांना तुमच्या अशा मृदु नम्र स्वभावाने संतोष द्या. तशी विनम्रता, लीनता अंगी बाणवून घेण्यात कष्ट पडले तरी ते सोसा आणि कायावाचामने सर्वतोपरी प्रयत्न करून विनम्र व्हा. संत सज्जनांप्रमाणेच परमेश्वराच्या चरणीदेखील आदरपूर्वक लीन होऊन विनम्र होऊन वंदन करा, त्याची भक्ती करा.

**हरीकीर्तनी प्रीति रामी धरावी ।**
**देहेबुद्धि नीरूपणी वीसरावी ॥**
**परद्रव्य आणीक कांता परावी ।**
**यदर्थी मना सांडि जीवी करावी ॥ १०३ ॥**

सरळ अर्थ:

हरीचे कीर्तन करताना त्याच्याबद्दल मनात प्रेम, आदरबुद्धी बाळगावी. कीर्तनातील विषय उलगडून सांगताना तहानभूक विसरून जावे. परक्याचे धन आणि परस्त्री यांची कामना जाणीवपूर्वक टाळावी.

विश्लेषण:

समर्थ या श्लोकात ईश्वराचे भजन संकीर्तन करताना काय पथ्ये पाळावेत त्याबद्दल मार्गदर्शन करत आहेत. ते म्हणतात, हरीचे कीर्तन करताना त्याच्याबद्दल मनात प्रीती वसलेली असली पाहिजे. वरवरचे बोलणे करू नये. कीर्तन आणि भाषण यात फरक आहे. आपण हल्ली कितीतरी भाषणे ऐकतो. बहुतेक राजकीय पुढाऱ्यांची भाषणे लिहून आणलेली असतात नुसती वाचून दाखवली जातात. त्यात वक्त्याचा अभ्यास किती आणि कुणी सेक्रेटरीने लिहून दिलेले किती हे न सांगताही ओळखणे कठीण जात नाही. हरीकीर्तनाचे तसे नसावे. कीर्तन हे परमेश्वराचे महात्म्य भक्तिभावपूर्वक सांगणारे असावे केवळ भोंगळ स्वरूपाच्या भाकडकथा सांगणारे असू नये. परमेश्वरावर नितांत श्रध्दा, भक्ती, प्रेम, प्रीती असेल तरच कीर्तनकार त्यात रंगून जाऊन बोलू शकतो. गुणसंकीर्तन आणि निरुपण करताना तल्लीन होऊन देहभान विसरून बोलायला हवे. टाळ्या आणि जयजयकार किती होतो, कोणी बिदागी देणार आहे का? किती? बायाबापड्या कीर्तन ऐकायला आल्या आहेत का? इत्यादी लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून हरीचे गुणगान, आणि त्याचे वर्णन (निरुपण) करायला हवे.

**क्रियेवीण नानापरी बोलिजेते ।**
**परी चित्त दुश्चित्त ते लाजवीते ॥**
**मना कल्पना धीट सैराट धावे ।**
**तया मानवा देव कैसेनि पावे ॥ १०४ ॥**

सरळ अर्थ:

कित्येक लोक स्वत: काही न करता निव्वळ बाता मारत असतात. त्यांचे मन नाना प्रकारच्या दुर्विचारांकडे, कुकल्पनांकडे सुसाट धावत असते. अशा लोकांना देव पावणे शक्य नाही.

विश्लेषण:

आधी केले मग सांगितले अशी वृत्ती सत्कार्याच्या संदर्भात असायला हवी. करायचे काहीच नाही पण गाजावाजा मात्र आपण ते सत्कृत्य केल्याचा करायचा अशी प्रवृत्ती असणारे लोक या जगात कमी नाहीत. तसेच एखादी  कृती स्वत: केलेली नाही पण ती केल्याने काय होईल ते लोकांना अगदी अधिकारवाणीने सांगायचे हा देखील त्यातलाच एक प्रकार. दोन्ही त्याज्यच. दोन्हींमध्ये बोलणाऱ्याचे चित्त शुध्द नाही हे दिसून येते. असे चुकीच्या दिशेने विचार करणारे मन चांगल्या कल्पनांमध्ये स्थिर असत नाही. नावरे आवरीता असे हे चंचल मन नाना प्रकारच्या कल्पना करत अबलख वारुसारखे सुसाट धावत असते. अशा चंचल मनाच्या माणसाकडून एकाग्रतेने देवाचे ध्यान होणे दुरापास्तच. मग देवाची कृपा या माणसावर कशी होईल?

**विवेके क्रिया आपुली पालटावी ।**
**अती आदरे शुद्ध क्रीया धरावी ॥**
**जनीं बोलण्यासारिखे चाल बापा ।**
**मना कल्पना सोडि संसारतापा ॥ १०५ ॥**

सरळ अर्थ:

काय बरोबर, काय चूक याची नीट समज घेऊन आपली क्रिया करावी. आणि ती करताना मनात शुध्दता अंगिकारावी. बोले तैसा चाले हा मंत्र जपावा आणि मनातून ऐहिक संसारातील समस्यांचा विचार काढून टाकावा.

विश्लेषण:

विवेक म्हणजे सारासारविचारबुद्धी. बरोबर काय आणि चूक काय? योग्य काय अयोग्य काय? काय करायला पाहिजे आणि काय नको यांचा नीट विचार करून निवड करण्याची क्षमता असणे म्हणजे विवेकबुद्धी असणे. कमी जास्त प्रमाणात

बुद्धी सर्वांकडे असते पण विवेकबुद्धी असतेच असे नाही. त्यामुळे जनसामान्यांनी देखील ज्ञानाची, विज्ञानाची कास धरून ही विवेकबुद्धी अंगी बाणवून घ्यायला हवी. भल्या-बुऱ्याचा, खऱ्या-खोट्याचा नीट तारतम्याने विचार करून म्हणजेच विवेकबुद्धीचा कौल घेऊन त्याने आपल्या कृती करायला हव्यात. एखाद्या वेळी घाईघाईने काही चुकीचा निर्णय घेतला असेल तर क्रिया पूर्ण करण्यापूर्वीच तिचा सारासार विचार करून ती वेळीच दुरुस्त करता येते. तशी करावी आणि आपली कृती निर्दोष ठेवावी. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सारासार विचार केल्यानंतर आपल्या क्रियेच्या निर्दोष, बिनचूक असल्याचा विश्वास वाटतो. त्यामुळे त्या क्रियेविषयी आपण जे बोलू तेच आचरणात आणता येते. बोले तैसा चाले हा लौकिक आपण मिळवू शकतो. तेव्हा समर्थ या श्लोकात उपदेश करत आहेत की सारासारबुद्धी, विवेक बाळगून तुमच्या कृती निष्ठापूर्वक करा, निर्दोष, शुध्द म्हणजे चांगल्या करा, ठरवल्याप्रमाणे, समाजात सांगितल्याप्रमाणे करा. आणि त्यांबाबतीत बाकी कसली चिंता करू नका.

**बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा ।**
**विवेके मना आवरी स्थानभ्रष्टा ॥**
**दया सर्वभूती जया मानवाला ।**
**सदा प्रेमळू भक्तिभावे निवाला ॥ १०६ ॥**

सरळ अर्थ:

जो माणूस शुचिर्भूत होऊन एकनिष्ठेने चंचल मनावर ताबा ठेऊन (हरीस्मरण करत) असतो आणि सर्व प्राणीमात्रांवर दया करत असतो त्याला प्रेमळ भक्तीभावाची अनुभूति होऊन मन:शांति मिळते.

विश्लेषण:

करुणाष्टकात समर्थानी लिहिले आहे ‘अचपळ मन माझे नावरे आवरीता’. मन हे चंचल असते. ते अगदी सहजतेने स्वैर बनते. एक विचार चालू असतानाच दुसरा विचार जन्म घेतो. कधी चांगला असतो, कधी वाईट. आणि अशा बहकण्यावर उपाय काही करता येत नाही अशा अर्थाचे हे वचन. पण या श्लोकात मात्र समर्थ अशा स्वैर, चंचल मनाची संभावना ‘स्थानभ्रष्ट’ अशी करून त्याला आवरण्यासाठी विवेक ठेवणे हा उपाय सुचवतात. पहिल्या दोन चरणात ते सांगतात, माणसाने स्नान करून शुचिर्भूत होऊन नामजप सुरु करावा. हरीनामस्मरण, चिंतन आणि उद्घोष असे हे जपाचे स्वरूप असते. स्नान करून शरीर निर्मळ झाले म्हणजे आपल्यालाच शुध्द, पवित्र वाटते. अशा पवित्र अवस्थेत जाऊन निष्ठापूर्वक असा नामजप करावा. पण मग चंचल मन स्थानभ्रष्ट होऊन त्या नामजपापासून आपल्याला दूर नेत असेल, एकाग्रता ढळवीत असेल तर? आपण प्रयत्नपूर्वक संयम करून, विवेकाचे अवलंबन करून हा मनाचा उधळू पहात असलेला वारू आवरून धरायला हवा. जो शुचिर्भूत झालेला माणूस मनाला लगाम घालून, एकचित्त होऊन सर्व भूतांवर दया, प्रेम असे प्रेमळ भाव मनात आणतो आणि अशा अवस्थेत नामजप एकनिष्ठेने चालू ठेवतो त्याला मन:शांती लाभते.

**मना कोप आरोपणा ते नसावी ।**
**मना बुद्धि हे साधुसंगी वसावी ॥**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी ।**
**मना होइ रे मोक्षभागी विभागी ॥ १०७ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, तू आपल्यामध्ये क्रोधाचे बीज पेरू नकोस. संतसज्जनांच्या संगतीची इच्छा धर आणि दुष्ट प्रवृत्तीचा त्याग कर म्हणजे तू मोक्षप्राप्तीचा भागीदार होशील.

विश्लेषण:

या श्लोकाच्या चारीही चरणांची सुरुवात समर्थ मनाला संबोधून करतात म्हणजे यात जे सांगतात ते निक्षून ठामपणे सांगतात असा  त्याचा अर्थ घ्यायचा. सर्वप्रथम मनाने आपल्यात कोप म्हणजे क्रोध उपजवायचा नाही. क्रोधाचे बीज पेरून घ्यायचे नाही, म्हणजे सदैव शांत, रहायचे आहे. असे सदैव शांत निर्विकार रहाणे सहजासहजी शक्य होत नसते. विकारविरहित, स्थिरबुध्दी असतात ते साधुसंत. साधुसंतांचा सहवास मिळाला, त्यांच्या वृत्तीचे निरिक्षण आणि अनुकरण करता आले तर आपल्यालाही हे शक्य होते. म्हणून मनाने अशा साधुसंतांची संगत  कशी मिळेल त्याचा विचार करावा. सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो हा ध्यास घ्यावा. म्हणजे उघडा आहे की कुसंगती टाळायला हवी. तिसऱ्या चरणात हा उपदेश आला आहे. चांडाळ, दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांच्या संगतीत राहू नये. अशा संगतीचा त्याग करावा. मनाने असे विकारविरहित, साधुवृत्तीच्या शोधात असले आणि कुसंगतीपासून दूर राहिले म्हणजे आपोआपच मोक्ष मिळण्याच्या अवस्थेत त्याला प्रवेश मिळेल, ते मोक्षप्राप्तीचे भागीदार होईल.

**मना सर्वदा सज्जनाचेनि योगे ।**
**क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ॥**
**क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १०८ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, संतसज्जनांच्या सहवासामुळे आपल्या सर्व क्रिया भक्तिभावपूर्ण होतात. अशा भावभक्तीने केलेल्या क्रिया नसतील, नुसतीच वाचाळता असेल तर ती उपयोगाची नाही. अशा वाचाळतेतून निर्माण होणारे वादविवाद टाळून केलेले संवादच हितकारक असतात.

विश्लेषण:

इथून पुढल्या पाच श्लोकात समर्थ शेवटच्या चरणाची पुनरुक्ती करत आहेत. ‘तुटे वाद संवाद तो हीतकारी’ – ज्या संवादामध्ये वितंडवाद होत नाही असा संवाद सर्वतोपरी हितप्रद असतो असा हा चरण आहे. वाद आणि संवाद या दोन शब्दांच्या अर्थांमध्ये फरक आहे. वादाची परिणती भांडणामध्ये, कलहामध्ये आणि अखेर वैरामध्येही होऊ शकते. तर संवादात परस्परांच्या विचारांची देवाणघेवाण असते. वादविवादाने, वितंडवादाने प्रश्न सुटत नाहीत. सामोपचाराच्या संवादाने सुटू शकतात. म्हणजेच, वैयक्तिक असो वा सामाजिक, असे सुसंवाद करण्याने नुकसान होत नाही तर फायदाच होतो. असा संवाद संतसज्जनांशी केल्याने ज्ञानात भर पडते, आपला दृष्टीकोन विशाल बनतो. आणि त्यामुळे आपण योग्य पावले टाकून समस्यांची सोडवणूक करण्याची क्रिया करू शकतो. अर्थात यात आपला त्या संतसज्जनांवर, त्यांच्या सल्ला देण्याचे अधिकारी असण्याबद्दल विश्वास असला पाहिजे. सल्ला देण्याचा आव आणून उगीच काही तरी मनात भरवून देणारे ते संतसज्जन नव्हेत. अशांपासून दूरच रहायला हवे. खरे ज्ञानी, सज्जन अधिकारी पुरुष त्यांच्या संवादातून आपल्या कृती योग्य प्रकारच्या कशा होतील ते सांगू शकतात. म्हणून समर्थ म्हणतात अशा सज्जनांचा सहवास, त्यांच्याशी सुसंवाद करावा त्याने फायदा, हित होईल. पुढे ते म्हणतात, वादविवादातली वाचाळता टाळून, सुसंवादातून ज्यांची आवश्यकता जाणवलेली असते अशी सत्कृत्ये करायला हवीत. अन्यथा बोलाची कढी नि बोलाचाच भात काय कामाचा?

**जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा ।**
**जनीं वादसंवाद सूखे करावा ॥**
**जगी तोचि तो शोकसंतापहारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १०९ ॥**

सरळ अर्थ:

लोकांनी वादविवाद, निष्कारण, निष्फळ अशी चर्चा करू नये तर सुसंवाद करावा. कारण असा सुसंवाद शोक, क्रोध या दु:खदायक भावनांचा नाश करतो. असा सुसंवाद हा नेहमीच आपल्या हिताचा ठरतो.

विश्लेषण:

वाद आणि संवाद यातला फरक मागील श्लोकात स्पष्ट केल्यानंतर दोन्हीपैकी काय सोडावे आणि काय करत रहावे याबद्दलचा हा श्लोक आहे. एखादी गोष्ट करू नका असे सांगितल्यावर मग दुसरे काय करायचे हा प्रश्न उद्भवतो. त्याचा खुलासा समर्थांनी सांगणे क्रमप्राप्तच होते. त्याप्रमाणे ते म्हणतात, ज्यातून विवाद, तंटा-बखेडा निर्माण होऊ शकतो तो वाद घालणे सोडून द्या आणि ज्याच्यामुळे समस्यांची सोडवणूक होऊ शकेल, परस्परसामंजस्य वाढीला लागून आपल्याला आनंद, सुख होईल  असा संवाद करत रहा. असा सुखेनैव केलेला संवाद - सुसंवाद परस्परांच्या मनात शोक, संताप या तामसी गुणांचा प्रादुर्भाव होऊ देणार नाही. आणि हे तामसी गुण जर अशा सुसंवादाची सुरुवात होण्याआधी निर्माण झालेले असलेच तर त्यांचा नायनाटदेखील  करून टाकेल.

**तुटे वाद संवाद त्याते म्हणावे ।**
**विवेके अहंभाव याते जिणावे ॥**
**अहंतागुणे वाद नाना विकारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ११० ॥**

सरळ अर्थ:

ज्या संवादामुळे विवाद वाढत नाहीत तो संवाद. अशा सुसंवादात विचारपूर्वक अहंकार टाळलेला असतो. कारण अहंकारी भावनेतूनच नाना प्रकारचे विवाद,

वितंडवाद निर्माण होतात. असे वाद टाळणारा सुसंवाद आपल्या फायद्याचा असतो.

विश्लेषण:

इथे पुन्हा समर्थ संवाद म्हणजे काय ते सांगत आहेत. ते म्हणतात, ज्यात वाद टाळला जातो तो संवाद. एकमेकांशी भांडत, एकमेकाचा मुद्दा अहमहमिकेने खोडून काढायचा प्रयास करत केलेले बोलणे म्हणजे संवाद नव्हे. एकमेकाला समजून घेत 'माझेच म्हणणे खरे' असा अहंकार न बाळगता केलेली विचारांची देवाणघेवाण म्हणजे संवाद. अहंकार आला तिथे क्षोभ, क्रोध, वैर हेही येतात. आणि हे टाळायचे तर अहंकार, 'मी' पणा यांना टाळणे आवश्यक आहे. वादे वादे जायते तत्वबोध: ही उक्ती तेव्हाच खरी ठरते जेव्हा हे वाद वादावादीतून गुद्दागुद्दीत रुपांतरीत होत नाहीत. आणि ते तसे होत नाहीत तेव्हाच ते संवाद ठरतात. सुसंवाद होतात आणि त्यातून आपला भावनिक, बौद्धिक फायदा होतो.

॥श्रीराम॥

## दशक बारावे

**हिताकारणे बोलणे सत्त्य आहे ।**
**हिताकारणे सर्व शोधूनि पाहे ॥**
**हिताकारणे बंड पाखांड वारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १११ ॥**

सरळ अर्थ:

सत्य बोलण्यात हित असते. त्यासाठी संशोधन केले पाहिजे. आणि शंका कुशंका, ईश्वराविषयी, सध्दर्माविषयी तुच्छता दाखवणे अशासारख्या पाखंडीपणाला निरोप दिला पाहिजे कारण त्यातून वाद होऊ शकतात. असे वाद असतील तर तो संवाद नसतो. संवादानेच हित साधले जाते.

विश्लेषण:

या श्लोकाचा विशेष असा आहे की त्यात आपले हित कशामुळे साध्य होईल आणि त्यासाठी काय करायचे तसेच काय टाळायचे याबद्दल समर्थांनी सांगितले आहे. आता, आपले हित म्हणजे काय हा प्रश्न येतो. हित म्हणजे, ढोबळ मानाने, ज्यात आपला फायदा असेल असा परिणाम. मग तो भौतिक असो, उद्धारात्मक असो वा आणखी कोणताहि असो. आर्थिक, सामाजिक, आध्यात्मिक, कुठल्याहि प्रकारचा फायदा होणे यात त्या त्या परीचे हित सामावलेले असते. अहित दु:खदायी असते तर हित सुखदायी. तेव्हा उघड आहे, अहिताची इच्छा कोणी करणार नाही, पण आपले हित साधले जावे ही मनीषा सर्वांची असते. समृद्धीचे आयुष्य मिळणे हे आर्थिक हित, निष्कलंक प्रतिष्ठेचे जीवन जगता येणे हे सामाजिक हित, मन:शांति प्राप्त व्हावी हे आध्यात्मिक हित. यातले आध्यात्मिक हित आपण उदाहरणादाखल घेऊ. समर्थांच्या श्लोकाच्या पहिल्या चरणानुसार अशा आध्यात्मिक हितप्राप्तीसाठी म्हणजे मन:शांतीसाठी सत्त्यवचनी असणे आवश्यक

आहे. आपण असत्याचा प्रयोग करून काय साधतो? कदाचित थोडासा तात्पुरता लाभ. पण हे असत्त्य आपली पाठ सोडत नाही. ते उघड होईल काय ही शंका मनाला जाळते, ते झाकावे म्हणून आणि पुन्हा खोटे बोललो, वागलो तर - कबूल केले नाही तरी - मनाला त्याची खंत लागतेच लागते आणि वर वाढत्या भीतीनें अस्वस्थता येते, मन:शांति मिळत नाही. म्हणजेच आपले आध्यात्मिक हित साधले न जाता अहित होते. तेव्हा मुळातच असत्त्याची साथ न धरता सत्त्यवचनाचा अवलंब केला तर मनाची शांति हरवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आता बोलतो आहोत ते सत्यच आहे का याची खात्री काय? कशावरून ते चुकीचे, असत्य नाही? ही शहानिशा शब्द तोंडातून जाण्यापूर्वीच करून घ्यायला हवी. आणि अशी शहानिशा करणे म्हणजेच सत्य शोधणे. समर्थांच्या श्लोकाचा दुसरा चरण याच गोष्टीकडे निर्देश करतो. सत्य शोधण्याचे जे जे म्हणून मार्ग आहेत त्यांचा पाठपुरावा करायचा. संतवचनांचा आधार घेणे, ग्रंथांचा अभ्यास करणे, केवळ सांगोवांगीच्या गोष्टींवर, भाकडकथांवर विश्वास, अंधश्रध्दा न ठेवता पूर्ण विचार करणे हे सत्यशोधनाचे मार्ग आहेत. ते चोखाळून, सत्य काय ते शोधून काढून मगच बोलावे, यात हित आहे. याशिवाय आणखी काय अपेक्षित आहे? काळी जादू, जारणमारणविद्‌या करतो म्हणून गंडेदोरे बांधणारे, परमेश्वराचे नाव घेतील पण आपलेच महात्म्य वाढवणारे प्रकार करतील असे, सद्‌धर्माचा अभ्यास नसताना काही तरी थोतांड सांगणारे लोक, या लोकांना दूर ठेवायला हवे. ‘कुठला कोण देव? तो करतो असे जे तुम्ही म्हणता ते तो करतच नाही, आपोआपच होते, किंवा मीसुध्दा करून दाखवतो’ असे आव्हान देणारे पाखंडी यांना दूर केले पाहिजे. तेव्हा कोठे तुम्ही सत्याच्या जवळ जाल. आणि जेव्हा तुमच्या बोलण्यात पारखून घेतलेले, निखळ सत्य असेल तेव्हा त्याचा प्रतिवाद होऊ शकणार नाही. तुमच्या बोलण्याने संवाद साधला जाईल, हित साधले जाईल.

**जनीं सांगता ऐकता जन्म गेला ।**
**परी वादवेवाद तैसाचि ठेला ॥**
**उठे संशयो वाद हा दंभधारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ११२ ॥**

सरळ अर्थ:

ऐकण्या, बोलण्यात (वादात) उभा जन्म संपेल पण वाद तसाच राहील. कारण त्यात संशय आहे, दंभ आहे. आणि असा दंभ भरलेला वाद संपेल तरच तो संवाद होईल.

विश्लेषण:

सांगणारे खूप असतात. काही चांगले, काही वाईट, कोणी अभ्यासपूर्ण बोलणारे तर कोणी उथळ, केवळ वरवरचे ज्ञान असलेले. नाना प्रकारचे लोक आणि त्यांचे नाना प्रकारचे उपदेश. आपण आपले ऐकत असतो. थोडा वेळ हे सगळे बाजूला ठेवूया आणि चांगला उपदेश करणाऱ्या विचारी, ज्ञानी लोकांच्या सांगण्याकडे लक्ष केंद्रित करू या. असा ज्ञानी वक्ता आणि तसाच विचारी, ज्ञानार्जनोत्सुक श्रोता असेल तर असे सांगणे, असे ऐकणे ही परस्परप्रेरक क्रिया समाधानाची, आनंद देणारी असते. परंतु श्रोता जर केवळ सांगणाऱ्याला अडचणीत पकडायचे या हेतूने किंवा आपल्याला जास्त माहिती आहे जी दाखवायलाच पाहिजे अशा आविर्भावात निरर्थक प्रश्नावर प्रश्न विचारून किंवा केवळ खंडन करायचे म्हणून विरोधी मते मांडून वेळेचा अपव्यय करू इच्छित असेल तर तो दांभिकपणाने वाढवत ठेवलेला विवाद ठरेल. अशा विवादाला अंत नसतो कारण दंभ हा जाणून बुजून कातडे पांघरून घेतल्यासारखा असतो. तो चालूच रहाणार असतो. याचेच वर्णन समर्थांनी 'सांगण्या ऐकण्यात उभा जन्म गेला तरी वाद न संपता तसाच शिल्लक राहिला' असे केले आहे. खऱ्या जिज्ञासूचे समाधान होईल पण 'शंका'सुराचे होणे अशक्य. वाजवी शंका विचारणे आणि तिचे निरसन करून घेणे हा श्रोत्याचा हक्क असतो.

पण जर तसे निरसन वक्त्याकडून होत नसेल तर त्यावेळेपुरती माघार घेऊन दुसऱ्या एखाद्या जास्त ज्ञान असलेल्याला विचारावे, अखंड वितंडवाद घालत बसू नये हे पथ्य पाळणे परस्परांत वाद टाळून सुसंवाद साधण्यासाठी आवश्यक असते. हितकारक असते.

**जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।**
**अहंतागुणे ब्रह्मराक्षस जाले ॥**
**तयाहून व्युत्पन्न तो कोण आहे ।**
**मना सर्व जाणीव सांडूनि राहे ॥ ११३ ॥**

सरळ अर्थ:
कित्येक ज्ञानी पंडित हितकारक काय आहे ते न ओळखता केवळ अहंकार बाळगून राहिल्यामुळे वाया गेले. खरे तर ते श्रेष्ठ विद्वान, पण ती जाणीवच अहंकारामुळे सुटल्यावर राक्षसी प्रवृत्तीचे असल्यासारखेच बनले.
विश्लेषण:
ज्याचं अफाट वाचन आहे, निरनिराळ्या शास्त्रांची ज्याला माहिती आणि त्यापैकी किमान एकात तरी प्राविण्य आहे अशा व्यक्तीला पंडित म्हणता येईल. अशी पंडित असलेली व्यक्ति केव्हाहि आदरणीयच असते, किंबहुना असायला पाहिजे. पण अशा पंडिताला जर गर्वाची, अहंमन्यतेची बाधा झालेली असेल तर तो आदरणीय होत नाही. किंबहुना त्याला टाळावे असेच लोकांना वाटू लागते. अहंकारापोटी अशी व्यक्ति समोरच्याचा उपमर्द, अपमान करण्यात जराहि दिक्कत बाळगत नाही. यात आपण आपले स्वत:चेदेखील हित पहात नाही आहोत हे ती व्यक्ति ओळखत नाही. आपल्या प्रतिष्ठेला काळिमा फासणारे वर्तन आपण करतो आहोत हे तिच्या लक्षात येत नाही. ‘विद्या विनयेन शोभते’ या वाचनाचा तिला विसर पडतो आणि मग परिणाम काय होतो? लोकांच्या मनातले आपले आदराचे स्थान ती गमावून बसते. यातून धडा घ्यावा आणि वर्तन सुधारावे हे तारतम्यहि

अहंकारामुळे पाळले जात नाही उलट अहंकार वाढत जातो, मनात सूडबुध्दी जन्म घेते आणि अशा रीतीने पंडिताचे व्यक्तिमत्व दुष्ट, प्रसंगी राक्षसी वृत्तीच्या व्यक्तीत बदलते. त्याच्या बाबतीत 'कोण होतास तू? काय झालास तू?' हा प्रश्न पडू लागतो. आणि या सर्वाच्या मुळाशी काय असते? अहंता. वेदशास्त्रसंपन्न लंकापती रावण ब्राम्हण होता पण याच अहंकारापोटी राक्षस म्हणवला गेला आणि नाश पावला. तसे होऊ नये. जो ज्ञानी माणूस अहंकार विसरतो किंवा त्याचा त्याग करतो अशा माणसापेक्षा अधिक विद्वान (व्युत्पन्न) आणि म्हणून आदरणीय कोणीच नसतो.

**फुकाचे मुखी बोलता काय वेचे ।**
**दिसंदीस अभ्यंतरी गर्व सांचे ॥**
**क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।**
**विचारे तुझा तूचि शोधूनि पाहे ॥ ११४ ॥**

सरळ अर्थ:

फुकटची, बाष्फळ बडबड करण्यात कुणाचे काय जाते? आणि त्यात दिवसेंदिवस वाढत जाणारा अहंकार ! काही सत्कार्य न करता केवळ वाचाळपणा करणे काही कामाचे नाही हे समजायला पाहिजे असेल तर हे मना तूच त्याचा विचारपूर्वक शोध घे.

विश्लेषण:

मराठीत एक वाक्प्रचार आहे - आधी केले मग सांगितले - पण आज या वाक्प्रचाराचे उलटे स्वरूपच आपल्याला 'आश्वासन' या गोंडस शब्दात दिसते. आश्वासन केवळ देण्यासाठी असते, ते पाळायचे नसते असा एक अलिखित नियमच बनलेला असावा. 'हम जरूर करेंगे' ही केवळ सभेत द्यायची घोषणा असते. केवळ शब्दांचे बुडबुडे सोडत रहाणाऱ्याच्या  हातून काही कृती होत नसते. तोंडाची वाफ दवडण्यामुळे काही साध्य होत नाही. अर्थहीन, केवळ बोलायचे म्हणून

बोललेले बोल आणि कृती न करता केलेल्या वल्गना या दोन्ही गोष्टी कुचकामाच्या असतात. ‘व्वा, आपण काय बोललो आहोत आज, समाज सुधारणेसाठी ‘हमे ये करना होगा’ किंवा ‘आम्हाला हे करायला पायजेल आहे’ हे आपण किती जोसात सांगितले या सभेत आणि त्यामुळे टाळ्यांचा किती प्रचंड कडकडाट झाला’ या भ्रामक आत्मस्तुतीत मश्गुल असणारे पुढारी आजहि कमी नाहीत. समाजसुधारणेसाठी त्यांच्याकडून काही ठोस कृती होते का? याचा विचार केला तर ‘काही नाही’ असेच उत्तर येते. भाटांकडून मिळालेल्या टाळ्यांमुळे या पुढाऱ्यांच्या मनात वृथा अभिमान, अहंकारच निर्माण होतो आणि दिवसेंदिवस वाढत जातो. आधी ठोस कृती करा आणि मग ‘समाजासाठी आम्ही हे केलेले आहे’ असे पुराव्यानिशी ठासून सांगा. “आधी केले मग सांगितले” असे करणाऱ्या माणसाइतकाच मान “बोले तैसा चाले” अशा माणसालाहि दिला जाईल, त्याची पावले वंदिली जातील. तेव्हा समर्थ म्हणतात, “हे मना, तू स्वत:लाच विचार यात तथ्य, सत्य आहे की नाही ते म्हणजे तुझे समाधान होईल.” मनाच्या श्लोकात केवळ धार्मिक उपदेशच नाही तर आपल्याच नव्हे तर समस्त समाजाच्या भल्यासाठी आचरणात आणायच्या तत्वांचे विवेचनहि समर्थ करतात याचा हा श्लोक ठोस पुरावा आहे.

**तुटे वाद संवाद तेथे करावा ।**
**विवेके अहंभाव हा पालटावा ॥**
**जनीं बोलण्यासारखे आचरावे ।**
**क्रियापालटे भक्तिपंथेचि जावे ॥ ११५ ॥**

सरळ अर्थ:

वाद थांबला म्हणजे सुसंवाद साधावा, सारासार विचार करून अहंकार विसरून जावा, आपण लोकात जे बोलतो त्याप्रमाणेच आचरण ठेवावे. आणि अशा बदललेल्या आचरणातूनच भक्तिमार्गाला लागावे.

विश्लेषण:

पहिल्या दोन चरणांत समर्थ वाद – म्हणजे विवाद आणि संवाद – सुसंवाद या दोन्हींचा पुन्हा उल्लेख करत आहेत. जेव्हा वाद थांबतो आणि परस्परांच्या विचारांना योग्य तो मान देऊन प्रश्न सोडवण्याकडे प्रवृत्ती होते तेव्हा तिथे संवाद सुरु होतो. ‘माझेच म्हणणे खरे आहे’ ही आडमुठी भूमिका सोडून दिली की मग ‘तुमच्या म्हणण्यातहि तसे थोडे तथ्य दिसते हो’ ही सामंजस्याची भूमिका येते. आणि ही वेळ साधून शांत, संयमित असा संवाद सुरु करावा. अहंकारापोटी आपण धरत असलेल्या हेक्याचे नुकसान करणारे स्वरूप सारासारविचाराने ओळखून ते नम्रपणात पालटावे. यायोगे प्रश्नाची सोडवणूक करणारे वातावरण निर्माण होते आणि ते परस्परांच्या फायद्याचे असते.

तिसऱ्या चरणात समर्थ पुन्हा कृती आणि उक्ति यांच्या बद्दल बोलताहेत. मागील श्लोकात त्यांनी ‘क्रिया न करता केलेली वाचाळता’ व्यर्थ असे म्हटले आहे, म्हणजे आधी करा आणि नंतर बोला. पण या श्लोकात ते ‘बोलल्याप्रमाणे आपले वर्तन ठेवावे’ असे म्हणतात म्हणजे आधी बोला आणि मग करा. वरवर पाहता ही दोन परस्परविरोधी विधाने वाटतात. पण तसे ते नाही. कृती करायच्या आधी बोलायचे आणि नंतर काही करायचे नाही ही ‘क्रियेविण वाचाळता’ झाली. पण आधी बोलायचे आणि त्याप्रमाणे करायचे हा भाग ‘बोलल्यासारखे आचरणे’ आहे. पहिल्यात क्रिया नाही. तर दुसऱ्यात आचरण्याची क्रिया आहे. म्हणूनच वाचाळता टाळून कृती करणे आणि बोलल्याप्रमाणे प्रमाणे कृती करणे या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्वाच्या, इष्ट, म्हणून वंदनीय आहेत.

चौथ्या चरणात समर्थ पुन्हा भक्तीच्या मार्गाकडे निर्देश करत आहेत. या चरणाचा अर्थ असा घ्यायचा की हे मना, सुसंवाद साधून, विवेकाने अहंकार टाळून,

अंगीकारलेली कर्मे करशील  तेव्हा समाधानाने, तृप्त मनाने, परमेश्वराची भक्ति कर. भक्तिपंथावर वाटचाल सुरु ठेव.

**बहू शापिता कष्टला अंबऋषी ।**
**तयाचे स्वये श्रीहरी जन्म सोशी ॥**
**दिला क्षीरसिंधु तया ऊपमानी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११६ ॥**

सरळ अर्थ:

अंबरीष ऋषी त्याला मिळालेल्या शापांमुळे दु:खी कष्टी होता परंतु श्रीहरीने – देवाने त्याच्या वाट्याला येणारे अनेक जन्म स्वत: भोगले. तसेच उपमन्यूला देवाने क्षीरसागरही दिला. देव भक्तांचा अभिमानी असतो म्हणून तो भक्ताची उपेक्षा कदापि करत नाही.

विश्लेषण:

यापूर्वीहि बऱ्याच वेळा समर्थांनी आपल्याएखाद्या विधानावर खास जोर द्यायचा या उद्देशाने त्याचे पुन्हापुन्हा श्लोकाच्या शेवटच्या चरणात प्रतिपादन केले होते. नुपेक्षी कदा राम दासाभिमानी, मना सज्जना राघवी वस्ति कीजे, जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा, प्रभाते मनी राम चिंतीत जावा, तुटे वाद संवाद तो हीतकारी, आणि आता नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी. हा चरण श्लोक क्रमांक ११६ पासून ते क्रमांक १२५ पर्यंत असा दहा वेळा आला आहे. देव भक्ताकडे कधीहि दुर्लक्ष करत नाही, त्याची निराशा होऊ देत नाही कारण सच्च्या भक्ताचा त्याला नेहमी अभिमान असतो. हे समर्थ वारंवार सांगतात आणि त्यासाठी ते दाखलेदेखील देतात. या श्लोकात त्यांनी अंबरीष ऋषीचे तसेच उपमन्यूचे असे दोन दाखले दिले आहेत.

तेव्हा या आणि यापुढील नऊ श्लोकांच्या विवेचनात मी ‘नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी’ या चरणावर पुन्हा भाष्य न करता श्लोकात दिलेल्या उदाहरणांबद्दलच सविस्तर सांगणार आहे.

सत्ययुगात अंबरीष हा अत्यंत उदार, प्रजाहितदक्ष, धर्मपरायण राजा होऊन गेला. तो श्रीविष्णूचा निस्सीम भक्त होता.  तो व्रतवैकल्ये, तप, उपास इत्यादी ज्या ज्या मार्गाने श्री विष्णूच्या भक्तीत रत होता येईल ते ते मार्ग अवलंबायचा. कर्तव्यात चुकायचा नाही पण भक्तीमध्येहि कमतरता येऊ द्यायचा नाही. असेच एकदा तो विष्णू पूजेत अन्नग्रहण न करता मनोभावे मग्न झाला होता. एकादशीच्रे व्रत होते. संध्याकाळी अन्नग्रहण करून व्रत सुटणार होते. वेळ होत आली होती इतक्यात महा कोपिष्ट म्हणून प्रसिध्द असलेले दुर्वास ऋषि पूजेच्या ठिकाणी आले. अंबरीषाने त्यांना वंदन करून आपल्यासमवेत भोजन करण्याची विनंती केली. दुर्वासांनी ती मान्यहि केला पण म्हणाले, “हे राजा, मी प्रथम नदीवरून स्नान करून येईन आणि मगच आपण भोजन करू.” राजाने होकार भरला. परंतु उपास सोडायची वेळ काही क्षणांवर आली तरीहि दुर्वासांचा पत्ता नव्हता. राजा मोठ्या विवंचनेत  पडला. उपास वेळेवर सुटला नाही तर व्रतभंग होईल आणि श्रीविष्णूना ते आवडणार नाही. पण येणाऱ्या अतिथीच्याआधी भोजन कसे करायचे? तेव्हा उपस्थित थोर, विद्वान, वेदपारंगत ब्राम्हणानी सल्ला दिला की उपास सोडताना केवळ घोटभर पाणी प्यावे. वेदात सांगितल्याप्रमाणे पाणी हे अन्न आहेहि आणि नाहीहि. तेव्हा पाणी प्याल्याने उपास सुटेल तरी अतिथीच्या आधी भोजन केल्याचे पाप माथी येणार नाही. विद्वज्जनांच्या सल्ल्यावरून राजाने पाण्याचा घोट घेतला इतक्यात दुर्वास ऋषी तेथे येऊन पोचले. त्यांनी अंतर्ज्ञानाने जाणले की राजाने पाणी ग्रहण केलेले आहे. तेव्हा आधीच रागीट आणि त्यात भुकेलेले असल्याने त्यांनी संतापून राजाला शाप दिला, “हे उर्मट राजा, तू अतिथीधर्माचे पालन केले नाहीस, माझ्या आधी अन्नग्रहण केले आहेस.

या पापासाठी मी तुला शाप, देतो इथून पुढचे तुझे दहा जन्म पशुयोनीत किंवा मानव योनीत असतील." दुर्वासांची ही शापवाणी स्वत: श्री विष्णूनी ऐकली. आणि आपल्या भक्ताला हे निष्कारण शासन केले जात आहे हे पाहून त्यांनी अंबरीषावर लादले गेलेले जन्म आपल्या स्वत:वर घेतले. त्यातूनच दशावतार निर्माण झाले ज्यात मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह हे पशुजन्म समाविष्ट झाले. अशा रीतीने श्री विष्णूने भक्त अंबरीषाची उपेक्षा न करता त्याच्यावरची संकटे स्वत:वर घेऊन त्याला मुक्ति दिली.

कृतयुगातील व्याघ्रपाद ऋषीचा उपमन्यु हा दुसरा पुत्र, धौम्य ऋषीचा धाकटा भाऊ. लहानपणी एकदा उपमन्यु त्याच्या मामाच्या आश्रमात गेला असताना तिथे त्याला गाईचे दूध प्यायला मिळाले. आपल्या पित्याच्या आश्रमात परत आल्यानंतर रात्री त्याला दूध पिण्याची इच्छा झाली आणि त्याने ते मातेकडे मागितले. माता पिता अतिशय गरीब होते. त्यांच्याकडे गाय नव्हती तर दूध कुठे असणार? तेव्हा मातेने पाण्यात पीठ कालवून तेच दूध असे म्हणून उपमन्यूला प्यायला दिले. पण गाईच्या दुधाची चव समजलेल्या उपमन्यूला ते कसे आवडणार? तो रडायला लागला आणि गाईच्या दुधासाठी हट्ट करत राहिला. तेव्हा हतबुध्द झालेल्या मातेने त्याची समजूत काढायची म्हणून  सांगितले '"तुला दूध हवे असेल तर श्री महादेवाची – शिवाची- भक्ती आणि प्रार्थना कर. तोच तुला गाईचे दूध देईल." बाल उपमन्यु तेव्हापासून शिवाची प्रार्थना करत "ॐ नम: शिवाय" या मंत्राचा जप करत राहिला. अत्यंत उग्र तपस्या त्याने आरंभली. तेव्हा त्याची परिक्षा पहाण्याच्या उद्देशाने महादेवांनी इंद्राला त्याच्याकडे पाठवून नाना प्रकारची प्रलोभाने दाखवत शिवपूजेपासून त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण उपमन्युने त्या सर्वांकडे दुर्लक्ष केले आणि शिवपूजा सुरूच ठेवली. इंद्राने मग शिवाची निंदा करणारे शब्द वापरले. तेव्हा ती सहन न होऊन उपमन्यूने इंद्राला मारण्यासाठी धुनीतले भस्म अभिमंत्रित करून त्याच्याकडे फेकले. हे सारे बघत

असलेले श्री महादेव – शिवशंकर स्वत: तिथे प्रकट झाले. त्यांनी नंदीला आज्ञा करून ते भस्मास्त्र मध्येच अडवून धरवले आणि उपमन्यूला दर्शन देऊन त्याची इच्छा विचारली. उपमन्यूने मागितले, "हे महादेवा, माझ्या मातापित्यांना, माझ्या ज्येष्ठ बंधूला आणि मला गाईचे दूध प्यायला मिळावे इतकीच माझी इच्छा आहे." दुसरे काहीहि नको. तेव्हा त्याचा हा साधेपणा, निर्व्याज वृत्ती पाहून शंकराने त्याला संपूर्ण क्षीरसागर बक्षीस म्हणून दिला आपला पुत्र मानून पार्वतीच्या मांडीवर बसवले.

**धुरू लेंकरु बापुडे दैन्यवाणे ।**
**कृपा भाकिता दीधली भेटि जेणे ॥**
**चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११७ ॥**

सरळ अर्थ:

दीनवाण्या ध्रुव बाळाने कठोर तपस्या करून कृपेची प्रार्थना केली तेव्हा देवाने प्रसन्न होऊन त्याला तारकामंडळात अढळपद दिले. देव भक्तांचा अभिमानी असतो, तो भक्ताची उपेक्षा करत नाही.

विश्लेषण:

राजा उत्तानपाद याला दोन राण्या होत्या. सुनीति आणि सुरुचि. सुनीतीचा मुलगा ध्रुव. सुनीति पहिली राणी होती पण राजाला सुरुचि जास्त आवडायची. सुरुचीलाहि एक पुत्र होता, त्याचे नाव उत्तम. सुरुचि ध्रुवाचा द्‌वेष करीत असे. पित्याचे प्रेम आणि राज्य फक्त आपल्या उत्तमाला मिळावे अशी तिची इच्छा आणि त्या दिशेने प्रयत्न असायचे. पण उत्तानपादाचे ध्रुवावरहि खूप प्रेम होते. दोन्ही मुले पाच वर्षांची झाली तेव्हा एक दिवस राजा ध्रुवाला मांडीवर बसवून त्याच्याशी प्रेमाने बोलत असताना सुरुचि तेथे आली आणि रागाने फुणफुणत तिने ध्रुवबाळाला

राजाच्या मांडीवरून खेचून उतरवले आणि महालातून बाहेर घालवले. राजाला खूप वाईट वाटले पण तो सुरुचीला काही बोलू शकला नाही. दु:खी धृवाने झालेला प्रकार आपली आई सुनीति हिला सांगितल्यावर तिने त्याची समजूत काढली. आणि सांगितले, “बाळ, पित्यावर रागावू नकोस, ते विवश आहेत. पण भगवान विष्णूची प्रार्थना तू केलीस तर त्यांची कृपा तुझ्यावर होईल आणि ते तुझे दु:ख दूर करतील.” तेव्हा ध्रुवाने राजमहाल सोडला आणि वनात राहून विष्णूची प्रार्थना करायचे ठरवले. वनात जाताना त्याला नारदमुनी भेटले. त्यांनी ध्रुवाला “ॐ नमो भगवते वासुदेवाय” हा मंत्र दिला आणि त्याचा जप करत तपश्चर्या करायला सांगितले. ध्रुवाने यमुनेच्या काठी असलेल्या मधुवनात जाऊन मनोभावे आणि खंड न पाडता घोर तपश्चर्या केली. कालांतराने भगवान विष्णू प्रसन्न झाले आणि त्यांनी स्वत: येऊन धृवबाळाला जवळ घेतले. ते म्हणाले, “ ध्रुवबाळा, मला सर्व काही ज्ञात आहे. अन्यायाने तुला पित्याच्या मांडीवरून उतरायला लागले याचे तुला वैषम्य वाटते आहे हेहि मला ठाऊक आहे. चिंता करू नकोस. मी तुझ्या या घोर तपस्येमुळे तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तेव्हा मी तुला असे स्थान देतो जिथून कोणीही तुला घालवू शकणार नाही. या विश्वात जितकी म्हणून तारांगणे, नक्षत्रे आहेत ती सारी तुझ्याभोवती फिरत राहतील. तुझ्या स्थानाचा प्रलयकाळातहि नाश होणार नाही. महान सप्तर्षींना देखील तुझ्याभोवती प्रदक्षिणा घालावी लागेल. असे तुझे अढळपद असेल, तू चिरंजीव होशील.” असा वर देऊन भगवान अंतर्धान पावले. तेव्हापासून आजहि ध्रुव आकाशात चिरंतन काळासाठी एका जागी स्थिर आहे, चिरंजीव आहे. पित्याकडून उपेक्षा झाली तरी भक्ताचा अभिमान धरणाऱ्या देवाने तशी उपेक्षा केली नाही.

**गजेंद्रू महासंकटी वास पाहे ।**
**तयाकारणे श्रीहरी धावताहे ॥**
**उडी घातली जाहला जीवदानी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११८ ॥**

सरळ अर्थ:
ताकदवान असलेला हत्ती, गजेंद्र संकटात पडला असताना श्रीहरी स्वत: धावून गेले आणि त्या संकटात स्वत: उडी घेऊन त्यांनी आपला धावा करणाऱ्या गजेन्द्राला जीवदान दिले. त्याची निराशा केली नाही. कारण देव भक्ताची कधीच उपेक्षा करत नाही.

विश्लेषण:
क्षीरसागराने वेढलेला त्रिकूट नावाचा एक प्रसिद्ध, सुंदर, श्रेष्ठ पर्वत होता. त्या पर्वताच्या दरीमध्ये ऋतुमान नावाचे उद्यान एक होते आणि त्या उद्यानात एक मोठे सरोवर होते. त्यात सोनेरी कमळे उमललेली होती. तटावरील प्रत्येक ऋतूमध्ये हिरव्यागार राहणाऱ्या इतर वृक्षांनी ते सरोवर अत्यंत शोभायमान केलेले असे. एकदा त्या पर्वताच्या जंगलामध्ये अनेक हत्तिणींसह राहणारा एक गजेंद्र वेळू, बांबू, वेत, मोठमोठी झुडपे, झाडे यांना तुडवीत फिरत होता. हत्तीची वयात येणारी पिल्ले उन्हाने व्याकूळ झालेल्या त्याच्या पाठोपाठ येत होती. मोठमोठे हत्ती आणि हत्तिणी सुद्धा त्याच्याभोवती कडे करून चालल्या होत्या. त्याला आणि त्याच्या कळपाला अतिशय तहान लागलेली होती. म्हणून तो लगबगीने सरोवराजवळ गेला. त्या सरोवराचे पाणी अत्यंत निर्मळ आणि अमृताप्रमाणे मधुर होते. हत्ती अगोदर तेथे घुसून आपल्या सोंडेन भरपूर पाणी प्याला. नंतर त्या पाण्यात डुंबून त्याने आपला थकवा घालविला. गृहस्थाश्रमी माणसाप्रमाणे मायेने तो हत्ती आपल्या सोंडेने पाण्याचे फवारे उडवीत आपल्या बरोबरच्या हत्तिणी आणि पिल्लांना न्हाऊ घालू लागला. तसेच त्यांच्या तोंडात आपली सोंड घालून त्यांना पाणी पाजू लागला.

त्याचवेळी त्याच्या प्रारब्धामुळे एका बलाढ्य मगराने त्याचा पाय पकडला. संकटात सापडलेल्या त्या अत्यंत बलवान गजेंद्राने आपली शक्ती एकवटून

स्वतःला सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. गजेंद्र आणि मगर आपापली संपूर्ण शक्ती पणाला लावून झुंजत होते. कधी गजेंद्र मगराला बाहेर ओढीत होता तर कधी मगर गजेंद्राला आत ओढीत होता. बरोबरच्या हत्ती हत्तिणींनीहि गाजेन्द्राला बाहेर काढायचा प्रयत्न केला. पण उपयोग झाला नाही. पुष्कळ काळपर्यंत वारंवार पाण्यात ओढला गेल्यामुळे शेवटी गजेंद्राचे शरीर थकले. त्याच्या शरीरात ताकद राहिली नाही की. मगर जलचरच होता. असे असल्याने त्याची शक्ति क्षीण होण्याऐवजी वाढली. शरीरबलाचा अभिमान असणारा तो गजेंद्र एकाएकी प्राणसंकटात सापडला आणि स्वतःला सोडवून घेण्यात जेव्हा असमर्थ ठरला, तेव्हा आपल्या सुटकेच्या उपायावर त्याने पुष्कळ विचार केला. शेवटी त्याने ठरविले. "हा मगर म्हणजे विधात्याने मला लावलेला फासच आहे. याने मी कासावीस झालो आहे. म्हणून आता मी परमेश्वराला शरण जातो." आपल्या बुद्धीने असा निश्चय करून गजेंद्राने एकाग्र चित्ताने पूर्वजन्मी शिकलेले स्तोत्र म्हणून भगवंतांची स्तुती केली. त्यावेळी प्रसन्न होऊन आणि गजेंद्र संकटात आहे असे पाहून चक्रधारी भगवान श्रीहरी गरुडावर आरूढ होऊन अत्यंत वेगाने तेथे आले. शक्तिमान मगराने सरोवरात गजेंद्राला पकडून ठेवले होते, त्यामुळे तो कासावीस झाला होता. गरुडावर स्वार होऊन आलेल्या चक्रपाणि भगवान श्रीहरींना आकाशात पाहून गजेन्द्राने आपल्या सोंडेने त्यांना कमळ अर्पण केले आणि कसेबसे म्हणाला, "हे नारायणा, भगवंता, मी तुम्हाला वंदन करतो." गजेंद्राला अत्यंत पीडा होत आहे असे जेव्हा भगवंतांनी पाहिले, तेव्हा त्यांनी गरुडावरून एकदम खाली उडी घेतली आणि करुणा येऊन गजेंद्राबरोबर मगरालाही अत्यंत वेगाने सरोवराच्या बाहेर काढले आणि दोघांना वेगळे केले. अशा रीतीने त्यांनी गजेंद्रमोक्ष करून संकटात सापडलेल्या आपल्या भक्ताची उपेक्षा होऊ दिली नाही.

**अजामेळ पापी तया अंत आला ।**
**कृपाळूपणे तो जनीं मुक्त केला ॥**
**अनाथासि आधार हा चक्रपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११९ ॥**

सरळ अर्थ:
पापी अजामेळ जेव्हा मृत्युपंथाला लागला होता. तेव्हा देवाने कृपाळू होऊन त्याला वाचवले. हातात सुदर्शन चक्र धारण करणारा देव अनाथांना आधार देतो आणि त्यांची उपेक्षा कदापीहि करत नाही.

विश्लेषण:
९५व्या श्लोकात समर्थांनी या अजामेळाचे कथा सांगितलेली आहे. तीच इथे मी पुन्हा वर्णन करतो.

अजामेळ हा एक विद्वान ब्राम्हण होता. परंतु उतार आयुष्यात त्याच्याकडून प्रमाद घडला आणि तो विषयाधीन झाला. त्याला अनेक पुत्र होते. त्यांपैकी सर्वात धाकट्या, लाडक्या पुत्राचे नाव होते नारायण. विद्वत्ता असूनही पापाचरणात बुडालेल्या या ब्राम्हणाचा अंत जवळ आला. मृत्युशय्येवर असताना तो आपल्या लाडक्या पुत्राला वरचेवर नारायणा, नारायणा असे बोलावू लागला. नेमके त्याचवेळी यमदूत त्याला न्यायला आले. परंतु त्यांनी टाकलेला पाश त्याला न बांधताच श्रीविष्णूच्या आज्ञेने मागे जाऊ लागला. विष्णूच्या दूताचा आणि यमदूताचा संवाद अजामेळाच्या कानी पडला आणि त्याला उपरती झाली, पश्चात्ताप वाटला. अशा रीतीने भगवंतानी कृपा करून त्याला पापाच्या परिणामांतून मुक्त केले. मृत्यूशय्येवर असहाय्य, अनाथ असा पडलेल्या अजामेळाचा ते आधार बनले. तिथून पुढे पश्चात्ताप पावलेला अजामेळ हरीभक्तीला लागला आणि अंतिमत:

मुक्त झाला. अशा प्रकारे अभावितपणे केलेल्या आराधनेचेहि फळ देवाने त्याला दिले आणि उपेक्षित ठेवले नाही.

**विधीकारणे जाहला मत्स्य वेगी ।**
**धरी कूर्मरूपे धरा पृष्ठभागी ॥**
**जना रक्षणाकारणे नीच योनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२० ॥**

सरळ अर्थ:
ब्रम्हदेवाच्या सहाय्यासाठी म्हणून विष्णूने सर्वप्रथम मत्स्य अवतार घेतला, नंतर कूर्म (कासव) अवतार घेऊन समुद्रात बुडत असलेल्या पृथ्वीला आपल्या पाठीचा आधार दिला आणि पशु योनीतील वराह अवतार घेऊन हिरण्याक्ष असुराच्या कबजातून पृथ्वीला सोडवून आणले. अशा रीतीने देवाने आपल्या भक्तांची उपेक्षा न करता नेहमी त्यांच्या संकटकाळी धावून जाऊन त्यांचे रक्षण केले आहे.

विश्लेषण:
या श्लोकात वर्णिलेले पशुअवतार हे श्रीविष्णूने आपला भक्त अंबरीष याच्यासाठी स्वत:वर घेतलेले अवतार आहेत.

जलप्रलय येण्यापूर्वी श्री विष्णूनी मत्स्य हा पहिला अवतार घेतला होता. तो ब्रम्हदेवाचे हरवलेले वेद परत मिळवून देण्यासाठी आणि पृथ्वीवरील सर्व जीवांना नवे जीवन दान देण्यासाठी घेतला होता. त्याची कथा अशी: जलप्रलय होण्याच्या आधी त्यावेळचा राजा सत्यव्रत (जो नंतर सातवा वैवस्वत मनु म्हणून ओळखला जाऊ लागला) नदीत स्नान करून सूर्याला अर्घ्य देण्यासाठी कमंडलूत पाणी घेत होता तेव्हा त्यात एक छोटीशी मासोळी आली. राजा तिला परत प्रवाहात सोडायला लागला तर ती म्हणाली, :नको, मला परत प्रवाहात सोडू नको. इतर मोठे मासे मला खातील." तेव्हा राजाने तिला कमंडलूतच राहू दिले. पण लवकरच ती मासोळी

इतकी मोठी झाली की कमंडलुट ती मावेना. तेव्हा राजाने तिला आपल्या उद्यानातील सरोवरात सोडले पण तिथेही तिचा आकार महाकाय माशाएव्हढा झाला. त्याच्या डोक्यावर एक मोठी शिंगहि होते. झाला. राजाला आश्चर्य वाटले. हा काही  साधारण मासा नाही हे त्याने ओळखले आणि वंदन करून माशाला खऱ्या रुपात प्रकट व्हायला सांगितले. तत्क्षणी माश्यातून श्री विष्णू प्रगट झाले आणि त्यांनी राजाला आज्ञा केली की त्यांनी आपल्याला आता समुद्रात सोडावे. थोड्याच दिवसात जलप्रलय होणार आहे तेव्हा एक प्रचंड नौका तयार करून पृथ्वीवरील सर्व वनस्पती आणि प्राण्यांच्या जोड्यांना त्या नावेत रहायला सांगावे. प्रलय येईल तेव्हा वासुकी नागाचा दोर करून त्याच्या सहाय्याने त्या नावेला आपल्या डोक्यावर उगवलेल्या शिंगाला बांधावे म्हणजे तो मासा नावेला सुरक्षित जागी घेऊन जाईल आणि सर्वांचे रक्षण करील. सत्यव्रत मनुने त्या आज्ञेचे पालन केले. सात दिवसांनंतर खरोखरच प्रलय झाला. आणि मत्स्यअवतारातील भगवान विष्णूंनी नौका हृष्यमूक पर्वतावर नेऊन ठेवली. दरम्यानच्या काळात हयग्रीव नावाच्या राक्षसाने ब्रम्हदेवाच्या (विधीच्या) हातातून वेद पळवून नेले  होते तेहि त्यांनी हयग्रीवाचा वध करून परत मिळवून ब्रम्हाला दिले. त्या वेदांमधील ज्ञानाच्या योगाने आणि प्रत्येक वंशातील जोडप्यांच्या सहकार्यातून ब्रम्हा आणि मनुने पुराचे पाणी ओसरल्यानंतर नवीन सृष्टी निर्माण केली. अशा रीतीने मत्स्य अवतार घेऊन देवाने सृष्टीचा उद्धार केला. तिची उपेक्षा केला नाही.

दुसरा अवतार त्यांनी कूर्म म्हणजे कासवाचा घेतला आणि पृथ्वीला समुद्रात बुडण्यापासून वाचवले.  असे म्हणतात की एकदा इंद्राचा खजिना रिकामा झाला, विश्वाचा कारभार चालवणे कठीण होऊन बसले. तेव्हा तो भगवान श्रीविष्णूकडे गेला. भगवंताने त्याला समुद्रमंथन करून जडजवाहीर मिळवण्याचा मार्ग सुचवला. इंद्राने मिळेल त्या धनातला वाटा देण्याचे कबूल करून असुरांनाहि मदतीला बोलावले. आता समस्या होती इतका मोठा, अथांग सागर घुसळून काढायचा तर

तशीच मोठी माथानी, किंवा रवी लागणार होती. अशा वेळी मेरू पर्वताची मनधरणी करून त्याला आणि रवीला दोरी हवी म्हणून वासुकीला या कामासाठी राजी करण्यात आले. एका बाजूने सुर म्हणजे देव आणि दुसऱ्या बाजूने असुर, म्हणजे दानव अशा तऱ्हेना मंथनाला सुरुवात झाली. परंतु अथांग समुद्रात मेरू पर्वत बुडायला लागला. त्याला खालून काहीच आधार मिळेना. सर्वांनी मग विष्णूची करुणा भाकली. तेव्हा श्री विष्णुभगवान मदतीला धाऊन आले. त्यांनी कासवाचा म्हणजे कूर्म अवतार धारण केला आणि समुद्रात बुडी घेऊन मेरू पर्वताला आपल्या पाठीवर तोलून धरले. तेव्हा मंथन सुरु झाले आणि समुद्रातून एकामागोमाग एक अशी रत्ने बाहेर पडायला लागली. भगवंतानी हा अवतार घेऊन मदत केली नसती तर कुठले मंथन आणि कुठली रत्ने? विश्वाचा डोलारा कोलमडून पडला असता. पण देवाने हे ओळखले आणि विनवणी करणाऱ्या देवदानवांची उपेक्षा न करता त्यांची मदत केली.

तिसरा अवतार भगवंतानी नीच म्हणजे डुकराच्या (वराह) योनीत जन्माला येऊन घेतला. हा देखील पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी घेण्यात आला होता. भक्त प्रल्हादाचा पिता हिरण्यकश्यपु याला एक भाऊ होता. हिरण्याक्ष या नावाचा. तोही तसाच उन्मत्त आणि विष्णूशी वैर करणारा मदोन्मत्त राक्षस होता. त्याने एकदा ब्रम्हांडातल्या ग्रहमंडलातून चक्क पृथीचे अपहरण केले. आणि तिला पाताळात लपवून ठेवले. ब्रम्हांडाचा समतोल ढळला आणि पृथ्वीवरील सर्व जीव पाताळातल्या कुबट, अंधाऱ्या जागेत घुसमटून जायला लागले. तेव्हा त्या सर्वांनी आणि स्वर्ग लोकातील देवांनीहि विष्णूच्या नामाचा जप आरंभला आणि सहाय्याला येण्याची त्याला विनंती केली. तेव्हा श्रीविष्णूने नाकातून गळलेल्या स्लेष्मातून एका विचित्र दिसणारऱ्या किड्याच्या रुपात जन्म घेतला. हा किडा बाहेर येताक्षणीच आकाराने मोठा होत गेला तेव्हा सर्वांना दिसले की तो एक वराह होता. अत्यंत उग्र, क्रोधित अश्या दिसणाऱ्या त्या वराहाला दोन अत्यंत तीक्ष्ण असे सुळे दात होते जे तोंडातून ऊर्ध्व दिशेला बाहेर आलेले होती. लाल

डोळे, भयावह दिसणारे दात आणि आयुधधारी चार हात असलेल्या त्या वराहाने मुसंडी मारून पाताळ गाठला आणि पृथ्वीला जिथे लपवून ठेवलेले होते तिथे जाऊन तिला आपल्या सुळ्यांवर तोलून धरत वर आणले. तिला पूर्ववत ग्रहमंडलात स्थापित केले. तोवर हिरण्याक्ष अपशब्द उच्चारत युध्दासाठी आव्हान देत आला होता. तुंबळ युध्द झाले आणि त्यात वराहावतारधारी भगवंताने आपल्या हातातील आयुधांचे आघात करून हिरण्याक्षाची छाती फोडून त्याचा अंत केला. पृथ्वीवरील जीवांचा धावा ऐकून त्याच्याकडे दुर्लक्ष न करता, संकटात असलेल्या भक्तांची उपेक्षा न करता देवाने त्यांचे रक्षण केले.

||श्रीराम||

## दशक तेरावे

**महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला ।**
**म्हणोनि तयाकारणे सिंह जाला ॥**
**न ये ज्वाळ वीशाळ सन्नीध कोणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२१ ॥**

सरळ अर्थ:
प्रल्हाद हा देवाचा मोठा भक्त अतिशय त्रासात होता. तेव्हा त्याच्यासाठी म्हणून देवाने नृसिंहाचे रूप घेतले आणि प्रल्हादाचे रक्षण केले. नृसिंहाच्या अक्राळविक्राळ रूपाचा दाह इतका की त्याच्याजवळ कोणीही जाऊ शकत नव्हते. असा हा भक्ताविषयी अभिमान बाळगणारा देव भक्ताची उपेक्षा कधीच करत नाही.

विश्लेषण:
या श्लोकात असलेली प्रल्हादाची कथा अशी आहे:

वराह अवतारात श्रीविष्णूने मारलेल्या हिरण्याक्ष या असुराचा भाऊ हिरण्यकश्यपु हा आपल्या भावाचा देवानी वध केला हे पाहून अतिशय संतापला. सूड घेण्यासाठी आपण सर्वात बलशाली, अजेय, अमर व्हायचं या इच्छेने तसा वर मिळावा म्हणून त्यानं ब्रम्हदेवाची प्रार्थना आणि त्यासाठी घोर तपश्चर्या करायला सुरुवात केली. या तपश्चर्येत तो मग्न असताना देवांनी असुरांवर हल्ला करून त्यांचा पराभव केला. सारे असुर त्यांनी बळकावलेले स्वर्गाचे राज्य सोडून पळून गेले. तेव्हा हिरण्यकश्यपूची पत्नी कयाधु आणि पुत्र प्रल्हाद यांना इंद्र पकडून नेणार होता. पण देवर्षी नारदांनी त्यांना अभय देऊन आपल्या आश्रमात आश्रय दिला. नारद स्वत: श्रीविष्णूचे निस्सीम भक्त. त्यामुळे त्यांच्या आश्रमातील वास्तव्यात तेथे चालणाऱ्या विष्णूभक्तीमुळे बाल प्रल्हादाच्या मनावरहि परिणाम होऊन तोदेखील विष्णूचा भक्त, उपासक बनला. हिरण्यकश्यपूचे तप पूर्ण झाल्यावर प्रसन्न

झालेल्या ब्रम्हदेवानी त्याला हवा असलेला वर दिला. या वरामुळे हिरण्यकश्यपूला देव, दानव, मानव आणि पशु यांपैकी कोणीहि, दिवसा किंवा रात्री, शस्त्रांनी किंवा अस्त्रांनी, वास्तूमध्ये किंवा बाहेर, जमिनीवर, पाण्यात किंवा आकाशात मारू शकणार नव्हते. या वरदानामुळे हिरण्यकशपु आणखीच उन्मत्त बनला. त्याने पुन्हा स्वर्गलोकावर ताबा मिळवला आणि अत्याचार सुरु केले. विष्णूवरचा राग तो विसरला नव्हता, उलट तो जास्तीच खदखदत राहिला. अशा परिस्थितीत त्याचा स्वत:चा पुत्र प्रल्हाद हा विष्णूची भक्ती करतो आहे, श्रीहरी, श्रीहरी असे त्याचे नाम सतत घेत आहे यामुळे तर तो आणखीच भडकला आणि हर प्रकारे प्रल्हादाला मारायचा प्रयत्न करू लागला. त्याला श्वापदांपुढे फेकले पण ती श्वापदे प्रल्हादाला काही इजा न करता दूर निघून गेली, त्याला उकळत्या तेलात फेकले पण ते तेलच थंड झाले आणि प्रल्हादाला काही अपाय झाला नाही. इतकेच काय पण प्रल्हादाला अग्नीत जाळून टाकायची आज्ञा हिण्यकश्यपूने आपली बहीण होलिका हिला दिली. पण प्रल्हादाचा स्पर्श होताच होलिकाग्नीच्या ज्वालादेखील विझल्या. या सगळ्या प्रसंगांत भक्त प्रल्हाद मुखाने केवळ श्रीहरी, श्रीहरी असे नाम घेत शांत अविचलित राहिला होता. या सगळ्यामुले हिरण्यकश्यपु वेडापिसा झाला आणि त्याने क्रोधाने प्रल्हादाला विचारले, “कोण आहे हा तुझा हरी? बोल, कुठे आहे तो? येऊ दे माझ्यासमोर, मारून टाकेन मी त्याला.” प्रल्हाद म्हणाला, “माझा हरी इथे, तिथे, सगळीकडे, अणुरेणू व्यापून राहिला आहे.” यावर हिरण्यकश्यपूने समोरच्या दगडी खांबाकडे बोट दाखवून विचारले, “असं? या खांबात आहे तो?” प्रल्हादाने हो म्हणताच हिरण्यकश्यपूने खांबाला लाथ मारली. त्यासरशी तो खांब उन्मळला आणि त्यातून घनघोर गर्जना करत भयंकर दिसणारी आकृती बाहेर पडली. तिचे शरीर माणसाचे होते पण तोंड सिंहाचे, तोंडात कराल दाढा, लाल लाल जीभ, तर लांब अणकुचीदार नखे असलेले बलिष्ठ हात असे ते अक्राळविक्राळ दिसणारे रूप गर्जना करून म्हणाले, “हो मीच प्रल्हादाचा हरी आहे आणि तुझा वध करायला आलो आहे.’ उन्मत्त हिरण्यकश्यपु मोठ्याने हसून

म्हणाला, “तूच काय कोणीच मला मारू शकणार नाही. ब्रम्हदेवाने वरदान दिले आहे मला. देव, दानव, मानव, पशु यांपैकी कोणीहि, दिवसा किंवा रात्री, शस्त्रांनी किंवा अस्त्रांनी, वास्तूमध्ये किंवा बाहेर, जमिनीवर, पाण्यात किंवा आकाशात मला मारू शकणार नाही.” यावर श्रीहरी म्हणाले. नीट डोळे उघडून बघ, मी ना पशु आहे ना मानव, मी नृसिंह आहे आणि माझ्याकडे कोणतेहि शस्त्र, अस्त्र नाही पण तरीहि तुझा नाश मी करणार आहे, इथे, या क्षणी. आत्ताचा क्षण म्हणजे दिवस नाही नि रात्रही नाही, संध्याकाळ आहे.” असे म्हणून नृसिंहाने हिरण्यकश्यपूला धरले आणि ना वाड्यात, ना बाहेर असा उंबरठ्यावर बसून, ना जमिनीवर, ना हवेत, म्हणून मांडीवर ठेऊन, हाताच्या नख्यांनी छाती फाडून त्याचा अंत केला. यावेळी नृसिंहाचा क्रोध इतका पराकोटीला गेला होता की त्याच्या त्या अक्राळविक्राळ, गर्जना करत असलेल्या मुखाकडे पाहण्याचेही कोणाला धाडस होत नव्हते मग जवळ जाणे तर दूरच. पण परमभक्त असलेल्या प्रल्हादाने त्याचे गुणगान करत जवळ जाऊन त्याला शांत केले. अशा रीतीने देवाने भक्त प्रल्हादावरच्या प्राणसंकटातून त्याची मुक्तता केली. त्याच्याकडे पाठ फिरवली नाही.

**कृपा भाकिता जाहला वज्रपाणी ।**
**तया कारणे वामनू चक्रपाणी ॥**
**द्विजांकारणे भार्गवू चापपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२२ ॥**

सरळ अर्थ:

वज्रधारी इंद्राने करुणा भाकताच चक्रपाणि विष्णूने वामनावतार घेतला तसेच तत्कालीन ब्राम्हणांवर चालवलेले अत्याचार थांबवण्यासाठी परशुरामाचा अवतार घेतला. कारण देव अडचणीत असलेल्या भक्ताकडे कधीहि पाठ फिरवत नाही.

विश्लेषण:

प्रल्हादाचा नातू बळी जेव्हा असुरांचा राजा बनला होता तेव्हाची गोष्ट आहे ही. बळी हा विष्णूभक्त होता आणि आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय होता. कनवाळू, कर्तव्यदक्ष आणि दानशूर अशा बळीला असुरांचे गुरु शुक्राचार्य यांनी एकदा सल्ला दिला की त्याने शंभर अश्वमेध यज्ञ करावेत म्हणजे त्याला इंद्रपद प्राप्त होऊन तो स्वर्गाचाहि स्वामी बनू शकेल. स्वर्गाच्या स्वामित्वाचा मोह कोणाला टाळता येईल? गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून बळीने अश्वमेध करायला सुरुवात केली. जसजशी यज्ञांची संख्या शंभराच्या जवळ येत चालली तसतशी देवाधिपती वज्रधारी इंद्राच्या मनात धडकी भरायला लागली. आपले इंद्रपद जाणार या भीतीने त्याने मग क्षीरसागरात शेषशय्येवर विश्रांती घेत असलेल्या विष्णूची प्रार्थना, आपल्यावर कृपा करावी म्हणून त्याची भाकणूक करायला सुरुवात केली (कृपा भाकिता जाहला वज्रपाणी). बळीराजा तर मोठा सद्‌गुणी राजा होता. त्याने कधीहि कोणावरहि अन्याय केला नव्हता. कोणा याचकाला बळीच्या दरबारातून निराश, विन्मुख होऊन जावे लागले नव्हते. त्यामुळे भगवान विष्णू धर्मसंकटात पडले. काय करावे? मग त्यांनी विचार केला आणि इंद्राला त्याचे इंद्रपद जाणार नाही अशी व्यवस्था आपण वेळ येताच करू असे आश्वासन देऊन स्वर्गलोकात परत पाठवले. कश्यप ऋषींची पत्नी, इंद्राची माता अदिति देखील पुत्राच्या चिंतेने व्याकुळ झाली होती तेव्हा कश्यप ऋषींनी तिला आश्वासन दिले की श्रीविष्णू तिच्या पोटी अवतार घेणार आहेत आणि ते इंद्राची काळजी दूर करतील (तया कारणे वामनू चक्रपाणी). बळीराजाच्या शंभराव्या अश्वमेधाला सुरुवात झाली तेव्हा अदितीच्या पोटी एक दिव्य बालक जन्माला आले. अत्यंत तेजस्वी अशा त्या बालकाने जन्म घेताच बटूचे रूप धारण केले. कश्यप ऋषींनी त्याचे नाव वामन असे ठेवले आणि त्याची मुंज करून “ॐ भवति भिक्षांदेही” हा मंत्र देऊन बळीराजाकडे पाठवले. यज्ञस्थानी बटु वामन येताच बळीराजाने त्याचे स्वागत, आदरातिथ्य केले आणि विचारले, ‘हे वामना, मी तुला काय भिक्षा देऊ?” तेव्हा

वामन उत्तरला, “राजन, माझ्या तीन पावलांनी व्यापली जाईल एव्हढी जागा तुम्ही मला द्यावी.” बळीराजाने होकार देताच वामनाने विशाल अवतार धारण केला, त्याच्या एका पावलात स्वर्गलोक व्यापला गेला, दुसऱ्या पावलात पृथ्वी आणि मग वामनाने विचारले, “आता मी तिसरे पाउल कुठे ठेऊ?” तेव्हा वामन हा दुसरातिसरा कोणी नाही तर स्वत: भगवान विष्णू आहेत हे ओळखून नतमस्तक होऊन म्हणाला, ”भगवन, आपले पाऊल माझ्या मस्तकावर ठेवावे.” शुक्राचार्यांनी परोपरीने राजाला हे दान न देण्याबद्दल सांगितले, इतके की दानानंतर हातावर पाणी सोडायच्या झारीत जाऊन त्यांनी पाणी अडवले पण राजाने त्यांना न जुमानता वामनाला आपल्या मस्तकावर पाउल ठेवायला विनवले. वामनावतारातले भगवान विष्णू प्रसन्न होऊन म्हणाले, “ राजा, मी प्रसन्न आहे. तू माझा भक्त आहेस तेव्हा तुझीदेखील उपेक्षा मी करणार नाही. तू दिलेल्या या दानाचे फळ म्हणून मी तुला अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल आणि पाताल या पृथ्वीच्या पोटातील सप्तपाताळांपैकी तिसऱ्या सुतल या पाताळाचे राज्य देतो. स्वर्गापेक्षाहि अधिक संपन्न असे तुझे राज्य असेल. तू तिथला स्वामी बनून रहा. तुझा गदाधारी द्वारपाल म्हणून तिथे माझी उपस्थिती राहील.” आणि अशा तऱ्हेने त्यांनी तिसरे पाउल बळीच्या मस्तकावर ठेऊन त्याला सुतल पाताळात पाठवले. इंद्रदेवाचीही उपेक्षा केला नाही आणि बळीराजाचीही नाही. कारण देव भक्ताभिमानी असतो. तो कोणाही भक्ताला उपेक्षित ठेवत नाही.

या श्लोकातील दुसरे उदाहरण आहे परशुरामाचे. परशुरामाचे पिता होते ऋषि जमदग्नी आणि माता रेणुका. ब्राम्हण पिता आणि क्षत्रिय कुलात जन्मलेली माता यांचे हे अपत्य. मूळचे नाव रामभद्र. पण शस्त्रास्त्रविद्येच्या अध्ययनात श्री गणेशाने त्यांना परशु (चाप) भेट म्हणून दिला त्यामुळे त्यांचे नाव परशुराम (चापपाणि) झाले. भृगु ऋषीचा प्रपौत्र (पणतू) म्हणून त्याना भार्गव असेही म्हणतात. श्रीविष्णूचा सहावा अवतार म्हणून ते जन्माला आले. परशुराम सात

चिरंजीव व्यक्तींमधील एक आहेत म्हणून ते त्यांच्यानंतर झालेल्या प्रभु रामचंद्राच्या अवतारात आणि नंतरच्या श्रीकृष्ण अवतारातहि उपस्थित होते. परशुराम हा अवतार तेव्हाच्या क्षत्रिय राजांनी ब्रम्ह्वृन्दांवर केलेल्या अनन्वित अत्याचारांमुळे त्यांना शासन करण्यासाठी घेण्यात आला (द्विजांकारणे भार्गवू चापपाणी). महिष्मती नगरीचा क्षत्रिय राजा कार्तवीर्य ऊर्फ सहस्त्रार्जुन याने जमदग्नीच्या आश्रमातून कामधेनु कपिला गाय जबरदस्तीने हिरावून नेली आणि आश्रमाची नासधूस केली. त्यामुळे रागावून परशुरामाने कार्तवीर्याशी युध्द केले आणि त्यात त्याचे हजार हात छाटून त्याचा शिरच्छेद केला. यामुळे चिडलेल्या कार्तवीर्याच्या पुत्रांनी परशुराम आश्रमात नसताना त्याच्या पित्याचा - जमदग्नीचा वध केला. परशुरामाला हे समजल्यावर त्याने कोपायमान होऊन महिष्मतीवर जोरदार २१ हल्ले चढवून कार्तवीर्याच्या पुत्रांसह साऱ्या दुष्टबुध्दी क्षत्रियांना मारून पृथ्वी नि:क्षत्रिय केली आणि ती कश्यपऋषींना भेट म्हणून दिली. स्वत: समुद्र हटवून त्याच्याकडून नवीन प्रदेश मिळवला व तिथे राहू लागले. असे म्हणतात की हा प्रदेश म्हणजे कोकण. अशा रीतीने या अवतारात श्रीविष्णूने ब्राम्हणांवर होत असलेल्या अत्याचारातून त्यांची सुटका केली.

**अहल्येसतीलागी आरण्यपंथे ।**
**कुडावा पुढे देव बंदी तयाते ॥**
**बळे सोडिता घाव घाली निशाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२३ ॥**

सरळ अर्थ:

प्रभू रामचन्द्रानी अरण्यातून जात असताना सती अहिल्येचा उध्दार केला तसेच नंतर रावणाने पकडून ठेवलेल्या देवांची सुटका करून रावणाचा वध केला. अशा रीतीने देवाने आपल्या भक्तांच्या यातनांकडे दुर्लक्ष न करता त्यांना सहाय्य केले. कारण देवाला भक्ताचा अभिमान असतो.

विश्लेषण:

ऋषी विश्वामित्र यांच्या यज्ञस्थानी येऊन ती भ्रष्ट करणाऱ्या, आश्रमात घुसून अत्याचार करणाऱ्या क्रूर ताटका नावाच्या राक्षसिणीचा आणि तिच्याबरोबरच्या इतर राक्षसांचा बीमोड करण्यासाठी दशरथाच्या परवानगीने विश्वामित्र ऋषी राम आणि लक्ष्मण यांना घेऊन गेले होते. ते कार्य पूर्ण झाल्यानंतर ते त्या दोघांना सीतास्वयंवरासाठी घेऊन निघाले. वाटिका, वने, उपवने, अरण्ये असा त्यांचा प्रवास चालला होता. या अशा प्रवासामागे खरे तर नियती होती. रामाच्या हातून आणखी एक महत्वाचे कार्य घडायचे होते. मिथिला नगरीजवळ पोचताना त्यांना एक निर्जन, पडिक असा आश्रम दिसला. रामाने विश्वामित्राना त्या आश्रमात कोणीच ऋषी-मुनी का रहात नाहीत असे विचारल्यावर विश्वामित्रांनी त्याचे कारण सांगितले. तो आश्रम गौतम ऋषींचा होता. त्यांची पत्नी अहल्या ही अतिशय रूपवान होती. एके दिवशी गौतम ऋषी आश्रमात नसल्याची संधी साधून देवराज इंद्र गौतमांसारखे रूप घेऊन आश्रमात आला. आणि कामातुर होऊन अहल्येशी लगट केली. इंद्राचे कपट अहल्येने ओळखले परंतु आपण इतक्या रूपवान आहोत की देवराज इंद्रालाहि आपला मोह पडला आहे या विचाराने ती संयम हरवून बसली आणि इंद्राच्या आधीन झाली. नंतर इंद्र स्वर्गात परत जायला निघाला असतानाच गौतम ऋषी आश्रमात परत आले. आपल्यासारख्याच रूपात असलेल्या इंद्राला पाहून सारा प्रकार त्यांच्या लक्षात आला. तेव्हा त्यांनी इंद्राला तर शाप दिलाच शिवाय अहल्येलादेखील “तू शिळा होऊन हजारो वर्षे इथे पडून राहशील. जेव्हा राम अवतारात श्री विष्णू येऊन तुला पदस्पर्श करशील तेव्हाच तुझा उध्दार होईल. आणि त्यानंतरच तू तुझ्या मूळ रुपात येऊन माझ्याकडे येऊ शकशील.” असा शाप देऊन गौतम ऋषी आश्रम सोडून हिमालयात निघून गेले. इतके सांगून विश्वामित्रांनी रामाला आश्रमात जाऊन तिथे असलेल्या शिळेला स्पर्श करून

यायला सांगितले. रामाच्या पायाच्या स्पर्शाने शिळेची पुन्हा पूर्ववत सुंदर अहल्या बनली.

या श्लोकात दिलेले दुसरे उदाहरण आहे रावणाने पकडून कैदेत ठेवलेल्या ग्रह, नक्षत्रे आणि इतर देवांचे. महादेवाचा सर्वश्रेष्ठ भक्त गणला गेलेला रावण केवळ आपल्या अहंकारापायी त्यांचा वैरी बनला आणि त्याने देवांना त्रास द्यायला सुरुवात केली. अनेक देवांना बंदी करून लंकेत दास म्हणून हलकीसलकी कामे करण्यासाठी घेऊन गेला. सर्व ग्रहांना आणि नक्षत्रांना देखील त्यांनी आपण सांगू त्यावेळी आणि सांगू त्याच स्थानावर राहावे, केवळ आपल्या आज्ञेनेच सर्व काही चालावे म्हणजे मानवच काय पण सारे देवहि आपले अंकित होतील ही अवास्तव महत्वाकांक्षा धरून रावणाने हे केले होते. तथापि महादेवाने त्याचा हा डाव उधळून लावला आणि ग्रहनक्षत्रांना, देवांना बंधमुक्त केले. त्याना संरक्षण (कुडावा) प्रदान केले. आणि श्रीहरीकडून मानवजन्मातील राम अवतारात बलपूर्वक रावणाचा अंत करविला.

**तये द्रौपदीकारणे लागवेगे ।**
**त्वरे धावतो सर्व सांडूनि मागे ॥**
**कळीलागि जाला असे बौद्ध मौनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२४ ॥**

सरळ अर्थ:

द्रौपदी संकटात सापडली असताना सगळी कामे सोडून श्रीहरी तिच्या मदतीसाठी त्वरित धावून गेला. आणि कलीयुगामध्ये {लोकांच्या कल्याणासाठी) बुध्द म्हणूनहि अवतार घेता झाला. भक्ताचा अभिमान बाळगणारा देव कधीही त्याला निराश करत नाही.

विश्लेषण:

या श्लोकातील पहिले उदाहरण विष्णूच्या श्रीकृष्ण अवतारातील आहे. द्रौपदी ही त्याची निस्सीम भक्त होती. द्यूतप्रसंगी दुर्योधन व दु:शासनाकरवी झालेले वस्त्रहरण हा द्रौपदीच्या जीवनातील सर्वात मोठा मानहानीचा प्रसंग होता. त्या प्रसंगातदेखील द्रौपदीने आपल्या संयमाची व बुद्धिमत्तेची चुणूक सभाजनांना दाखवून दिली होती. "माझ्या पतीने आधी स्वत:ला पणाला लावले असल्यास नंतर मला पणाला लावण्याचा अधिकार त्यांना उरतो का?" या तिच्या प्रश्नाने भीष्म पितामहांनादेखील निरूत्तर केले होते. वस्त्रहरणासारख्या प्रसंगामधे पतींनी सर्व अधिकार गमावल्यानंतर द्रौपदीने आपला सखा श्रीकृष्ण याचा धावा केला होता. तिच्या हाकेला प्रतिसाद देत श्रीकृष्ण सारे काही सोडून, विनाविलंब धावून गेला आणि त्याने  द्रौपदीला वस्त्रे पुरवून तिच्या सन्मानाचे रक्षण केले.

भगवद्गीतेमध्ये (अध्याय चौथा, श्लोक ७ आणि ८) श्रीकृष्णअवतारात भगवान म्हणाले आहेत :

जेव्हा जेव्हा अवनीवरती धर्मऱ्हास होतो |
अधर्मनाशास्तव मी तेव्हा जन्माला येतो ||
सज्जनरक्षण, कुकर्मनाशन, धर्मस्थापनार्थ |
युगा युगातुनि जन्म घेउनी मी येतो, पार्थ ||

या वचनाला अनुसरून त्यांनी पुढे कलियुगात गौतमाच्या रुपात अवतार घेतला. हा अवतार कुणा एका भक्ताच्या विनवणीवरून घेतलेला नव्हता तर अधर्मनाश, कुकर्मनाश, आणि सद्धर्मस्थापनार्थ घेतला होता. लोकांमधील अज्ञान दूर करून त्याना बोध व्हावा म्हणून घेतलेला होता. राजपुत्र सिध्दार्थ ऊर्फ गौतम म्हणून जन्माला आलेल्या आणि आरामाचे आयुष्य कंठत असलेल्या गौतमाला एकदा राजवाडा सोडून बाहेर फिरत असताना रस्त्यावर एक जराजर्जर माणूस दिसला. दन्तरहित मुख, सफेद आणि विरळ झालेले डोक्यावरचे केस, वाकलेली कृश तनु

असा तो माणूस हातात काठी घेऊन थरथरत असा रस्त्यावरून कष्टाने चालत होता. काही दिवसांनंतर त्याच्यासमोर एक आजारी माणूस आला. हातापायाच्या काड्या झालेल्या, पोट फुगलेले, चेहरा पिवळा पडलेला, धापा टाकत आणि दुसऱ्याच्या आधाराने कसातरी चालत होता तो. या दोन दृश्यांनी गौतम अस्वस्थ झाला. तिसऱ्या वेळी त्याने एक प्रेतयात्रा पाहिली. चार लोकांच्या खांद्यावर तिरडी आणि यात्रेत मागून शोकविव्हल नातेवाईक आणि मित्र. कोणी मोठ्याने रडतो आहे तर कोणी छाती बडवून घेत आकांत करतो आहे अशी ती प्रेतयात्रा पाहून गौतमाचे मन पूर्णपणे विटले. त्याच्या मनात यौवन, स्वास्थ्य आणि एकंदरीत जन्ममृत्यू या तिन्हींबद्दल घृणा निर्माण झाली. यौवन, जे शरीराला शोषून घेते.... स्वास्थ्य, आरोग्य, जे शरीराला शेवटी नष्टच करते..... जीवन, जे थोड्या अवधीतच समाप्त होऊन जाते...! काय उपयोग आहे या सगळ्यांचा माणसाला? जीवनमरणाचं हे चक्र असंच चालू रहाणार आहे का? अंतर्मुख होत चाललेल्या गौतमाला चौथ्या वेळी एक संन्यासी दिसला. लोभ, मोह, माया सगळ्यांपासून मुक्त झालेला, प्रसन्नमुख, शांत चित्त संन्यासी. त्याच्या दर्शनाने प्रभावित होऊन गौतम जन्म, दु:ख आणि जरा-मरण, यांच्यापासून मुक्तीच्या शोधात राज्य, मातापिता, पत्नी आणि पुत्र या सगळ्यांचा त्याग करून मौनी, म्हणजे संन्यासी बनून तप करण्यासाठी तो जंगलात निघून गेला. कित्येक वर्षांच्या अन्नपाण्याविना केलेल्या खडतर तपस्येनंतर त्याला बोध झाला. शरीराचे चोचले अथवा शरीरकष्ट या दोन्हींचाहि अतिरेक अयोग्य आहे. मध्यम मार्ग स्वीकारून मनापासून सन्मार्गाला लागले पाहिजे. कर्मकांडे, यज्ञांमध्ये आणि एरवीही भक्षणासाठी केली जाणारी अमर्याद पशुहत्या यांचा अतिरेक टाळला पाहिजे. मनुष्यच्या जन्मजातीपेक्षा त्याचे कर्म महत्वाचे मानले पाहिजे, दु:ख, त्याची कारणे आणि त्यांचे निवारण यासाठी ज्ञानदान, बुद्धीची प्रगल्भता, शील, प्रेम, करुणा, अहिंसा, मैत्री आणि समभाव या अष्टांगानी परिपूर्ण असलेल्या जीवनाचे तत्व अनुसरणे म्हणजे सद्धर्मपालन अशा या बोधानंतर त्याने हा धर्मबोध लोकांमध्ये

पसरवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. अशा तऱ्हेने नवीन बौध्दधर्माचे संस्थापन आणि प्रसार झाला. सुरुवातीला दिलेली भगवंतची उक्ति त्यांच्या या बौध्द अवतारात सार्थ झाली.

**अनाथां दीनांकारणे जन्मताहे ।**
**कलंकी पुढे देव होणार आहे ॥**
**तया वर्णिता शीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२५ ॥**

सरळ अर्थ:

दीनदुबळ्यांसाठी, अनाथांसाठी देव अवतार घेत असतो. कली युगात पुढे कल्की हा देवाचा अवतार होणार आहे. वेद-पुराणांमध्ये त्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. आणि तो भक्तांच्या हिताकडे दुर्लक्ष करणार नाही.

विश्लेषण:

या श्लोकाच्या तिसऱ्या चरणात म्हटल्याप्रमाणे श्रीमद्भागवतपुराणात बाराव्या स्कंदाच्या दुसऱ्या अध्यायात कल्की अवताराबद्दल सविस्तर वर्णन आहे. त्यात सांगितल्याप्रमाणे कलियुगाचा अंत होत असताना सर्वत्र अराजक माजलेले असेल. राज्यकर्ते लुटेरे बनलेले असतील, समाजात नीतिमत्ता ढासळलेली असेल, विवाहात वडीलधाऱ्या माणसांची पसंती, संमती या गोष्टीचे महत्व पार नष्ट झालेले असून केवळ स्त्री पुरुष स्वत:च एकमेकाला बघून विवाह करतील, संस्कारांच्या अभावामुळे अशा विवाहातील पावित्र्य नष्ट झालेले असेल. सामान्यजनाना जंगलात भटकून कंदमुळे, मांस, झाडपाला अशा प्रकारच्या अन्नावर गुजराण करावी लागेल. त्यामुळे माणसे, पशुपक्षी सर्वांचेच आकार लहान आणि आयुष्यमान कमी झालेले असेल. माणसाचे आयुष्यमान फक्त ३० वर्षांचे उरलेले असेल. अशा परिस्थितीतून दीनदुबळ्यांना, अनाथाना वाचवण्यासाठी श्रीविष्णू पुन्हा एकदा पृथ्वीवर अवतार घेतील. त्यांचे नाव कल्की असेल. संभल नावाच्या गावामध्ये

विष्णुयश नावाच्या विद्वान, उदार अशा ब्राम्हणाच्या घरी ते जन्म घेतील. देवदत्त या नावाचा त्यांचा पांढऱ्या रंगाचा घोडा असेल आणि हातात तलवार घेऊन ते या घोड्यावर बसून लुटारू राज्यकर्त्यांना मारून पुन्हा पृथ्वीवर सुराज्य निर्माण करतील आणि हळूहळू प्राणिमात्रांची स्थिती पूर्ववत स्वास्थ्यपूर्ण होईल. या कामगिरीमुळे कल्कीला देवत्व मिळून भगवान कल्की या नावाने ते ओळखले जातील. अशा रीतीने देव अनाथांची, दीनदुबळ्यांची 'कुणीतरी आपल्याला अराजकातून, दयनीय परिस्थितीतून सोडवावे' ही अपेक्षा पूर्ण करेल, त्याना निराश करणार नाही.

**जनांकारणे देव लीलावतारी ।**
**बहुतांपरी आदरे वेषधारी ॥**
**तया नेणती ते जन पापरूपी ।**
**दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ॥ १२६ ॥**

सरळ अर्थ:
जनहितासाठी देव असे अनेक अवतार सहजपणे घेतो. पण त्याचे हे नाना वेषधारी अवतार ज्याना ओळखता येत नाहीत ते लोक पापी, दुष्ट दुरात्मे असतात.

विश्लेषण:
या श्लोकापासून पुढे श्रीसमर्थ "नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी" हा चरण वापरत नाही. मागील दहा श्लोकांत तो वापरला होता. आता या श्लोकात ते सांगताहेत की देव, मग तो शंकर महादेव असो वा श्री विष्णू असो सर्व जनांसाठी कालपरत्वे आणि आवश्यकतेनुसार निरनिराळे अवतार धारण करत असतो. समर्थ इथे पहिल्या चरणात मुद्दामच 'फक्त भक्तांसाठी' असे म्हणत नाहीत तर जनांकारणे, म्हणजे सर्व जनांसाठी असे म्हणत आहेत. जग हे सुष्ट-दुष्ट, चांगले-वाईट, सज्जन-दुर्जन अशा सर्व प्रकारच्या लोकांनी भरलेले असते. देव जेव्हा अवतार घेऊन येतो तेव्हा तो अवतार फक्त भक्तांनाच दिसेल असे नाही, भक्त

नसलेल्यांनाहि दिसेल. त्याला सुष्ट बघतील असेच दुष्टहि बघतील. पुन्हा दुसऱ्या चरणात ते म्हणतात 'बहुतांपरी'. या बहुतांमध्ये 'उडदामाजि काळे गोरे' असणारच. नाही का? तर देवाचा अवतार या सर्वांसाठी असतो. प्रश्न हा आहे की सारेच त्या अवतारातले महात्म्य ओळखू शकतात का? उत्तर नाही असेच आहे. तसे नसते तर श्रीकृष्णाला मारायचा प्रयत्न कंसाने केला नसता आणि कौरवांनीहि कृष्णाशी वैर पत्करले नसते, प्रभू रामचंद्राचे कैकेयीने वाईट चिंतले नसते. रावणाने रामाशी वैर पत्करले नसते आणि हनुमानाच्या शेपटीला आगहि लावली नसती. असे हे, कंस, कैकेयी, रावण, कौरव, वगैरे लोक, जे त्या त्या अवतारातील महात्म्य, त्यांमधील देवाचे स्वरूप ओळखू शकले नव्हते अशांना आपण दुष्ट, पापी असे म्हणतो. तिसऱ्या आणि चौथ्या चरणात समर्थहि तेच म्हणतात. जरी त्यांनी दुरात्मे, महानष्ट, चांडाळ, पापी अशी जहालातली जहाल विशेषणे अशा देवत्व ओळखू न शकणाऱ्यांसाठी  वापरली असली तरी आपण 'असे लोक पापाचे धनी असतात' एव्हढा अर्थ घेतला तरी पुरे आहे.

**जगी धन्य तो राममूखे निवाला ।**
**कथा ऐकता सर्व तल्लीन जाला ॥**
**देहेभावना रामबोधे उडाली ।**
**मनोवासना रामरूपी बुडाली ॥ १२७ ॥**

सरळ अर्थ:

जो रामनाम मुखाने उच्चारत राहिला आहे तो, तसेच जो रामकथा ऐकण्यात तल्लीन झाला आहे, ज्याची शारीरिक सुखांची भावना नष्ट झाली आहे आणि रामाच्या दर्शनाच्या इच्छेपुढे ज्याच्या इतर सर्व मनोवासना संपल्या आहेत असा माणूस या जगात धन्य होय.

विश्लेषण:

धन्य होणे किंवा असणे म्हणजे काय? आपण बऱ्याच वेळा हा शब्द वापरतो. (धन्यवाद हा शब्द तर वापरून वापरून पार झिजलेल्या नाण्यासारखा झाला आहे.) मग धन्य या शब्दाचा नक्की अर्थ काय ? कोणाला धन्य म्हणायचे आणि तो कशामुळे धन्य होतो? श्रीमंत, भाग्यवान, श्रेष्ठ, उत्तम, पवित्र, कृतज्ञ, कृतार्थ, समाधानी, संतुष्ट, तृप्त असे कितीतरी पर्याय शब्दकोशांत दिलेले आहेत. समर्थांना इथे अपेक्षित आहे तो अर्थ म्हणजे भाग्यवान असणारा. श्रीरामाचे नाव ज्याला स्वमुखाने घ्यायला मिळते आणि जो ते घेतो तो जीव भाग्यवान असतो. का? तर अशा नामोच्चाराने त्याला आंतरिक समाधान, शांतता मिळते. त्याच्या मनात काही तगमग असेल तर ती निवते. हे भाग्य त्याला मिळते, म्हणून तो धन्य होतो. याशिवाय धन्य असण्यासाठीची पात्रता आणखीहि काहीजणांना मिळते. कोण असतात असे भाग्यवान? ज्याना श्रीरामकथा ऐकायला मिळते आणि ती समजून ऐकताना जे देहभान विसरून तल्लीन होतात ते महाभाग धन्य ठरतात. देहभान म्हणजे समर्थांच्या भाषेत देहेभावना. रामाचे चरित्र श्रवण करत असताना जेव्हा श्रोता त्याचा तो राहिलेला नसतो, रामनाम घेण्यात किंवा ऐकण्यात तल्लीन झालेला असतो, तेव्हा त्याच्या आजूबाजूला काय चाललेलं आहे त्याची पर्वा, आपल्या देहाची, शारीरिक सुखदु:खाची भावना त्याला उरलेली नसते. एकच ध्यास लागून राहिलेला असतो - श्रीराम, श्रीराम. हा असतो रामबोध. आणि मग काय होते? मनाच्या डोळ्यांपुढे, अंत:चक्षूंपुढे श्रीरामाचे लोभसवाणे रूप त्याचा तोच उभे करतो. त्याला पाहतो आणि पाहतापाहता मनातल्या इच्छा, कामना, वासना साऱ्या काही त्या रामरुपाला बघण्यात विसरतो. ही अवस्था ज्याची होते तो धन्य ठरतो.

**मना वासना वासुदेवी वसो दे ।**
**मना वासना कामसंगी नसो दे ॥**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे ।**
**मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ॥ १२८ ॥**

सरळ अर्थ:

हे मना, तुझी वासना केवळ वासुदेवाच्या ठायी वसू दे, कामेच्छेत नको, भलत्या सलत्या कल्पना तुझ्यामध्ये निर्माण होऊ देऊ नको आणि सज्जनांच्या सहवासातच तू रममाण हो.

विश्लेषण;

मागील श्लोकात समर्थांनी धन्य पुरुषाच्या सर्व मनोवासना रामरुपात बुडून गेलेल्या, पर्यायाने, नष्ट झालेल्या असतात असे म्हटले असले तरी संपूर्ण कामना, वासना, नष्ट होणे शक्य नसते. तसे असणे नैसर्गिक प्रवृत्तीच्या विरुध्द असते हे तेहि जाणून आहेत. त्यामुळे स्वाभाविक परंतु योग्य असलेल्या इच्छा, मनोकामना या असाव्यात. पण त्यांना एक निश्चित दिशा दिलेली असावी असे ते या श्लोकात सांगत आहेत. धन्य झालेला जीव देखील मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा करणारा असू शकतो. मोक्ष या दिशेकडे त्याची कामना असते. सर्वसामान्य माणसाला हरीकृपेची कामना असावी. म्हणून समर्थ म्हणतात, हे मना तू आपल्यात केवळ वासुदेवाच्या, भगवंताच्या भक्तीची कामना वसू दे. विषयासक्तीची, दैहिक सुखाची, कामवासनेची इच्छा ठेवू नको. या वासनेसारख्या आणखीहि भलभलत्या इच्छा असू शकतात. त्यादेखील तू आपल्यामध्ये बाळगू नको. राग, द्वेष, मत्सर, यापोटी निर्माण होणाऱ्या इच्छा, कामना अशाच वावग्या म्हणजे न जोपासण्यासारख्या असतात. त्या तू आपल्या ठायी निर्माण होऊ देवू नको. आणि हे साध्य करण्यासाठी तू कुसंगती टाळ. सन्मार्गी, सज्जन व्यक्तीच्या सहवासात रहा. अशा सहवासात असताना मनात कुविचार येत नाहीत.

**गतीकारणे संगती सज्जनाची ।**
**मती पालटे सूमती दुर्जनाची ॥**
**रतीनायिकेचा पती नष्ट आहे ।**
**म्हणोनी मनातीत होवोनी राहे ॥ १२९ ॥**

सरळ अर्थ:

सद्गती प्राप्त होण्यासाठी संतसज्जनांची संगत आवश्यक असते. तिच्यामुळे दुर्जनांची दुष्टबुध्दीदेखील चांगल्या बुध्दीत बदलू शकते. रतीचा पती काम(देव) हा दुष्ट आहे म्हणून त्याला आपल्या मनाबाहेर ठेवले पाहिजे.

विश्लेषण:

सत्संगतीची महती समर्थ इथे पुन्हा सांगत आहेत. माणसाने सन्मार्गी लागावे यासाठी आणि त्याला त्याच्या इहलोकीच्या जीवनात तसेच नंतर परलोकीच्या जीवनातसुध्दा सद्गती लाभायची असेल तर त्याला इथे चांगली संगत ठेवायला हवी. संतसज्जनांच्या सहवासात राहिल्याने आपली मती, आपली बुध्दि विकारविरहित होते. त्यामुळे इथल्या जीवनात तर आपण सद्वर्तनी होतोच शिवाय परलोकीच्या जीवनातील सद्गतीसाठी पात्र बनतो. अगदी दुर्जन असला तरी तो खऱ्या संतसज्जनांच्या भेटीनंतर, त्यांचा उपदेश ग्रहण केल्यानंतर आणि त्याप्रमाणे वर्तन ठेवल्यानंतर सज्जन बनू शकतो. त्याची दुष्टबुध्दि बदलून सन्मतीत रुपांतरीत होते. वाटमारी करून हत्त्या करणारा वाल्या कोळी देखील नारद मुनींचा सहवास, त्यांचा उपदेश मिळाल्यावर सुबुध्द ऋषि वाल्मिकी बनून रामायण लिहू शकला. सत्संगती ठेवताना आपण आपल्यातील कुवासनांचाहि त्याग केला पाहिजे. कामवासना हे रतीचा पती मदन उर्फ कामदेव याचे अस्त्र. हे अस्त्र प्रजोत्पादनाच्या हेतूला पूरक आहे. परंतु याच्या अनिर्बंध वापरामुळे सद्गतीच्या मार्गात अडथळा येतो. कामदेव त्या काळातहि हा संयम वापरू शकला नव्हता. अहल्येच्या मनात इंद्राविषयी अभिलाषा निर्माण करून तिचे पावित्र्य भंग करवले. ब्रम्हर्षी होण्यासाठी

घोर तपस्या करत असलेल्या राजर्षी विश्वामित्राच्या मनात मेनकेच्या सौंदर्याची अभिलाषा निर्माण व्हावी म्हणून त्याने त्यांच्यावर हे अस्त्र सोडून तपोभंग करवला. या कृत्यांचा विचार करता कामदेव हा दुर्जन (नष्ट) ठरतो म्हणून त्याला आपल्या मनाचा कबजा घेऊ देता कामा नये. त्याला मनातीत केले पाहिजे म्हणजेच आपल्या मनातून काढून टाकले पाहिजे. सद्गती मिळण्यासाठी सज्जनांची संगत ठेवणे, त्यांचा उपदेश स्वीकारून त्या उपदेशाचे पालन करणे जितके आवश्यक आहे तितकेच आवश्यक कामवासना मनातून काढून टाकणेहि आहे.

**मना अल्प संकल्प तोही नसावा ।**
**सदा सत्यसंकल्प चित्ती वसावा ॥**
**जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा ।**
**रमाकांत एकांतकाळी भजावा ॥ १३० ॥**

सरळ अर्थ:

रसोड वृत्तीचे विचार सोडून द्यावेत, सद्विचारांना मनात थारा द्यावा. आणि दुर्विचारांचा त्याग करावा. त्यासाठी एकांतात रामरूपी रमाकांत विष्णूचे भजन चिंतन करावे.

विश्लेषण:

संकल्प म्हणजे एखादी गोष्ट करण्याचा मनोदय. अल्प संकल्प म्हणजे इंग्रजीत म्हणतात तसे low aim. दुसरा एक अर्थ असा होतो की धरसोड वृत्तीने केलेला संकल्प. एका वेळी म्हणायचे “मी असे करीन” आणि लगेच ठरवायचे, “नको, त्यापेक्षा मी तसे करीन”. एक ना धड, भाराभर चिंध्या असा प्रकार करायचा. हा असा संकल्प कुचकामाचा असतो. त्यातून काहीहि साध्य होत नाही. आपण काय करू शकतो याची पूर्ण खात्री करून घेऊन मग केलेला संकल्प सत्य संकल्प असतो आणि तो पुरा करणे शक्य असते. असा सत्य संकल्प आपल्या मनाच्या

गाभाऱ्यात – चित्तात ठामपणे रुजवून घ्यावा. चार लोकांत बाष्कळ बडबड (जल्प), अव्वाच्या सव्वा अफाट बोलणे, किंवा मिया मूठभर, दाढी हातभर अशा लंब्याचौड्या बढाया मारणे हे करू नये. आणि एकदा दृढ असा सत्य संकल्प केला तर मग तो ‘माझ्याच्याने पुरा होईल की नाही?’. अशा प्रकारचे नकारार्थी विचार (negative thinking) करून शंका कुशंका (विकल्प) काढत बसू नये. परमेश्वराच्या भक्तीचा संकल्प धरतानाही “मी एका तासात एक कोटी वेळा देवाचे नाव घेऊ शकेन अशी माझी भक्ती आहे” अशा प्रकारच्या वायफळ गप्पा चार लोकात मारू नये, तसेच “का हो? मी रामनाम घेत बसायचे म्हटले तर माझा फायदा होईल ना? तो नक्की मला पावेल ना? की तसे काही नसतेच?” अशा प्रकारचे विकल्प मनात आणू नये, कुशंका घेऊ नये. आणि हे असे सत्संकल्पापासून विचलित करणारे प्रश्न विचारत बसणे टाळण्यासाठी, वायफळ बडबड करणे टाळण्यासाठी लोकांच्या वर्दळीपासून दूर एकांतात बसून रमाकांत श्रीहरीचे म्हणजेच सीताकांत रामाचे भजन चिंतन करावे.

||श्रीराम||

# <u>दशक चौदावे</u>

**भजावा जनीं पाहता राम एकू ।**
**करी बाण एकू मुखी शब्द एकू ॥**
**क्रिया पाहता उद्धरे सर्व लोकू ।**
**धरा जानकीनायकाचा विवेकू ॥ १३१ ॥**

सरळ अर्थ:

या जगात ज्याचे भजन, अनुकरण करावे अशी एकच व्यक्ती आहे - श्रीराम. तो एकवचनी आहे, एकच बाण – रामबाण – धारणा कर्ता आहे. परंतु तो उध्दार सर्व लोकांचा करतो. अशा रामाचा विवेक अंगी बाणवून घ्या.

विश्लेषण:

श्रीसमर्थ या श्लोकात त्यांचे आराध्यदैवत असलेल्या श्री रामाचे विशेष गुण वर्णन करून सांगत आहेत. ते म्हणतात की या जगातल्या सगळ्या लोकांत पूजनीय असा कोण असेल तर तो एक रामच आहे. या रामाचा व्यक्तिविशेष ‘एक’ हा आहे. एकवचनी, एकपत्नी, एकनिष्ठ, एकाच बाणाने अचूक वेध घेणारा असा हा राम आहे. पित्याला एकदा एक वचन दिले की ‘त्याच्या शब्दाबाहेर न जाता, कारण न विचारता, त्याची इच्छा प्रमाण मानून तो वनवासात जाईल’, त्याप्रमाणे निघून गेला. त्या काळी बहुपत्नीत्वाची प्रथा असूनदेखील (प्रत्यक्ष पित्याच्याच तीन भार्या होत्या) त्याने एकपत्नीव्रत संभाळले. वनवासात असताना शूर्पणखा सौंदर्यवतीचे रूप घेऊन समोर आली आणि प्रेमयाचना करू लागली तरी श्रीरामाचे मन विचलित झाले नाही. आणि सीतेचा दीर्घकाळ वियोग झाला असतानाही त्याने आपले मन ढळू दिले नाही. सीतेशी तो सदैव एकनिष्ठ राहिला. केवळ एका बाणात वालीचा वध त्याने केला. आपण ‘रामबाण’ असा शब्द वापरतो त्यामागची भूमिका हीच आहे. औषध नक्की गुण देणारे असेल तर आपण त्याला

रामबाण इलाज असे म्हणतो. तर असा हा राम उध्दार मात्र सर्व लोकांचा करतो, लंकेचे राज्य जिंकले पण ते स्वत:साठी न ठेवता सद्वर्तनी विभीषणाच्या हवाली केले कारण विभीषणाच्या कुशल आणि कार्यक्षम राज्यकारभारामुळे लंकेची जनता सुखी होईल म्हणून. अयोध्येतील प्रजेला देखील त्याने सुखी, समाधानी ठेवले म्हणून तर त्याचे राज्य आदर्श ठरले. आजही आपण 'अच्छे दिन' येतील तेव्हा रामराज्य येईल असे म्हणतोच ना? तर अशा या श्रीरामाचे विचार, त्याचा विवेक, त्याची न्यायी वृत्ती आपण आदर्श, अनुकरणीय मानली पाहिजे.

**विचारूनि बोले विवंचूनि चाले ।**
**तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥**
**बरे शोधल्यावीण बोलो नको हो ।**
**जनीं चालणे शुद्ध नेमस्त राहो ॥ १३२ ॥**

सरळ अर्थ:
आधी विचार करून बोलावे, काळजीपूर्वक बोलावे. त्यामुळे, कोणी कितीही रागावलेले असले तरी त्यांचा राग शांत होईल. तसेच खरे काय आहे ते माहित करून घेण्याआधी बोलू नये, आणि लोकात वावरताना आपले आचरण शुध्द तसेच ठरवल्यानुसार असावे.

विश्लेषण:
११५व्या श्लोकानंतर समर्थ पुन्हा एकदा समाजात असताना आपले आचरण कसे असावे त्याविषयीचा उपदेश मनाला करत आहेत. आपले बोलणे, वागणे, एकंदर कसे असायला हवे? उचलली जीभ लावली टाळ्याला असे बोलता कामा नये. सारासार विचार करून, विवेक बाळगून आपले मत मांडावे, समोरच्याचाही विचार आपण केला असला पाहिजे. आपल्या बेफाट बोलण्यामुळे समोरचा दुखावला जाऊ नये ही काळजी घेऊन बोलावे. असे अवधान ठेवून बोलल्यामुळे ऐकणाऱ्याला राग

येत नाही. किंबहुना तो आधी रागावलेला असेल तर शांत होतो. आणखी काय पथ्य पाळायला हवे? संभाषणाचा विषय काय आहे त्याची पूर्ण माहिती करून घेतल्यावरच आपण त्याबद्दलचे आपले मत मांडायाला हवे. कोणी काही बोलला असेल तर केवळ त्याची भलामण करायची किंवा त्याला विरोधच करायचा या हेतूने बोलू नये. कोण जाणे, त्याचे प्रतिपादन बरोबरही असू शकेल. मग आपण आपल्या बोलण्यातून विरोधच का करायचा? म्हणून समर्थ म्हणतात की बरे (बरोबर) काय आहे हे शोधून, समजून मगच बोलत जा. हे झाले बोलण्याचे ! आचरणाचे काय? तर जनीं चालणे, म्हणजे समाजातले आपले आचरण शुध्द, दोष द्यायला वाव असणार नाही असे, नीटनेटके, नियमबध्द असावे.

**हरीभक्त वीरक्त विज्ञान राशी ।**
**जेणे मानसी स्थापिले निश्चयासी ॥**
**तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे ।**
**तया भाषणे नष्ट संदेह मोडे ॥ १३३ ॥**

सरळ अर्थ:

जो निश्चयपूर्वक वागतो, बोलतो, जो निरिच्छ होऊन हरीभक्तीत तल्लीन होऊन रहातो अशा भक्ताच्या दर्शनामुळे आणि त्याचा पदस्पर्श केल्याने पुण्यप्राप्ती होतेच, शिवाय त्याच्याशी संवाद केल्याने आपल्या मनातील शंकाकुशंकांचा नाश होतो.

विश्लेषण:

खरा हरीभक्त कसा असतो? आजकाल कितीतरी बुवा, महाराज, गुरुजी आपल्या नावामागे ह.भ.प. असे बिरूद जोडतात. हरी भक्ती परायण अमके बुवा, ह.भ.प. तमके महाराज असे. परायण असणे तर सोडाच, खरी हरीभक्ती म्हणजे काय हेदेखील त्यांच्यापैकी कित्येकाना माहीत असते की नाही कुणास ठाऊक. हरीचा

खरा भक्त अंगी वैराग्य बाणवून घेतलेला, निरिच्छ असतो, ज्ञानी असतो, भौतिक, आध्यात्मिक साऱ्याच गोष्टींचे ज्ञान त्याला प्राप्त झालेले असते. भजन, पूजन, चिंतन, मनन, सर्व प्रकारांनी हरीची भक्ती करायची या विचारावर तो ठाम असतो आणि निश्चयपूर्वक तसे आचरण करतो. हरीभक्तीत, हरीनामजपात तो तल्लीन होऊन रहातो, सांसारिक चिंतेला त्याच्या मनात जागा असत नाही इतका तो विरक्त असतो. अशा भक्ताचे दर्शन, त्याचा स्पर्श पुण्यदायी ठरतो. त्याच्याशी संभाषण झाले तर आपल्या मनातील संदेह, शंकाकुशंकांचे निरसन होते. त्याच्या संगतीत थोडा वेळ जरी घालवला, त्याच्याशी दोन वाक्ये जरी बोलले तरी मन शांत होते. आपल्या वृत्ती प्रसन्न होतात.

**नसे गर्व आंगी सदा वीतरागी ।**
**क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी ॥**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।**
**इही लक्षणी जाणिजे योगिराणा ॥ १३४ ॥**

सरळ अर्थ:
ज्याच्या अंगी गर्व नाही, जो सदैव निरिच्छ असतो, दया, क्षमा, शांति या त्रिसूत्री वर्तनात दक्ष असतो, ज्याच्या अंगी लोभ, क्रोध, नाही तरीही जो दीनवाणा नाही असा मनुष्य संत, सज्जन, योगीपुरुष असतो. ही त्याची लक्षणे असतात.

विश्लेषण:
१३३व्या श्लोकात हरिभक्ताचे वर्णन केल्यानंतर या श्लोकात समर्थ योगी पुरुषाची लक्षणे सांगत आहेत. योगी कुणाला म्हणायचे? असा संतसज्जन ज्याच्या अंगी गर्व नसतो. जो वीतरागी म्हणजे अनासक्त, निरिच्छ असतो तो योगी. आसक्ती नसल्यामुळे त्याचे मन स्थिर, शांत झालेले असते. तो काम, क्रोध, मद, मत्सर या भावनांपासून मुक्त असतो पण तरीही दीनवाणा, बापुडवाणा नसतो. त्याची वृत्ती

क्षमाशील, दयाळू असते. किंबहुना दया, क्षमा, शांति, अनासक्ती हे योग्याचे स्थायिभाव असतात. हीच योगी असण्याची लक्षणे आहेत. अगदी किरकोळ गोष्टींनी चिडचीड करणारी, रागीट, कुणालाही कधीही क्षमा करणे जिला माहीत नाही अशी, चंचल मनाची, गर्विष्ठ, अशांत व्यक्ती योगी असण्याची शक्यताच नसते.

**धरी रे मना संगती सज्जनाची ।**
**जेणे वृत्ति हे पालटे दुर्जनाची ॥**
**बळे भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे ।**
**महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥ १३५ ॥**

सरळ अर्थ:
हे मना, तू संतसज्जनांची संगत धर जिच्या प्रभावामुळे दुर्जनांची वृत्ती देखील बदलून चांगली होऊ शकते, त्यांची बुद्धी चांगल्या मार्गाकडे लागू शकते आणि मग महाभयंकर असलेल्या मृत्यूची देखील भीती उरत नाही.

विश्लेषण:
माणसाच्या जीवनावर संगतीचा फार मोठा प्रभाव असतो. संगती संगदोष: म्हणतात. सुसंगत वा कुसंगत या दोन प्रकारच्या, दोन टोकाच्या संगती आहेत. कोणती साथसांगत धरावी हे तारतम्य माणसाने ठेवले पाहिजे.

कुसंगतीमुळे आपले मनदेखील तसे होण्याचा संभव जास्त असतो. याउलट सुसंगत ही माणसाला सुधारण्याचे कार्य करते. वरच्या दोन श्लोकांत वर्णन केलेले खरे हरीभक्त आणि योगी हे सदबुध्दी बाळगणारे, सन्मार्गाला लागलेले संत सज्जन असतात. अशांची संगत ही सुसंगत असते. ती धरावी. कारण ती आपल्या हिताची ठरते. समर्थांच्या शब्दात, सज्जनांची संगत ही दुर्जनाची दुष्प्रवृत्ती बदलून चांगली करण्याचे कार्य करते. आणि वृत्ती अशी पालटल्यावर मनातील भाव आपोआपच

सद्भाव होतात, बुध्दी चांगली होते आणि सन्मार्गाला लागते. असा बदल झाल्यानंतर मग भवाचे भय मिटते. भविष्यात काय होणार आहे त्याची फिकीर वाटत नाही, आणि कुणालाही न टळणाऱ्या मृत्यूसारख्या क्रूर घटनेचीही भीती उरत नाही.

**भये व्यापिले सर्व ब्रह्मांड आहे ।**
**भयातीत ते संत आनंत पाहे ॥**
**जया पाहता द्‌वैत काही दिसेना ।**
**भयो मानसी सर्वथाही असेना ॥ १३६ ॥**

सरळ अर्थ:

हे ब्रम्हांड भीतीने भरलेले आहे. फक्त संत सज्जनच भीतीपासून मुक्त आहेत कारण ते मनोमन अनंताला, परमेश्वराला पाहू शकतात ज्याला पाहिल्याने आपल्यात आणि त्याच्यात काही अंतर आहे असे वाटतच नाही आणि त्यामुळे मनात कसलेही भय उरत नाही.

विश्लेषण:

भीति कुणाला नसते? जो जन्माला आला तो मनुष्य, प्राणी, पशु पक्षी, किडा, मुंगी, सर्वांना कसली ना कसली भीति ग्रासत असतेच. आणि भीति कशाची वाटते? कशाचीही - आजार, अपघात, चोरी, नुकसान, मरण, कशाची ना कशाची तरी भीति सर्वांनाच वाटत असते. म्हणूनच समर्थ म्हणतात की हे विश्व, हे ब्रम्हांड भीतीने व्यापलेले आहे. पण ज्यांना कुठलीही अशी भीति उरलेली नाही असे लोकही असतात. भलेही थोडे असोत, असतात हे खरे. कोण असतात हे महाभाग? साधु, संत हे ! त्यांच्या मनात कुठल्याच विकारांना स्थान नसते, मग तिथे भय हा विकार कोठून प्रवेश करणार? ते तर परमेश्वराच्या भक्तीत मग्न असतात. त्याना अंतर्चक्षूंपसमोर तो अनादि अनंत परमेश्वर दिसत असतो. आणि हा परमेश्वर त्यांच्यासाठी कसा असतो? ज्याच्याकडे बघताना मनात तू कोण? मी कोण?

कस्त्वम ?? कोऽहं? हा दुजाभाव, द्वैत उरत नाही असा ! तो माझ्यात आहे आणि मी त्याच्यात. 'मीही तो आहे', 'सोऽहं' ही त्यांची धारणा बनते. आणि मग अशी एकत्वाची भावना मनात भरली तर तिथे भय कसे असेल? शक्यच नाही.

**जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।**
**परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ॥**
**देहेबुद्धिचे कर्म खोटे टळेना ।**
**जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥ १३७ ॥**

सरळ अर्थ:
ज्ञानी व्यक्तींनी श्रेष्ठ काय, सत्कर्म काय ते कितीतरी वेळा स्पष्ट करून सांगितले तरीही अडाण्याला ते समजत नाही. आपल्या देहाचे स्तोम माजवून खोट्या सुखाच्या मागे लागणे तो थांबवत नाही. मीपणामुळे त्याला या ठेवीचे मोल कळत नाही.

विश्लेषण:
आपलेच म्हणणे खरे आहे ही अहंकाराची भावना ज्या माणसाची असते त्याला अडेलतट्टू किंवा mule headed (खेचराच्या मेंदूचा) असे म्हणतात. दुसऱ्यानी, विद्वज्जनानी सांगितलेले त्याला पटत नाही आणि तो आपले म्हणणे सोडत नाही. समर्थ अशा लोकांबद्दल म्हणत आहेत की या जगात श्रेष्ठ असे काय आहे? सत्कर्म कोणते? काय टाळावे? कसे आचरण करावे? या साऱ्या गोष्टी ज्ञानी, सज्जन साधुसंतांनी कितीतरी वेळा स्पष्ट करून सांगितल्या असल्या तरी अडाणी माणसे त्यांच्याकडे दुर्लक्षच करत आली आहेत. सदुपादेशाचे जसे काही त्याना वावडेच असते. हरीभक्ती, सद्धर्माचरण या गोष्टी करणे श्रेष्ठ म्हणून आवश्यक असताना केवळ विषयवासना बाळगणे, देहाचे चोचले पुरवत रहाणे यांनाच महत्व देऊन ही माणसे जगतात. देहबुद्धी, व्यक्तिपूजा, यात आनंद मानतात. 'मला

वाटते तेच बरोबर आहे’ असा ‘मी’पणा, अहंभावदेखील त्यांच्यात अज्ञानाबरोबर मुरलेला असतो. आजही आपण पहातो की बहुमताच्या जोरावर निवडून आलेला एखादा पक्षपुढारी, मंत्री समोर आला की त्याच्यापेक्षा वयाने मोठी माणसेसुद्धा त्याच्या पायांना स्पर्श करून वंदन करतात. सत्कर्माच्या बळावर पुढारी बनलेले फार थोडे. लांड्यालबाड्या करत वर आलेलेच असतात बरेचसे. मंत्रीपदावर वर्णी लागलेल्यांबद्दल तर बोलायलाच नको. केवळ सत्ताधारी पक्षातला आहे या एकाच पात्रतेवर मंत्री बनवले जाते. या लोकांच्या पाया का पडायचे? अरे, परमेश्वराच्या पाया पडा, त्याची भक्ती करा ! हरीभक्ती, सद्भाव, सत्कार्य, सद्धर्म हा आपला अनमोल ठेवा आहे हेच अशा अहंमन्य, अडाणी लोकांना कळत नाही.

हा श्लोक आणि पुढच्या चार श्लोकात समर्थ “जुने ठेवणे मीपणे आकळेना” हा चरण अंतिम चरण म्हणून सांगतात त्याचे कारण त्यांना या अज्ञानाकडे ठाम निर्देश करायचा आहे म्हणून.

**भ्रमे नाढळे वित्त ते गुप्त जाले ।**
**जिवा जन्मदारिद्र्य ठाकूनि आले ॥**
**देहेबुध्दीचा निश्चयो ज्या टळेना ।**
**जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥ १३८ ॥**

सरळ अर्थ:

भूल पडल्यामुळे आपल्याला मिळालेली खऱ्या धनाची ठेव दिसेनाशी झाली, हरवून गेली आणि त्यामुळे दारिद्र्य आले. आपल्या देहाचे स्तोम माजवून खोट्या सुखाच्या मागे लागणे जो थांबवत नाही त्याला त्याच्या मीपणामुळे या ठेवीचे मोल कळत नाही.

विश्लेषण:

मागील श्लोकात सांगितलेला ठेवा हे खरे धन आहे. पण इहलोकातील जीवांना देहबुध्दीची, ऐहिक सुखात रममाण होण्याची भूल पडलेली असल्यामुळे ते खरे धन दिसेनासे झाले आहे. हे जीव हरीभक्ती विसरले आहेत, सद्‌भावना, सत्कर्म, सद्‌धर्म विसरले आहेत. त्यामुळे एखादी धनाची पोटली जशी कुठेतरी ठेवली असल्यामुळे दिसत नाही आणि ती दिसत नसल्याने कालांतराने विस्मरणात जाते तसे या अनमोल ठेव्याचे झाले आहे. ते ठेव्याचे धन गहाळ झाल्यामुळे जगणारा जीव कर्मदरिद्री, जन्मदरिद्री असा उरला आहे. ऐहिक सुखांचा अतिरेक करण्याकडे प्रवृत्ती वाढल्यामुळे, त्यातच आपले हित आहे अशी समजूत करून घेतल्यामुळे हे झाले आहे. 'मी, माझे, मला' यापलीकडे परमार्थ नावाची काही गोष्ट आहे आणि ती करायची असते हे विसरल्यामुळे झाले आहे. ही अशी हानिकारक देहबुध्दी टाळावी. अर्थात जीवनाला आवश्यक असेल तितकीच ती असावी, तिचा अनावश्यक अतिरेक टाळावा हे जोपर्यंत त्याला कळत नाही तोपर्यंत जुना ठेवा, त्यातून मिळणारी शांति यांचं मोल त्याला कळणार नाही.

**पुढे पाहता सर्वही कोंदलेसे ।**
**अभाग्यास हे दृश्य पाषाण भासे ॥**
**अभावे कदा पुण्य गाठी पडेना ।**
**जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥ १३९ ॥**

सरळ अर्थ:

आसमंतात सर्वत्र परमेश्वराचे अस्तित्व भरून राहिलेले आहे. पण करंट्या माणसाला तो दिसत नाही. त्यामुळे तो स्वत: अश्रध्दच रहातो आणि पुण्य मिळण्यापासून वंचित होतो. सन्मार्गाच्या उपदेशाचा जो ठेवा आहे त्याचे महत्व त्याला कळत नाही.

विश्लेषण:

जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, आसमंतात सर्वत्र परमेश्वराचे अस्तित्व आहे. अगदी कोंदून भरलेले आहे. पण ते अभागी जनसामान्यांना ओळखता येत नाही. साधु संत ओळखतात. त्यांना ते अस्तित्व जाणवते. हिरण्यकश्यपूला समोरचा खांब केवळ दगड म्हणूनच दिसला. त्यात असलेले नृसिंह अवतारातले भगवान विष्णु दिसले नाहीत. प्रल्हादाला ते दिसले. तसेच आपले होते. आसमंतात परमेश्वराऐवजी आपण दगडच पाहतो. देवळातल्या मूर्तीचा दगड दिसतो पण तिच्यातही देवत्व आहे हे आपण ओळखत नाही. मन निर्मळ करून, मीपणाचा, अहंकाराचा त्याग करून भावभक्तीने लीन व्हा म्हणजे त्या मूर्तीच्या पाषाणातला देव तुम्हाला जाणवेल. बघणाऱ्याची दृष्टी जशी असते तसेच त्याला दिसते. शंकेखोराला, नास्तिकाला देव जाणवणार नाही, पण भक्ताला नक्की जाणवतो कारण त्याच्या ह्रदयात  परमेश्वराच्या भक्तीचा भाव असतो ज्याची भूक देवाला असते. देव भावाचा भुकेला ! देवाचे पोट छप्पन प्रकारचे भोग चढवल्याने भरत नाही. द्रौपदीच्या थाळीला चिकटलेले भाजीचे एक पान खाऊन ते भरते. आणि तो प्रसन्न होऊन भक्ताच्या पदरात पुण्य टाकतो. भक्तीभाव नसेल तर पुण्य मिळण्याची अपेक्षा करता येत नाही कारण हरीभक्तीचा ठेवा महत्वाचा आहे हेच कळलेले नसते.

**जयाचे तया चूकले प्राप्त नाही ।**
**गुणे गोविले जाहले दुःख देही ॥**
**गुणावेगळी वृत्ति तेही वळेना ।**
**जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥ १४० ॥**

सरळ अर्थ:

जे चुकले ते चुकलेच, पुन्हा मिळणे नाही. त्रिगुणांच्या प्रभावामुळे या जन्मी दु:ख भोगावे लागते. तरीही  या प्रभावाखालून सुटका करून घेण्याची धडपड करावी हे

कळत नाही त्यामुळे आपली अशी असलेली ज्ञानाची ठेव काय आहे तेही कळत नाही.

विश्लेषण:

भक्तीभाव नसण्यामुळे पुण्य कदापि मिळत नाही असे प्रतिपादन समर्थांनी मागच्या श्लोकात केले आहे. त्यापुढे या श्लोकात ते पुन्हा म्हणतात की जे मिळत नाही ते नाहीच. चुकते ते चुकतेच. सत्व, रज, तम या त्रिगुणांच्या असण्यामुळे या जन्मात देहाला पुण्याच्या अभावी दु:खे भोगावी लागतात. का? ते श्रीमद्भगवद्गीतेही सांगितलेले आहे.

प्रकृतीतल्या सत्व-रजो-तम या त्रिगुणांच्या संगाने
देहामधल्या जीवांवरती, पार्था, पडती नियंत्रणे अध्याय १४ - श्लोक ५

अशी नियंत्रणे मनुष्याला काय करायला भाग पाडतात हेदेखील पुढे सांगितले आहे:

सत्व सुखाने, रज कर्माने, तसेच तम अज्ञानातुन
प्रमाद करण्या भाग पाडिती जीवाला, कुंतिनंदन अध्याय १४ - श्लोक ९

हे त्रिगुण देहातल्या जीवाला चुकायला – प्रमाद करायला - भाग पाडतात. आणि मग समर्थ म्हणतात त्याप्रमाणे अशा प्रमादातून जीवाला दु:खे भोगावी लागतात.

पण तरीही त्रिगुणांच्या प्रभावाचे हे जोखड झुगारून द्यावे अशी वृत्ती मीपणामुळे धारण केली जात नाही. माणसामध्ये सत्व, रज, तम हे तीनही गुण असतात. त्यातही सत्वापेक्षा रजोगुण आणि तमोगुण जास्त प्रमाणात असतात. हे रज आणि तम गुण कुठून येतात आणि काय करतात?:

प्रीतीमधुनी रजोगुणाची उत्पत्ति असे, धनंजया,
आकांक्षा अन् आसक्तीने बांधि जिवा तो, कौंतेया   अध्याय१४ -श्लोक ७

अज्ञानातुन तम जन्मे जो पाडि जिवाला मोहात
तसेच आळस, निद्रा, आणिक प्रमाद यांच्या बंधात   अध्याय१४ -श्लोक ८

हे आकांक्षा, आसक्ती, मोह, आळस, हे दु:खदायी परिणाम टाळायचे असतील तर समर्थ म्हणतात त्याप्रमाणे 'गुणावेगळी वृत्ती' धारण करायला हवी. त्रिगुणाच्या पलीकडे पहायला हवे. तरच:

त्रिगुणांच्या पलिकडे पाहि जो असा देहधारी भक्त
जरा, दु:ख अन् जननमरण या चक्रातुन होई मुक्त अध्याय १४-श्लोक २०

मुक्ती मिळवणे हेच तर अंतिम ध्येय असायला हवे. मुक्ती हा हरवलेला ठेवा आहे आणि तो मिळवायचा आहे हे कळले पाहिजे. ते कळत नाही हे दुर्दैव.

||श्रीराम||

## दशक पंधरावे

**म्हणे दास सायास त्याचे करावे।**
**जनीं जाणता पाय त्याचे धरावे॥**
**गुरू अंजनेवीण तें आकळेना।**
**जुने ठेवणे मीपणे ते कळेना॥१४१॥**

सरळ अर्थ:

जो जाणता आहे, ज्ञानी आहे अशा अधिकारी व्यक्तीकडून ज्ञान मिळवावे. त्यासाठी पडतील ते कष्ट करावे, अहंकार सोडून त्याचे पाय धरावेत. कारण गुरूने उपदेशाचे अंजन डोळ्यात घातल्याखेरीज ते ज्ञान, तो आपला पूर्वीचा ठेवा प्राप्त होणार नाही.

विश्लेषण:

गुरूचे महत्व वादातीत आहे. गुरूचा अनुग्रह मिळाल्याखेरीज, त्याचा उपदेश मिळाल्याखेरीज कोणतीही विद्या, ज्ञान प्राप्त होत नाही. “मला कोणा गुरूची गरज नाही, माझा मीच ग्रंथ वाचेन आणि ज्ञान मिळवीन” हे ‘मी’पणाचे बोलणेही किती फोल आहे बघा, गुरु म्हणून कोणी माणूस नसला तरी इथे ग्रंथ हेच तुमचे गुरु बनतात जे तुम्हाला ज्ञान देतात. ग्रंथ वाचण्यासाठी तुम्हाला प्रयत्न, सायास करावे लागतात. डोळ्यासमोर धरण्यासाठी तुम्ही दोन्ही हातानी पुस्तक उघडून धरता तेव्हा तुमच्या हातांची जुळणी अशी असते जसे काही तुम्ही काहीतरी मागता आहात आणि ते तुम्हाला देत आहे. पुस्तक मिटवता तेव्हा तेच दोन हात जोडले जातात तेव्हा ती कृती म्हणजे तुम्ही नकळत त्याला वंदन करत असता. मानवी गुरूच्या बाबतीत जे करायचे ते तुम्ही पुस्तकाबरोबरही करता. म्हणजे पुस्तक तुमचा गुरु होऊनच तुम्हाला ज्ञान देते. होय ना? म्हणून समर्थ म्हणतात त्याप्रमाणे गुरूचे, जो जाणता, ज्ञानी, विद्वान आहे, त्याचे पाय धरावे आणि पडतील ते कष्ट झेलून, सायास करून, त्याच्याकडून आधिभौतिक, आधिदैविक,

आध्यात्मिक, वैयक्तिक, सामाजिक सर्व प्रकारचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे. अश्या ज्ञानाचे अंजन आपल्या डोळ्यात पडले नाही तर आत्मज्ञान होणार नाही. पूर्वापारपासून अस्तित्वात असलेला पण आपल्या मीपणाच्या हट्टाग्रहामुळे कळेनासा झालेला हा ठेवा काय आहे ते आपल्याला समजणार नाही.
श्लोक क्रमांक १३७ पासून समर्थ पुन्हापुन्हा वापरीत असलेला श्लोकाचा चौथा चरण - जुने ठेवणे मीपणे ते कळेना – या १४१व्या श्लोकात समाप्त होतो.

**कळेना कळेना कळेना ढळेना।**
**ढळे नाढळे संशयोही ढळेना॥**
**गळेना गळेना अहंता गळेना।**
**बळें आकळेना मिळेना मिळेना॥१४२॥**

सरळ अर्थ:
(१३७ ते १४१ या श्लोकात दाखवून दिलेले जुने ठेवणे काय आहे हे ) अजिबात कळत नाही. मनाला ग्रस्त करणाऱ्या शंकांचे निरसन होत नाही. खोलवर रुजलेला अहंकार गळून पडत नाही त्यामुळे मारून मुटकून प्रयत्न केले तरी आत्मज्ञान मिळत नाही.

विश्लेषण:
योग्यता असलेल्या गुरूचा उपदेश मिळू शकत नसेल तर आत्मज्ञानाच्या शोधाचे काय होईल? तो योग्य मार्गाने चालू राहील का? धेय्यपूर्तीकडे घेऊन जाईल का? याचे उत्तर समर्थ देत आहेत. आणि ते उत्तर नकारार्थी आहे. अगदी ठामपणे समर्थ म्हणत आहेत, “नाही !” ‘जुने ठेवणे’ असलेल्या आत्मज्ञानातील एक कणही कळणार नाही. ठामपणा व्यक्त करण्यासाठी ते त्रिवार उच्चार करत आहेत की ‘कळणार नाही.’ जे काही तुम्हाला समजल्यासारखे वाटत असेल त्याच्याबद्दलही तुमच्या मनात शंका, संशय येत राहील ‘खरंच असं असेल का? की नसेल? देव,

श्रीहरी खरेच आहे का? आणि तो आपला उध्दार खरंच करू शकेल का? की तसं काही नसतंच?' या शंकाकुशंका मनात येत राहतील. आणि मग देवाच्या अस्तित्वावरचा विश्वासच डळमळीत झाल्यावर मनात काय उरेल? अहंकार ! हा अहंकार कधी गळून जाऊ शकणार नाही. त्यासाठी योग्य मार्ग अवलंबावा लागेल आणि तो मार्ग खरा, जाणता गुरूच दाखवू शकतो. गुरूचे मार्गदर्शन नसेल तर 'हटातटाने पटा रंगवून आणि शिरी जटा धारण करून', किंवा अर्थ न समजता घोकंपट्टीने पाठ केल्याने खरे ज्ञान मिळवलेले नसते. बळजोरीने काही साध्य होत नाही. कशाचेही आकलन होत नाही.

**अविद्यागुणे मानवा ऊमजेना।**
**भ्रमे चूकले हीत ते आकळेना॥**
**परीक्षेविणे बांधले द्दढ नाणें।**
**परी सत्य मिथ्या असें कोण जाणें॥१४३॥**

सरळ अर्थ:

अज्ञानामुळे माणसाला काही समजत नाही आणि गैरसमजापोटी काय चुकते आहे तेही आकलन होत नाही. न पारखता एखादे नाणे जवळ बाळगतो पण ते खरे आहे की खोटे याचा त्याला पत्ता नसतो.

विश्लेषण:

शहाण्याला शब्दाचा मार असे म्हणतात. अडाण्यावर त्याचाही प्रयोग उपयोगाचा ठरत नाही. कारण त्याला काही कळतच नाही. त्यातून तो अडेलतट्टू असेल तर बघायलाच नको. आपला चुकीचा असलेला समजच बरोबर आहे अशा भ्रमातच तो असतो. त्यामुळे कोणी सांगत असलेले चार हिताचे शब्द ऐकावेत म्हणजे त्याने आपले भले होईल याचे आकलन त्याला होणे दुरापास्त ठरते. इथे मी अडाणी हा शब्द वापरला आहे म्हणजे निरक्षर, अशिक्षित लोकांकडे माझा निर्देश आहे असे समजू नये. कितीतरी अशिक्षित लोक आज सदुपदेश शिरोधार्य

मानल्यामुळे यशस्वी होऊन उच्चपदाला पोचलेलेही दिसतात. समर्थ ज्याचा 'अविद्यागुण असलेला मानव' असा उल्लेख करतात तो माणूस शिक्षित असूनही अध्यात्मात अनभिज्ञ असेल, ऐहिक भोगांबद्दलच जागरूक असेल तर अडाणी ही संज्ञा त्याला लागू पडते. अशा अडाणी माणसाचे वर्तन कसे असते? एखाद्याने त्याच्याकडे असलेले नाणे खरे आहे की खोटे आहे समजून घ्यायचा प्रयत्न न करता ते खरेच आहे असा समज करून घेऊन ते मुठीत घट्ट धरून ठेवण्यासारखे. दासबोधातही समर्थ म्हणतात, "खोटें सांडून खरें घ्यावें |तरीच परीक्षवंत म्हणावें |असार सांडून सार घ्यावें |परब्रह्म तें ||". पण विषयोपभोग घेणे हेच आपल्या आयुष्याचे अंतिम ध्येय आहे अशा धारणेपोटी 'संसार असार आहे तेव्हा चित्तशुद्धी करून परमार्थ साधला पाहिजे तेव्हाच परब्रम्हाचे आकलन होईल' हे सत्य समजून न घेणारा माणूस अडाणीच !

**जगी पाहतां साच ते काय आहे।**
**अती आदरे सत्य शोधुन पाहे॥**
**पुढे पाहतां पाहतां देव जोडे।**
**भ्रम भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे॥१४४॥**

सरळ अर्थ:

जगात आहेत त्या गोष्टींमध्ये खऱ्या कोणत्या, सत्य काय आहे याचा शोध आस्थापूर्वक, आदरपूर्वक करावा. तो करता करता पुढे देव भेटेल आणि मग गैरसमज, भूल, अज्ञान या साऱ्या गोष्टींचे निराकरण होईल.

विश्लेषण:

आपल्याला डोळे मिळाले आहेत. त्यांच्या मदतीने आपण आजूबाजूला असलेल्या गोष्टी पाहतो. कान मिळालेले आहेत, त्यांनी ऐकतो. कधी असं होतं की एखाद्या गोष्टीबद्दल आपण ऐकून असतो त्यापेक्षा ती प्रत्यक्ष बघितल्यानंतर वेगळीच निघते. आणि कधी असंही होतं की एखादी गोष्ट आपण नजरेने बघतो आणि

तिच्याविषयी आपला ग्रह बनवतो. पण तिच्यातले गुण कोणी जाणकार वर्णन करून सांगतो तेव्हा तिचा आधी न दिसलेला पैलू आपल्या लक्षात येतो. आणि मग आपल्याला जाणवतं की वरकरणी जे दिसतं ते खरं असेलच असं नाही. आपण झोपेत असताना स्वप्न बघतो. स्वप्नात अनेक गोष्टी, घटना दिसतात. त्यांचा कार्यकारण भाव काय त्याचा विचार करण्याची आपल्यात त्यावेळी क्षमता नसते. जे दिसलं ते खरंच आहे अशी आपली समजूत असते. पण जेव्हा जागे होतो तेव्हा कळतं, अरे, त्या गोष्टी, त्या घटना दिसल्या तशा असणं शक्यच नाही. आपण बघितलं ते सारं फसवं होतं. हे जसं भौतिक गोष्टींना लागू होतं तसंच वैचारिक गोष्टीनादेखील लागू असतं. ज्ञानी लोक म्हणतात, “संसार असार आहे, जग मिथ्या आहे.” आपण त्यावर विचार न करता पोपटपंचीप्रमाणे तेच घोकत जातो. अरे पण हे जर मिथ्या, म्हणजे खोटं, असत्य आहे, तर खरं काय? सत्य काय आहे? याचा विचार करायला हवा ना? त्या सत्याचा शोध घ्यायला हवा. तो शोध घेताना ‘बघू या तरी हे सत्य म्हणजे काय आहे ते? ते सत्यच आहे का?’ अशी शंकेची, संशयाची भावना ठेऊन शोध घ्यायचा नाही, तर समर्थ सांगतात त्याप्रमाणे अती आदरे हा शोध करायला हवा. असा आदरपूर्वक शोध करता करता आपल्याला आत्मज्ञानरूपी परमात्मा प्राप्त होतो. अनेक संतांना झाले तसे, बोधीसत्व गौतमाला मिळाले तसे ज्ञान मिळते. नाशवंत देह खोटा आणि अंतरात्मा खरा हे समजते. ‘सोऽहं, अहम ब्रम्हास्मि’ हे आत्मज्ञान मिळते. म्हणजेच आपल्याला तो आपल्यातच असलेला देव भेटतो. आणि असे आत्मज्ञान झाल्यावर आपल्यामध्ये असलेले चुकीच्या समजुतींचे भ्रम, पडलेली भूल, (भ्रांति), अज्ञान हे सारे आपोआपच दूर होते हे ओघाने आलेच.

**सदा वीषयो चिंतितां जीव जाला।**
**अहंभाव अज्ञान जन्मास आला॥**
**विवेके सदा सस्वरुपी भरावे।**
**जिवा ऊगमी जन्म नाही स्वभावें॥१४५॥**

सरळ अर्थ:

सदैव विषयोपभोगाचाच विचार करत राहिल्याने माणसाच्या मनामध्ये अहंकार, अज्ञान यांचा प्रवेश होतो. ते टाळण्यासाठी अंगी विवेक बाणवून आत्मज्ञान मिळवावे कारण जन्माच्या वेळची निर्विकार बुद्धी सहजासहजी परत मिळत नसते.

विश्लेषण:

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याचे मन शुध्द, विकारविरहित असते. पण जसजसा तो मोठा होत जातो तसतसे सारे विकार त्या मनात जागे होऊ लागतात. खायला पाहिजे, प्यायला पाहिजे, पांघरायला पाहिजे या जाणीवा होत रहातात. आणि अशातूनच या जगात उपलब्ध असलेल्या नाना विषयांचा उपभोग घेण्याची प्रवृत्ती बळावत जाते. किंबहुना चांगले काय, वाईट काय याचे ज्ञान व्हायच्या आधीच मला हे हवे, मला ते हवे अशी विषयांची चिंता मनाला व्यापत जाते. या अशा अज्ञानापोटी ‘मला, मी, माझे’ या जाणीवा प्रकर्षाने होतात आणि अशातून अहंकार जन्माला येतो. जन्मभरात या अहंकाराचा संपूर्ण बीमोड करणे शक्य नसते कारण ‘मी’ हे अस्तित्व मृत्यू होईपर्यंत रहातेच. पण जास्तीत जास्त जितका शक्य होईल तितका अहंकार, अज्ञान यांचा बीमोड करायचा असेल तर मनात सार काय, असार काय, योग्य काय, अयोग्य काय याचा विवेक बाणवून घेतला पाहिजे. इथे समर्थ ‘सस्वरूप’ असा शब्दप्रयोग करतात. सस्वरूप म्हणजे आपलं रूप, आपला स्वभाव. आपल्या स्वभावात हा विवेक भरून राहिला पाहिजे तर हे विकार जाऊन आपलं चित्त उगमाच्या वेळी जसं शुध्द असतं तसं होईल. अन्यथा ते तसं शुध्द होणं हे सहजासहजी साध्य होणारं, स्वाभाविक असं नसतं.

**दिसे लोचनी ते नसे कल्पकोडी।**
**अकस्मात आकारले काळ मोडी॥**
**पुढे सर्व जाईल कांही न राहे।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे॥१४६॥**

सरळ अर्थ:

समोर दिसते ते कायम टिकणारे नसते. सारे काळाच्या ओघात अचानक नाहीसे होईल. काहीच राहणार नाही. तेव्हा चांगल्या, शुध्द मनाने त्या अनंताचा शोध करत राहावे.

विश्लेषण:

आपण एखादी वस्तू खरेदी करतो तेव्हा चौकशी करतो, “हिची गॅरंटी किती आहे? एक वर्षाची? दोन? दहा?” दहा वर्षं झाली, वस्तू तिथवर टिकली. पुढं काय? लाकडाची आहे? तुटून, सडून जाईल, लोखंडाची आहे? गंजून जाईल. अगदी सिमेंट कॉंक्रीटचं घर बांधलंय, किती टिकेल? कायमचं? नाही ! कारण जी जी गोष्ट या नश्वर जगात दिसते आहे ती ती कल्पांतापर्यंत टिकणारी नसते. मग कोटी कल्पांची भाषाच कशाला? कुणीही तितकी हमी देऊ शकणार नाही. कदाचित अकस्मात काही तरी दुर्घटना होईल आणि आकारात दिसते ती वस्तू, घर, अगदी स्वत: मनुष्यप्राणीदेखील अस्तित्व गमावून बसेल. काळाच्या पोटात गडप होईल. वादळ, वणवा, महापूर, रोगराई, धरणीकंप, संहाराचे हे सारे दूत असताना बघता बघता नायनाट व्हायला वेळ लागत नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे. आज आहे ते उद्या असणार नाही. मग कायमचे असे काय आहे? संतत असेल असे, अंत नसलेले - अनंत असे काय आहे? ते आहे परब्रम्ह. त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. तेव्हा समर्थ म्हणतात, हे मना, तू आत्मज्ञानाच्या योगाने चिरंतन असलेल्या परब्रम्हाचा शोध घे.

या श्लोकापासून पुढच्या चार श्लोकात समर्थ ‘मना संत आनंत शोधूनि पाहे’ या चौथ्या चरणाची, मनावर ठसावे म्हणून पुनरुक्ती करत आहेत.

**फुटेना तुटेना चळेना ढळेना।**
**सदा संचले मीपणे ते कळेना॥**
**तया एकरूपासि दूजे न साहे।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें॥१४७॥**

सरळ अर्थ:

जे तुटत फुटत नाही, आपल्या स्थानावरून ढळत नाही, कधी नाश पावत नाही, चिरंतन असे आहे पण अहंकारामुळे माणूस पाहू शकत नाही, जे एकमेवाद्वितीय आहे त्या अनंताचा शुध्द मनाने शोध करत राहावे.

विश्लेषण:

वरच्या, १४६व्या श्लोकात समर्थ म्हणतात की जे काही आहे ते सर्व नाशवंत आहे, कायमसाठी टिकणारे नाही. पण अशी एक गोष्ट आहे जी अविनाशी आहे, तिचे अस्तित्व खंडित होऊ शकत नाही. ती म्हणजे परब्रम्ह, परमात्मा. तो तर सर्वत्र आणि सर्वकाळ आपले अस्तित्व राखून आहे. आपण मूर्तींची पूजाअर्चा करतो, त्या मूर्ती नाशवंत असतात, तुटतात, फुटतात. पण त्याचा असा अर्थ नव्हे की आपण त्यांच्या ठायी कल्पिलेले देवत्व तुटते, नाश पावते. ते तर जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, आसमंतात सर्वत्र आणि सदैव संचित होऊन राहिलेले असते. आपण जन्माला येतो, जगतो आणि मरून जातो. मागे राहिलेले लोक अल्प काळ आपली आठवण ठेवतात आणि मग विसरून जातात. पण देव, परमात्मा ही अमूर्त कल्पना जगाच्या आरंभापासून आजपर्यंत टिकून आहे, कायमस्वरूपी 'संचलेली' आहे. पुढेही रहाणार आहे. कसा आहे परमात्मा? कसे आहे परब्रम्ह? हे आपल्याला कळत नाही. कारण आपण आपल्या देहापलीकडे कशाचा विचारच करत नाही. आपण आपल्यातच, 'मी' या कल्पनेतच गुंतून पडलेले आहोत. पण आपल्या मुक्तीसाठी आपण त्या चिरंतन, सार्वकालिक असलेल्या, त्याच्यासारखे तेच असे असलेल्या परब्रम्हाचे ज्ञान मिळवण्यासाठी शोध चालू ठवला पाहिजे. मीपणा,

अहंकार, अज्ञान याना सोडून देऊन त्या अनादि, अनंत अशा तत्वाचा, शोध घेत राहिले पाहिजे.

**निराकार आधार ब्रम्हादिकांचा।**
**जया सांगतां शीणली वेदवाचा॥**
**विवेके तदाकार होऊनि राहें।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे॥१४८॥**

सरळ अर्थ:
ब्रम्हा आणि इतरांचा आधार असलेला परमात्मा स्वत: निराकार आहे. त्याची महती पूर्णपणे सांगण्यात वेददेखील असमर्थ ठरले आहेत. तेव्हा हे मना, विवेक पाळून तू त्याच्यासारखे निराकार होऊन रहा आणि त्या अनंताचा शोध घे.

विश्लेषण:
ब्रम्हा, विष्णु, महेश हे त्रिदेव, तसेच इतर सारे ग्रह, नक्षत्रे किंबहुना सारे विश्व देहधारी, साकार आहे परंतु या सर्वांच्या मूळ स्थानी असलेला असलेला आत्मा, परमात्मा ज्याला परब्रम्हही म्हणतात तो कसा आहे? कसा दिसतो? काय खातो? कुठे राहातो? कोणालाही माहित नाही. आपला देह आपण बघतो पण आपल्याला आपला आत्मा दिसत नाही. आपला देह मरतो म्हणजे काय होतं? त्याच्यातून आत्मा निघून जातो. हा आपला आत्माही आपण पाहू शकत नाही मग त्या परम आत्म्याला, परब्रम्हाला कुठून पहाणार? तेही आकाररहित आहे. पण तरीही आहे ! निस्सीम, निर्गुण, निराकार, अखंड, त्याच्यासारखे तेच असे एकमेवाद्वितीय आहे. अपौरुषेय असलेल्या वेदांनी, पुराणानी त्याचं पूर्ण वर्णन सांगायचा किती प्रयत्न केला तरी त्यांना ते शक्य झालेले नाही. 'नेति नेति' असंच म्हणत रहायला लागलं. दासबोधात समर्थ म्हणतात, "न कळे, न कळे, नेति नेति | ऐसे बोलतसे श्रुती | तेथे मज मूर्खाची मती | पवाडेल कोठे?" वेद पुराणाना जे शक्य झाले नाही ते माझी अल्पमती काय सांगणार? त्याच्या असण्यावर विश्वास ठेवायचा हेच

खरे. त्रिदेवांसह समस्त विश्वाच्या कृती त्या परब्रम्हाकडून, परमात्म्याकडूनच घडवल्या जातात. महादेवाला त्याची पत्नी नजरेसमोर आगीत भस्म होत असताना बघायला लागली, विष्णूला त्याची पत्नी हरवून वनवास भोगावा लागला, ब्रम्हदेवाला त्याचं पाचवं शीर गमावून बसायला लागलं. शिवाय कुणी त्याची पूजा करणार नाही हा शाप भोगावा लागला. हे या सगळ्यांचे ललाटलेख लिहिणारा तो निराकार परमात्माच आहे. अशा निराकार, अनादि, अनंत, सनातन आणि चिरंतन तत्वाला जाणून घ्यायचं असेल तर हे मना, तुला तद्रूप होऊन, तदाकार होऊन राहावं लागेल. आणि तसं होण्यासाठी त्याचा शोध घ्यावा लागेल. तुझ्यामध्ये विवेक, सद्विचार बाणवून घेऊन आत्मज्ञान मिळवूनच तो शोध तुला करता येईल.

**जगी पाहतां चर्मलक्षी न लक्षे।**
**जगी पाहता ज्ञानचक्षी न रक्षे॥**
**जगी पाहता पाहणे जात आहे।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे॥१४९॥**

सरळ अर्थ:

बाह्यांगातील चक्षूंनी (बघणे, ऐकणे, वास घेणे, चव घेणे, स्पर्श करणे) तो परमात्मा दिसू शकत नाही. तसेच अंतर्चक्षूंनी (मन, बुद्धी) देखील त्याचे दर्शन होत नाही. पहायला जाऊ तर पाहता पाहता नजर थकते पण तो दिसत नाही. त्यासाठी संतांचा आधार घेऊन त्या कायमस्वरूपी अनंताचा शुध्द मनाने शोध करत राहावे

विश्लेषण:

आपल्याला मिळालेले चर्मचक्षु म्हणजे फक्त डोळेच नव्हेत तर डोळे, कान, नाक, जिव्हा आणि त्वचा ज्यांच्या योगाने आपण अनुक्रमे बघतो, ऐकतो, वास घेतो, चव घेतो आणि स्पर्श करतो ती इंद्रिये. अशा इंद्रियांच्या सहयोगाने आपण दृश्य

वस्तू जाणू शकतो. पण जे अदृश्य, निराकार आहे त्याचे काय? या चर्मचक्षूंनी आपल्याला त्याचे ज्ञान मिळू शकत नाही, दर्शन होऊ शकत नाही. मग उरले ते ज्ञानचक्षु – मन, बुध्दी. हे चर्मचक्षुपेक्षा थोडे वरच्या वर्गातले. ते विचार करू शकतात, स्वप्न पाहू शकतात, कल्पना करू शकतात. पण त्यांनादेखील निराकार परब्रम्हाचे पुरे ज्ञान मिळत नाही, शंका, संशय, अविश्वास, अहंता या अडथळ्यांमुळे मिळालेल्या तुटपुंज्या ज्ञानाची क्षमता पूर्ण ब्रम्ह जाणण्याची राहिलेली नसते. “आज मी त्याला बघणारच” अशा अहंकारी अट्टाहासाने मूढ माणूस ठाण मांडून डोळे रोखून बसला तर काय होईल? पाहता पाहता नजर थकेल, डोळे मिटतील, आयुष्य सरेल, बघण्याची क्षमता संपून मृत्यू येईल पण तरीही निराकार ब्रम्हाचा आकार काही दिसणार नाही. मग काय करायचं? संत सज्जन अशा अधिकारी व्यक्तींचे आत्मज्ञान प्राप्तीसाठीचे मार्गदर्शन घ्यायचे आणि त्याद्वारे शुध्द मनाने त्या अनंत, चिरंतन परब्रम्हाचा शोध घ्यायचा.

**नसे पीत ना श्वेत ना श्याम काही।**
**नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं॥**
**म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे॥१५०॥**

सरळ अर्थ:

तो मुक्तिदाता परमात्मा ना पिवळ्या रंगाचा आहे ना काळ्या किंवा पांढऱ्या रंगाचा. तसेच तो निळाही नाही. किंबहुना तो प्राप्त होण्यासारखा नाही नी अप्राप्यदेखील नाही. फक्त त्याच्यावर विश्वास ठेवा आणि त्याचा शुद्ध मनाने शोध करत रहा. तसे करणेच तुम्हाला मुक्ति मिळवून देईल.

विश्लेषण:

एकदा परब्रम्ह, परमेश्वर, परमात्मा निराकार आहे असे प्रतिपादन केल्यानंतर समर्थ त्याच्या रंगाची, असण्या नसण्याची चर्चा का करत आहेत हा प्रश्न पडणे साहजिक आहे. पण चर्मचक्षूंमधील डोळे हेच इंद्रीय जास्तीत जास्त विश्वासार्हतेने एखाद्या वस्तूचे असणे सिद्ध करून देते. या डोळ्यांना रंगांची आवड जास्त असते. कुठल्याही वस्तूचा आकार नोंदवण्याआधी डोळे तिचा रंग नोंदवून घेतात. तेव्हा या डोळ्यांची जी अपेक्षा असते तीच इथे पराभूत होत असल्याचे मनावर बिंबवण्यासाठी त्यांनी हे उदाहरण घेतले आहे. परब्रम्ह ना  पिवळ्या रंगाचे, ना काळ्या, ना सफेद, ना निळ्या. आपण म्हणतो राम गोरा, कृष्ण काळा, शंकर गोरा पण त्याचा कंठ निळा. इथे आपण हे विसरतो आहोत की राम, म्हणजेच विष्णु, शंकर, ब्रम्हदेव हे देव आहेत, त्रिदेव. ते म्हणजे परब्रम्ह नाही. १४८ व्या श्लोकात आपण पाहिले की निर्गुण परब्रम्ह हे सगुण त्रिदेवांचा आधार आहे. रोजच्या जीवनातील उदाहरण द्यायचं झालं तर छताला आधार देणारा खांब हा छत होत नाही. देव किंवा देवांचे अवतार हे अंत नसलेले, अमर नाहीत. अमर आहे ते परब्रम्ह. समर्थ सांगतात की त्याच्या न व्यक्त होणाऱ्या अस्तित्वावर भक्त जेव्हा शुध्द मनाने, आदरपूर्वक विश्वास  ठेवतो तेव्हाच तो मुक्ती मिळायला पात्र बनतो. ही पात्रता मिळवण्यासाठी संत सज्जनांचा  उपदेश ग्रहण आणि पालन करूनच या अव्यक्त परब्रम्हाचा शोध घ्यायला हवा.

या श्लोकात “मना संत आनंत शोधूनि पाहे” हा चरण समर्थांनी शेवटचा वापरला आहे. यापुढील श्लोकात तो नाही.

||श्रीराम||

## दशक सोळावे

**खरें शोधितां शोधितां शोधिताहे।**
**मना बोधिता बोधिता बोधिताहे॥**
**परी सर्वही सज्जनाचेनि योगे।**
**बरा निश्चयो पाविजे सानुरागे॥१५१॥**

सरळ अर्थ:

सत्याचा शोध हा शोधता शोधता लागतो तसेच त्याचा बोधदेखील त्याला समजून घेता घेताच लागतो. पण यासाठी संतसज्जनांचा संग आवश्यक आहे आणि शिवाय मनात त्या सत्याचा शोध आणि बोध घेण्याविषयीची आस्था आणि दृढ भावना असणे देखील आवश्यक आहे.

विश्लेषण:

संत सज्जनांचा सहवास असणे आणि त्यांच्याकडून परब्रम्ह तत्वाच्या शोधासाठी मार्गदर्शन मिळणे हे किती महत्वाचे आहे हे समर्थ या श्लोकात सांगत आहेत. ते म्हणतात कुठल्याही तत्वाच्या सत्य स्वरूपाचा शोध हा नेहमी घेत राहिले पाहिजे. शोध निरलसपणे, निष्ठापूर्वक करत राहिल्यानंतरच त्या शोधाचे फलित हाती लागू शकते. तत्वबोध हा अचानकपणे, सहजासहजी होत नसतो. पुन्हा पुन्हा समजावून घेण्यानेच अखेरीस तो होतो. उघड आहे. आपण ग्रंथ वाचतो, पहिल्या वाचनात त्यातले सार कळत नाही, पुन्हा वाचतो, पुन:पुन्हा वाचतो तेव्हा कोठे थोडे काही समजल्यासारखे वाटते. पण अर्थ पूर्णपणे स्पष्ट होण्यासाठी कितीतरी वाचने करावी लागतात. त्या ग्रंथविषयात पारंगत, ज्ञानी अशा व्यक्तीकडून तो समजावून घ्यायला लागतो. त्यांनी सांगितलेल्याचे फिरून फिरून मनन करून पूर्ण बोध घ्यावा लागतो. म्हणजे अशा व्यक्ती, ज्यांना समर्थ सज्जन, संत म्हणतात, त्यांच्या सहयोगाने, फिरून फिरून शोधायचा प्रयत्न करून (शोधिता

शोधिता) थोडा थोडा असा बोध प्राप्त करून  घ्यावा लागतो (बोधिता बोधिता) तेव्हा कोठे शोधत असलेले सत्य, खरे ब्रम्हज्ञान मिळू शकते. अर्थात त्यासाठीची ओढ, जिज्ञासा, आस्था आणि ते मिळवायचेच  असा दृढनिश्चय तर असला पाहिजेच, शिवाय संतवचनांचा, सद्‌गुरुंच्या उपदेशाचा आधार घेऊन हा बोधाचा शोध केल्यास तो साध्य होतो.

**बहूतांपरी कुसरी तत्त्वझाडा।**
**परी अंतरी पाहिजे तो निवाडा॥**
**मना सार साचार ते वेगळे रे।**
**समस्तांमधे एक ते आगळे रे॥१५२॥**

सरळ अर्थ:

किती तरी गोष्टींविषयी अहमहमिकेने, अलंकारिक भाषेमध्ये बोलता येत असले तरी त्यातले सार काय आहे त्याचा आपल्याला मनात निश्चय झालेला असला पाहिजे. असे हे जे निश्चित झालेले सारतत्व असते ते इतर सगळ्या गोष्टींहून आगळेवेगळेच असते.

विश्लेषण:

आपण पाहतो की आपल्या आजूबाजूला कितीतरी भाषणपटू, अलंकारिक वाक्यप्रयोग करून आपले म्हणणे मांडणारे लोक असतात. सगळेच ते ज्या विषयावर बोलतात त्या विषयात पारंगत, अधिकारी असे असतातच असे नाही. किंबहुना त्यांच्यामध्ये 'लोकां सांगे ब्रम्हज्ञान, आपण कोरडे पाषाण' अशांचे प्रमाणही मोठे असते. कित्येकदा ते जे बोलतात त्यावर ते स्वत:च विश्वास ठेवतात की नाही याचा संभ्रम पडतो. अध्यात्मावर तत्वज्ञान झाडणाऱ्याना स्वत:लाच खरे ज्ञान नसते पण शब्दांचा फुलोरा उभा करणे यात त्यांचे कौशल्य असते. आध्यात्मिक विचारांमधील सारतत्व हे अशा फुलोऱ्यातून, पोपटपंचीतून स्पष्ट होत नसते. त्यासाठी बुद्‌धी वापरून, अंत:करणापासून मनन, चिंतन करून

सार काय, असार काय याचा निवाडा करायला हवा. हे सारतत्व, सत्यज्ञान एकमेवाद्‌वितीय असते, इतर सर्व फापटपसाऱ्यापासून वेगळेच असते.

**नव्हे पिंडज्ञाने नव्हे तत्वज्ञाने ।**
**समाधान कांही नव्हे तानमाने॥**
**नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें।**
**समाधान ते सज्जनाचेनि योगे॥१५३॥**

सरळ अर्थ:

केवळ भौतिक ज्ञान असण्याने किंवा केवळ अध्यात्मिक ज्ञानाची जाणीव असल्याने आपल्याला समाधान मिळत नाही. संगीत ऐकण्याने, कर्मयोग पालन करण्याने किंवा संन्यस्त राहण्यानेही जे समाधान मिळत नाही ते सज्जनांच्या संगतीत असण्याने मिळते.

विश्लेषण:

पिंडज्ञान म्हणजे आपल्या शरीराविषयीचे ज्ञान. आपला देह, इंद्रिये, मन, बुध्दी इत्यादींचा विचार या पिंडज्ञानात केलेला आहे. याच्या उलट तत्वज्ञान हे शरीर सोडून सृष्टीतील इतर गोष्टींबद्‌दलचे ज्ञान. सृष्टीची उत्पत्ती, त्यामागची प्रेरणा, पंचमहाभूतांचा त्यातील सहभाग यांचा अभ्यास. समर्थ म्हणतात या दोन्ही प्रकारचे ज्ञान असणे मानवाच्या दृष्टीने आवश्यक असते. नाना प्रकारच्या साधनांनी तो ते मिळवायचा अट्टाहास ठेवतो. पण या दोन्ही शाखांतील संपूर्ण ज्ञान मिळवणे कुणालाही सहजशक्य असे नसते. त्यामुळे जितके मिळाले आहे तेव्हढ्याने त्याचे समाधान होत नाही. मग हे समाधान कशाने मिळवावे याचा तो विचार करू लागतो. कुणी संगीतासारख्या आणि इतरही नाना प्रकारच्या कलांची साधना करत ते शोधतो तर कुणी योग साधना करतो. याउलट असेही हटयोगी असतात जे सर्व भोगांचा त्याग करून ब्रम्हज्ञान मिळवू पहातात. पण

या त्यांच्या ‘एकला चालो रे’ अशा पद्धतीने चाललेल्या शोधात त्यांच्या हाती खरे ज्ञान, समाधान लागत नाही. मग हे समाधान कशाने साध्य होते? याला समर्थ उपाय सुचवतात की सुयोग्य, ज्ञानी, सत्प्रवृत्त अशा सद्गुरूचा सहवास, त्याचा अनुग्रह मिळाला तर हे समाधान, आंतरिक शांतता मिळणे शक्य होते.

**महावाक्य तत्त्वादिके पंचीकरणे।**
**खुणे पाविजे संतसंगे विवरणे॥**
**द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो।**
**तया सांडूनि चंद्रमा भाविजेतो॥१५४॥**

सरळ अर्थ:
महावाक्ये, वेदांमधील तत्वे, पंचमहाभूते या केवळ खुणा आहेत अंतिम सत्य जाणण्याच्या. त्यांचे विवरण संतांकडून करून घेणे, समजून घेणे हे महत्वाचे. द्वितीयेचा चंद्र दाखवण्यासाठी वापरलेला संकेत सोडून प्रत्यक्ष चंद्र बघणे हे महत्वाचे.

विश्लेषण:
श्लोकाच्या पहिल्या चरणात समर्थ तीन गोष्टींचा उल्लेख करतात. महावाक्ये, तत्वे इत्यादि आणि पंचीकरण. तिसऱ्या आणि चौथ्या चरणांमध्ये त्यांनी एक दृष्टांत सांगितलेला आहे. त्याचा विचार नंतर ओघाने येईलच. महावाक्ये कोणती? ‘तत्वमसि’, ‘अहं ब्रम्हास्मि’, ‘प्रज्ञानं ब्रम्ह’ आणि ‘अयमात्मा ब्रम्ह’ ही ती चार महावाक्ये जी वेदांची अधिष्ठाने, साक्षात्कारी मानली जातात. प्रत्यक्ष भगवान शंकराने व्यासपुत्र शुक याला व्यासाच्या विनंतीवरून ब्रम्ह म्हणजे काय या ज्ञानाचा साक्षात्कार म्हणून ही चार वाक्ये सांगितली होती. अर्थात ही चार वाक्ये म्हणजे संपूर्ण ब्रम्हज्ञान नव्हे. एका अर्थी ती एक ‘झलक’ किंवा खुणा आहेत. या साक्षात्काराशिवाय जे ज्ञान आहे ते अप्रत्यक्ष किंवा परोक्ष, तात्विक ज्ञान असे

मानले जाते. परोक्ष ज्ञानात ईश्वर, जीव आणि जगत यांचे स्वरूप आणि त्यांच्यातील परस्पर संबंधाचा विचार असतो. अशा विचाराला तत्व असे म्हणतात. महावाक्ये चार पण तत्वांची संख्या अनिश्चित आहे. पंचीकरण हे महाभूतांशी निगडित आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही भूते आहेत. आपण समजतो तशी ही भुते – मृत्युनंतर भटकणारे अतृप्त आत्मे – नव्हेत. तर भूत म्हणजे सत्य. आणि या भूतांचे काही अंश मिळून एक महाभूत होते. एका भूताचा अर्धा भाग आणि उर्वरित चार भूतापैकी एक एक अंश मिळून अर्धा भाग असे मिळून एक महाभूत होते. उदाहरणार्थ पृथ्वी या भूतातील अर्धा भाग आणि आप, तेज, वायु, आकाश या भूतांतील प्रत्येकी एक एक अंश मिळून अर्धा भाग यांतून पृथ्वी हे महाभूत बनले आहे. अशा या महाभूतांच्या संयोगातून सृष्टीतील वस्तुजात निर्माण होते. या संयोगाला पंचीकरण म्हणतात. महावाक्ये, तत्वे आणि पंचीकरणाची प्रक्रिया या गोष्टींचे – ब्रम्हज्ञानाच्या खुणांचे - सविस्तर विवरण निष्णात, अनुभवी संतमहात्म्यांच्या उपदेशातून मिळते. ब्रम्हज्ञानाच्या खुणा पटतात. द्वितीयेचा चंद्र म्हणजे दिसेल न दिसेल अशी कोर असते. ती दाखवण्यासाठी आपण लहान मुलाला "तीऽऽ बघ, ती झाडाची फांदी दिसते ना? तिच्यामागे लपलेला आहे चंद्र" असे समजावतो. झाडाची फांदी ही खूण नक्की दिसते मग तिच्यामागची चंद्रकोर कल्पनेने दिसायला लागते. हळू हळू, दिवस जातील तसतसा चंद्र मोठा झालेला प्रत्यक्ष दिसायला लागतो. मग मुलाला झाडाच्या फांदीचा विसर पडतो. समर्थ या दृष्टांतातून हे सांगतात की ब्रम्हज्ञानाच्या जिज्ञासूंनी महावाक्ये, तत्वे महाभूतांचे पंचीकरण यांच्याकडे फक्त झाडाची फांदी म्हणून पहावे आणि त्यांच्याबद्दलच्या उहापोहात न पडता त्यांच्याही पलीकडील परमसत्य, परब्रम्ह यांच्या साक्षात्कारासाठीची साधना सत्संगातून करावी.

**दिसेना जनी तेचि शोधूनि पाहे।**
**बरे पाहता गूज तेथेचि आहे॥**
**करी घेउ जाता कदा आढळेना।**
**जनी सर्व कोंदाटले ते कळेना॥१५५॥**

सरळ अर्थ:
जे सहजासहजी दृष्टीस पडत नाही त्याचा शोध करून पहा. ते आहे तिथेच आहे तरी त्याला उचलून घेऊ म्हटले तर कुठे आहे ते दिसत नाही. ते तत्व, ते गौप्य चराचरात भरून राहिले आहे पण त्याचे आकलन होत नाही.

विश्लेषण:
१५११व्या श्लोकात ज्या गोष्टीचा शोध घ्यावा म्हणजे शोधता शोधता त्याचा बोध होईल असे समर्थ म्हणतात ते ब्रम्हसत्य हे सहजासहजी दिसत नाही, म्हणजे सहजासहजी आकलन होत नाही.पण म्हणून त्याचा शोध थांबवून चालणार नाही. तो चालू ठेवलाच पाहिजे. ते सत्य आहेच. जिथे ते आहे असे परमेश्वर म्हणतात तिथे ते आहे. महावाक्यांत सूचित केल्याप्रमाणे ‘तत्वमसि’ - तूच ते आहेस, ‘प्रद्न्यानं ब्रम्ह’ – तुझ्या ज्ञानात ब्रम्ह आहे, ‘अयम् आत्मा ब्रम्ह’ – हा तुझा आत्माच ब्रम्ह आहे, आणि जेव्हा तुला त्याची जाणीव होईल तेव्हा तूच म्हणशील ‘अहम् ब्रम्हास्मि – मीच ब्रम्ह आहे. पण गंमतीची गोष्ट म्हणजे हे आपल्या जागी असलेले ब्रम्ह पहायला जाता दिसत नाही इतकेच. आणि जे दिसत नाही, कळत नाही ते तू उचलणार कसा? अंधारात चाचपडत असल्यासारखा शोध घेताना ब्रम्ह हे चराचर विश्वात भरून राहिलेले आहे, जळी, स्थळी, काष्ठी पाषाणी, तुझ्या स्वत:च्या आत्म्यामध्ये, असे असलेले हे सत्याचे अस्तित्व तुला कसे मिळेल? ज्याचा शोध घ्यायचा ते आणि जो शोध घेतो आहे तो हेच जर एक असतील तर ती गोष्ट दिसणे हे अशक्यप्रायच असणार. पण त्या गोष्टीचे सखोल ज्ञान मिळण्यासाठी डोळसपणाने, अंत:करणापासून साधना करायला हवी.

**म्हणे जाणता तो जनी मूर्ख पाहे।**
**अतर्कासि तर्की असा कोण आहे॥**
**जनीं मीपणे पाहता पाहवेना।**
**तया लक्षितां वेगळे राहवेना॥१५६॥**

सरळ अर्थ: आपल्याला ते परब्रम्ह तत्व समजले आहे असे जो म्हणतो तो मूर्ख आहे. कारण जे अतर्क्य आहे त्याचा तर्कही कोणी करू शकत नसतो. 'मी पाहिलं, मी जाणलं' असा अहंकार बाळगून असणाऱ्याला तर ते दिसणार नाही, कळणार नाही. त्याला पाहणं म्हणजे त्याच्यात सामावून जाणं. एकतत्व होणं. जिथं 'मी'पणा आहे तिथं ते जमणं केवळ अशक्यच.

विश्लेषण:

जगात 'मी परमेश्वराला जाणतो', 'मला तो भेटला आहे, रोज भेटतो' अशा घोषणा करून अज्ञानी, भोळ्या लोकांना आपल्या नादी लावणारे भोंदू लोक काही कमी नाहीत. बापू, बाबा, माँ, भगवान अशा नाना उपाधि घेऊन हे लोक वावरत असतात. समर्थ या श्लोकात त्यांची गणना रोखठोकपणे मूर्खात करत आहेत. त्याचं कारणही ते देतात. जे अतर्क्य आहे, कसे आहे त्याची कल्पनाच काय, नुसता अंदाज, तर्कही करता येत नाही ते, बाबानो, तुम्हाला भेटायचे तर दूरच, तुमच्या आकलनाच्याही बाहेरचे आहे. आणि त्यात तुमच्या मनात 'मी', 'मी' असा अहंकार भरलेला असेल तर ते तुमच्या नजरेत काय, तुमच्या गर्विष्ठ बुद्धीतदेखील येणार नाही. ते काय आणि कसे आहे त्याचा तर्कही तुम्ही करू शकणार नाही. तेव्हा तुम्ही मला ब्रम्ह तत्व काय आहे ते कळले आहे असे म्हणाल तर 'मी झोपलो आहे' असे स्वत: सांगणारा माणूस झोपलेला असणे शक्यच नाही तशी तुमची गत असेल. समुद्राच्या कडेला बसून किंवा त्याच्या पाण्यात पाय बुडवून उभे राहिलेल्याला 'मला समुद्र कळला आहे' असे म्हणायचा काय अधिकार? समुद्राचे नजरेत न मावणारे विशाल रूप, त्याची अथांग खोली हे सगळे काठावर राहून कळणार नाही.

त्याच्या अंतरात शिरले पाहिजे तसेच ब्रम्हज्ञानाचे आहे. त्याच्या अभ्यासात विनम्रपणे बुडून गेले पाहिजे. तेव्हा ते आणि तुम्ही यांची एकरूपता होईल. थोडक्यात सांगायचे तर अशी एकरूपता झाल्यावर 'अहं ब्रम्हास्मि' मधून 'अहं' आणि 'अस्मि' हे शब्द आपोआप गळून पडतील आणि राहील ते केवळ शुध्द, सत्य ब्रम्ह.

**बहू शास्त्र धुंडाळता वाड आहे।**
**जया निश्चयो येक तोही न साहे॥**
**मती भांडती शास्त्रबोधे विरोधें।**
**गती खुंटती ज्ञानबोधे प्रबोधे॥१५७॥**

सरळ अर्थ:

शास्त्रे, पुराणे, ग्रंथ अशी बाडेच्या बाडे आहेत. नाना ग्रंथ धुंडाळले तरी खरे ब्रम्हज्ञान होत नाही. किंबहुना वेगवेगळ्या शास्त्रांतील वेगवेगळ्या मतांमुळे गोंधळ वाढतो आणि वितंडवाद, भांडणे उद्‌भवतात. खरे प्रबोधन, खरा आणि नेमका ज्ञानबोध झाला तरच अशा भांडणांचा मार्ग खुंटतो.

विश्लेषण:

वाचण्यासाठी खूप आहे. आयुष्य पुरणार नाही वाचून संपवायला. आणि पुन्हा नवनवीन भर पडतच आहे त्यात. अध्यात्मामध्ये पाहिले तर श्रुती(वेद), स्मृती, पुराणे, उपनिषदे, सूत्रे, स्तोत्रे, आणि भौतिकाच्या विचारात तर पदार्थविज्ञान, रसायन, जैविक, कला, न्याय, तंत्र, तर्क, संख्या, भूस्तर, नाना प्रकारची शात्रे आणि प्रत्येकात असंख्य ग्रंथ. काय वाचावे आणि किती वाचावे? बाडेच्या बाडे आहेत ग्रंथांची. कुठल्या एका शास्त्राचा अभ्यास करायचा असे ठरवले तरीही त्यावरच्या अगणित ग्रंथांमधली प्रतिपादने, खंडने, मत-मतांतरे ही वाचता वाचता त्यातले खरे सार काही ध्यानात येत नाही हे सत्य आहे. गोंधळच उडतो. थोडे समजले असे वाटले तरी कोणीतरी त्याच्या विरोधात केलेल्या विधानांमुळे जे समजले असे वाटले

त्याच्याबद्दलदेखील पुन्हा शंका येते. मग यातून सुटका कशी? तर त्या त्या विषयातील तज्ञ, निर्विवादपणे अधिकारी असलेल्या व्यक्तीकडून मार्गदर्शन, प्रबोधन मिळवायचे. अध्यात्मिक विषयांसाठी असे मार्गदर्शक म्हणजे संत, सद्गुरु जे असत्याचे प्रतिपादन कधी करणार नाहीत. आणि इतर भौतिक ज्ञानाच्या शाखांमधील अनुभवसिध्द ज्ञान मिळवलेले गुरु जे स्वत: अनुभव घेतलेला असल्यावाचून सांगणार नाहीत. अशा लोकांकडून नेमका ज्ञानबोध होतो आणि मग मता-मतांचा गोंधळ समाप्त होतो. खऱ्या अर्थी प्रबोधन होते, खरे ज्ञान मिळते. आणि मग शंकाकुशंका उरत नाहीत. वादांचा, भांडणांचा मार्ग खुंटतो म्हणजे ते समाप्त होतात. समर्थांच्या मनोबोधावरील प्रवचनांत स्वामी वरदानंद भारती यांनी या संदर्भात एक मोठे छान उदाहरण दिले आहे. एका स्थानकावर गाडी जेवणासाठी थांबली असताना चार प्रवासी उतरले आणि उपाहारगृहात गेले. चौघेही चार वेगवेगळ्या प्रांतातले होते. काश्मिरी प्रवासी होता त्याने उपाहारगृहाच्या चालकाकडे तोमूल मागितले, मराठी होता त्याने भात मागितला, तमिळ होता त्याने सोरु देण्याची विनंती केली तर पंजाब्याने चावलची मागणी केली. ते स्थानक होते कर्नाटकात. उपाहारगृहातल्या कर्मचाऱ्यांना माहित होते ते फक्त अन्नम्! कुणालाच काही समजेना. सगळे वर्दळीवर आले. तेव्हढ्यात स्थानकप्रमुख उपाहारगृहात जेवायला आला. तो मोठा चाणाक्ष आणि माहितगार होता. त्याने नोकरांना चार थाळ्या भरून अन्नम् आणून त्या प्रत्येकाच्या पुढे ठेवायला सांगितले. कर्नाटकातले अन्नम् म्हणजेच काश्मिरीमधला तोमूल, मराठीतला भात, तमिळमधला सोरु आणि पंजाबी भाषेतला चावल. बस्स मग काय, चारीही प्रवासी त्यांना पाहिजे होतं ते मिळाल्यामुळे संतुष्ट झाले आणि गुण्यागोविंदाने हसत हसत जेवू लागले. भांडणतंट्याचे नाव उरले नाही. कारण हुशार स्थानकप्रमुखाने त्यांना ज्ञानबोध दिला होता, प्रबोधन केले होते.

**श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रे।**
**स्मृती वेद वेदान्तवाक्ये विचित्रे॥**
**स्वये शेष मौनावला स्थीर पाहे।**
**मना सर्व जाणीव सांडून राहे॥१५८॥**

सरळ अर्थ:

श्रुती, स्मृती, न्याय, मीमांसा, तर्कशास्त्र, वेद इत्यादी अनेक ग्रंथ आहेत. त्यांमध्ये जे ज्ञान वर्णन केले आहे ते परस्परविरोधी, विचित्र वाटते. त्या सगळ्या ग्रंथांच्या वाचनाने गोंधळ उडतो. हजार डोक्यांचा शेषनाग देखील विचारांच्या गोंधळामुळे मौन धारण करता झाला आणि सर्व जाणीवा सोडून स्थिरपणे पहात रहाणे त्याने पत्करले.

विश्लेषण:

हा श्लोक वरच्या १५७व्या श्लोकालाच पुढे नेणारा आहे. श्रुती, स्मृती, न्याय, मीमांसा, तर्कशास्त्र, वेद, उपनिषदे, वेदान्त (ईश्वराच्या शोधाचे तत्वज्ञान) इत्यादी विपुल वाचनापायी एक ना धड भाराभार चिंध्या अशी अवस्था होते. हे सारे ग्रंथ आपापल्या परीने साधकाच्या उपयोगाचे आहेत यात शंका आही. पण त्या प्रत्येकातील गृहितांमध्ये, प्रतिपादनांमध्ये समन्वय असा आढळत नाही. किंबहुना वैचित्र्य, विसंगती, विरोध आढळतो. त्यामुळे ब्रम्हज्ञानातील खरे तत्व, सार समजणे दुरापास्त बनते. विचारांचा गोंधळ उडतो. या सगळ्या ग्रंथांच्या वाचनाने पांडित्य येईल कदाचित, पण ब्रम्हज्ञान मिळणार नाही. हे सगळे ग्रंथ मोराच्या पिसांवरल्या सुंदर डोळ्यांसारखे आहेत. डोळे सुन्दर आहेत पण त्यातला एकही पाहू शकत नाही. समर्थ पुढे म्हणतात, शेष हा हजार तोंडाचा, दोन हजार डोळ्यांचा, आणि भगवान विष्णूच्या सान्निध्यामुळे त्याची विभूती, म्हणजे अलौकिक सामर्थ्य मिळालेला नाग आहे. पण तरीही तो खरे ब्रम्हज्ञान समजू वा सांगू शकला नाही त्यामुळेच त्याने मौन धारण केले आणि परमेश्वराच्या शय्येखाली स्वस्थ, स्थिर

पडून राहिला. केवळ अनन्यभावे श्रीविष्णूला आराम देण्याच्या स्वरूपातली भक्ती करीत राहिला आहे. पण म्हणजे आपण विचार करायचा सोडून देऊन स्वस्थ बसायचे असे नाही, तर शब्दज्ञानाच्या, पुस्तकी पांडित्याच्या मागे न लागता सर्व जाणिवा सांडून म्हणजे अनन्यभावे परमेश्वराची भक्ती, ध्यान करत रहायचे आहे.

**जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची।**
**तया भोजनाची रुची प्राप्त कैची॥**
**अहंभाव ज्या मानसीचा विरेना।**
**तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना॥१५९॥**

सरळ अर्थ:
तोंडातून आत माशी गेली म्हणजे जसे मळमळते आणि पुढे जेवणात गोडी वाटत नाही तसेच मनात अहंभाव शिरल्याने चांगल्या ज्ञानाची गोडी येत नाही. ते पचत नाही.

विश्लेषण:
'मी कोणीतरी आहे, मला सगळे काही कळते' अशी जाणीव मनात व्हायला लागते तेव्हा तिथे अहंकाराचा, मीपणाचा प्रादुर्भाव होतो. अशा या अहंकाराच्या जाणीवेला समर्थ मक्षिका, म्हणजे माशी असे म्हणतात. माशी ही केव्हाही टाळायची असते हे आपण ओळखून असतो. डोळ्यासमोर आली, अंगावर बसली की आपला हात आपोआपच तिला हाकलण्यासाठी उचलला जातो. मग अशी माशी यदाकदाचित तोंडात शिरली तर आपण अस्वस्थ होतो. तिथून पुढे जर ती अन्नाच्या घासाबरोबर पोटात गेली तर पुढचा घास घ्यायची इच्छाच होत नाही. मळमळून येऊन उलटी होते. समोरचे अन्न कितीही गोड, रुचकर असले तरी उलटी होऊन गेल्याखेरीज ते खाण्याची वासनाच होत नाही. जोपर्यंत ती माशी पोटात आहे तोपर्यंत अन्नावरची वासना उडून जाते. अहंकाराचे तसेच आहे. जोपर्यंत आपला

अहंकार गळून पडत नाही तोपर्यंत आपल्याला ज्ञानरुपी अन्न जबरदस्तीने घेऊनही पचत नाही. कारण त्या अहंकारापोटी त्या अन्नाची चवच गेलेली असते.

**नको रे मना वाद हा खेदकारी।**
**नको रे मना भेद नानाविकारी॥**
**नको रे मना शीकवूं पूढिलांसी।**
**अहंभाव जो राहिला तूजपासी॥१६०॥**

सरळ अर्थ:

हे मना, खेदकारक असा वाद घालू नकोस, त्याच्यामुळे भेदाभेद, भांडण तंटे होतात. ते टाळ. तुझ्या मनात असलेल्या अहंकाराची दीक्षा पुढल्या पिढीला देऊ नकोस.

विश्लेषण:

श्री समर्थ नेहमीच वाद – वितंडवाद टाळावा, सुसंवाद साधावा असे सांगत आले आहेत. श्लोक क्र. १०८ ते ११२ या श्लोकांमध्ये त्यांनी वादामुळे कसे नुकसान होते ते सांगितले आहेच. या श्लोकातही ते म्हणतात की वाद हा दु:खाचा जनक, खेदकारक असतो. तो टाळलाच पाहिजे. वाद हा मतभेदांतून निर्माण होतो. “तुझे म्हणणे मला पटत नाही. माझे म्हणणेच बरोबर आहे” या हट्टाग्रहातून मतभेद स्पष्ट होतो. आणि असाच पवित्रा उभय पक्षांनी घेतला तर प्रकरण हमरीतुमरीवर येते. दोघांचाही अहंभाव प्रभावी ठरतो. मग वादे वादे जायते तत्वबोध: या तत्वाऐवजी वादावादीतून गुद्दागुद्दी सुरु व्हायला वेळ लागत नाही. त्यापेक्षा असे भेद आणि वाद नकोतच हे मनावर बिंबवून घेतले म्हणजे मग सुसंवादाला सुरुवात होण्याची शक्यता वाढते. संत सज्जन जेव्हा काही उपदेश करतात तेव्हा तो त्यांच्या हट्टाग्रहाचा निदर्शक नसतो. तर ते उपदेश देऊन स्वस्थ रहातात. ‘तुम्हाला पटले तर पाळा, नसेल पटले तर सोडून द्या, देव तुमचे भले करो!’ अशी त्रयस्थाची भावना ठेवून ते उपदेश करतात. आपल्यालाच सर्व कळते आहे अशी त्यांची अहंकाराची, दर्पाची भावना नसते. पण आपण सामान्य माणसे मात्र

आपल्या मताचा दुराग्रह केवळ मीपणापोटी धरतो. आपण मीपणा ठेवतो तेच मग दुसऱ्याला उदाहरण घालून दिल्यासारखे असते. विशेषत: पुढची पिढी, जी संस्कारक्षम असते तिच्यामध्येही आपण अहंकाराची बीजे पेरतो आहोत हे आपल्या लक्षात येत नाही. म्हणून समर्थ इथे धोक्याचा इशारा देतात की बाबारे, वाद टाळ, भेद टाळ, आणि तुझ्यामध्ये असलेला अहंकार तू इतरांना अनुसरण्याचे धडे देऊ नको.

||श्रीराम||

## दशक सतरावे

**अहंतागुणे सर्वही दुःख होते।**
**मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते॥**
**सुखी राहता सर्वही सूख आहे।**
**अहंता तुझी तूंचि शोधुन पाहे॥१६१॥**

सरळ अर्थ:

अहंकारामुळे दु:खच होते. अहंकारी जे काही बोलतो त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. तेव्हा दु:खाला कारणीभूत असणारा अहंकार बाळगण्यापेक्षा सुखी होण्याचा मार्ग शोधून काढ म्हणजेच आपल्यातली अहंकारी वृत्ती ओळखून तिला दूर कर.

विश्लेषण:

समर्थ म्हणतात त्याप्रमाणे अहंकारामध्ये दु:खच मिळते यात शंका नाही. गर्वाचे घर खाली अशी म्हणही प्रचलित आहे. अहंकार म्हणजे स्वत:बद्दलची अतिरंजित भ्रामक कल्पना असणे. मीच श्रेष्ठ आहे असे म्हणणाऱ्याला जेव्हा त्याच्यापेक्षाही वरचा, खराखुरा श्रेष्ठ भेटतो तेव्हा वैफल्याची भावना दु:ख देतेच त्याशिवाय आजपर्यंत ज्यांच्यावर आपण श्रेष्ठ आहोत असा रुबाब मारला त्यांच्या कुत्सित नजरांना तोंड देणे हेही दु:खदायी होते. श्रेष्ठतेच्या भ्रमात जे काही बोललेले असते त्याबद्दल आता लोक शंका घेतात आणि त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. त्याचे महत्व उरत नाही. म्हणजे ते बोलणे, ते ज्ञान व्यर्थ झाल्यासारखे होते. मग अशा अहंकारात मश्गुल असण्याचा फायदा काय? त्यापेक्षा नम्रतेने, इतरांपासून दूर न जाता, त्यांच्यात मिळून मिसळून, त्यांच्या कल्पनांची, ज्ञानाची कदर करत रहाण्यानेच लोकांच्या आदराला पात्र होता येते. यात आनंद मानून त्याचा स्वीकार करण्यातच खऱ्या सुखाची गुरुकिल्ली आहे. मी, माझे, मला या कल्पनांचा अतिरेक असणे म्हणजे अहंकारी असणे. अशी अहंता आपल्यात आहे का हे आत्मपरिक्षण

करून स्वत:च ओळखले पाहिजे. अन्यथा इतरांनी ते सप्रमाण दाखवून दिले तर आपल्या होणाऱ्या दयनीय अवस्थेतल्या दु:खाला पर्याय रहात नाही. तेव्हा अशी अहंतेची वृत्ती टाळूनच सुखी होता येते हे सत्य ओळखून वागावे हेच योग्य.

**अहंतागुणे नीति सांडी विवेकी।**
**अनीतीबळे श्लाघ्यता सर्व लोकी॥**
**परी अंतरी सर्वही साक्ष येते।**
**प्रमाणांतरे बुद्धि सांडूनि जाते॥१६२॥**

सरळ अर्थ:

अहंकारी असण्यामुळे विवेकी मनुष्याच्याही वर्तनातली नीति हळू हळू कमी होत जाते. तरीही अनीतिमान बनलेला माणूस लोकांमध्ये मानसन्मानाची अपेक्षा करता असतो. पण अंतर्मनात कुठेतरी टोचणी त्यालाही असते. मात्र ती सद्प्रवृत्ती, सद्बुध्दी अहंकारामुळे दडपली जाते.

विश्लेषण:

मागील श्लोकात समर्थांनी  अहंकारामुळे माणसाला दु:खे भोगावी लागतात हे सांगितले. आता या श्लोकात ते अहंकारामुळेच माणूस ऊर्ध्वगतीला जाऊन ‘नरका नारायण’ बनण्या ऐवजी अधोगतीला जाऊन ‘नरका वानर’ बनतो असे सांगत आहेत. हुशार, विवेकसंपन्न मनुष्यदेखील जर अहंकारी असेल तर त्याची नीतिमत्ता ढासळत जाऊन तो अनीतिमान बनतो. इतकेच नव्हे तर तसे असण्यातच धन्यता मानतो. आपल्या अनीतिपूर्ण वर्तनाला तो समर्थन देतो आणि त्याबद्दल लोकांनी आपला उदो उदो करावा, आपल्याला मान सन्मान द्यावा अशी अपेक्षा करतो. अगदी साधे रोजच्या व्यवहारातले उदाहरण द्यायचे झाले तर एखाद्या अतिशय हुशार पण मद्यपि माणसाच्या बोलण्याचे देता येईल. समोरच्या माणसाला तो “अरे यार, कोण म्हणतो दारूत काही वाईट आहे? आपण तर बुवा दोन पेग

चढवल्यानंतरच खुलून गाऊ शकतो, किंवा उत्तम लिहू शकतो. पण तुला काय समजणार म्हणा. अरे कम्बख्त, तूने तो पीहि नही" असे फुशारकीने सुनावतो. मद्यपानाची तरफदारी करण्यात तो आपली हुशारी कामी लावतो. आणि सामान्य लोकही 'अरे वा, पंडीतजी काय कमालीचे गातात. पण सम गाठल्यानंतर समोरच्या प्याल्यातून पितात ते पाणी नाही बरं का. व्हिस्की असावी लागते त्याना. तेव्हाच मैफल जमते हो त्यांची" असे कौतुकाने म्हणतात. गायकही मग त्या कौतुकाने धन्यता पावतात. पण खरे तर हे कौतुक, ही धन्यता, फुशारकी वरवरची असते. अंतर्मनात 'आपले वागणे योग्य नाही, चुकतो आहोत आपण' अशी सदसद्विवेकाची टोचणी ही असतेच. पण तरीही लोकांमध्ये ती टोचणी दाखवून द्यायची नसते. का? तर अहंकार आडवा येतो. आणि हा अहंकारच त्या सदसद्विवेकबुद्धीला दडपून ठेवतो. समर्थांच्या भाषेत ती (सदसद्विवेक) बुद्धी सांडून जाते.

**देहेबुद्धिचा निश्चयो द्दढ जाला।**
**देहातीत ते हीत सांडीत गेला॥**
**देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी॥१६३॥**

सरळ अर्थ:

देहबुध्दी, म्हणजे विषयोपभोगाची आवड, मनात द्दढमूल झाली म्हणजे देहापलीकडे असलेल्या हिताकडे दुर्लक्ष केले जाते. पण तसे न करता विषयोपभोग टाळून चित्तशुध्दी अंगिकारावी आणि सदैव सज्जनांची संगत धरावी.

विश्लेषण:

या आणि इथून पुढच्या १६७व्या श्लोकापर्यंत प्रत्येक श्लोकाच्या चौथ्या चरणात समर्थ सज्जनांची संगत सदैव धरावी असा उपदेश मनाला, म्हणजेच आपल्याला करत आहेत. ही संगत का धरली पाहिजे हे आत्तापर्यंतच्या किती तरी श्लोकांमधून

त्यांनी सांगितले आहे. तसेच देहबुध्दी मनाला अधोगतीच्या मार्गावर नेण्याला कारणीभूत असते हेही वरचेवर प्रतिपादित केले आहे. देहबुध्दी ही अजिबातच नसावी हे शक्य नसते. देह, शरीर आहे म्हणजे त्याचे संगोपन, त्याच्या पालनासाठी आवश्यक त्या गोष्टी करणे हे अटळ असते. ते टाळायचा प्रयत्न करणे हेही चुकीचे ठरते. शरीर जगवण्यासाठी अन्न ग्रहण केले पाहिजे, ते कष्टले, आजारी पडले तर त्याला बरे वाटावे यासाठी औषधोपचार केले पाहिजेत. त्याला स्वच्छ, प्रसन्न ठेवले पाहिजे. या साऱ्या गोष्टी करण्याने मनही प्रसन्न होते. प्रसन्न चित्ताने देवाचे मनन, चिंतन, पूजन, अर्चन केले म्हणजे ती देवाशी जवळीक साधण्यासारखे होते. पण अशा  देहबुद्धीचा अतिरेक झाला तर आपण शरिराचे कोडकौतुक पुरवण्यात, त्याला आवडणाऱ्या नानाविध विषयांचा उपभोग घेण्यातच इतिकर्तव्यता मानायला लागतो. आणि मग तशात देहाच्या पलीकडचे असलेल्या आध्यात्मिक, पारमार्थिक जीवनाकडे दुर्लक्ष होते. देवपूजेत चालढकल होते, भक्तिभाव विसरला जातो. मुक्ती हे जे अंतिम ध्येय आहे त्याच्याबद्दलची आसक्ती कमी होते. किंबहुना 'कसली मुक्ती आणि कसलं काय? मरणानंततचे काय ते कोणी पाहिलंय? मग तिचा हव्यास धरून हातचं सोडून पळत्याच्या पाठी का लागायचे?' अशी अहितकारक वृत्ती बनते. समर्थ इशारा देत आहेत की बाबानो, हे असे वागू नका, देहबुद्धी, देहाचे चोचले पुरवण्यातच या नरजन्माचे सार्थ आहे असे न मानता आत्म्याच्या शुध्दीवर लक्ष केंद्रित करा. तुम्हाला ते कठीण वाटत असले तर संतसज्जनांच्या सहवासात रहा कारण त्यांना देहबुध्दीतला फोलपणा कळून चुकलेला असतो त्यामुळे ते तुम्हाला योग्य, हितकारक असलेला मार्ग दाखवून देऊ शकतात.

**मनें कल्पिला वीषयो सोडवावा।**
**मनें देव निर्गुण तो ओळखावा॥**
**मनें कल्पिता कल्पना ते सरावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी॥१६४॥**

सरळ अर्थ:

एखाद्या विषयाचा (गोष्टीचा) भोग घ्यायची कल्पना मनात असेल तर त्या कल्पनेला मनातून काढून टाकावे आणि विषयांच्या पलीकडे असलेल्या, निर्गुण, निराकार देवतत्वाला मनोमन ओळखून घ्यावे. त्याची कल्पना मनाने करत रहावे म्हणजे करता करता ती कल्पना संपेल (केवळ कल्पना असे तिचे स्वरूप संपेल). यासाठी मार्गदर्शन मिळावे म्हणून सज्जनांची संगत सदोदित धरावी.

विश्लेषण:

प्रपंचामध्ये माणसाला कितीतरी गोष्टी हव्या असतात. एखादी गोष्ट मिळाली तरी ती पुन्हापुन्हा मिळावी, जशी मिळाली त्यापेक्षा जास्त चांगल्या प्रतीची, जास्त संख्येने मिळावी अशा इच्छा त्याच्या मनात उद्भवत रहातात. त्यांचीच कल्पना मनात येत रहाते. आणि मग अशा एखाद्या गोष्टीप्रमाणे इतरही अनेक गोष्टींची कल्पना, कामना मनात घर करते. मिळाल्या त्या, मिळाल्या तितक्या आणि मिळाल्या तशा गोष्टींमध्ये समाधान मानून आणखीचा हव्यास सोडून द्यायला हवा. यालाच समर्थ स्वत:च्या मनानेच कल्पिलेला विषय सोडून द्यावा असे म्हणत आहेत. मग मनात काय आणावे? तर अशा ऐहिक सुखाच्या विषयांपेक्षा निर्गुण, निराकार अशा देवाचे, परमात्म्याचे अस्तित्व मनोमन ओळखत रहावे. त्याची कल्पना करत राहावे म्हणजेच भक्तिभावाने त्याला स्मरत रहावे. विषयांच्या कल्पनांची अडगळ दूर केल्यानंतर आपल्या अंतर्मनात पोकळी न ठेवता केवळ देव याच निर्गुण, निराकार तत्वाचा विचार भरून घ्यावा. देव कसा आहे, त्याचे रंगरूप कसे आहे, तो काळा आहे की गोरा आहे? प्रेमळ, कनवाळू आहे की कठोर आहे? एकटाच आहे की संगे गोपाळांचा मेळा असलेला लेकुरवाळा आहे? अशासारख्या कल्पना करता करता हळू हळू असल्या साऱ्या कल्पना सरत जातील आणि आपला आत्माच तो परमेश्वर आहे याची ओळख पटेल. कठीण वाटते? आहेच कठीण. म्हणूनच अशी प्रचीति येण्यासाठी सहाय्यकारी होईल असा संतांचा

उपदेश, त्यांचे  मार्गदर्शन नित्य मिळत रहायला हवे यासाठी सदोदित त्यांची संगत धरून रहावे.

**देहादीक प्रपंच हा चिंतियेला।**
**परी अंतरी लोभ निश्चित ठेला॥**
**हरीचिंतने मुक्तिकांता वरावी।**
**सदा संगती सज्जनांची धरावी॥१६५॥**

सरळ अर्थ:

देहाविषयीच्या चिंतेने प्रपंच केला म्हणजे मनात लोभ हा उपजत रहातोच. तो विसरून हरीचे चिंतन करावे. लोभी वृत्तीऐवजी अंतिम मुक्ती हीच आपली प्रियव्यक्ती असल्यासारखी तिच्या भेटीची आस ठेवावी.

विश्लेषण:

माणूस प्रपंच करतो. फक्त स्वत:च्या देहाला जगवण्यासाठी केलेले प्रयास म्हणजे प्रपंच नाही. मी स्वत: तर आहेच, शिवाय मी ज्यांना माझे म्हणतो ते सारे, म्हणजे माझे आईवडील, पत्नी, अपत्ये, आप्त, मित्र अशा अनेकांचा समावेश असलेले आपले जीवन जगणे म्हणजे प्रपंच करणे. या साऱ्यांच्याबद्दल मनात लोभ असल्यामुळे त्यांच्याही  योगक्षेमाची चिंता करत आपण प्रपंच करतो. मी म्हणजे माझा देह इथपासून वाढलेल्या या गोतावळ्याचा मोह, त्याच्याबद्दलचा  लोभ मनात बाळगून त्याच्या ऐहिक सुखासाठीच्या म्हणजेच देहादिक प्रपंचाच्या चिंता वाहताना त्यात देवाला स्थान कोठे असते? 'देखल्या देवा दंडवत' यातच? देवाची पूजा करत असतानासुध्दा प्रापंचिक विचारांच्या भाऊगर्दीत ती पूजाही यांत्रिकतेने केल्यासारखीच केली जाते. तसे होऊ नये. पत्नीवर जसे निरतिशय प्रेम केले जाते तसेच प्रेम प्रपंचाच्या चिंतांपासून मिळवायच्या मुक्तीवर करायला पाहिजे. परमेश्वराचे चिंतन मनापासून करत मुक्ती हीच आपली परिणिता, कांता बनून मिळावी असे मागणे त्याच्याकडे करावे. संत महंताना अशी मुक्तीची ओढ

लागलेली असते. समर्थ इथे जसे म्हणतात की 'हरीचिंतने मुक्तिकांता वरावी।' त्याप्रमाणेच तुकाराममहाराज म्हणतात 'तुका म्हणे मुक्ति पर्णिली नोवरी| आता दिवसचारी खेळीमेळी||' मुक्तीची आस धरणाऱ्या अशा संतांकडून उपदेश मिळाल्यास आपल्या जीवनाचे सार्थक होते. म्हणूनच समर्थ सांगतात त्याप्रमाणे संतांचा सहवास मिळवणे आवश्यक असते.

**अहंकार विस्तारला या देहाचा।**
**स्त्रियापुत्रमित्रादिके मोह त्यांचा॥**
**बळे भ्रांति हें जन्मचिंता हरावी।**
**सदा संगती सज्जनांची धरावी॥१६६॥**

सरळ अर्थ:

देहाच्या प्रेमाबरोबरच त्याच्या अहंकाराचा विस्तार होऊन त्याच्याशी संबंधित बायको, मुलं, मित्र, आप्त इत्यादींचा मोह वाढीला लागतो. परंतु हा मोह झटकून टाकून देहादिक प्रेमाचा भ्रम दूर केला पाहिजे.

विश्लेषण:

देह म्हणजे 'मी' या अहंकारामध्ये मी स्वत: तर आहेच, शिवाय मागील श्लोकाचा अर्थ स्पष्ट करताना सांगितल्याप्रमाणे मी ज्यांना माझे म्हणतो ते सारे, म्हणजे माझे आईवडील, पत्नी, अपत्ये, आप्त, मित्र अशा अनेकांचा त्यात समावेश आहे. या साऱ्या गोतावळ्याबद्दल मनामध्ये प्रेम, लोभ, माया, ममता या मोहाच्या भावना उद्भवलेल्या असतात. म्हणजेच समर्थ सांगतात त्याप्रमाणे आपल्यातल्या मीपणाची, अहंकाराची व्याप्ती वाढलेली असते. पण हा मोह म्हणजे काय आहे? केवळ एक भ्रामक कल्पना. आधी आईवडिलांविषयी कृतज्ञतेची भावना असते. तिची जागा हळू हळू कमी होत पत्नीवरच्या प्रेमाला प्राधान्य दिले जाते कारण ती आपल्या साऱ्या गरजा पुरवते. मुले झाली म्हणजे त्यांच्याकडे जास्त लक्ष केंद्रित केले जाते कारण आपल्या म्हातारपणात त्यांनी आपल्याला आधार द्यावा अशी अपेक्षा असते. या सगळ्यांवरच्या मोहामध्ये आपल्या त्यांच्यापासूनच्या

अपेक्षाही दडलेल्या असतात. ज्या कधी पुऱ्या होतात, कधी नाही. निश्चिती कशाचीच नाही. पुऱ्या झाल्या तर उत्तम, न झाल्या तर अपेक्षाभंगाचे दु:ख. मग आपण बाळगलेल्या मोहाला, प्रेमाला अर्थ काय उरला? शून्य. म्हणजे जन्मभर आपण या गोतावळ्याची चिंता करत राहिलो ती केवळ भ्रामक कल्पनांपोटीच हे सत्य कळून येते. त्यापेक्षा आज, जीव आहे तेव्हाच, खंबीरपणे त्या भ्रमाला दूर का करू नये? ममत्व सोडून का जगू नये? समर्थ सांगतात की होय, ही जन्मभराच्या चिंतेची भ्रांती निश्चयपूर्वक, कठोर निर्णय घेऊन दूर सारली पाहिजे. आणि हा कठोरतेचा निर्णय घेण्यासाठी मनाची तयारी करायला मदतकारी होईल असा सत्संग सदोदित धरायला पाहिजे.

**बरा निश्चयो शाश्वताचा करावा।**
**म्हणे दास संदेह तो वीसरावा॥**
**घडीने घडी सार्थकाची धरावी।**
**सदा संगती सज्जनांची धरावी॥१६७॥**

सरळ अर्थ:
जे कायम टिकणारं आहे, शाश्वत रहाणारं आहे त्याचा म्हणजे परमेश्वरतत्वाचा ध्यास धरावा. त्याच्याबद्दलच्या मनात येणाऱ्या शंका कुशंका विसरून जावे. त्याच्या श्रध्दापूर्वक चिंतनातच आपल्या जन्माचे सार्थक होणार आहे हे क्षणोक्षणी, सदैव लक्षात ठेवावे.

विश्लेषण:
माणसाचं आयुष्य हे चिरकाल टिकणारं नाही. त्याला मर्यादा आहेत. किंबहुना या ऐहिक जीवनात काहीच कायम रहाणारं नसतं. आरोग्य, धनसंपत्ती, किती काळ टिकेल आणि माणसाला त्यांच्या योगाने मिळणारं सुख किती काळ भोगायला मिळेल ते कुणालाच सांगता येत नाही. रंकाचा राव होतो तसा रावाचा रंकदेखील

होऊन जातो. धडधाकट देहाला कुठली व्याधी कधी लागेल आणि आरोग्य बिघडेल त्याची शाश्वती देता येत नाही. शरीर नाशवंत आहे. ‘मरावे परी कीर्तिरूपे उरावे’ असे म्हणतात. पण ती कीर्ति तरी कायम रहाते का? किती तरी महात्मे होऊन गेले. त्यांची कीर्ति, त्यांचं महात्म्य बदलत्या काळाच्या ओघात कमी कमी होत जाऊन विलयालाही गेलेलं आपण पाहतो. बदलत्या विचारधारणांमध्ये त्यांचे सद्‌गुणदेखील दुर्गुणात गणले जातात. मग कायम टिकणारी, शाश्वत अशी गोष्ट काय आहे? एकच - परमेश्वर. जग राहो अथवा न राहो, जगाचा निर्माता, पालनकर्ता आणि विनाशकर्ताही असणारा एकमेव परमेश्वर. तो कायम आहे. तेव्हा मानवजीवनात त्या परमेश्वराबद्‌दलचे ज्ञान करून घेण्यासाठी त्याची भक्तिपूर्वक उपासना करावी हे शाश्वत सत्य आहे. नास्तिक म्हणतील, ‘काय आहे? कोण आहे? कुठे आहे हा परमेश्वर?’ भक्त प्रल्हादाचा पिता हिरण्यकश्यपु यानेही अशा शंका काढल्या होत्या. परमेश्वराने नृसिंह अवतारात त्याचा अंत कसा केला ते १२१व्या श्लोकात आलेलेच आहे. तेव्हा अशा शंका मनात येऊ देऊ नका. शाश्वत असणाऱ्या परमेश्वराच्या अस्तित्वाबद्‌दल निश्चित असा आणि मनात त्याबद्‌दल कोणत्याही प्रकारचा संदेह बाळगू नका असे समर्थ या १६७व्या श्लोकाच्या पहिल्या दोन चरणात सांगत आहेत. तिसऱ्या चरणात ते म्हणतात की हा असा निश्चय आयुष्यभर, जीव असेपर्यंत घडोघडी बाळगावा. आज मानले, उद्‌या नाही असे करता कामा नये. तर घडोघडी, क्षणोक्षणी त्या परमेश्वराचे अस्तित्व मान्य करून त्याचे चिंतन भक्तिभावाने करायला हवे तेव्हाच नरजन्माचे सार्थक होईल. आणि यासाठी आपली वर्तणूक चांगली, त्या परमेश्वराला मान्य होईल अशी रहावी हे साध्य कसे व्हावे याचा मार्ग दिसावा म्हणून संतसज्जनांच्या सहवासात रहावे, त्यांचा सदैव अनुग्रह घ्यावा.

गेल्या पाच श्लोकात चालू असलेली ‘सदा संगती सज्जनांची धरावी’ या चौथ्या चरणाची पुनरुक्ति समर्थांनी या श्लोकात समाप्त केली आहे.

**करी वृत्ती जो संत तो संत जाणा।**
**दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा॥**
**उपाधी देहेबुद्धीते वाढवीते।**
**परी सज्जना केवीं बाधु शके ते॥१६८॥**

सरळ अर्थ:

जिचे आचरण भगवंताशी तादात्म्य पावल्यासारखे, शुध्द, असते अशीच व्यक्ति संत, सज्जन म्हणून ओळखावी. सज्जन व्यक्ति वाईट विषयांच्या इच्छा ठेवणारी, केविलवाणी नसते. या साऱ्या वृत्तींमुळे देहबुध्दी, ऐहिक सुखाचे प्रेम, वाढीला लागते. पण खऱ्या संतसज्जनाना देहबुध्दीची कधीही बाधा होऊ शकत नाही.

विश्लेषण:

मागल्या पाच श्लोकात आणि त्याआधीही कित्येक वेळा समर्थांनी संतांच्या संगतीचा, सहवासाचा आग्रह धरला आहे. आता या श्लोकात ते हा संत सज्जन कसा ओळखावा ते स्पष्ट करून सांगत आहेत. बाबानो, मी तुम्हाला सांगतो संतसज्जनाचा उपदेश घ्या, परंतु अशा संतांना सज्जनाला तुम्ही कसे ओळखाल? सत प्रवृत्ती असणारा तो संत. ज्याच्या वागण्यात लांडीलबाडी नसते तो संत. संत म्हणजे कोणी हातचलाखी, चमत्कार करून दाखवणारा जादुगार नव्हे. ख्रिस्ती धर्मात एखाद्याने काही चमत्कार केलेला असेल तर त्याला मरणोपरान्त संत अशी पदवी दिली जाते (canonization). समर्थाना असे संत अपेक्षित नाहीत. आपल्या आयुष्यातच सदाचारी असलेला, विलासी प्रवृत्ती नसलेला, विद्वान, परोपकारी मनुष्य संत असतो. त्याला कसलीही दुराशा, म्हणजे अयोग्य गोष्टींची आशा नसते. आणि अशा दुराशांमुळे जी लाचारी, दैन्य किंवा दीनपणा येतो तो नसलेला, निरिच्छ, सदैव प्रसन्नचित्त, मद-मत्सर-क्रोध-मोह विरहित असलेला मनुष्य संत म्हणून त्यांना अपेक्षित आहे. भोग विलास, कर्मकांडे, कुठल्याही

गोष्टीचा अतिरेक यासारख्या उपाधींमुळे देहबुध्दी वाढीला लागते. संत या उपाधींपासून मुक्त असतो. असा आहे समर्थांना अपेक्षित संत.

**नसे अंत आनंत संता पुसावा।**
**अहंकारविस्तार हा नीरसावा॥**
**गुणेवीण निर्गुण तो आठवावा।**
**देहेबुद्धिचा आठवू नाठवावा॥१६९॥**

सरळ अर्थ:

अनंत असलेल्या परमात्म्याच्या स्वरूपाविषयी संत महंताना विचारावे. मी, माझे, माझ्यासाठी अशा मीपणाची वाढ आपल्या मनात होऊ देऊ नये. त्रिगुणांपासून मुक्त अशा निर्गुण, निराकार परमेश्वराचे ध्यान करत रहावे. आणि त्यासाठी देहबुद्धीचे विस्मरण होऊ द्यावे.

विश्लेषण:

ज्याला कसल्याही मर्यादा नाहीत, ना काळाच्या, ना व्याप्तीच्या, जो शाश्वत आहे, ज्याला अंत नाही तो अनंत. आणि असे अनंत, शाश्वत तत्व काय आहे ते १६७व्या श्लोकात समर्थांनी सांगितले. असे शाश्वत तत्व म्हणजे परब्रम्ह, परमेश्वर. त्याचे ज्ञान होण्यासाठी सदा संगती संत सज्जनांची धरावी हे १६७पर्यंतच्या पाच श्लोकांत सांगितले आणि असे ज्ञान देणारे संत कोण, कसे असतात ते १६८व्या श्लोकात सांगितले. या श्लोकात ते पुन्हा एकदा स्पष्ट सांगताहेत की संतांना अनंताविषयी विचारावे. खरे काय ते तेच सांगू शकतील. अशा ज्ञानी संतांकडे पृच्छा करण्यासाठी जाताना जिज्ञासूने कसे असले पाहिजे? प्रश्न कसले विचारले पाहिजेत? तर प्रश्नकर्त्याने निरहंकारी होऊन नम्रपणे संतांकडे जावे. विचारायचे प्रश्न केवळ अध्यात्माविषयी, अनंताविषयीच असावेत. मला लॉटरी लागेल का? माझ्या मुलीचे लग्न होईल का? मुलगा पास होईल का? असले प्रपंचासंबंधीचे प्रश्न विचारून खऱ्या संतांची किंमत कमी करू नका. असले प्रश्न कुडबुड्या ज्योतिषांना विचारावेत.

कधी हातावरच्या रेषा वाचल्याचे ढोंग करून तर कधी पाखराकडून पाकीट उचलून ते त्यांची उत्तरे देतील. खरे ज्ञानी संत त्यांची उत्तरे देणार नाहीत. कारण ते अशा गोष्टींच्या पलीकडे गेलेले असतात. त्यांचा अधिकार मोठा असतो त्यामुळे परमेश्वराविषयीच्या, परमार्थाविषयीच्या प्रश्नांची उकल ते करू शकतात. अर्थात ते जे सांगतात ते कळण्यासाठी विचारणाऱ्याच्या मनात निर्गुण निराकार परमेश्वराच्या अस्तित्वाविषयी पूर्ण विश्वास असला पाहिजे. विषयोपभोगाची त्याला आठवणदेखील ही ज्ञानसाधना करताना यायला नको आहे.

**देहेबुद्धि हे ज्ञानबोधे त्यजावी।**
**विवेके तये वस्तुची भेटी घ्यावी॥**
**तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे।**
**म्हणोनी सदा तेचि शोधीत जावे॥१७०॥**

सरळ अर्थ:

आत्मज्ञान मिळवून देहबुध्दीचा त्याग करायला हवा. अनावश्यक विषयांची इच्छा न धरता विवेक बाळगून केवळ जीवनावश्यक अशाच गोष्टी मिळाव्यात एव्हढी माफक अपेक्षा ठेवावी. आत्मज्ञान मिळून परमेश्वराशी तादात्म्य पावणे, वृत्ती तदाकार होणे हे देहबुध्दी असताना, सहजासहजी साध्य होण्यासारखे नाही. त्यासाठी सदैव साधना करत रहायला हवे.

विश्लेषण:

आजवरच्या उपदेशातून समर्थ देहबुध्दी टाकावी, देहबुद्धी आठवू नये, देहबुध्दी आत्मबुध्दीत बदलावी वगैरे फिरून फिरून सांगत आले आहेत. त्यावरून जर त्याना देहबुद्धीचे संपूर्ण वावडे अपेक्षित आहे असा अर्थ घेतला तर ते चुकीचे होईल. देहबुध्दी म्हणजे शरीरधर्म. ज्याचं अस्तित्व नाकारता येत नाही. देह आहे, शरीर आहे म्हणजे त्याच्या भरणपोषणासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी तर

केल्या पाहिजेतच. देहाला जिवंत ठेवण्यासाठी अन्न ग्रहण, प्राशन करायला हवे. त्याच्या आरोग्यासाठी स्वच्छता ठेवायला हवी, त्याच्या विसाव्यासाठी निद्रा घ्यायला हवी अगदी प्रजोत्पादनासाठी म्हणून इंद्रीयभोगही करायला हवा. या सगळ्या आवश्यक असलेल्या क्रिया करणे म्हणजे देहबुद्धी किंवा सोप्या शब्दात शरीरधर्म झाला. पण कुठल्याही धर्मातील क्रियांचा अतिरेक करणारा धर्मांध, अतिरेकी किंवा fanatic म्हटला जातो आणि त्याच्याशी संपर्क टाळला जातो. तसेच या शरीरधर्माचे आहे. त्याचा अतिरेक केला, त्याच्यासाठीची लोलुपता बाणवली गेली तर ते त्याज्य ठरते. हे समर्थांना अपेक्षित आहे. अशा देहबुद्धीच्या त्यागाविषयीदेखील विवेक बाळगला पाहिजे असेही ते सांगतात. मनात आले म्हणून किंवा संतांनी सांगितले म्हणून एका रात्रीत हे सगळे बंद करायचे असे नाही. यातील काय आणि किती आवश्यक आहे ते आणि तितके विचारपूर्वक, विवेकाने करायचेच. इथे ज्ञानबोध येतो. त्याग जो करायचा तो किती आणि कसा करायचा, कधी करायचा, का केला पाहिजे वगैरे नीट आकलन करून घेऊन त्याबद्दल सारासार विवेक बाळगून करायचा. थोडक्यात म्हणजे देहबुध्दीचे अवडंबर माजवायचे नाही. आणि मग अशा प्रकारे देहबुध्दीचा त्याग झाल्यानंतर जे सत्य तत्व आहे त्याचा शोध घ्यायचा. सत्य तत्व म्हणजे परमेश्वर. त्याच्या विषयीचे ज्ञान, म्हणजे खरे तर आत्मज्ञान मिळवण्यासाठीचे प्रयत्न सुरु करायचे. त्याच्याशी तदाकार, तद्रुप होणे हे सहजसाध्य नसते. कारण आपली बुध्दी ही अहंकार, देहधर्माची आसक्ति यांनी लिप्त असते. त्यांचे निरसन, निराकरण केल्यानंतरच साधनेला आरंभ होत असतो आणि ही शोध घेण्याची साधना अखंडीत, प्रयत्नपूर्वक आणि सदैव करावी लागते.

||श्रीराम||

## दशक अठरावे

**असे सार साचार तें चोरलेसे।**
**इहीं लोचनी पाहता दृश्य भासे॥**
**निराभास निर्गुण तें आकळेना।**
**अहंतागुणे कल्पिताही कळेना॥१७१॥**

सरळ अर्थ:

जे सार, म्हणजे सत्य असते ते लपलेले असते. पण केवळ डोळ्यांना जे दिसते तेच सार आहे, त्यापलिकडे दुसरे काही नाही अशी विचारधारणा आपण अहंकारापोटी बाळगतो त्यामुळे परमेश्वरतत्व जे निर्गुण, निराकार, निराभास असे आहे, लपलेले म्हणजे अदृश्य असे आहे ते आकलन होत नाही, त्याची कल्पनादेखील या अहंकारामुळे आपण करू शकत नाही.

विश्लेषण:

परमेश्वराचे अस्तित्व हे सत्य आहे. ते लपलेले म्हणजे अदृश्य असते यालाच समर्थ चोरलेले असणे असे म्हणत आहेत. जरा गंमत म्हणून उदाहरण देतो, पूर्वीच्या बायकांचा एक आवडता शब्दप्रयोग असे -‘चोरट्या अंगाचा’-. म्हणजे काय तर ‘दिसायला लहान चणीचा पण खरा बऱ्यापैकी जाडजूड’. जाडी लपलेली अशी. किंवा मुली जरा मोठ्या होऊ लागल्या म्हणजे आपल्या शरीरातील बदल दिसून येऊ नये म्हणून अंग चोरून घ्यायच्या. लपवायचा प्रयत्न करायच्या. आपण अदृश्य होऊ शकतो असं त्यांना वाटत असावं. तर हे असं हे चोरलेले असणे म्हणजेच झाकलेले, लपलेले असणे. आता परमेश्वर काही स्वत:ला चोरून ठेवत नाही. फक्त तो आपल्याला दिसत नाही. डोळ्यांना दिसतो असे वाटते ते काय असते? फक्त मूर्ती, शेंदूर फासलेला दगड किंवा असेच काही तरी. पण सार साचार, म्हणजे खरे परमेश्वर तत्व, परब्रह्म तत्व हे त्या मूर्तीत नसते. कारण ते तर

निराकार, निर्गुण, असे आहे. आपण मूर्तीपूजा करतो म्हणजे मूर्तीच्या ठिकाणी हे निर्गुण निराकार देवत्व लपलेले आहे अशी केवळ कल्पना करतो. आणि आपल्या अहंकारापोटी आपण पुजत असलेली मूर्ती इतर मूर्तींपेक्षा जास्त खरी आणि नवसाला पावणारी आहे वगैरे भ्रामक कल्पनांच्या आहारी जातो. त्यामुळे अर्थातच परब्रह्मतत्वाच्या सत्य स्वरूपाविषयी अनभिज्ञ राहतो.

**स्फुरे वीषयी कल्पना ते अविद्या।**
**स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या॥**
**मुळीं कल्पना दो रूपें तेचि जाली।**
**विवेके तरी स्वस्वरुपी मिळाली॥१७२॥**

सरळ अर्थ:

देहबुध्दीपोटी आपण ज्या कल्पना करतो त्या अज्ञानजन्य असतात त्यांना अविद्या म्हटले जाते. पण ज्या कल्पना ब्रह्मज्ञान प्राप्तीसाठी असतात त्याना सुविद्या म्हटले जाते. अविद्या आणि सुविद्या या दोन्हीही 'कल्पना' या एकाच स्वरूपात असतात. सारासार विचार केल्यानेच त्या वेगळ्या ओळखता येतात.

विश्लेषण:

जीव आहे म्हणजे त्याला देह आहे आणि त्याला आत्माही आहे. या दोन्ही गोष्टींवर प्रभुत्व गाजवणारी आणखी एक गोष्ट जीवाकडे आहे ती म्हणजे मन. मनामध्येच देहबुद्धी निर्माण होते आणि मनातच आत्म्याशी संबंधित आध्यात्मिक विचारधारा निर्माण होते. मन हे चंचल असते. एका क्षणी एक विचार तर दुसऱ्या क्षणी कदाचित त्याच्या विरोधातला विचार असा प्रकार चालू असतो. आता हे परस्पर विरोधातले विचार म्हणजे चांगले आणि वाईट या दोनच प्रकारात मोडतात. या श्लोकाच्या तिसऱ्या चरणात समर्थ हेच सांगताहेत. मनात उपजते ती भावना म्हणजे कल्पना. मूलत: एकच असलेली ही कल्पना दोन रूपे घेऊन अवतरते. चांगली, म्हणजे आत्म्याशी संबंधित, परमार्थाची, किंवा परब्रम्हविषयक विचारांची – सुविद्येची, ज्ञानाची कल्पना आणि वाईट म्हणजे

देहबुद्धीशी संबंधित वैषयिक अविद्येची, अज्ञानाची कल्पना. आत्म्याच्या समाधानाकडे म्हणजेच ब्रह्मज्ञानप्राप्तीच्या आकांक्षेकडे दुर्लक्ष करून केवळ देहबुध्दीने पंचेंद्रियांचे सुखच कल्पित जाणारी अज्ञानदर्शक कल्पना ती अविद्या, आणि देहाच्या भरणपोषणासाठी आवश्यक असतील तेव्हढ्याच त्याच्या मागण्यांचा विचार करून बाकी आत्मिक ज्ञान मिळवण्याच्या, परमात्म्याशी तद्रुप होण्याच्या साधनेत मग्न राहणारी कल्पना ती सुविद्या. या एकाच कल्पनेच्या दोन रूपांमधील अनुकरणीय, पाठपुरावा करण्यासारखे रूप कोणते ते नीट, सखोल, विवेकपूर्ण विचारानेच ठरवता येते आणि अंगी बाणवता येते.

**स्वरुपी उदेला अहंकार राहो।**
**तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो॥**
**दिशा पाहतां ते निशा वाढताहे।**
**विवेके विचारे विवंचुनि पाहे॥१७३॥**

सरळ अर्थ:

मनात जो अहंकाररुपी पापग्रह – राहू जन्म पावला आहे त्याने सारे आकाश व्यापून टाकले आहे. त्यामुळे जिकडे तिकडे अंधाराशिवाय काही दिसत नाही. पण यातून मार्ग काढायचा असेल तर सदसद्विवेकबुध्दीवर विसंबूनच तो काढला पाहिजे.

विश्लेषण:

समर्थ सबंध मनोबोधात फिरून फिरून विवेकाची महती अधोरेखित करतात. आणि ते योग्यच आहे. तारतम्य, सारासार विचार, विवेकबुध्दी या चाळण्या न लावता केलेल्या कृतीचा परिणाम आपल्याकडून चुकीचा मार्ग अवलंबला जाण्यात होऊ शकतो. अविवेक अहंकारातूनच माणसाच्या मनात उगम पावलेला असतो. ‘मी सर्वज्ञ आहे, मी म्हणतो तेच बरोबर आहे’ हा अहंकार मनात उदयाला आला

म्हणजे सदुपदेश धुडकावला जातो. समर्थ अहंकाराला पापग्रह राहू म्हणतात. राहू जसा इतर सर्व ग्रहांना ग्रासत आकाशात वावरत असतो. सूर्य, चंद्रही त्याच्या तावडीतून सुटत नाहीत तसा हा अहंकार भल्याभल्यांना अविवेकी कृत्ये करणे भाग पाडतो. सूर्यग्रहण, चंद्रग्रहण या गोष्टी राहूने त्यांना गिळल्यामुळे होतात ही कल्पना विज्ञानाच्या निकषावर भलेही चुकीची असली तरी सामान्य जनमानसात त्या काळी घर करून होती. आणि मग ग्रहणकाळात जसा सर्वत्र अंधार होतो तसा अंधार जीवनात अहंकाररूपी अविवेकाच्या प्रभावाने होतो. ‘हे बरोबर की ते बरोबर’ यात निवड करणे जमत नाही. आणि चुकीची निवड झाल्याने दु:ख प्राप्त होते. तेव्हा विवेक करावा. आणि त्याच्या मदतीने नीट विचार करूनच निर्णय घ्यावा.

**जया चक्षुने लक्षिता लक्षवेना।**
**भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना॥**
**क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो।**
**दयादक्ष तो साक्षीने पक्ष घेतो॥१७४॥**

सरळ अर्थ:

डोळ्यांनी पाहू गेले तर दिसत नाही, संसारात रममाण व्हावे तर त्यापायी परमेश्वराचा भक्तीने पाठपुरावा केला जाऊ शकत नाही. परमेश्वर अविनाशी आहे आणि जो अविनाशी आहे तोच अक्षय्यमोक्षदायी असतो. तो दयावंत आणि दक्ष असल्याने अप्रत्यक्षपणे सद्भक्ताची बाजू घेतो.

विश्लेषण:

१७१व्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे परमेश्वराचे अस्तित्व चोरलेले, म्हणजे लपलेले आहे. तो अदृश्य आहे. आपण उघड्या डोळ्यांनी, चर्मचक्षूंनी त्याला पाहू म्हटले तर तो दिसत नाही. ज्ञानचक्षूंनी पहायचे म्हटले तरी तो स्वत: निर्गुण, निराकार,

निराभास असल्यामुळे दिसणे शक्य नाही. आणि आपण संसारात गुंतल्याने (भवा भक्षिता) त्याचा निस्सीम भक्तीने पाठपुरावा करायचा म्हटले तर तेही जमत नाही (रक्षिता रक्षवेना). १४९व्या श्लोकाच्या पहिल्या दोन चरणांमध्येदेखील समर्थांनी हेच सांगितलेले आहे. “जगी पाहतां चर्मलक्षी न लक्षे। जगी पाहता ज्ञानचक्षी न रक्षे||” चर्मचक्षु म्हणजे फक्त डोळेच नव्हेत तर डोळे, कान, नाक, जिव्हा आणि त्वचा ज्यांच्या योगाने आपण अनुक्रमे बघतो, ऐकतो, वास घेतो, चव घेतो आणि स्पर्श करतो ती इंद्रिये. अशा इंद्रियांच्या सहयोगाने आपण दृश्य वस्तू जाणू शकतो. पण जे अदृश्य, निराकार आहे त्याचे काय? या चर्मचक्षूंनी आपल्याला त्याचे ज्ञान मिळू शकत नाही, दर्शन होऊ शकत नाही. मग उरले ते ज्ञानचक्षु – मन, बुध्दी. हे विचार करू शकतात, स्वप्न पाहू शकतात, कल्पना करू शकतात. पण त्यांनादेखील निराकार परब्रह्माचे पुरे ज्ञान मिळत नाही मग दर्शन तर फार दूरची गोष्ट. पण असे असले तरी तो परमेश्वर जो अक्षय आहे, अविनाशी आहे तो दयावंत आणि दक्षही आहे. सद्भक्ताच्या निर्वाहासाठी, त्याचा योगक्षेम चालण्यासाठी दक्ष असलेला हा परमेश्वर सद्भक्ताच्या अडचणींमध्ये स्वत: समोर न येता साक्षीने, म्हणजे अप्रत्यक्षपणे -ज्याला आपण हस्ते परहस्ते असे म्हणू शकतो- मदत करतो. त्याला चिरकाल टिकणारा मोक्ष मिळवून देतो. जो स्वत: क्षयातीत म्हणजे अविनाशी आहे तोच शाश्वत स्वरूपाची सायुज्यमुक्ति, किंवा क्षय न होऊ शकणारा, अक्षय्य मोक्ष प्रदान करू शकतो.

**विधी निर्मिता लीहितो सर्व भाळी।**
**परी लीहिता कोण त्याचे कपाळी॥**
**हरू जाळितो लोक संहारकाळी।**
**परी शेवटी शंकरा कोण जाळी॥१७५॥**

सरळ अर्थ:
ब्रह्मदेव सर्वांची भविष्ये त्यांच्या कपाळावर लिहितो. पण त्याच्या स्वत:च्या कपाळावर कोण लिहीत असेल? महादेव सर्व जीवांचा संहार करतो. मग या महादेव शंकराला मारणारा कोणी आहे का? कोण?

विश्लेषण:
ब्रह्मदेव सर्वांची भविष्ये त्यांच्या कपाळावर लिहितो. मग त्याच्या स्वत:च्या भविष्याचे काय? त्याच्या कपाळावर कोण लिहितो? महादेव शंकर सर्वांचा संहार करतो. त्याला मरण कोणाच्या हाती आहे? दासबोधाच्या नवव्या दशकातील पाचव्या समासात समर्थांनी हाच प्रश्न केला आहे:

ब्रह्मयानें सकळ निर्मिलें । ब्रह्मयास कोणें निर्माण केलें । विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कोण ॥२४॥
रुद्र विश्वसंहारकर्ता । परी त्या रुद्रास कोण संहारिता । कोण काळाचा नियंता । कळला पाहिजें ॥२५॥

ब्रह्मा, विष्णू, महेश या तिघांकडे विश्वाची तीन महत्वाची कार्ये आहेत, निर्माण, पालनपोषण आणि संहार. पण ही कार्ये त्यांच्याकडे सोपविली कोणी? प्रलयानंतर त्यांची गती काय? तेदेखील नष्ट होतील तरी सृष्टी शिल्लक राहते. मग तिचा वाली कोण? या गहन प्रश्नाचे उत्तर समर्थ पुढच्या चार श्लोकात मिळून देणार आहेत. या सर्वांपेक्षा मोठा असा देव असला पाहिजे. तो कोण, कसा आहे याचे उत्तर कळायला हवे, म्हणजेच त्या सार साचार ब्रह्माचे ज्ञान व्हायला पाहिजे आहे.

**जगी द्वादशादित्य हे रुद्र अक्रा।**
**असंख्यात संख्या करी कोण शक्रा॥**
**जगी देव धुंडाळिता आढळेना।**
**जगी मुख्य तो कोण कैसा कळेना॥१७६॥**

सरळ अर्थ:

जगात बारा आदित्य आणि अकरा रुद्र आहेत. त्यांना धरून असलेल्या असंख्य देवांत शक्र, म्हणजे इंद्राचाही समावेश कोणी कोणी करतात. पण शोधायला गेलं की 'खरा देव, मुख्य देव कोणता आणि कसा आहे?' तर तो कळून येत नाही.

विश्लेषण:

जगात तेहतीस कोटी म्हणजे तेहतीस पातळ्यांवरचे देव आहेत. ध्यानात घेतले पाहिजे की इथे वापरलेला कोटी हा शब्द लक्ष, कोटी, दशकोटी, अब्ज अशांसारखा संख्यावाचक नाही. बहुतेक लोकांना 'तेहतीस कोटी' चा अर्थ 'तेहतीस करोड' असाच वाटत असतो. पण मुळात संस्कृतात "कोटी" या शब्दाचा अर्थ करोड नसून 'स्तर' किंवा 'पातळी' असा आहे. कल्पना अशी आहे की त्या मोठ्या देवाने, म्हणजे परमेश्वराने सृष्टीचे नियमन करण्यासाठी देवांकडे कार्यभार सोपवले आहेत. त्यांच्यात ८ वसू, ११ रूद्र, १२ आदित्य, २ अश्विनीकुमार असे तेहतीस स्तर आहेत. या स्तरामधील दैवतांची नावे पुढे देत आहे.

अष्टवसूंची नावे – आप, धृव, सोम, धर, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास.

अकरा रूद्रांची नावे – हर, बहुरूप, त्र्यंबक, अपराजित, वृषाकपि, शंभू, कपर्दी, रैवत, मृगव्याध, शर्व आणि कपाली

बारा आदित्यांची नावे – अंशुमान, अर्यमन, इंद्र, त्वष्टा, धाता, पूषन, भग, मित्र, वरूण, सविता, विवस्वान व विष्णू.

दोन अश्विनीकुमार – नासत्य आणि दस्त्र

या सगळ्यांना वाटून दिली गेलेली कामे भिन्न भिन्न आहेत म्हणून त्यांचे स्तर, त्यांच्या कोटीही भिन्न. पण मग प्रश्न असा उठतो की त्यांचे हे वेगवेगळे स्तर, कोटी कोणी ठरवल्या? त्यांच्या कामांचे वाटप कोणी केले? कोण आहे तो मुख्य देव जो या सगळ्याहून श्रेष्ठ आहे? आणि कसा आहे तो? याचे ज्ञान मिळवणे ही मोठीच साधना आहे.

**तुटेना फुटेना कदा देवराणा।**
**चळेना ढळेना कदा दैन्यवाणा॥**
**कळेना कळेना कदा लोचनासी।**
**वसेना दिसेना जगी मीपणासी॥१७७॥**

सरळ अर्थ:
हा जो मुख्य देव आहे तो मूर्तीसारखा तुटत फुटत नाही. आपल्या कर्तव्यापासून चळत किंवा ढळत नाही, बापुडवाणा होत नाही. पण तो काय आहे, कसा आहे ते कोणालाही कळत नाही. याचं कारण हेच आहे की अहंकार धारण करणाऱ्याला त्याचे अस्तित्व कदापि दिसत नाही.

विश्लेषण:
समर्थ म्हणतात हा जो मुख्य देव, देवराणा आहे तो निर्गुण निराकार आहे. त्यामुळे तो तुटण्या फुटण्याची शक्यताच नाही. आपण देव म्हणून मूर्ती देव्हाऱ्यात ठेवतो, देवळात प्रतिस्थापित करतो. त्या मूर्ती कालांतराने म्हणा किंवा पूर्वी आक्रमणांमध्ये व्हायच्या तशा म्हणा, भंग पावतात. अगदी आत्ताही भक्त मूर्तींना दह्यादुधाचा अभिषेक करतात, नाना प्रकारची सुगंधी विलेपने लावतात. आणि त्यांना घासून पुसून स्वच्छ करतात. अशामध्ये त्यांची झीज होतेच. आणि मग कालांतराने त्या गुळगुळीत होऊन नाक, डोळे, ओठ काही दिसत नाही अशा विद्रूप

होतात. गणेशविसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी समुद्रकिनाऱ्यावर पडलेल्या मूर्तींच्या अवशेषांची दशा डोळ्यांपुढे आणा. हात पाय तुटलेले, शीर्ष आकाशाकडे डोळे लावून पडलेले असे केविलवाण्या अवस्थेत त्या पडलेल्या दिसतात. पण खरा देवराणा, ईश्वर असा त्या नश्वर मूर्तीसारखा झिजत, तुटत फुटत आणि दीनवाणा होत नाही. कारण मूर्तीसारखा तो सगुण नाही. निर्गुण आहे. आपल्या डोळ्यांना दिसत नाही. त्याची भक्ति मनोमन करायची असते. पण 'आमच्या मंडळाचा गणपती सर्वात मोठा, छान सजवलेला आहे, लाखो रुपयांचा आहे, राजा आहे' अशा बढाया मारणारे आम्ही आमच्या अहंकारामुळे खऱ्या परमेश्वरापासून दूरच रहातो. आमच्या मनात राहते ती भव्य आकाराची मूर्तीच, मूठभर आकाराच्या हृदयात सामावणारा परमेश्वर नाही. तो या मीपणाच्या भावनेने पछाडलेल्या जगात रहातच नाही.

**जया मानला देव तो पुजिताहे।**
**परी देव शोधूनि कोणी न पाहे॥**
**जगी पाहता देव कोट्यानुकोटी।**
**जया मानली भक्ति जे तेचि मोठी॥१७८॥**

सरळ अर्थ:
जो तो आपण मानू तोच देव असे म्हणून त्याला पुजतो पण खऱ्या देवाला शोधून काढायचे कष्ट घेत नाही. जगात देवांची संख्या मोजता न येण्यासारखी झाली. पण अखेर भक्ति हीच खरी आणि महत्वाची असते.

विश्लेषण:
एक ईश्वर, पण प्रत्येकाच्या मनात त्याचे रूप वेगळे. वस्तुत: निर्गुण असलेला देव मूर्तीच्या रुपात सगुण होतो. आणि हे सगुण रूप हे ज्याच्या त्याच्या कल्पनेनुसार बनते. चार हातांचा, चार मस्तकांचा, तीन डोळ्यांचा, गजमुखाचा,

वानराच्या देहातला, अनेक रूपे आपणच सगुण देवाला प्रदान करतो. आणि त्या रूपाची प्रार्थना, पूजा करतो. अडचणीत असल्यामुळे म्हणा, दु:खाने गांजलेले असल्यामुळे म्हणा की आणि काही कारणामुळे म्हणा, तो देव चमत्कार करून आपल्या अडचणी, दु:खे दूर करेल या अपेक्षेने आपण त्याला गाऱ्हाणे घालतो, भोग चढवतो, आणि तो मूर्तीच्या रूपातला देव कधी पावेल याची वाट बघत रहातो. सगुण रूपाच्या प्रेमात आपण निर्गुण देवाची कल्पनाच करू बघत नाही. भगवद्गीतेच्या सातव्या अध्यायात भगवान म्हणतात:

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धया ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम▯।२४॥

(मूढांना ना कळत रूप मम शाश्र्वत, अव्यक्त ।
अज्ञानाच्या पोटि समजती मजला ते व्यक्त ॥२४॥)

समर्थही म्हणतात की जो ज्या स्वरूपाला देव मानतो त्याचीच तो पूजा करतो आणि खऱ्या परमेश्वर तत्वाचा शोध घेण्याचे कष्ट घेत नाही. यामुळेच जगात अशा देवांची संख्या लाखो, करोडो अशी, कोट्यानुकोटी झाली आहे. पण हे जे होते आहे ते त्या खऱ्या देवाच्या, परमेश्वराच्याच करणीने. स्वत: भगवंतानी गीतेच्या सातव्या अध्यायात म्हटले आहे:

यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम▯।२१॥

(जो ज्या देवावरती श्रध्दा ठेवाया बघतो ।
त्याला त्या श्रध्दास्थानाशी मीच स्थिर करतो ॥२१॥)

भक्ति खरी, मनापासून केलेली असली तर ती महत्वाची कारण मूळ संस्कृतात असलेल्या सुभाषिताप्रमाणे:

आकाशात पतितं तोयं यथा गच्छति सागरम ।
सर्वदेवनमस्कार: केशवं प्रति गच्छति ॥

(नभातून होणारी वृष्टी सागरादिशेने पळते ।
तसे सर्वा देवांना नमिता नमन केशवाला मिळते ॥)
तात्पर्य हे की भक्ति महत्वाची, कोणत्या देवाची हे महत्वाचे नाही.

**तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले।**
**तया देवरायासि कोणी न बोले॥**
**जगीं थोरला देव तो चोरलासे।**
**गुरूवीण तो सर्वथाही न दीसे॥१७९॥**

सरळ अर्थ:
त्रैलोक्याची उत्पत्ती ज्याने केली त्या थोरल्या - मोठ्या देवाबद्दल, परमेश्वराबद्दल कोणी काही बोलत नाही. कारण हा थोरला देव अदृश्य, लपलेला असतो. आणि सद्गुरूच्या मार्गदर्शनाच्या योगानेच तो दिसू शकतो अन्यथा नाही.

विश्लेषण:
या श्लोकापासून पुढे चार श्लोकांमध्ये समर्थ या थोरल्या देवाविषयीचे ज्ञान केवळ सद्गुरूच्या सहाय्यानेच मिळेल आणि तो सद्गुरू कसा ओळखायचा याबद्दल सांगत आहेत. यापूर्वीही बऱ्याच श्लोकांत त्यांनी संत सज्जन किंवा सद्गुरू आणि त्यांचे मार्गदर्शन याबद्दल सांगितले आहे. इथे ते म्हणतात (कोट्यानुकोटी असलेल्या देवांपेक्षा) खरा असलेला थोरला देव, देवराया हा या त्रैलोक्याचा निर्माणकर्ता आहे. त्याच्याकडूनच या तीनही लोकांची निर्मिती झाली. पण

त्याच्याविषयी कोणी काही बोलत नाहीत. म्हणजे त्याच्याविषयी कोणाला काही ज्ञान नाही. माहितीच नसेल तर कोण काय बोलणार? नाही का? समोर असलेल्या गोष्टीबद्दल आपण सांगू शकतो की ती गोष्ट मोठी आहे, लहान आहे, पिवळ्या, निळ्या, काळ्या रंगाची आहे, मृदू आहे, कठीण आहे, अशी आहे, तशी आहे. पण डोळ्यांसमोरच नसलेल्या गोष्टीचं वर्णन काय करणार? हा थोरला देव चोरलेला आहे. म्हणजे तो लपलेला आहे. चर्मचक्षूंना तो ना दिसतो ना जाणवतो. ज्ञानचक्षूंनी तरी जाणता येतो का? शक्यता आहे. पण केव्हा? अधिकारी व्यक्तीने, सद्गुरूने मार्गदर्शन केले तर. 'आपल्याला कळत नाही मग सद्गुरू झाला तरी तो आपल्यासारखा मानवच आहे . मग तो सहाय्य कसे काय करू शकेल? त्याला कसे मिळाले हे ज्ञान?' हा प्रश्न विचारला जाईल. इथे अधिकारी असणे हा गुण महत्वाचा. असा अधिकार प्राप्त होतो तो जेव्हा त्या व्यक्तीने अनन्य भक्तीने, साधना करून परब्रह्माविषयीचे ज्ञान प्राप्त करून घेतलेले असेल, परमेश्वराचे अस्तित्व त्याला जाणवलेले असेल तेव्हा. अशा अधिकारी गुरुकडून उपदेश, योग्य भक्ती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन, ज्ञान मिळाले तरच अदृश्य अवस्थेतला थोरला देव आपल्याला कळू शकेल.

**गुरु पाहता पाहता लक्ष कोटी।**
**बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी॥**
**मनी कामना चेटके धातमाता।**
**जनी व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता॥१८०॥**

सरळ अर्थ:

जगात गुरु अगणित आहेत, लाखो, कोटीच्या संख्येने मिळतील. बहुतेकजण मंत्रतंत्र, चेटूक करणारे, खोटे चमत्कार दाखवणारे असे असतात. अशा लोकांना किंमत देणे योग्य नाही कारण ते काही मुक्ति मिळवून देऊ शकत नाहीत.

विश्लेषण:

मागील श्लोकात समर्थांनी परमेश्वराच्या भक्तीसाठी गुरूची आवश्यकता असल्याचे सांगितले. या श्लोकात ते खरा गुरू कसा असतो ते सांगतात. आज जगात तथाकथित गुरूंचे पेव फुटले आहे. इथे शिक्षणसंस्थांमधील गुरू किंवा शिक्षक यांच्याबद्दल अनादर दाखवण्याचा उद्देश नाही. तर बाबा, स्वामी, संत, गुरू अशी नाना विशेषणे स्वत:ला लावून घेऊन भोन्दुपणा करणाऱ्या तथाकथित गुरूबद्दल समर्थांना बोलायचे आहे. असे भोंदू गुरू "आपल्यामध्ये मोठी मंत्रशक्ती आहे, तुला जे हवे ते मी मिळवून देतो" असे सांगतात आणि हातचलाखी, जादूटोणा करून भोळ्या भाबड्यांचा गैरफायदा घेतात. हे कसले गुरु? हे तर मनात कामना, वासना ठेवणारे चेटके. अशा गुरु, स्वामी, बाबा इत्यादींपासून सावध आणि दूरच रहायचे असते. ना ते संत असतात ना सज्जन. ब्रह्मद्न्यान, मुक्ति देऊ शकणारे अधिकारी गुरू तर ते नव्हेतच.

॥श्रीराम॥

## दशक एकोणिसावे

**नव्हे चेटकी चाळकू द्रव्यभोंदू।**
**नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू॥**
**नव्हे उन्मतू वेसनी संगबाधू।**
**जनी ज्ञानिया तोचि साधु अगाधू॥१८१॥**

सरळ अर्थ:

चेटूक करणारे, फसवाफसवी करणारे, धनलोभी, भोंदू, इतरांची निंदा नालस्ती करणारे, मत्सरी, भक्तीचा अभाव असलेले, गर्विष्ठ, व्यसनी, वासनांमध्ये बुडालेले लोक साधू म्हणवून घेण्यास पात्र नसतात. खरोखर ज्ञानी असलेली व्यक्तीच साधू असते.

विश्लेषण:

मागील श्लोकात आणि या पुढच्या तीन श्लोकात समर्थ जसे खरा गुरु कसा नसतो हे सांगत आहेत त्याचप्रमाणे गुरुमधल्या चांगुलपणाची लक्षणे काय असतात तेही सांगत आहेत. हस्तलाघव दाखवून फसवणारे लोक भोंदू असतात. धनलोभी असल्यामुळे फसवणुकी करून दुसऱ्याचे धन हडप करण्याचाच हेतू ते बाळगतात. गंडेदोरे, चेटूक, काळी जादू करणारे हे लोक त्यांनी कितीही आव आणला तरी खरे ज्ञान प्राप्त झालेले गुरु असत नाहीत. असल्या जारणमारण विद्यांमधून काही चांगले निष्पन्न होत नाही मग अशा विद्यांचे जाणकार चांगले कसे म्हणता येतील? त्याचप्रमाणे कुचाळकीखोर, परनिंदा करण्यात आनंद घेणारे, मनात मत्सर बाळगणारे, दुसऱ्याचे चांगले होत असेल तर ते ज्याना बघवत नाही असे, ईश्वर भक्तीचा मागमूसही ज्यांच्या मनात नसतो असे लोकदेखील दुसऱ्याला काही ज्ञान देऊ शकतील अशा पात्रतेचे नसतात. चांगल्या वाइटाचा विधिनिषेध न बाळगता नाना प्रकारच्या व्यसनांत रममाण होणारे, विषयवासनांमध्ये सदैव डुंबत राहणारे,

अहंकाराचा दर्प ज्यांच्या विचारात, आचारात, उच्चारात भरून राहिलेला असतो अशांचे स्वत:चे मनच कुठल्याही सद्‌विचारांचे ज्ञान सामावून घेण्याला असमर्थ असते मग ते इतरांना सदुपदेश कुठून देणार? हे सारे लोक साधुत्वापासून पराकोटीच्या अंतरावर असतात. खरे साधू अशांपैकी एकाही दुर्गुणाने लिप्त नसतात कारण सद्‌विचारांचे, सद्‌भावनांचे, सदाचारांचे अगाध ज्ञान त्यांच्या मनात ओतप्रोत भरलेले असते.

**नव्हे वाउगी चाहुटी काम पोटी।**
**क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी॥**
**मुखे बोलिल्यासारिखे चालताहे।**
**मना सद्‌गुरु तोचि शोधूनि पाहे॥१८२॥**

सरळ अर्थ:

सद्‌गुरू, सज्जन असलेली व्यक्ती ना वायफळ कल्पना, चावट कामना पोटात ठेवून वावरते, ना काही सत्कार्य केल्याशिवाय नुसती बडबड, बढाया मारते. संतसज्जन व्यक्ती जसे बोलेल तसेच आचरण ठेवेल. अशा सद्‌गुरूचा, हे मना, तू शोध घे.

विश्लेषण:

सद्‌गुरूने विद्‌वान असणे हे एक लक्षण आहेच परंतु नुसती विद्‌वत्ता असूनही उपयोग नाही. जर अशा विद्‌वानाच्या ओठावर एक आणि पोटात दुसरेच असा प्रकार असेल तर त्याची गुरु म्हणवून घेण्याची पात्रता नाही. खूप वाचन केले आहे, पठन केले आहे पण मनात वावग्या कल्पना आहेत, लंपटतेच्या कामना आहेत, अशी व्यक्ती निष्णात वक्ता बनू शकेल, सुयोग्य गुरु नाही. वाचनापोटी मिळालेल्या ज्ञानातून आपण स्वत: अनुभव न घेता आणि त्यावर स्वत:चा ठाम विश्वास न ठेवता पोपटपंची केल्यासारखे ज्ञान शिष्याच्या कानावर घालायचे हे केवळ बोलघेवड्या वक्त्याचे काम आहे. राजकारणात असे अनेक पुढारी आपल्याला दिसतात जे भाषणे ठोकतात, "हमे ऐसा करना होगा, हम यह करेंगे,

वह करेंगे', 'तुम्ही आमच्या पक्षाला मत द्या, आम्ही तुम्हाला रामराज्य देऊ', 'परदेशातील बँकांत लपवलेल्या काळ्या धनातली पै न पै आम्ही देशात परत आणू...' काय अन क्काय ! प्रत्यक्षात काही होत नाही. हे कसले पुढारी? खरेच काही केल्याशिवाय फक्त तोंडाचा पट्टा चालवणारे हे तर केवळ वाचावीर! हे काही कामाचे नाही. खरे पुढारी, खरे गुरु असे नसतात. ते एक तर आधी करतात आणि मग बोलतात. नाही तर बोलल्यासारखे करून तरी दाखवतात. दुर्मिळ असतात असे गुरु. सहजासहजी आढळत नाहीत. पण मनोभावे शोधले, श्रद्धापूर्वक शोधले तर अशा योग्यतेच्या गुरूचा लाभ होतो. तेव्हा हे मना, तू अशा सद्गुरूचा मनोभावे शोध घे.

**जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी।**
**कृपाळु मनस्वी क्षमावंत योगी॥**
**प्रभु दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे।**
**तयाचेनि योगे समाधान बाणे॥१८३॥**

सरळ अर्थ:

लोकांमध्ये राहणारा सद्गुरू, जो भक्त आहे, ज्ञानी, आहे, विवेकी आहे, सन्यस्त वृत्ती बाळगणारा, कृपाळू, मनावर पूर्ण नियंत्रण ठेवणारा, क्षमाशील आहे, योगी, सामर्थ्यवान, जागरूक, विद्वान आणि सर्व प्रकारचे चातुर्य अंगी असलेला आहे अशा सद्गुरूच्या सान्निध्यामुळे आपल्याला समाधान लाभते.

विश्लेषण:

बोले तैसा चाले असा हा सद्गुरू आणखी कसा असतो? अनेक गुण आहेत जे अशा सुयोग्य गुरूमध्ये असणे आवश्यक असते. समर्थ या श्लोकात सद्गुरूच्या ठायी असाव्या लागणाऱ्या गुणांपैकी प्रमुख बारा गुणांचा उल्लेख करत आहेत. सर्वात प्रथम म्हणजे सद्गुरू परमेश्वराचा निष्ठावान भक्त असायला पाहिजे. तो स्वत: भक्त नसेल तर शिष्याच्या मनात भक्ती तो कशी काय निर्माण करू

शकणार? आणि भक्ती नसेल तर मुक्ती कशी मिळणार? दुसरे म्हणजे सद्गुरूने ज्ञानी असलेच पाहिजे, अन्यथा तो शिष्याला काय शिकवणार? 'मुख्य सद्गुरूचे लक्षण, आधी पाहिजे विमळ ज्ञान' (दासबोध). पोकळ बाता मारून लोकांना भुलवता येईल पण असे दिले गेलेले पोकळ, निष्फळ ज्ञान शिष्याला अडाणीच ठेवेल. विवेक, म्हणजे सार-असार, खरे-खोटे, ग्राह्य-त्याज्य, इष्ट-अनिष्ट, योग्य-अयोग्य यांमधील भेद नीट जाणून, काय करायचे आहे त्याचा ठाम आणि अचूक निर्णय घेणे हा तिसरा गुण आहे. यानंतर येते वैराग्य. विषयवासना, देहबुध्दी, हव्यास, लालसा या दुर्गुणांचा त्याग म्हणजे विरक्ती, वैराग्य. लोकांमध्ये राहून, प्रपंच करीत असूनही अनासक्त राहणे हे वैराग्य. सद्गुरुकडे असे वैराग्य असणे आवश्यक आहे. सद्गुरू आणखी कसा असावा? दीनदुबळ्यांसाठी कृपावंत असणे, स्वमन पूर्णत: नियंत्रित करून असणे, इतरेजनांच्या चुकांकडे क्षमाशीलतेने पहाणे हीदेखील सद्गुरूसाठी आवश्यक लक्षणे आहेत. आणि अशी व्यक्ती लेचीपेची, सहजतेने वाकणारी असता कामा नये, सद्गुरू स्वत: हिंमतवान, सामर्थ्यवान असला पाहिजे, नेहमी सतर्क, चौकस, जागरूक असणारा, अत्यंत चतुर असून विद्वत्तेत कमी नसणारा असा असला पाहिजे सद्गुरु. अशा सर्व गुणांनी संपन्न असलेल्या गुरूच्या सान्निध्यात राहून त्याच्याशी विचारविमर्ष करीत ज्ञानोपासना करण्याने, त्याचा सदुपदेश ग्रहण करण्याने शिष्याला ज्ञानप्राप्तीबरोबरच आत्मिक समाधान लाभते.

**नव्हे तेचि जाले नसे तेचि आले।**
**कळो लागले सज्जनाचेनि बोले॥**
**अनिर्वाच्य ते वाच्य वाचे वदावे।**
**मना संत आनंत शोधीत जावे॥१८४॥**

सरळ अर्थ:

जे नव्हते ते निर्माण झाले, जे नसते ते दृश्यमान झाले. यामागचे गूढ काय ते संतसज्जनांच्या सांगण्यामुळे कळून येते. जे खरे तर वर्णन करता येत नाही ते

स्पष्ट करून सांगण्याचे काम हे संतसज्जन करतात म्हणून आपल्याला अपेक्षित असलेल्या अनंताचा  बोध होण्यासाठी अशा सज्जनांचा शोध घेतला पाहिजे.

विश्लेषण:

परब्रह्माची निर्मिती शून्यातून झाली असे म्हणतात. शून्य म्हणजे ज्यात काही नसते ते. मग अशा काहीही  नसलेल्या गोष्टीतून काहीतरी निर्माण होते याचे गूढ काय? ही अचंभित करणारी घटना आहे हे खरेच. बरे, परब्रह्म झाले म्हणजे तरी काय झाले? ते कोणाला दिसले आहे काय? नाही. पण आपण त्याची कल्पना करतो. समर्थांच्या या श्लोकातील पहिल्या ओळीतील पहिला भाग – नव्हे तेचि जाले – हा या परब्रह्माच्या 'काही नसताना निर्माण होणे' या भूमिकेकडे निर्देश करतो. आता दुसरा भाग – नसे तेचि आले – त्याचा विचार करूया.  परब्रह्म निर्गुण, निराकार आहे आणि तरीही परब्रह्माचे सगुण रूप कल्पून 'महादेव हा कपाळावर तिसरा डोळा असलेला, व्याघ्रचर्म पांघरणारा, त्रिशूल, डमरू धारण करणारा आहे, तर ब्रह्मदेवाला चार मस्तके आहेत, गणेशाला हत्तीचे मस्तक असून तो तुन्दिलतनु आहे, सुदर्शनचक्रधारी विष्णू हा क्षीरसागरात शेषनागाच्या अंगावर पहुडलेला आहे' अशा रुपात आपण साऱ्या देवांना पाहतो. म्हणजेच निर्गुणाला सगुण करून त्याचे भजन, पूजन करतो. हे कशामुळे?, किंवा कोणामुळे? तर 'कळो लागले सज्जनाचेनि बोले'. विद्वान विचारवंत सज्जन गुरूंनी हे प्रतिपादन त्यांच्या ज्ञानदानातून आपल्याला दिले. म्हणजे थोडक्यात, विश्व, ब्रह्मांड, परमेश्वर यांच्या उत्पत्तीपासून ते त्यांच्या कल्पित, अकल्पित अस्तित्वापर्यंत सारे काही आपल्याला संत सज्जनांमुळेच कळून आले आहे हे निर्विवाद. पुढे समर्थ म्हणतात, असे हे परब्रह्म कसे असेल ते आपण सामान्यजन शब्दात वर्णन करू शकत नाही. ते अनिर्वचनीय आहे. सज्जनांकडून मिळालेल्या त्याच्या अस्तित्वाच्या निर्देशाप्रमाणे फक्त 'ते आहे' असे म्हणू शकतो. त्यामुळे आपण त्या अनिर्वाच्य ब्रह्माच्या असण्याचा उल्लेख आपल्या वाचेमधून, वाणीमधून करत राहावे आणि

त्याच्यासंबंधाने सत्यबोध व्हावा, त्याचा चिरकालिक, अनंत असण्याचा गुणविशेष समजण्यासाठी मार्गदर्शन करू शकतील अशा अधिकारी सज्जनांचा शोध घेत राहावे.

**लपावे अति आदरे रामरुपी।**
**भयातीत निश्चित ये सस्वरुपी॥**
**कदा तो जनी पाहतांही दिसेना।**
**सदा ऐक्य तो भिन्नभावे वसेना॥१८५॥**

सरळ अर्थ:

रामाच्या आश्रयाला जाऊन त्याच्यामागे लपावे म्हणजे आपण रामरूपाशी आदरपूर्वक लीन होऊन जातो. भयातीत असलेल्या रामस्वरुपाचा आपल्या स्वरूपामध्ये प्रवेश होतो. हे तादात्म्य साध्या डोळ्यांनी दिसणारे नसते. परंतु ते असते हे निश्चित. आणि त्यामुळेच त्याच्यात आणि आपल्यात काही भिन्नत्व आहे अशा भावनेचा लवलेश मनात उरत नाही.

विश्लेषण:

मागील श्लोकात (आणि त्यापूर्वीच्या १४६ ते १५० क्रमांकाच्या श्लोकातही) समर्थांनी मनाला अनंत असणारे सत्य शोधत राहावे असे सांगितले. या आणि याच्या पुढल्या श्लोकात ते हा शोध कसा करावा ते सुचवत आहेत. हा शोध मनाने अत्यंत आदरपूर्वक करायचा आहे. हा आदर कोणासाठी? तर जो निर्भय – भयातीत – आहे अशा श्रीरामासाठी. इथे ते 'रामरूपात अती आदरे लपावे' असा वाक्यप्रयोग करतात. लपणे म्हणजे आश्रय घेणे. लहान मूल त्याला कसली भीती वाटत असेल तर आईच्या मागे लपते. अगदी अभावितपणे ते आईच्या पायाला लपेटून बघत रहाते. कारण त्याला अपार विश्वास वाटतो की आपण भ्यालो असलो तरी आई भिणारच नाही. आपले रक्षण ती नक्की करेल. हा विश्वासच 'अती आदर' या शब्दांतून समर्थांना व्यक्त करायचा आहे. लहान मुलासाठी जशी

आई ही कशालाही भीत नसते तसा भक्तासाठी हा प्रभू राम कशालाही भीत नसतो. तो भयातीत असतो. तेव्हा अशा या भयातीत असलेल्या रामाला अत्यंत आदरपूर्वक शरण जावे, म्हणजेच त्याची भक्ति करावी. यामुळे काय होईल? आता आपले संरक्षण नक्की होणार या भावनेमुळे आपल्या मनातली भीति नाहीशी होईल. जसा काही तो स्वत: भयातीत असलेला प्रभू रामच आपल्या स्वरूपात प्रवेश करेल आणि आपणही त्याच्यासारखे निर्भय होऊ. म्हणजे आपल्या भक्तीच्या योगे आपणही राममय होऊ. त्याचे आणि आपले तादात्म्य होऊन जाईल. हे तादात्म्य अंत:करणातील असल्याने बाह्यचक्षूंना दिसणार नाही. पण ते असेल आणि त्याच्या असण्यामुळे आपण आणि प्रभू एकच आहोत, आपल्यात भिन्नत्व, दुजाभाव नाही, सदैव टिकणारे ऐक्य आहे हा विश्वास वाढीला लागेल.

**सदा सर्वदा राम सन्निध आहे।**
**मना सज्जना सत्य शोधुन पाहे॥**
**अखंडीत भेटी रघूराजयोगू।**
**मना सांडी रे मीपणाचा वियोगू॥१८६॥**

सरळ अर्थ:

मना, श्रीराम हा सदोदित आपल्या जवळ आहे या सत्याचा शोध घेऊन तू ते नीटपणे समजून घे. या सान्निध्यामुळे श्रीरामाच्या अखंडपणे होत असलेल्या भेटीची अनुभूति होत रहाण्यासाठी तू तुझ्यातल्या अहंकाराचा, ‘मी’ पणाचा त्याग करायला हवा.

विश्लेषण:

वरच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे जेव्हा श्री राम आणि आपले मन यांच्यात तादात्म्य, संतत ऐक्य होऊन राहाते, तेव्हा, उघडच आहे की, श्रीराम सदैव आपल्या सन्निध आहे, आपल्या अंतर्मनात म्हणजे अगदी आपल्या अगदी जवळ आहे, खंड

न पडता आपल्याला भेटत राहणार आहे कारण तो तिथेच आहे. श्रीमद्भगवद्गीतेत देखील सांगितले आहे ‘भूतांच्या अंतरात ईश्वर निवास करुनी असे । अन□मायेने यंत्राजैसे तयां चाळवित बसे ॥’ (अ.१८ –श्लोक ६१). आणि हेच ते आनंत संत - त्रिकालाबाधित सत्य - आहे. पण हे आपल्याला सहजासहजी ओळखता येत नाही. ‘तुझे असुनि तुजपाशी, तू जागा चुकलासी’ अशी आपल्या मनाची भरकटलेली अवस्था असते. तेव्हा अती आदरे आपण त्याचा अंतर्मनात शोध घेत राहिले म्हणजे आपल्याला  आपल्याच मनात, अंत:करणात, असलेल्या प्रभू रामाच्या अस्तित्वाची अनुभूती होईल. पण रघुकुलतिलक रामाच्या या अखंडित भेटीचा योग येण्यासाठी आपल्या मनातील मीपणा, अहंकार या दुर्गुणांचा वियोग झाला पाहिजे. आपला गर्व, अहंकार, ताठा त्यागून, निरागसतेने अंतर्मुख होऊन आपण हा आनंत सत्याचा शोध घेत राहिले पाहिजे. आपल्या अंतरातच असलेल्या आत्मारामाला ओळखले पाहिजे.

**भुते पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे।**
**परी सर्वही स्वस्वरुपी न साहे॥**
**मना भासले सर्व काही पहावे।**
**परी संग सोडुनि सुखी रहावे॥१८७॥**

सरळ अर्थ:

पंचमहाभूतांपासूनच निर्माण झालेले प्राणिमात्राचे शरीर आणि आणि त्यांतूनच निर्माण झालेले ब्रह्मांड या दोन्ही गोष्टीत एकरूपता आहे. पण तरीही या सगळ्या गोष्टी वेगवेगळ्या दिसतात. आपण त्या तशा दिसतात म्हणून खेद वा मोद या दोन्ही भावना जोपासता कामा नये. पहावे आणि त्यांच्याबाबतची ममत्वाची, हव्यासाची भावना सोडून देऊन, नि:संगपणे रहावे यातच सुख आहे.

विश्लेषण:

पंचमहाभूतांपासून  अखिल विश्वाची, ब्रह्मांडाची उत्पत्ती झाली हे प्रतिपादन १५४व्या श्लोकात समर्थांनी पंचीकरण म्हणजे काय ते सांगताना केले होते. ब्रह्मांड म्हणजे त्यात समाविष्ट असलेल्या सर्व गोष्टी. ग्रह नक्षत्रे, तारका, भूमी, वृक्षवल्ली, प्राणिजात सर्वच. म्हणजे त्यात मनुष्यदेह – पिंड- आला हे उघडच आहे. हा देह देखील पंचमहाभूतांच्या संयोगातून बनलेला आहे. म्हणून तर जेव्हा देह आणि आत्मा विलग होतात तेव्हा देह हा राख, ज्वाला, बाष्प, वायु अशा स्वरूपात पंचमहाभूतांमध्ये विलीन होऊन जात असतो. पण हे जे देह, पंचमहाभूते आणि ब्रह्मांड यांच्यातले ऐक्य आहे ते आपल्या लक्षात येत नाही. आपण माती (पृथ्वी), पाणी, वारा, अग्नितेज, पोकळी (आकाश) या गोष्टी वेगवेगळ्या पाहतो. ग्रह नक्षत्रे वेगवेगळी पाहतो. ग्रहांच्या, नक्षत्रांच्या आकाशातल्या स्थानांचा आपल्या जीवनातील घटनांवर परिणाम होत असतो असे मानतो तरीही या सर्वांच्या आपल्या पिंडाशी म्हणजे देहाशी असलेल्या ऐक्याचा आपण विचार करत नाही. समर्थ म्हणतात या सगळ्या गोष्टी आपल्या मनाला वेगवेगळ्या वाटत, दिसत असल्या तरी त्या तश्या दिसण्यात काही वावगे नाही असा विचार करूनच राहावे. त्याबद्दल खंत, खेद, मोद आदी कुठल्याच भावना बाळगू नये. जे आहे, जसे आहे तसे स्वीकारावे आणि अशा स्वीकारण्यातच सुख मानून नि:संगपणे, निरिच्छपणे जीवन जगत रहावे.  या श्लोकातून कोणी “जे दिसते आहे ते निमुटपणे पहावे आणि ‘आपला त्याच्याशी काय संबंध? आपल्याला काय कारायचंय त्याच्याशी?’ अशी भावना ठेवून निवांतपणे आपले जीवन आपण जगत रहावे” असा निष्कर्ष कोणी काढील तर ते चुकीचे आहे. कारण अशा जगण्यात निरिच्छपणा, नि:संगवृत्ती नाही तर फक्त आपल्याच  जीवनाबाबत आत्मकेंद्रित होऊन रहावे ही प्रवृत्ती आहे. आणि समर्थ अशा प्रवृत्तीचा अंगीकार करायला सांगणे हे कदापि शक्य नाही. संग सोडून सुखी राहावे म्हणजे मोह, माया, लोभ, टाळून  शांत, स्थिरचित्त होऊन रहावे.

या आणि पुढल्या तीन श्लोकात 'परी संग सोडुनि सुखी रहावे' या चरणाची पुनरुक्ति करून समर्थ नि:संग, निरिच्छ होऊन जीवनाचे सुख घ्यावे हे तत्वज्ञान मनावर बिंबवीत आहेत.

**देहेभान हे ज्ञानशस्त्रे खुडावे।**
**विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावे॥**
**विरक्तीबळे निंद्य सर्वै त्यजावे।**
**परी संग सोडुनि सुखी रहावे॥१८८॥**

सरळ अर्थ:

देहभान, देहबुध्दी यांचा नाश ज्ञानरूपी शास्त्राने करावा. देहाचे चोचले विसरून भक्तीच्या मार्गावर चालावे. निन्दनीय अशा ज्या ज्या गोष्टी आहेत त्यांची लालसा न धरता त्यांचा त्याग करावा आणि अशा तऱ्हेने नि:संग होऊन राहावे यात सुख आहे.

विश्लेषण:

या श्लोकात नि:संग वृत्ती कशामुळे धारण करता येईल यासाठी ते उपाय सुचवत आहेत. सर्वात प्रथम म्हणजे देहबुद्धी – जिच्यातून फक्त मी, माझे आप्त, माझा देह आणि त्याच्याचसाठीच्या कामना, वासना या उगम पावतात – टाळली पाहिजे. ती कशी टाळायची? तर ज्ञानशस्त्राने! काय चांगले, काय वाईट, ऐहिक सुख हेच अंतिम ध्येय मानायचे की पारमार्थिक कल्याण? यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधून मिळवणे म्हणजे ज्ञानप्राप्ती करून घेणे. असे सखोल ज्ञान मिळाले म्हणजे मग देहलालसा धरणे कसे चुकीचे आहे याचा बोध होतो. माझ्यातला मी म्हणजे देह नव्हे तर त्याहीपलीकडील विदेही असे स्वरूप – आत्मा- आहे याचा बोध होतो. आजीवन देह हा असतोच फक्त त्याचे अवडंबर न माजवणे हेच स्वत:चे अस्तित्व देहरहित, विदेही असल्यासारखे समजणे. हे ज्ञान. असे ज्ञान शस्त्रासारखे

परिणामकारक असते. त्या शस्त्राने मनाला चिकटून असलेली, कीड पसरवणारी बांडगुळे, विषवल्ली, खुडून टाकाव्या म्हणजे देहभान सुटते. आणि देहभान विसरण्याची, विदेहीपणाची भावना मनात जोम धरायला लागली की परमेश्वराच्या भक्तीचा साक्षात्कार व्हायला लागतो. माझ्या देहासुखासाठी देवाने काही करावे ही अपेक्षा न बाळगता देवाची अशी निरपेक्ष भक्तीच आपण करायची असते. देहभान सोडणे, भक्तिमार्ग धरणे या दोन साधनांबरोबरच तिसरे पथ्य पाळायचे ते म्हणजे 'निंद्य सर्वै त्यजावे'. याचा अर्थ जे जे वाईट आहे, निंदनीय आहे अशा सर्व गोष्टींचा त्याग करावा. भलेही त्या वरपांगी फायद्याच्या वाटत असल्या तरी त्यांचा अंतिम परिणाम वाईटच होत असतो हे ध्यानात घ्यावे. अगदी साधा विचार करायचा तर अति गोड, अति जहाल, अति क्षोभ, अति शोक या सगळ्याच गोष्टी शारीरिक तसेच मानसिक स्वास्थ बिघडवणाऱ्या असतात. म्हणूनच निंद्य, त्याज्य असतात. यांच्याच जोडीला मद, मत्सर, मोह, मस्ती, मिथ्यावचन, या निंदनीय गोष्टींचाही त्याग करायला हवा. विरक्ती हा एक गुण अंगिकारला की आपोआपच अशा निंद्य गोष्टी आचरणातून नाहीशा होतात. आणि मग आयुष्य शांत, सुखमय होते.

**मही निर्मिली देव तो ओळखावा।**
**जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा॥**
**तया निर्गुणालागी गुणी पहावे।**
**परी संग सोडुनि सुखे रहावे॥१८९॥**

सरळ अर्थ:

ज्याने या पृथ्वीची निर्मिती केली त्या देवाला ओळखावे कारण त्याच्या दर्शनाने जीवाला तत्काळ मोक्ष मिळतो. निर्गुण, निराकार असलेल्या त्या परमेश्वराला तो जसे काही आपल्या समोर ठाकला आहे, सगुण साकार झाला आहे अशा कल्पनेने पहावे आणि मग विषयमोह त्याग करून सुखी व्हावे.

विश्लेषण:

या पृथ्वीच्या, किंबहुना साऱ्या विश्वाच्या निर्मितीपूर्वी एकमेव ईश्वरतत्व, म्हणजेच परब्रह्म अस्तित्वात होते. या ईश्वरतत्वाच्या प्रेरणेनेच ब्रह्मांडाची, पर्यायाने पृथ्वीची उत्पत्ती झाली. पृथ्वीवरील जीव उत्पन्न झाले. त्या जीवांतून उत्क्रांती होत होत मनुष्य अस्तित्वात आला. इतर जीवांच्या तुलनेने जास्त बुध्दिमत्ता, मन असलेल्या मनुष्याने पृथ्वीवर आपल्या असण्याला मूळ कारण असलेल्या त्या ईश्वरीतत्वाला, परब्रह्माला कृतज्ञतापूर्वक ओळखले म्हणजे मानले पाहिजे. यालाच समर्थ पृथ्वीची निर्मिती ज्याच्यामुळे झाली त्या देवाला ओळखावे असे म्हणतात. हे ओळखणे म्हणजे समोरासमोर येऊनच एकमेकांची दखल घेणे नव्हे. कारण आपला देह दृश्य असला तरी ते तत्व, परमेश्वर दृश्य नाही. निर्गुण, निराकार आहे. आपले चर्मचक्षु त्याला पाहू शकत नाहीत. त्याला ओळखायचे म्हणजे आंतरिक चक्षूंनी, मनोमन त्याची कल्पना करून श्रध्दापूर्वक त्याचे अस्तित्व मान्य करायचे आहे. सामान्य माणसाला हे असे काही नजरेसमोर नसताना मनात कल्पना करणे कठीण जाते. मग काय करायचे? ते सगुण आहे असे वाटावे म्हणून मूर्तीच्या स्वरूपात ते पहावे. गणपती, महादेव, विष्णू, भवानी अशा विविध सगुण स्वरूपात म्हणजे मूर्ती रुपात देव भजावा. अर्थात मूर्ती या केवळ प्रतीके आहेत हे विसरू नये. आणि खऱ्या निर्गुण निराकार परमेश्वराला विसरून मूर्तीपुजेच्या अवडंबरात गुंतून जाऊ नये. अशा अवडंबारात वाहवले न जाता, निर्मळ मनाने, विषयांची प्रीति सोडून म्हणजे संग सोडून देवाची भक्ती करीत आनंदाने राहावे म्हणजे इहलोकातील वासानंतर सत्वर मुक्ति मिळते.

**नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता।**
**परेहून पर्ता न लिंपे विवर्ता॥**
**तया निर्विकल्पासि कल्पीत जावे।**
**परि संग सोडुनि सुखे रहावे॥१९०॥**

सरळ अर्थ:

हा जो निर्गुण निराकार देव आहे तो स्वत: काही निर्मिती करत नाही, सृष्टीचे भरण पोषणहि स्वत; करत नाही. कारण तो सूक्ष्मात सूक्ष्म अशी जी वाणी – परा- त्या वाणीच्याही पलीकडला, तिला वर्णन करता येणार नाही असा आहे. तो कधीच भासमान होत नाही. आपण सर्व संग सोडून फक्त त्याच्या निर्विकल्प स्वरूपाची कल्पना करत समाधान मानून रहावे.

विश्लेषण:

वरवर पहाता मागील श्लोकातील 'देवाने पृथ्वी निर्माण केली आहे' ही कल्पना आणि या श्लोकातील 'देव हा कर्ता नाही आणि भर्ताही नाही' हे प्रतिपादन दोन्ही परस्परांशी विसंगत वाटतात. पण तशी नाहीत. आपण ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिमूर्तीपैकी ब्रह्मदेव हा सृष्टीचा निर्माणकर्ता, श्रीविष्णू हा पालनकर्ता आणि महेश, महादेव हा संहारकर्ता असे मानतो. परंतु देवाची ही तीन रूपे म्हणजे निराकार, निर्गुण, असे जे ईश्वरतत्व, परमेश्वर, ते नव्हे. ही त्या मूळ तत्वाची रूपे आहेत, किंबहुना ते मूळ ईश्वरतत्व या तीनही क्रिया स्वत: न करता त्या करण्यासाठी त्या तीन रूपांना प्रेरणा देते अशी कल्पना या दोन श्लोकातून समर्थ स्पष्ट करत आहेत. आणि ते पटतेही. कारण ना शरीर, ना हात, ना पाय, ना डोळे, असे निराकार, ज्याचे वर्णनही करता येत नाही असे असलेले परब्रह्म स्वत: या क्रिया कशा करणार? परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार वाचा किंवा वाणी आहेत त्यांपैकी परा ही जिच्यातून स्वर उमटतो ती वाणी सूक्ष्मात सूक्ष्म अशी मानली जाते तिच्याही वर्णन करण्याच्या कुवतीपलीकडले, असे परात्पर (परेहून पर्ता) ते आहे. मग असे परब्रह्म जे नि:संशय (निर्विकल्प) अनंत, चिरंतन, न बदलणारे (न लिंपे विवर्ता) आहे त्याची आपण केवळ कल्पनाच करावी, सतत करत रहावी, श्रध्दापूर्वक करत रहावी आणि इहलोकातील मोह, माया यांचा त्याग करून (संग सोडून) समाधानाने, आनंदित राहावे हेच योग्य ठरेल.

||श्रीराम||

## दशक विसावे

**देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना।**
**तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना॥**
**परब्रह्म तें मीपणे आकळेना।**
**मनी शून्य अज्ञान हे मावळेना॥१९१॥**

सरळ अर्थ:

देहाचे चोचले पुरवण्यातच जो धन्यता मानतो त्याला कदापीही खरी ज्ञानप्राप्ती होत नसते. त्याच्यात भिनलेल्या मीपणामुळे परब्रह्माविषयी त्याला आकलन होणे दुरापास्तच. त्यामुळे त्याच्या मनात असलेले अज्ञान कधीही दूर होत नाही.

विश्लेषण:

स्वत:च्या ऐहिक सुखातच गुंतून पडलेल्या जीवाला आध्यात्माचा, परमात्म्याचा विचार करायला फुरसत मिळत नाही. अहं, म्हणजे मी, माझा देह, केवळ माझ्याशी संबंधित असेल तेच मला प्रिय आणि तेच मला हवे अशा निश्चयाचा माणूस परब्रह्माचा विचार करायला वेळ कुठून काढणार? मग ब्रह्मज्ञान त्याला कसे होणार? ज्याचा विचारच केला जात नाही ते प्राप्त होणे अशक्यच. किंवा आधी मी माझा स्वार्थ बघेन आणि मग परमार्थाचा विचार करेन अशी वृत्ती धारण करणाऱ्याला ब्रह्मज्ञान अगदी कल्पान्त झाला तरी आकलन होणे शक्य नाही असे समर्थ इथे म्हणतात. कल्प हा अतिशय मोठा कालावधी असतो. कृत, त्रेता, द्वापार आणि कली ही चार युगे प्रत्येकी एक हजार वेळा उलटली म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस उलटतो. असा एक दिवस आणि तितक्याच लांबीची एक रात्र हा काल म्हणजे एक कल्प. आपल्या सौर कालगणनेत सांगायचे तर ८ अब्ज, ६४ कोटी वर्षे (८,६४,००,०००००) म्हणजे एक कल्प. त्यामुळे मानवी आयुष्याचा विचार केला तर त्याला त्याच्या जन्मात ब्रह्मज्ञान होणे शक्य नाही.

म्हणजे त्याच्या मनातले अज्ञान दूर होणार नाही. यातील अतिशयोक्तीचा भाग सोडून आपण इतपत अर्थ घ्यायचा की 'देहबुद्धी, मीपणा न ठेवता मनुजाने परमेश्वराच्या भक्तीत आपले आयुष्य व्यतीत करावे अन्यथा ब्रह्मज्ञान होणे नाही' अशी जाग देण्याचे काम समर्थ या श्लोकात करत आहेत.

**मना ना कळे नाढळे रूप ज्याचे।**
**दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचे॥**
**तया खूण ते हीन दृष्टांत पाहे।**
**तेथे संग निःसंग दोन्ही न साहे॥१९२॥**

सरळ अर्थ:

एकमेवाद्वितीय सर्वोत्तमाचे म्हणजे परमेश्वराचे ध्यान – स्वरूप काय आहे ते मनाला ना कळते ना दिसते. त्यामुळे ते काय, कसे आहे याबद्दल जी काही उदाहरणे, ज्या काही उपमा, रूपके दिली जातात ती सारी फसवी, अक्षम असतात कारण त्या स्वरूपाला ना संग असतो ना नि:संग.

विश्लेषण:

सर्वोत्तम, एकमेवाद्वितीय असलेला देवराणा, परमेश्वर, परब्रह्म कसे आहे ते कोणाला कळले नाही. ना त्याचे रूप कोणाला दिसले. आपल्याच अंतरंगात वसणारा हा द्वैतभावविरहित आत्माराम आपल्या चर्मचक्षूंना कसा दिसणार? तो मनाला केवळ जाणवेल. यालाच साक्षात्कार म्हणता येईल. जर कोणी म्हणत असेल की अहो, तो महाकाय आहे, हत्तीसारखा आहे, चार डोळे, पाच तोंडे, दहा हात वगैरे वगैरे असलेला आहे तर ते सारे थोतांड आहे. या सगळ्या उपमा, उत्प्रेक्षा, रूपके परब्रह्माचे वर्णन करण्यासाठी तोकडी पडतात, वेद, शास्त्रे, पुराणे यांनादेखील परब्रह्माचे स्वरूप वर्णन करता आलेले नाही मग हे सारे दृष्टांत तर फसवे आणि कुचकामाचे म्हणून समर्थांच्या शब्दात हीन आहेत. आणि दुजेवीण, म्हणजे

ज्याच्या तोडीचा दुसरा कोणी किंवा दुसरे काहीही नाही अशा ‘याच्यासारखे हेच’ असलेल्या - एकमेवाद्‌वितीय परब्रह्माला कसली उपमा समर्पक ठरणार? परब्रह्म कशाला स्पर्श करत नाही किंवा त्याला कशाचा स्पर्श होऊ शकत नाही. ना त्याला ब्रह्मांडातील कुठल्या गोष्टीचा हव्यास आहे, ना तिरस्कार. ना संग, ना नि:संग असे हे त्या सर्वोत्तमाचे ध्यान आहे.

**नव्हे जाणता नेणता देवराणा।**
**न ये वर्णिता वेदशास्त्रा पुराणा॥**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा।**
**श्रुती नेणती नेणती अंत त्याचा॥१९३॥**

सरळ अर्थ:

परमेश्वर हा कोणत्याही जाणत्या नेणत्या प्राण्यासारखा नाही. शास्त्रे, पुराणे, वेद यांनाही त्याचे वर्णन करता आलेले नाही. तो दृश्य आहे? अदृश्य आहे? कसा आहे? याची साक्ष देणाराही कोणी नाही कारण या परमेश्वरतत्वाचा थांगपत्ता श्रुती, स्मृती, पुराणे, शास्त्रे कोणालाच लागलेला नाही.

विश्लेषण:

क्रमांक १८९ आणि १९० या दोन श्लोकात ज्याप्रमाणे समर्थांनी देवाच्या निर्माता, कर्ता, भर्ता या भूमिकांबद्‌दल सकृद्‌दर्शनी परस्परविरोधी विधाने केल्याचे दिसले होते तसेच इथे ते ‘देव सारे काही जाणतो’ या आपल्या विश्वासाला छेद देणारे असे ‘देवराणा जाणता किंवा नेणतादेखील नाही’ असे विधान करत आहेत. या लेखासाठी मी जे जे संदर्भग्रंथ वाचले त्या सगळ्यांमध्ये ‘जाणता नेणता’ या शब्दप्रयोगाबद्‌दल अनिश्चितता, संदिग्धता आढळली. जाणीव म्हणजे काय आणि नेणीव म्हणजे काय याचेच विवेचन तेथे केले गेलेले दिसून आले. मी इथे जाणीव (ज्ञात असणे किंवा स्मरणात असणे) वा नेणीव (ज्ञात नसणे किंवा विस्मरण)

या दोन गुणांचा उहापोह करू इच्छित नाही. आपण माणसाची वर्गवारी तो ‘जाणता (शहाणा)’ किंवा ‘नेणता (अडाणी)’ आहे अशा दोन शब्दात करत असतो. माणूस हा बुद्धी असलेला प्राणी आहे पण इतर प्राण्यांमध्येदेखील हे दोन्ही गुण असतात. एखादा पाळीव कुत्रा तुम्ही जवळ बोलावले की लगेच येतो. बोलावले की जायचे ही जाणीव त्याला असते. पण तुम्ही त्याला कुरवाळण्यासाठी जवळ बोलावता की मारण्यासाठी याची नेणीव असते. म्हणजे या इहलोकातले माणसासहित सारे मर्त्य प्राणी जाणते-नेणते असतात. समर्थांनीही त्यांच्या स्फुट काव्यात एके ठिकाणी म्हटले आहे ‘जाणता नेणता प्राणी । जन्मतो मरतो सदा । जाणणे नेणणे नाही । ते ब्रह्म जाणते भले॥ देवराणा - परमेश्वर – परब्रह्म मर्त्य नाही. ज्याला सुरुवात नाही, अंत नाही असे सनातन, अनादि, अनंत असे ते तत्व आहे. फिरून फिरून जन्मतो, मरतो असा प्राणी ते नाही. म्हणून परब्रह्म हे, समर्थ म्हणतात तसे, नव्हे जाणता नेणता देवराणा. आणि असे हे ना जाणते, ना नेणते (म्हणून अमर्त्य) असलेले परब्रह्म काय आहे, कसे दिसते हे कोणालाही ठाऊक नसल्याने त्याचे वर्णनही कोणी करू शकत नाही, अगदी वेद, पुराणे, शास्त्रे ही सुध्दा. कोणीही ठामपणे, हमीपूर्वक म्हणू शकत नाही की ते त्याला दिसले आहे, दृश्य स्वरूपात आहे. आणि ते अदृश्य आहे असे म्हणावे तर ते चराचरात, मोठ्यात मोठ्या आकारात किंवा सूक्ष्मात सूक्ष्म अशा अणुरेणूतही ते सामावलेले आहे असे आपण म्हणतो. आणि या गोष्टी जर दृश्य आहेत तर त्यात सामावलेले ब्रह्म अदृश्य कसे म्हणावे? याचा अर्थ ब्रह्माच्या अशा दृश्य अथवा अदृश्य कुठल्याच स्वरूपाचा साक्षीदार मिळू शकणार नाही. विश्वाच्या उत्पत्तीपूर्वीपासून अस्तित्वात असलेले हे तत्व विश्वाच्या विलयानंतरही असणार आहेच आणि असा विलय झालाच तर तो केव्हा होणार आहे हेदेखील श्रुती, स्मृती, पुराणे, वेदशास्त्रे सांगू शकत नाहीत मग त्याहीनंतर असणाऱ्या परब्रह्माचा अंत त्याना कळणे तर अशक्यच.

**वसे हृदयी देव तो कोण कैसा।**
**पुसे आदरे साधकू प्रश्न ऐसा॥**
**देहे टाकिता देव कोठे पहातो।**
**परि मागुता ठाव कोठे रहातो॥१९४॥**

सरळ अर्थ:

साधक भक्तिभावाने प्रश्न विचारतो कि आपल्या हृदयात रहाणारा देव असतो तरी कसा? आणि मृत्युनंतर जेव्हा आपले शरीर नष्ट पावते तेव्हा शरीरातच असलेले हृदयही नष्ट पावते मग तो देव कुठे जातो? त्याचा नंतरचा ठाव ठिकाणा काय?

विश्लेषण:

समर्थांनी या श्लोकात साधकाला पडणारा प्रश्न नेमका सांगितला आहे. साधक भक्तिभावाने, आदरपूर्वक हा प्रश्न विचारत आहे त्यामुळे त्यातला प्रामाणिकपणा लक्षात घेतला की त्याला पडलेले कोडे किंवा त्याने विचारलेला प्रश्न हा काही जाणुनबुजून उलटपरिक्षा घेण्यासाठी टाकलेला आहे असे वाटत नाही. तो विचारतो आहे की हा हृदयात रहाणारा देव, भगवंत आहे तरी कसा? हृदयात रहात असल्यामुळे तो दिसू शकत नाही तेव्हा साधकाचा म्हणजेच भक्ताचा हा पहिला प्रश्न रास्त आणि त्याच्या निरागसतेचे द्योतक आहे असेच म्हणावे लागेल. शिवाय संत सज्जन म्हणतात की देव देवळात नसतो. त्याचे निरंतर वास्तव्य असते आपल्या हृदयात. हृदय तर आपल्या देहात असते. याचा अर्थ झाला की देव आपल्या देहातच असतो. मग मृत्युनंतर जाळल्या जाणाऱ्या, पुरल्या जाणाऱ्या किंवा गिधाडांच्या भक्ष्यस्थानी पडण्यासाठी विहिरीत टाकून दिल्या जाणाऱ्या देहाचा पूर्ण विनाश झाल्यावर त्या भगवंताला रहायला दुसरे स्थान कुठे आहे? कुठे रहातो तो मग? हा भक्ताचा अति आदरे विचारला गेलेला दुसरा प्रश्न. समर्थ याचे उत्तर पुढच्या श्लोकात देत आहेत.

**बसे हृदयी देव तो जाण ऐसा।**
**नभाचेपरी व्यापकू जाण तैसा॥**
**सदा संचला येत ना जात कांही।**
**तयावीण कोठे रिता ठाव नाही॥१९५॥**

सरळ अर्थ:

हृदयात वसणारा देव आकाशासारखा व्यापक असतो. तो कुठून येत नाही की कोठे जात नाही, तो सदैव अस्तित्व ठेवून असतोच. सदैव आणि सर्वत्र. त्याच्याविना रिकामी अशी जागाच नसते कुठेही.

विश्लेषण:

समर्थ म्हणतात, अरे देव हा आकाशासारखा असतो. आकाश म्हणजे काय? एक विस्तीर्ण अशी पोकळी. आकाश म्हणजे आपण मान वर केल्यावर डोळ्यांना दिसते तेव्हढेच नाही. आपल्या अवतीभवती पहा आणि अनुभवा. वर असलेली पोकळी आणि आपल्या आजुबाजूला असलेली पोकळी एकच असते. त्यामुळे वर आकाश, आजूबाजूला आकाश, अगदी रिकाम्या मडक्यात असते तेही आकाशच. या सर्वव्यापी आकाशासारखा सर्वव्यापी असतो हा देवराणा. आकाशाची सुरुवात कुठून होते आणि शेवट कुठे होतो हे जसे समजत नाही तसेच हा देवराणा कुठून येतो? कुठे जातो? हेही कळत नाही. किंबहुना तो ना कुठून येतो ना कुठे जातो. सतत आणि सर्वत्र साठून असणारा असा असतो हा भगवंत, देवराणा. तो नाही अशी जागाच अस्तित्वात नसते. त्यामुळे देह नाश पावला तर तो कुठे जाईल हा प्रश्नच उद्‌भवत नाही. देहातला प्राण, आत्मा हाच असतो देवराणा, हाच तो निराकार, निर्गुण भगवंत. त्यामुळे भगवद्‌गीतेच्या दुसऱ्या अध्यायात म्हटल्याप्रमाणे;

नाही जन्मत, मरतहि नाही आत्मा चिरंजिवी |
आज असे अन पुन्हा न होइल असाहि तो नाही ||

चिरंजीव अन□पुरातन असा हा आत्मा आहे |
नाश पावली जरी शरीरे तरी उरून राहे ||     श्लोक २० वा

सहजपणे जैसी मनुजाने वसने बदलावी |
तशीच आत्मा जीर्ण शरीरे त्यागुनि चढवी नवी ||     श्लोक २२ वा

**नभी वावरे जो अणुरेणु काही।**
**रिता ठाव या राघवेवीण नाही॥**
**तया पाहता पाहता तेचि जाले।**
**तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले॥१९६॥**

सरळ अर्थ:

या अथांग आकाशात जे सारे अणुरेणु आहेत त्या सर्वांमध्ये भरून राहिलेल्या राघवामुळे, परमेश्वरामुळे रिकामे असे स्थानच त्यात उरलेले नाही. पण हा परमेश्वर तर दिसत नाही. तेव्हा त्याला पहाण्याचा प्रयत्न करता करता, त्याचे ध्यान करता करता आपले अंत:करणही त्याच्याशी तादात्म्य पावते. मग तिथे दिसावेसे वाटणारे (लक्ष्य) आणि असून न दिसणारे (अलक्ष्य) या दोन्हीत काही अंतर रहात नाही.

विश्लेषण:

समर्थांचे समग्र साहित्य पाहिले तर त्यात अनेक वेगवेगळ्या देव देवतांच्या आरत्या, स्तोत्रे, वर्णने आढळतात. परंतु प्रभू रामचंद्र, रघुकुलतिलक, श्रीराम, राघव, हे त्यांचे विशेष श्रद्धास्थान असल्यामुळे परमेश्वर, परब्रह्म किंवा एकंदरीत ईश्वरतत्व यासाठी ते त्याच्याच नावाचा उल्लेख करतात. या श्लोकात देखील ते आकाशात, किंबहुना संपूर्ण आसमंतात वावरत असलेल्या अणुरेणूंमध्ये अस्तित्व असलेल्या परब्रह्म ईश्वरतत्वाला राघव असे संबोधतात आणि म्हणतात की या राघवाने व्यापल्यामुळे आसमंतात रिकामी अशी जागाच उरलेली नाही. जी काही

जागा आहे ती सारी त्यानेच व्यापून टाकलेली आहे. पण असे असले तरी ते परमेश्वरतत्व आपल्याला दिसत नाही म्हणून ते अलक्ष्य असते तर ते दिसावे हे आपले लक्ष्य असते. आणि ते लक्ष्य साध्य व्हावे म्हणून आपण ध्यास घेतलेला असतो. असा ध्यास घेऊन त्याचे भक्तिपूर्वक ध्यान करता करता एक वेळ अशी येते की त्या अलक्ष्य तत्वाशी आपले तादात्म्य घडून येते. जिवाशिवाची भेट होते म्हणतात तसे होते. सागराच्या ओढीने नदी प्रवास करत असते. तिच्या उगमस्थानी किंवा नंतरच्या संपूर्ण प्रवासात तिला सागर दिसत नसतो. पण अखेर एक वेळ अशी येते की ती सागराला भेटते. भेटीत त्यांचे तादात्म्य होते आणि मग नदी ही नदी रहात नाही. तीदेखील सागरच बनून जाते. तसेच दिसू शकत नसलेले अलक्ष्य आणि ते दिसावे हे लक्ष्य हे दोन्ही एकजीव होतात. त्या तादात्म्यात बुडून जातात.

**नभासारिखे रूप या राघवाचे।**
**मनी चिंतिता मूळ तुटे भवाचे॥**
**तया पाहता देहबुद्धी उरेना।**
**सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना॥१९७॥**

सरळ अर्थ:

या राघवाचे – परमेश्वराचे रूप आकाशासारखे आहे. त्याचे चिंतन केल्याने भवाचे म्हणजे संसाराचे बंधन तुटते. त्याचे दर्शन झाले तर देहाबद्दलची आसक्ति नाहीशी होते. त्याच्या भेटीसाठीच्या तळमळीची आर्तता मनात मावत नाही.

विश्लेषण:

राघवाचे रूप कसे आहे हे सांगताना समर्थांना आकाशाची आठवण होते. आकाशाचा रंग जसा निळा तसाच श्रीरामाचाही असे ध्वनित करणारे 'घननीळ राम' असे त्याचे वर्णन केले जाते. निरभ्र निळ्या आकाशाकडे नजर लावली म्हणजे मनाला शांत शांत वाटते त्याप्रमाणेच श्री रामाचा विचार मनात वागवल्यावर, रामनामाचे

मनोमन चिंतन केल्यावर, नकळतच संसारातील विवंचनांचा विसर पडून जातो. यालाच समर्थ म्हणतात की आकाशासारखे रूप असलेल्या रामाचे चिंतन केल्याने भवाचे मूळ तुटते. घननीळ रामाचे रूप डोळ्यांपुढे आणले म्हणजे आपले देहभान विसरले जाते आणि आपोआपच मनोमन विदेही वृत्ती उपजते. 'मी, माझे, माझ्यासाठी- या भावना दूर होतात. मी फक्त त्या प्रभू रामचंद्रासाठी, परमात्म्यासाठी आहे अशी भावना मनात जन्म घेते. आणि मग आपल्या देहाबद्दलच्या आसक्तीच्या जागी त्या परमेश्वराला भेटायची आसक्ति लागून रहाते. त्या तळमळीची आर्तता इतकी वाढते की पोटात मावत नाही. सदा सर्वदा आपण रामनामाचा म्हणजेच परमेश्वराचा नामजप करत रहातो.

**नभे व्यापिले सर्व सृष्टीस आहे।**
**रघूनायका ऊपमा ते न साहे॥**
**दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावे।**
**तया व्यापकू व्यर्थ कैसे म्हणावे॥१९८॥**

सरळ अर्थ:

आकाशाने साऱ्या सृष्टीला व्यापले आहे. परंतु श्रीरामाला – परब्रह्माला त्याची उपमा देणे योग्य होणार नाही. स्वभावत:च एकमेवाद्वितीय असलेल्याला उगाचच व्याप्तीच्या मर्यादेत का गोवायचे?

विश्लेषण:

समर्थ १९५व्या श्लोकापासून पुन्हापुन्हा परमेश्वर, रघुनायक हा आकाशासारखा, आकाशाइतक्या व्याप्तीचा आहे असे सांगतात. पण या श्लोकात त्यांना स्वत:लाच वाटते की हे बरोबर नाही. आकाशाने सृष्टीला व्यापून टाकले आहे. म्हणजे त्याला सृष्टीच्या व्याप्तीची मर्यादा आहे. जयासी तुळणा नाही अशा एकमेवाद्वितीय असलेल्या रामपरमात्म्याला अशा मर्यादित व्याप्तीचा कसे म्हणायचे? म्हणून

त्याला उगाचच आकाशाची उपमा देणे उचित होणार नाही. मग त्या रघुनायकाचे रूप आहे तरी कसे ? याचा खुलासा समर्थ पुढच्या श्लोकात देत आहेत.

**अती जीर्ण विस्तीर्ण ते रूप आहे।**
**तेथे तर्कसंपर्क तोही न साहे॥**
**अती गूढ ते दृश्य तत्काळ सोपे।**
**दुजेवीण जे खुण स्वामिप्रतापे॥१९९॥**

सरळ अर्थ:
श्रीरामाचे रूप विस्तीर्ण, अतिशय पुरातन असे आहे. त्याला कसलीही तर्कसंगती लागू पडत नाही. अतिशय गूढ असे हे ईश्वरतत्व आहे. पण तरीही त्याच्याच कृपेने गूढता नाहीशी होऊन त्याचे ते अद्‌वितीय असलेले रूप सुलभपणे दृग्गोचर होते.

विश्लेषण:
समर्थ पहिल्याच चरणात रघुनायकाच्या रूपाला, ब्रह्मतत्वाला, जीर्ण असे म्हणतात. आपण एखाद्या विटून झिरझिरीत झालेल्या, हातात धरताच फाटेल की काय असे वाटावे अशा अवस्थेत असलेल्या वस्त्राला जीर्ण असे म्हणतो. त्या अर्थाने समर्थ त्यांच्या आराध्यदैवताला जीर्ण म्हणणे कदापि संभवत नाही. तर इथे जीर्ण म्हणजे पुरातन, पूर्वापारपासून असलेले असा अर्थ आहे. सृष्टी नव्हती, काहीच नव्हते तेव्हा होते ते ब्रह्म. आज मितीला सृष्टीचा आरंभ होऊन १,९५,५८,८५,११८ वर्षे झाली असे आपले हिंदु जोतिषशास्त्र सांगते (विकीपीडिया). ब्रह्मतत्व हे तर त्याही पूर्वीपासून अस्तित्वात होते. म्हणून ते पुरातन आहे. आणि आपली नजरही पोचू शकत नाही इतका आवाका असलेल्या आकाशालादेखील आपल्यात सामावून घेणारे ब्रह्म किती विस्तीर्ण असेल याची कल्पनाही आपण करू शकत नाही. तर्क तर नाहीच नाही. त्यामुळे ब्रह्मतत्व

काय आहे हे एक मोठे गूढ आहे. अद्वैत वेदान्तानुसार मानव जेव्हा ब्रह्म जाणून घेण्यासाठी  मनापासून साधना करतो तेव्हा ब्रह्म ईश्वरतत्व बनते. ईश्वराचे स्वरूप सामान्य माणसाच्या आकलनशक्तीच्या पलीकडचे आहे. परंतु हे त्याचे अद्वितीय असणारे गूढ स्वरूप त्याच्याच कृपेने, ज्याला समर्थ स्वामीकृपेने म्हणतात, अधिकारी  गुरु, संतांच्या मार्गदर्शनाखाली आकलनीय, सोपे असे होते आणि साधक मानवाला त्याचे ज्ञान व्हायला सुरुवात होते.

**कळे आकळे रूप ते ज्ञान होता।**
**तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था॥**
**मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।**
**तो रे तोचि तो राम सर्वत्र पाहे॥२००॥**

सरळ अर्थ:
ज्ञानप्राप्ती झाल्यावर ते रूप कळून येते, त्याचे आकलन होते. त्यानंतर सर्वसाक्षी अवस्था उरत नाही. मन उन्मन होते आणि शब्दही फुटत नाही. असे ते रूप म्हणजेच श्रीराम. तो सर्वत्र भरून राहिलेला आहे.

विश्लेषण:
मागील श्लोकात सांगितल्याप्रमाणे साधकाला जेव्हा ईश्वरतत्वाविषयी ज्ञान प्राप्त होते तेव्हा त्याची जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तूर्या या चारही अवस्थांतून सुटका होते. माणसाच्या जागृत असणे, स्वप्न बघत असणे आणि सुषुप्त, म्हणजे गाढ निद्रेत असणे  अशा तीन अवस्था  मानल्या जातात. या तीनही अवस्थांहून वेगळी अशी चौथी अवस्था म्हणजे तूर्या. या तूर्या अवस्थेलाच सर्वसाक्षी अवस्था असेही म्हटले जाते. पहिल्या तीन अवस्थांची जाणीव होत असते परंतु तूर्या या अवस्थेची नाही. ती सात्विक अशी जाणीवस्वरूप अवस्था आहे. मनुष्याला या अवस्थेची जाणीव होत नसली तरी या अवस्थेला सर्व जाणीव असते.

दासबोधामध्ये ७व्या दशकातील द्वैतकल्पनानिरसन निरूपण नावाच्या ५व्या समासात (श्लोक ५) समर्थ या अवस्थेविषयी म्हणतात – जाणे ब्रह्म जाणे माया ।ते एक जाणावी तूर्या ।सर्व जाणे म्हणूनिया ।सर्वसाक्षिणी ॥मनुष्याला सत्संगाच्या योगे ब्रह्मतत्वाचे ज्ञान मिळते तेव्हा त्याच्या जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थांतील सर्व जाणीवा तुटतात. आणि या साऱ्या जाणीवा नाहीश्या होऊन मन उन्मन म्हणजे वृत्तीविरहित, मनोधर्मविरहित होते तेव्हा सर्वसाक्षी तूर्यावस्थेचे प्रयोजनच उरत नाही. म्हणोन सर्वसाक्षी मन ।तेचि झालीया उन्मन ।मग तूर्यारूप ज्ञान ।मावळोन गेले ॥(दासबोध दशक ७ समास ५ श्लोक ११) मन उन्मन झाले म्हणजे जो आत्मानंद मिळतो त्यातल्या अकल्पित अनुभवामुळे मनुष्य अवाक होऊन जातो.  हा आत्मानंद म्हणजे दुसरे तिसरे काही नसून परब्रह्माचे, परमेश्वराचे स्वरूप जाणवणे. समर्थ पुढे या श्लोकाच्या अखेरच्या चरणात मनाला आदेश देत आहेत की अरे हे स्वरूप म्हणजे रामाचेच रूप आहे. तेच तुला उन्मनी अवस्थेत जळी स्थळी काष्ठी पाषाणी, सर्वत्र दिसत राहील. मनोभावे, भक्तिभावे पहात रहा.

||श्रीराम||

## <u>अखेरचे पंचक</u>

**कदा ओळखीमाजि दुजे दिसेना।**
**मनी मानसी द्‌वैत काही वसेना॥**
**बहूता दिसा आपली भेट जाली।**
**विदेहीपणे सर्व काया निवाली॥२०१॥**

सरळ अर्थ:
पाहायला गेले तर दुसरे काही नजरेला येत नाही, माझ्या मनात मी आणि तू या दोन्हीत द्‌वैत दिसत नाही. किती दीर्घ काळ लोटल्यावर तुझी भेट झाली आणि देहबुद्‌धी नष्ट होऊन मला शांती मिळाली.

विश्लेषण:
मनाच्या श्लोकातील उपदेशातला हा आणि यानंतरचे तीन श्लोक हे उपसंहारात्मक आणि अखेरचा २०५ वा श्लोक फलश्रुती सांगणारा आहे. या श्लोकात समर्थ त्यांना झालेल्या रामाच्या दर्शनाचे – साक्षात्काराचे वर्णन करत आहेत. ते म्हणतात, 'रामराया, अरे आजवर सतत मी तुझ्या सगुण रूपातील भेटीचा ध्यास घेतला. त्यामुळे मला तुझ्याशिवाय दुसरे काहीही डोळ्यापुढे आणता येत नाही. किंबहुना दुसरे काही दिसतच नाही. तू आणि तूच सदैव माझ्या मनात असल्यामुळे मी स्वत: राममय होऊन गेलो आहे. आणि त्यामुळे माझ्यात आणि तुझ्यात काही द्‌वैतभाव उरलेला नाही. 'तत्वमसि' आणि 'अहम ब्रम्हास्मि' या महावाक्यांचे एकमेकात विलीनीकरण झाल्याचे प्रत्यंतर मला येते आहे त्यामुळे तू आणि मी दोघे एकच झालो आहोत. आपल्यात वेगळेपणा जाणवतच नाही. तुझी आणि माझी ही अशी आगळीवेगळी भेट आज कितीतरी काळानंतर झाली आहे. आणि या भेटीमुळे मला देहभान काही उरलेले नाही, माझी देहबुद्‌धी नष्ट होऊन मी

विदेही झालो आहे. देहबुद्धी नाही पण देह आहे आणि तो तुझ्या भेटीमुळे तृप्त, शांत झाला आहे.’

(ही श्रीरामाची समर्थांशी झालेली भेट पहिलीच नाही. यापूर्वीही समर्थ जेव्हा उत्तर हिंदुस्थानात तीर्थाटन करत होते तेव्हा प्रथम अशी भेट झाली होती. समर्थांना ते उत्तराखंडात केदारनाथाजवळ उगम पावलेल्या मंदाकिनी नदीच्या तीरावर उभे असताना देव काही भेटत नाही या विचाराने औदासिन्य आले होते आणि त्या भरात देहत्याग करावा असे त्यांच्या मनात आले. तेव्हा साक्षात प्रभू रामचंद्र प्रकटले आणि त्यांनी सांगितले, “अरे हा तुझा देह गेली दोन तपे मी संभाळलेला आहे तो मला तुझ्याकडून काही उदात्त, लोकोत्तर कार्य करवून घ्यायचे आहे म्हणून. तुझ्या देहावर माझी सत्ता आहे. तेव्हा तू स्वत: होऊन त्याचा असा एकाएकी त्याग करू शकत नाहीस. सावर स्वत:ला आणि जा, जनसामान्यांमध्ये माझ्याविषयी, परमार्थाविषयी प्रबोधन कर.” या आदेशानंतर समर्थ पुन्हा महाराष्ट्रात आले आणि त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वांगीण प्रबोधनाचे अलौकिक कार्य केले, आपण उपदेश करण्यास अधिकारी सद्गुरु असल्याचे सिद्ध केले आणि मग देह ठेवला.)

**मना गुज रे तूज हे प्राप्त झाले।**
**परी अंतरी पाहिजे यत्न केले॥**
**सदा श्रवणे पाविजे निश्चयासी।**
**धरी सज्जनसंगती धन्य होसी॥२०२॥**

सरळ अर्थ:
हे मना, तुला हे गुपित मिळाले आहे. परंतु त्याचा अर्थ समजण्यासाठी अंत:करणपूर्वक प्रयत्न करायला हवा. सदोदित नित्यनियमाने संतसज्जनांच्या

संगतीत राहून त्यांच्याकडून श्रवण केले तर तो तुला नक्की समजेल आणि तू धन्य होशील.

विश्लेषण:

आतापर्यंतच्या २०१ श्लोकांमध्ये जो उपदेश समर्थांनी केला आहे त्यातून त्यांनी दिलेल्या ज्ञानाला ते 'गुज' अशी संज्ञा देतात. गुज म्हणजे अशी हितप्रद गोष्ट जी सकृद्दर्शनी किंवा सहजासहजी न दिसते किंवा ध्यानात न येते. हे गुज गुपितस्वरूप, म्हणून जिव्हाळापूर्वक समजावून सांगितली जाते. ते म्हणतात, "हे मना, हा मनोबोध मी तुला दिला आहे तो अशा गुपितासारखा आहे, तुझ्या हिताचा आहे. तो समजून घेण्यासाठी तुला प्रयत्न करावे लागतील. श्रध्दापूर्वक, अंतरीच्या जिव्हाळ्याने, विश्वासपूर्वक असे प्रयत्न करावे लागतील. तुला त्याचे सम्यक आकलन झाले म्हणजे तू धन्य होशील". भगवान श्रीकृष्णाने देखील भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायातील विसाव्या श्लोकात हेच अर्जुनाला सांगितले आहे. भगवान म्हणतात:

गुपितामधले गुपीत ऐसे शास्त्र तुला जे कथिले मी ।
ते समजुन घेण्याने होइल कृतकृत्य बुध्दिमंतही ॥

समर्थ पुढे म्हणतात, "हे जे गुज मी तुला आजवर सांगितले ते कदाचित तुला स्वप्रयत्नातून समजले नाही तर त्यासाठी अधिकारी संतसज्जनांना विनंती करून त्यांच्याकडून त्याची उकल ऐकावीस. त्यासाठी तुला अशा संतसज्जनाशी, सद्गुरूशी जवळीक साधून नेहमी त्याच्या सहवासात राहून, निश्चयपूर्वक आणि लक्षपूर्वक, ते सांगत असलेला अर्थ श्रवण केला पाहिजे". आता असा सद्गुरू सहजासहजी भेटत नाही. आजकालच्या जमान्यात तर ते दुरापास्तच दिसते. त्यायावर उपाय काय? स्वामी वरदानंद भारती हे मनोबोधावरील त्यांच्या निरुपणात म्हणतात त्याप्रमाणे असे लायक, अधिकारी आणि ज्ञानी सद्गुरू फार

कमी आणि दुर्मिळ असतात. त्यामुळे कुणाला तरी गुरु मानून त्याच्याकडून ज्ञानाची अपेक्षा केली तर फसगत होईल. फायदा होणे दूरच राहिले. शिवाय नुसते श्रवण केल्याने बोध नीटसा होईलच याची शाश्वती नाही. त्यापेक्षा समर्थ ज्याला ‘जुना ठेवा’ असे म्हणतात ते आपले धार्मिक वाङमय, गीता, ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध इत्यादी ग्रंथांचे वाचनही श्रवणाच्या जोडीने करत रहावे. ग्रंथ हेदेखील गुरुस्थानीच मानले जातात. तेव्हा अशा ग्रंथांचे लक्षपूर्वक, विचारपूर्वक वाचन, परिशीलन करावे. ते कायमपणे आपल्याबरोबर ठेवले म्हणजे ‘सदा संगती’ देखील साध्य होते. आणि त्याच्या जोडीला खरोखर लायक असा सज्जन गुरु मिळाला, त्याचा ज्ञान देण्याचा अनुग्रह झाला तर मग आणखी काय पाहिजे?

**मना सर्वही संग सोडुनि द्यावा।**
**अती आदरे सज्जनाचा धरावा॥**
**जयाचेनि संगे महादुःख भंगे।**
**जनी साधनेवीण सन्मार्ग लागे ॥२०३॥**

सरळ अर्थ:

हे मना, तू सारे संग, साऱ्या आसक्ति सोडून दे. फक्त संतसज्जनांचा संग धर आणि तोही अत्यंत आदरपूर्वक. या संगामुळे संसारातील दु:खांचे निरसन होते आणि इतर साधना केल्याशिवायही सन्मार्ग कळून येतो.

विश्लेषण:

श्लोक क्र. २०१ ते क्र. २०५ हे पंचक उपसंहारात्मक असल्यामुळे त्यांत बहुतांशी मागील सगळ्या श्लोकांतून देण्यात आलेल्या उपदेशाकडे अधोरेखित केल्यासारखे पुनरपि लक्ष वेधवले आहे समर्थांनी. संतसज्जनांच्या सहवासात रहावे, त्यांच्याकडून ज्ञान मिळवावे, त्यांच्यामुळे भक्तीभाव कळून येतो इत्यादी प्रतिपादन समर्थांनी श्लोक क्रमांक १०७, १०८, १२८, १२९, १३५, १५१, १५३ आणि इतरही बऱ्याच ठिकाणी केले आहे. तसेच, संग म्हणजे विषयासक्ती सोडून द्यावी हा आग्रहदेखील

अनेकवार बोलून दाखवला आहे. हाच उपदेश या श्लोकातही आहे. सर्वही संग सोडून द्यावा पण सज्जनाचा संग धरावा असे समर्थ म्हणतात. हा विरोधाभास आहे का? असा प्रश्न पडेल. पण नाही! समर्थ इथे परस्परविरोधी विधान नाही करत आहेत. इथे संग या शब्दावरील श्लेष लक्षात घ्यायला पाहिजे. सर्व संग यामधील संगाचा अर्थ आसक्ति, मोह, कामना असा आहे तर ज्याच्या योगे महादु:ख भंगते तो सज्जनाचा संग यातील संग म्हणजे संगत, किंवा सहवास, जवळिक. सज्जनाच्या संगतीत राहताना मनातल्या साऱ्या आसक्ती, अभिलाषा, मोह, इच्छा, कामना, वासना या सोडून द्यायच्या आणि अशा प्रकारे निर्मळ झालेल्या मनाने आदरपूर्वक, विश्वासाने सज्जनांच्या संगतीचा आनंद घ्यायचा. अशा आनंदाच्या डोहात अवगाहन करताना मनात काही दु:ख असले, कितीही मोठे असले तरी ते भंग पावते. जाणवत नाही. हा आनंदाचा डोह कसला? तर भक्तिमार्गाचे ज्ञान! मनात भक्तीभाव निर्माण होतो, वाढीला लागतो आणि त्यामुळे इतर काही तपस्या, साधन यांची आवश्यकता न पडता मन सन्मार्गाला लागते. 'ऐसें संतांचें महिमान| संतसंगें होतें ज्ञान | संतसंगापरतें साधन | आणिक नाहीं' ॥ (दासबोध, दशक ७, समास १०, श्लोक ३६)

**मना संग हा सर्वसंगास तोडी।**
**मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी॥**
**मना संग हा साधका शीघ्र सोडी।**
**मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥२०४॥**

सरळ अर्थ:

हा सज्जनसंग असा असतो की त्याच्या योगे इतर संग, आसक्ती सुटून जातात. तो मोक्षप्राप्तीसाठीची पात्रता निर्माण करतो. साधकाला प्रखर साधना करावी लागण्यापासून सुटका देतो. आणि त्याच्याचमुळे ईश्वरतत्व आणि आपण यातील द्वैत नाहीसे होते.

विश्लेषण:

समर्थ संतसज्जनांचा संग आदरपूर्वक अंगिकारावा असे वारंवार सांगतात. या श्लोकात ते हा संग धरल्याने काय होते ते सांगत आहेत. सर्वप्रथम हा संग मनुष्याच्या मनातून सर्व प्रकारच्या आसक्तींचे निराकरण करतो. म्हणजे सज्जनसहवासात असताना मनात एकप्रकारची उदात्त भावना निर्माण होऊन तिच्याकडेच लक्ष लागल्याने इतर वासना, कामनांची गोडी मनात प्रवेश करू शकत नाही. आपण देवळात जातो तेव्हा आपले मन देवाच्या मूर्तीकडे भक्तिभावाने एकाग्रतेने पाहण्यात गुंतलेले असते. त्यावेळी इतर कसल्याही गोष्टीचा विचार मनात येत नाही मग वाईट विचार तर सोडाच. संतांचा उपदेश ग्रहण करत असतानादेखील हेच घडते. त्यांच्या उपदेशाचा अर्थ समजून येण्यासाठी तेव्हा आपण लक्षपूर्वक विचार करत असतो. त्यामुळे आपल्याला अमूक एक गोष्ट हवी होती, किंवा हवी आहे, ती मिळवायला जायला पाहिजे हा विचारही आपल्या मनात येत नाही. आणि संतांच्या संगतीतच आपले वास्तव्य असले तर मग काय, नित्यच सन्मार्गाचा उपदेश कानावर पडत राहिल्याने इतर साऱ्या इच्छा आकांक्षांचा विसर पडतो इतकेच नव्हे तर त्यांत काही गोडी वाटत नाही. मनाची अशी आसक्तिरहित धारणा झाली म्हणजे सहजावस्था प्राप्त व्हायला, मुक्ति, मोक्ष मिळायला जास्त वेळ लागत नाही. हा मोक्ष म्हणजे चित्तशुध्दी होणे. अशी चित्तशुध्दी संतसंगामुळे सहजासहजी शक्य होते, त्यासाठी साधकाला फार मोठी खडतर तपस्या किंवा साधना करावी लागत नाही. आता साधक म्हणजे कोण? त्याविषयी समर्थांनी दासबोधात  सांगितले आहे ते असे; (दासबोध - दशक ५, समास ९, श्लोक २ आणि ३)

अवगुणाचा करूनि त्याग| जेणें धरिला संतसंग| तयासि बोलिजे मग| साधक ऐसा॥२॥

जो संतांसि शरण गेला| संतजनीं आश्वासिला| मग तो साधक बोलिला| ग्रन्थांतरीं॥३॥

ज्याने अवगुण टाळून सत्संग धरला असेल आणि विश्वासपूर्वक संतांना शरण गेला असेल असा माणूस साधक म्हणवून घेण्यास पात्र ठरतो. तर अशा साधकाची संतसंगतीत राहून चित्तशुध्दी झाल्यावर परमार्थज्ञान मिळणेही सोपे जाते. साधक मनोमन ईश्वरतत्वाच्या जवळ पोचतो. त्याला आत्मानुभूती होते आणि मग ईश्वर आणि आपण हे द्‌वैत न राहता एकरूपच आहे हे ब्रह्मज्ञान मिळते.

**मनाची शते ऐकता दोष जाती।**
**मतीमंद ते साधना योग्य होती॥**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी।**
**म्हणे दास विश्वासत मुक्ति भोगी ॥२०५॥**

सरळ अर्थ:

मनाचे श्लोक ऐकल्यामुळे साऱ्या दोषांचे निरसन होते. श्रवण करणाऱ्यांमध्ये कोणी मंदबुद्‌धी असले तरी त्यांचीही प्रवृत्ती भक्तिमार्गाची साधना करण्याकडे होते, अंगी ज्ञान, वैराग्यसामर्थ्य बाणवते आणि अखेर मोक्षपद प्राप्त होते असे मी रामदास सांगतो.

विश्लेषण:

मागील सर्व २०४ श्लोकामध्ये परमार्थज्ञानाच्या प्राप्तीसाठी काय करायला हवे ते विवेचन केल्यानंतर समर्थांनी त्या श्लोकांच्या पठण-श्रवणाची फलश्रुती काय आहे ते या अखेरच्या श्लोकात सांगितले आहे. ते म्हणतात, हे दोनशे मनाचे श्लोक ऐकले म्हणजे सारे दोष नष्ट होतात. औषध घेतले म्हणजे रोग जातो तसेच हे आहे. आपले मन नाना विषयांच्या विचारांनी व्यापलेले असते. चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, निर्दोष-सदोष अशा सर्व प्रकारच्या विकारांनी मनात गर्दी केलेली असते. काळे ढग जसे आकाश आच्छादित करून वातावरणात अंधार पसरवत असतात तसेच हे मनातले दोष आपल्या जीवनात अंधार आणतात. पण जेव्हा

वारा त्या ढगांना उडवून लावतो आणि आकाश पुन्हा स्वच्छ, निरभ्र होते तसे हे मनाच्या श्लोकांचे श्रवण ते दोष उडवून लावतात आणि मनाला भक्तिमार्गावर घेऊन जातात.  पण ऐकणाऱ्याने ते नुसते ऐकणे पुरे असत नाही. 'अर्थांतर पाहिल्याविण ।उगेचि करी जो श्रवण ।तो श्रोता नव्हे पाषाण ।मनुष्यवेषें ॥ (दासबोध, द८, स६, श्लो७). अर्थ समजून घ्यायचा तर लक्षपूर्वक, विश्वासून ऐकले पाहिजे. तेव्हा कोठे आपले दोष समजून येतील, आपण कुठे चुकत होतो ते समजेल आणि मग भक्तिमार्गाची साधना करता येईल. ही साधना केवळ बुध्दिमंत साधकच करू शकेल असे नाही, तर मतीमंद व्यक्तिदेखील करू शकेल असा परिणाम हे श्लोक साधतील. इथे मतीमंद म्हणजे आज आपण जो अर्थ घेतो तसा मंदबुध्दी, लवकर बोध न होणारा असा नाही घ्यायचा. तर ज्याच्याकडे बुध्दी आहे परंतु तिच्यावर अज्ञानाचे, दुराग्रहाचे – ज्याला इंग्रजीत ईगो म्हणतात - जळमट साठलेले आहे, आत्मज्ञान करून घेण्याकडे प्रवृत्ती नाही असा. योग्य प्रकारे केलेले, श्रध्दापूर्वक, केलेले या मनाच्या श्लोकांचे श्रवण अशा माणसांच्या बुध्दीवर आलेला झाकोळ नाहीसे करते. आणि मग काय होते? तर अशा झाकोळरहित, जागृत, शुध्द बुद्धीला ज्ञानाचा प्रकाश मिळतो, विकारांपासून सुटका होते, वैराग्याचे सामर्थ्य मिळते आणि मनुष्यजीवनातले अंतिम ध्येय असलेली मोक्षप्राप्ती होते. याची ग्वाही समर्थ या अंतिम श्लोकात देत आहेत.

॥ श्रीराम ॥

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष आहे**

**श्री. मुकुंद कर्णिक यांचे हे ई साहित्यवरील तिसरे पुस्तक.**

श्री. मुकुंद कर्णिक यांचे बरेच आयुष्य परदेशात गेले. पण ते कायम मराठी लिहित असतात. मराठी बालकथा, लघुकथा इत्यादी त्यांचे साहित्य यापूर्वी प्रकाशित झाले आहे. त्यांची दोन पुस्तके इतर प्रकाशकांनी विक्री साठी छापली व दोन ई साहित्यने यापूर्वी प्रकाशित केली या सर्व पुस्तकांना अत्यंत चांगला प्रतिसाद वाचकांकडून मिळाला.

तरुण नवोदित साहित्यिक ई साहित्यवर आपली पुस्तके नेहमीच प्रकाशित करतात. परंतु, श्री मुकुंद कर्णिक यांच्यासारखे ज्येष्ठ लेखकसुद्‌धा आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१२), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्‌वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्‌य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२),

साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(२), यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३)असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामुहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।